THE BOOK WAS DRENCHED

TEXT FLY WITHIN THE BOOK ONLY

DAMAGE BOOK

UNIVERSAL
LIBRARY
OU_192811
UNIVERSAL
LIBRARY

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

ll No. M83M17A Accession No. M3765

uthor Madakhol Ker. G.T

Title :- Anagha -

This book should be returned on or before the date last marked below

# अ न घा

हवा मे उड़ता जाय मेरा लाल
दुपट्टा मलमल का।

म. त्र्यं. माडखोलकर

1950

मूल्य पांच रुपये

प्रकाशक
रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी,
१९१ शनवार, पुणें २

जानेवारी १९५०

Checked 1963
CHECKED 1956
Checked 1969

१. या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे, अनुवादाचे, उतारे घेण्याचे चित्रकथा तयार करण्याचे वगैरे सर्व अधिकार सौ. **शांता माडखोलकर**, गृहीतागमा, साहित्य विशारद ( हिंदी–अलाहाबाद युनिव्हर्सिटी ), 'प्रमाद', अभ्यंकर रस्ता, धंतोली नागपूर नं. १ यांच्याकडे आहेत.

२. मुखपृष्ठावरील चित्रः—श्री दीनानाथ दलाल

[illegible]

मुद्रक
मा. ह. पटवर्धन
संगम प्रेस लि.,
४०।४१ वेलस्ली रोड,
पुणें १

नागपूरचे
दानशूर रसिकाग्रणी
श्रीमंत लक्ष्मण श्रीधर
ऊर्फ बाबूराव देशमुख
यांस
स्नेहादरपूर्वक समर्पण

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- | --- |
| २७ | ३ | कॉलेजच्या वर्षारंभीच | कॉलेजच्या वर्षारंभींचा |
| ५६ | २६ | इतके नव्हे, | इतकेंच नव्हे, |
| ६७ | २४ | कसं हो हात | कसे हो हात |
| १५७ | ९ | मांडवाच्या तारणाला | मांडवाच्या तोरणाला |
| १६७ | २६ | कोण्या प्राण्याचे | कोणा प्राण्याचे |
| १७१ | १६ | वटमुरू इथें | वटवृक्ष इथें |
| १७५ | ८ | पात्रं वाटून | पात्रं वाढून |
| २०१ | १७ | आहे, अनघाच्या | आहे, हें अनघाच्या |
| २११ | २५ | यांतून न् भस्म | त्यांतून न् भस्म |
| २१५ | १३ | पुन्हा लपेटून | पुन्हां हाताने लपेटून |

• • •

# १

"जगातलीं सगळीं संकटं न् दुःखं आपल्याच मागं हात धुऊन का लागावींत हा एकच विचार सध्या माझ्या मनात घोळतोय सारखा—"

अनघा अगदीं सावकाश एक एक शब्द संथपणानें उच्चारीत म्हणाली.

पण बोलता बोलता काळयाभोर वलयानीं झाकोळलेल्या तिच्या त्या तेजस्वी टपोऱ्या डोळ्याच्या पापण्यावर आसवें तरारलीं.

"छे, छे, बरोबर नाहीं तुझा हा विचार, अनू—"

अभय तिचा क्षीण, घामानें ओलावलेला, लहानसा नाजूक थंड हात आपल्या पुष्ट, रुंद हातात घेऊन उद्गारला.

"नाहीं कसा ? आज सकाळींच मीं दादाना म्हटलं, "उभ्या जन्मांत मीं कुणाचं अनिष्ट चिंतिलं नाहीं कधीं. तरीसुद्धा माझ्या कपाळीं हे एकापेक्षां एक दुर्धर भोग यावेत याचं नवल वाटतं मला." तेव्हां ते मला म्हणाले, "अग, हें पूर्वजन्मींच्या कर्मांचं फळ आहे. या जन्मीं जें सुकृत तूं करते आहेस, त्याचीं फळ पुढल्या जन्मीं चाखायला मिळतील तुला !" त्यावर मीं त्याना म्हटलं, "काय करायचीं आहेत तीं पुढल्या जन्मींचीं फळं घेऊन मला ? मागला जन्म, आजचा जन्म आणि पुढला जन्म हे तिन्ही जर स्मरणाच्या अखंड साखळींत गुंफलेले असते, तर आपण आपल्या पूर्वजन्मींच्या कृत्याचं हें प्रायश्चित्त आज भोगतों आहोंत, या जाणिवेनं दुःखानं होरपळलेल्या समंजस माणसाला खचित थोडंसं तरी समाधान वाटलं असतं. पण, इथं तर

पूर्वजन्म आणि आजचा जन्म या चे दुवे विस्मरणाच्या आघातानं निखळून गेलेले असून, केवळ कल्पनेच्या जोरावर कसा तरी आयुष्यातल्या बऱ्यावाईट प्रसंगाचा अन्वय लावून समाधान करून घ्यावं लागतंय मनाचं. पण मी आता अशा कोणत्याहि मृगजळाला फसायला तयार नाहीं, दादा! म्हणूनच धावडशीला जाऊन भार्गवरामाची उपासना करायची तुमची कल्पनाहि मान्य नाहीं मला!! आई जन्मभर देव देव करीत निराशेंत पिचतेय तेवढी पुरे! त्यापेक्षा नियतीच्या या क्रूर, अज्ञेय सृष्टींत जे काय आघात माझ्यावर होतील, ते मी तुच्छतेनं तिच्याकडे पाहात हंसत अंगावर झेलीन. तसल्या त्या दुबळ्या काल्पनिक समाधानापेक्षा निराशेचं धैर्य परवडलं मला!" दादा अगदीं निरुत्तर होऊन गेले माझ्या या युक्तिवादानं—"

अनघानें पदराच्या टोकानें डोळ्याच्या कडा पुशीत हंसत हसत म्हटलें.

आटत चाललेल्या विहिरीच्या खोल पाण्यावर पडलेल्या उन्हाच्या कवडशा सारखें तिचें तें निराश, खेदपूर्ण हास्य वाटलें त्याला.

"पुनर्जन्म हा तर निवळ मानवी कल्पनेचा खेळ आहेच. पण आनुवंशिकतेच्या शास्त्रीय तत्त्वावरसुद्धा विश्वास उरलेला नाहीं माझा आता. दादा आणि आई हीं दोघंहि किती निरोगी, बळकट आणि दीर्घायुषी आहेत, हें पाहाताच आहात तुम्हीं. मग त्यांची एकुलती एक लाडांत वाढलेली आणि उत्तम खेळाडू म्हणून गाजलेली मुलगी जी मी, तिच्यामागं रोग आणि दुबळेपणा हात धुऊन का लागावा? मला केव्हा केव्हा असं वाटतं कीं, आपल्या जीवनांतल्या ज्या घटनाचा किंवा प्रकाराचा सरळ अर्थ आपल्याला लावता येत नाहीं, त्याची उपपत्ति बसवून स्वतःच्या मनाचं कसं तरी समाधान करून घेण्यासाठीं आपण प्रारब्धवादाच्या किंवा आनुवंशिकतेच्या कल्पना काढल्या आहेत या. पण असल्या कोणत्याच कल्पनांनी स्वतःच्या मनाची फसवणूक करून घ्यायला तयार नाहीं मी यापुढं—"

बोलता बोलता ती एकदम थांबली. पण आवेशानें तिच्या रेखीव, पातळ नाकपुड्या थरथरत होत्या. लाल चाफ्याच्या कळीसारखा आपला किंचित् कोमेजलेला निमुळता अधर तिनें पांढऱ्या शुभ्र अणीदार दंतपंक्तींत दाबला; व तिच्या त्या विरळ भुंवयाच्या मधोमध बारीक आंठी उमटली.

त्याच्या हातातून आपला हात सोडवून घेऊन तिनें दोन्ही हात छातीवर ठेवले. जणूं आपली तीव्र मनोवेदना दाबून टाकण्याची धडपड ती करीत होती. पण तिच्या पापण्यांच्या कडा मात्र पुन्हा ओलावल्या.

आपल्या मनोव्यथेची तीव्रता त्याच्या दृष्टीस पडूं नये म्हणूनच कीं काय, तिने मान किंचित् उंचावून उशाशीं गरगरत असलेल्या पंख्याकडे पाहिले आणि पदरानें तोंड पुसल्यासारखे करून म्हटलें, " काय भयंकर उकाडा होतोय् आज उजाडल्यापासूनच ! उशाशी पंखा सारखा गरगरतोय्, तरीसुद्धा कपाळ काहीं कोरडं रहात नाहीं. छे ! छे ! चैत्रातच जर जिवाची इतकी तलखली होतेय, तर वैशाखाच्या महिन्यात काय होईल कोण जाणे !—"

अभय विषयांतर करण्याची संधीच पाहात होता. त्याने चटूदिशीं तिला विचारले—

" मग दादाबरोबर जायचं का महाबळेश्वरला आपण ? यंदा आपला तिकडे यायचा विचार नाही असं कळवलं होतंस तूं त्याना, म्हणून ते बिचारे मुद्दाम आपल्याला न्यायला आले साताऱ्याहून इतक्या लांब. मग जायच ना महाबळेश्वरला आपण ?—"

" नाहीं ! यंदा कसं जाता येईल महाबळेश्वरला आपल्याला ! गेल्या वर्षी निरुपमाला जेव्हा आपण आपल्याबरोबर तिथं नेली, तेव्हा तिनं कबूल करून घेतलं होतं माझ्याकडून यंदा तिच्याबरोबर पचमढीला जायच. ते वचन पाळलं पाहिजे आपल्याला आता. गेली दहा अकरा वर्षं आपण जातोच आहोत महाबळेश्वरला सारखी. यंदा पंचमढीला जाऊं या. दर वर्षी त्याच त्या ठिकाणीं जाण्यापेक्षा एखादे वेळी वेगळया ठिकाणीं गेल्यानं तेवढाच मनाला निराळेपणाचा आनंद लाभतो—"

" पण दादाना काय वाटेल ? ते मुद्दाम इतक्या लांब आले या वयांत—"

" त्याना माझ्यापासून आतापर्यंत काय मोठं सुख झालय, तर या नकारानं वाईट वाटायचंय त्याच्या मनाला ? एकदा आपण त्यांच्याबरोबर

साताऱ्याला गेलों, म्हणजे ते मला धावडशीला, शिखर-सिंघणापूरला किंवा पंढरपूरला घेऊन जातील पण मला आता कोणत्याहि देवाचं तोंड पाह्यची इच्छा नाही मुळींच—"

तें वाक्य उच्चारून ती काही क्षण थांबली आणि पुन्हा आवेशानें उद्गारली—

"दादाना मीं हेंहि सांगून टाकलं आज सकाळी कीं, "उभ्या आयुष्यात आम्हीं कोणाचं अनिष्ट चिंतिलं नसतानासुद्धा ज्या अर्थी हीं संकटं आमच्यावर एकामागून एक सारखीं कोसळताहेत, त्या अर्थी या जगात परमेश्वर नाहीं असंच समजते मी. लग्न झाल्यापासून गेलीं बारा वर्षं मी छायेसारखी त्यांच्या पाठीशी उभी आहें. आमचा उत्कर्ष न पाहावल्यामुळं अनेकानीं अनेक प्रकारचे आघात त्यांच्यावर केवळ दुष्टाव्यानं केले. त्या आघातानी ते कधीं खचले नाहींत; पण माझ्या हृदयाला मात्र जखमा झाल्या. त्याहि जखमा मी मुकाट्यानं सोसल्या. पण, माझ्यावर जो हा आघात आता आमच्या दुर्दैवानं केला आहे, तो मी सोसूं शकत नाहीं, तेहि सोसू शकणार नाहींत जगातले सगळे असाध्य रोग आणि सगळीं अमानुष संकटं आमच्या माग हात धुऊन लागावींत, हा काय न्याय समजायचा का देवाघरचा ? इतका तुमच्या देवानं किंवा दैवान आमचा सूड घ्यायला असं काय कुणाचं घोड मारल होतं आम्हीं ?" दादाचा सगळा वेदात अगदीं लटपटून गेला माझ्या या बोलण्यापुढं—"

"दादाचा वेदात लटपटला असेल, पण माझा वेदात लटपटणार नाहीं, अनू. आपल्यावर सारखे आघात झाले याबद्दल तक्रार नाही माझी मुळींच ; किंवा मी कुंतीप्रमाणं विपत्कालाचा वरहि मागणार नाही कधी. विपत्तींत देवाचं स्मरण जागृत रहातं म्हणून विपत्कालाचा वर मागायचा, याचा अर्थच हा कीं, आपली श्रद्धा निरपेक्ष नाही आणि जिवंतहि नाहीं. माधवरावाच्या त्या ओळी आठवतात ना तुला ?—"आकाशिंच्या कुऱ्हाडी। माथा खुशाल पाडी ॥ आघात सोसण्याचें सामर्थ्य मात्र द्यावें ॥"—तो वर मागेन मी देवाजवळ ! संकटाचे घाव एकसारखे मस्तकावर पडायलासुद्धा

भाग्य लागतं. भट्टींतून गेल्याशिवाय सोन्याला तेज चढत नाही आणि लोखंडाचं पोलाद बनत नाही. भूगर्भातील उष्णतेनं हजारो वर्षं होरपळून निघावं, तेव्हा कोळशाला हिरेपण लाभतं. ते भाग्य आपल्या कपाळी आलंय, असंच समजतों मी––"

"तुम्ही खुशाल समजा! पण, मी मात्र असं समजतें कीं, दैवानं आपला सूड आरंभलाय! अगदीं लग्नापासून पाहाते आहे मी, आपला प्रीतिविवाह-सुद्धा तुमच्या दुर्लौकिकाला आणि नोकरी जाण्याला कारण झाला––"

"पण त्यामुळं नुकसान झालं का आपलं काही? उलट आपल्या आयुष्यात संकट हीं उत्कर्षाला कारण होतात असाच अनुभव नाही का आपला?––"

"हो. त्या मद्रासी प्रोफेसराच्या कारस्थानामुळं तुमचा सायन्स कॉलेजचा प्रिन्सिपल् व्हायचा योग हुकला, तेव्हासुद्धा तुम्ही हेंच म्हणाला होतात; न् माझं असं उलट समाधान केलं होतंत कीं, प्रिन्सिपल् होऊन कॉलेजच्या कारभाराचा खटारा ओढीत बसण्यापेक्षा संशोधन करण्यातच खरं बुद्धीचं साफल्य आहे. त्यानंतर लवकरच तुम्हाला सायन्स कॉंग्रेसचं अध्यक्षपद मिळाल्यामुळं तुमचं ते म्हणणं शोभूनहि दिसलं त्या वेळी. पण मला झालेलं हें भयंकर दुखणं!–हें कोणत्या उत्कर्षाला कारण होणार आहे आपल्या?–"

"ते कसं सांगता येईल आज? पण या दुखण्यानं इतकं खचून जाणं शोभत नाही तुला खरोखरी! तुला आठवतं, अनू? नऊ वर्षांपूर्वी जेव्हा माझं रक्त देऊन शस्त्रक्रिया करावी लागली तुझ्यावर, तेव्हा तें जिवावरलं संकट असतानासुद्धा तूं घाबरली नव्हतीस इतकी! काल तो जॉन गंथरने कॅन्सरला बळी पडलेल्या आपल्या एकुलत्या एका मुलाच्या मृत्यूवर लिहिलेला 'डेथ, बी नॉट प्राऊड' हा लेख वाचल्यावर तूं जेव्हा मला म्हणालीस कीं, 'मृत्यूच्या नजरेला नजर देत अशा रीतीनं रोगाशीं झगडण्यात मातब्बरी आहे माणसाची!' तेव्हां मला धन्यता वाटली होती तुझ्या धैर्याबद्दल. पण आज सकाळपासून तूं अगदीं निराळं बोलते आहेस. वास्तविक कॅन्सरच्या

मानानं तुझं दुखणं किती तरी सौम्य. आणि तरी तूं असं धीरं सुटल्यासारखं बोलावंस ?––"

"बोलूं नये तर काय करूं, अभय ? पाठींतल्या वेदनानीं काल रात्रीपासून तळमळतेय मी. शिवाय मरण—तारुण्यात येत असलेलं मरण—कुणाला हो गोड वाटेल ?—"

तिचे डोळे पुन्हा भरून आले. तो अगदीं स्तब्ध होता. फक्त खालीं वांकून त्यानें तिच्या गरम कपाळावर हलकेच आपला हात ठेवला. त्याबरोबर तिनें तो हात जोरानें दाबला आणि म्हटलें—

"किती बरं वाटलं तुमच्या हाताच्या स्पर्शानं मला ! जणू कोलन वॉटरची थंड घडीच ठेवली आहे माझ्या कढत कपाळावर––"

तिनें त्याचा दुसरा हात चटकन् धरून आपल्या आसवानीं भिजलेल्या गालावर आणि थरथरणाऱ्या ओठावर ठेवला.

"फार फार बरं वाटतं. काय जादू आहे हो तुमच्या स्पर्शात !—"

"आता बारा वर्षं लग्नाला होत आलीं आपल्या, तरी ती जादू कमी झालेली नाहीं का मुळीच ? माझी प्रकृति थंड आणि तुझी उष्ण. त्यामुळं माझा शीतल स्पर्श सुखकर वाटतो तुला इतका. दुसरं काही नाहीं––"

"आणि तुम्हाला नाहीं का माझा स्पर्श सुखकर वाटत ?—"

"नाहीं कसा ? वाटतो ना ! ते ओघानंच येतं. ज्या कारणामुळं तुला माझा स्पर्श सुखकर वाटतो, त्याच कारणामुळं मला तुझा वाटतो—"

"अगदीं खरं ?—"

"का बरं ? शंका का आली तुला ?—"

"शंका अगदीं सकारण आली. बारा वर्षांपूर्वी कॉलेजातल्या टेनिसच्या सामन्यात जिला तुम्हीं खेळताना पाहिलत, जिचं उन्मुक्त, चपल यौवन पाहून तुम्ही मोहित झालात न् कॉलेजची नोकरी लाथाडून तुम्हीं जिच्याशीं लग्न केलत,

ती अनघा निराळी, आणि आजची रोगानीं पोखरलेली ही अनघा निराळी! लग्नानंतर त्याच दिवशीं संध्याकाळीं काढलेला तो आपला फोटो पाहिला, म्हणजे मला अलीकडे केव्हा केव्हा वाटतं, तुम्ही जिच्या मांडीला मस्तक टेकून बसलेले आहात त्या फोटोंत, ती तरुणी माझी सवत तर नव्हे?—"

" स्त्रीस्वभाव काय अजब आहे, अनू? त्या फोटोंतली बारा वर्षांपूर्वीची तूं!— ती तुझी छायाच तुला आज सवत वाटायला लागली का?—"

" का नये वाटूं? त्या वेळची ती टेनिसच्या सामन्यातले कप जिंकणारी अनघा आणि आजची अंथरुणावर तळमळत पडलेली अनघा! काहीं साम्य आहे का त्या दोघींत? आजची रोड, दुबळी, रोगट अनघा हें त्या टेनिस चॅम्पियन म्हणून कॉलेजात गाजलेल्या अनघाचं भूत आहे केवळ!— मला आठवतं, आपण त्या दिवशी रात्रीं पुनवेच्या चांदण्यात वेताळावर फिरायला गेलों असतां तुम्हीं ज्या वेळीं प्रथम ओढून मला जवळ घेतलंत, तेव्हा म्हणाला होतात, " तुला कितीहि हृदयाशीं घट्ट धरलं, तरी तुझं निराळेपण नाहींसं होत नाहीं; तुझ्यामाझ्यातलं अंतर कमी झालंसं वाटत नाहीं. जों जों तुला ओढून घट्ट जवळ घ्यावं, तों तों तुझ्या शरीराचं मार्दव अत्यंत सुख देत. पण, त्या मार्दवात असा काहीं कठीणपणा आहे कीं, तुला आपल्या हृदयाशीं सारखं घट्ट कवटाळूनहि कवटाळल्यासारखं वाटत नाहीं; आपल्या दोघातलं अंतर तुटूनहि तुटल्यासारखं वाटत नाहीं. सगुणोपासक जें अद्वैतातलं द्वैत म्हणतात, तें हेच असेल का? खरोखरी, लोण्यापेक्षा मऊ पण न वितळणारी, फुलापेक्षा नाजूक पण न कुस्करणारी आणि कापसापेक्षा हलुवार पण न दबणारी अशी जर जगांत कोणती अजब चीज असेल, तर तें स्त्रीचं शरीर!" प्रीतीच्या पहिल्या उन्मादातले तुमचे ते उद्गार!—तुम्ही वैज्ञानिक आहात कीं कवि आहात, हे कळेना मला!—"

" बारा वर्षं झालीं त्या मार्गशीर्षातल्या पूर्णिमेला आता. तरीसुद्धा माझा शब्द न् शब्द आठवतोय तुला आज, अनू?—"

" कां नाहीं आठवणार? आणि तुम्हांला नाहीं का आठवत माझ्य इतकाच? पूर्णिमेची ती शांत, गंभीर रात्र, वेताळाची ती निर्वृक्ष, निर्जन

निःशब्द पण चादण्यानं उजळून निघालेली त्या रात्रींइतकीच श्यामशीतल टेकडी, आकाशाच्या मध्यावर आलेला तो रोहिणीच्या योगताऱ्याजवळचा पूर्णचंद्र आणि त्या उघड्या हवेतल्या नैसर्गिक एकातात दशदिशाना साक्ष ठेवून घेतलेलं ते पहिलंच आलिंगन!—तो सारा विलक्षण प्रसंग—त्यातला तो सभय उत्कंठेचा आणि अतृप्त सुखाचा प्रत्येक क्षण— आपण विसरूं का कधीं तो प्रसंग युगं उलटलीं तरी?"

बोलतां बोलता तिनें त्याची कराङ्गुलि आपल्या दातात धरून तिला हळूच दंश केला आणि एक उसासा टाकून म्हटलें—

"हं! बारा वर्षे होऊन गेलीं नाहीं त्या प्रसंगाला! किती भुर्रकन् गेलीं बारा वर्षं! —"

ती क्षणार्ध थाबली आणि लगेच आठवल्यासारखें करून उद्गारली, "खरंच, निरू काल संध्याकाळीं आली होती आपण पचमढीला केव्हा जायचं हें ठरवायला. तिथं येत्या मेच्या पंचवीस तारखेला आपल्या लग्नाचा वाढदिवस साजरा करायचा बेत आहे तिचा. मग चलायचं ना पचमढीला?—"

"हो, जायला काहीं हरकत नाहीं. मात्र त्याच्या घरी उतरायचं नाहीं. तिथं स्वतंत्र बंगला घेऊन राहूं आपण. पण तुला झेपेल नौ मोटरच्या प्रवासाची दगदग?—"

"नाहीं झेपली तर होईल त्रास तीन-चार दिवस; पण, नंतर तर महिना दीड महिना मजेंत जाईल ना आपला? दादा मला फार तर पुण्यापर्यंत विमानानं नेऊं शकले असते. पण पुढं महाबळेश्वरला मोटारनंच जावं लागलं असतं ना? त्यापेक्षा काहीं पचमढीला जाण्याची दगदग जास्त नाहीं. शिवाय, इथं वाळ्याच्या ताट्यातल्या कोंदट वातावरणात मृत्यु जवळ येत असल्याची पावलोंपावलीं आठवण करून देणारे भोंवतालच्या माणसांचे भकास चेहरे पाहात दिवस काढण्यापेक्षा थोडाबहुत त्रास सोसून पचमढीला गेलेलं फार बरं —"

" ठीक आहे. निरुपमा आल्यावर ठरवूं आपला कार्यक्रम डॉक्टरांच्या सल्ल्यानं--"

" हें पहा, डॉक्टराच्या सल्ल्यावर मुळीच अवलंबून ठेवायचा नाहीं आपला कार्यक्रम, अभय! जायचं म्हणजे जायचं! आयुष्याचे जे काय थोडे दिवस आता उरले असतील, त्याचा प्रत्येक क्षण तुमच्या सहवासात सुखानं घालवायचा ठरवलाय् मीं--"

" पण निरुपमाला येऊ तर देशील! तिच्याशीं एकदां बोलून घेतों मी; काय सोयी गैरसोयी आहेत त्या पहातों; न् मग जाऊ आपण पचमढीला!"

" ही पहा, आलीच निरू! शंभर वर्षं आहेत बाई तुला-- "

" नकोत ग बाई तीं शंभर वर्षं मला! तुझ्या या आशीर्वादाप्रमाणं जर खरोखरीच शंभर वर्षं जगलें मी, तर आपल्यावर लुब्ध झालेल्या देवांगनेजवळ अमरत्वाचा वर मागून नंतर पस्तावलेल्या टेनिसनच्या टिथॉनससारखी गत होईल माझी! तसलं तें म्हातारं परावलंबी शरीर घेऊन शंभर वर्षं चिरचिर करीत कसं तरी रखडत जगण्यापेक्षा तारुण्यात हृदयक्रिया बंद पडून मरण आलेलं पुरवेल मला-- "

" उगाच बोलायच्या गोष्टी आहेत या, निरू! तारुण्यातलं मरण कोणाला आवडलंय बाई? तूं अजून अविवाहित आहेस. नवरा न् संसार याची गोडी अनुभवलेली नाहींस. म्हणून तारुण्यात मरण्याच्या गोष्टी सुचताहेत या तुला. चांगली अष्टपुत्रा हो न् नातवंडं खेळव म्हातारपणीं मांडीवर, असा आशीर्वाद आहे तुला माझा-- "

" मला जें एवढं दीर्घायुष्य देते आहेस तूं, त्यातलं जर निम्मं तुझ्या वाट्याला येत असेल, तर शंभर वर्षांचा तुझा आशीर्वाद मस्तकीं झेलायला तयार आहें मी, अक्का! बरं, पण पचमढीला जायचं ना पुढल्या आठवड्यात आपण? तसं कळवायला हवं आप्पाजींना मला--"

" मला काय विचारतेस? यांना विचार- "

" मग काय डॉक्टरसाहेब, जायचं ना आपण?- "

" हो. पण डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा मला एकदा. पचमढीची हवा थोडी मलेरियस् आहे म्हणतात. प्रवासाचा त्रास न् हवेचा बदल हीं दोन्ही सोसलीं पाहिजेत ना हिला ?— "

" नाहीं सोसलीं, तर तिथंच कायमची राहीन मी ! पचमढीसारख्या सुंदर स्थळीं जर मरण आलं, तर मरताना तेवढं तरी एक समाधान वाटेल जिवाला—"

" मरणाच्या गोष्टी कशाला बोलतेस, अक्का ?— "

" अग, येऊन जाऊन याना माझ्या मरणाची भीति. गेलीं दहा वर्षं माझीं दुखणीं काढताहेत हे एकामागून एक ! न् तरी याना मी मरेन असं भय वाटत असतं सारखं. माझ्या चिवटपणाबद्दल अद्याप खात्री झालेली नाहीं याची. हें पहा, काहीं झाल तरी येत्या पाच तारखेला आपण पचमढीला जायचंच— "

" बरं, जशी तुझी मर्जी. मग निरूताई, तुम्ही कळवा तसं आप्पाजींना. म्हणजे मीं आधीं तिथं जाऊन बंगला ठरवून येतों; न् लगेच निघूं आपण जायला— "

" म्हणजे ? आमच्याकडे नाहीं राहणार तुम्ही, अक्का ? आमचा बंगला चागला प्रशस्त न् हवाशीर आहे ग. सभोंवतीं सरकारी बगीचा असून पचमढी क्लबहि जवळ आहे अगदी. तुम्हा दोन माणसाना वेगळा बंगला कशाला ग हवा ?— "

निरुपमा अगदीं हिरमुसून बोलत होती. तिचा गोड हंसरा चेहरा विषादानें उतरून गेला होता. मृग नक्षत्रातल्या मृगाच्या पोटांत घुसलेल्या तिरप्या बाणासारखीं जीं तीन आडव्या मोत्याचीं कुडीं तिच्या कानांत लकाकत होतीं, त्यावर ढगाच्या ढेंकळासारख्या आलेल्या केसाच्या बटा करांगुलीनें मागें सारीत ती अभयला म्हणाली—

" तुम्ही आमच्याकडे राह्यलात तरी कांहीं गैरसोय होणार नाहीं डॉक्टरसाहेब, तुमची. बंगल्याची एक बाजू आप्पाजींनीं मोकळी करून ठेवली आहे तुमच्यासाठीं— "

" तूं आग्रह करूं नकोस त्याना, निरू. ते पचमढीला आले, तरी त्याचे उद्योग चालू राहणार नेहमीसारखे; न् म्हणून आम्ही स्वतंत्र राहणंच सोयीचें होईल. शिवाय, माझ्या दुखण्याचं स्वरूपहि असं आहे कीं, आम्ही कुणा कुटुंबात राहणं इष्ट नाहीं मुळींच. त्याना आधीं बंगला ठरवून येऊं दे न् मग निघूं आपण— "

" मला तिथल्या त्या मलेरियस् हवेची फार भीति वाटते— "

" पण डॉक्टरसाहेब, या दिवसात काहीहि त्रास नसतो मलेरियाचा. पचमढी म्हणजे अलका आहे खरोखरी, अक्का ! तिथं गेल्याबरोबर बरं वाटेल तुला — "

" अलका खरीच ! छोटा न् बडा दोघेहि महादेव राहतात ना तिथं ! शिवाय गौरकाय यक्षयुग्मं आणि अर्धनग्न किरातमिथुनंहि दृष्टीस पडतील तिथं आपल्या ! मग आता तरी ठरलं ना पचमढीला जायचं नक्की ?— "

" हो. तूं फार हट्टी झाली आहेस, अनू — "

" हट्ट ? छे ! हट्ट नाहीं हा मुळीच ! सुखाचा प्रत्येक क्षण पदरांत पाडून घेण्यासाठीं धडपड आहे ही माझी ! देवानं तुम्हाला इतकं मानसिक न् शारीरिक बळ दिलंय अभय, कीं तुम्हाला कल्पना नाहीं यायची कधीं ऐन तारुण्यात खचलेल्या मनाच्या न् पिचलेल्या शरिराच्या तगमगीची ! —"

# २

आणि, तारुण्याचा बहर ही मुसमुसणाऱ्या जीवनाची भरती ठरण्याऐवजी ओहोटी ठरावी, असाच खरोखरी दैवयोग होता अनघाचा.

अनघा ही साताऱ्चे अग्रगण्य वकील रा. ब. दादासाहेब आगटे याची एकुलती एक मुलगी. आगट्यांचें घराणें हे छत्रपतींचे आश्रित. साताऱ्याला त्यांचे सुंदर पिढीजात राममंदिर होतें; व धावडशीला त्याचा वाडा आणि इनाम जमीन होती. वकिलीचा जम बसल्याबरोबर दादासाहेबांनीं साताऱ्च्या गणेश टेकडीवर दोन एकर जागा घेऊन तेथें प्रशस्त बंगला बांधला. पण, त्याना संपत्तीचें सुख जरी सुलभतेनें लाभलें, तरी संततीचा लाभ मात्र लवकर झाला नाहीं. उमाबाईंना एकामागून एक पाच मुलगे झाले खरे; पण ते रांगते होण्याच्या आधींच मृत्युमुखीं पडल्यामुळें त्यांच्या त्या समृद्ध संसारावर दुःखाचा ढग डवरल्यासारखा झाला. म्हणून उमाबाईंना जेव्हा सहाव्या खेपेला दिवस गेले, तेव्हा त्या धावडशीला जाऊन राहिल्या; व ब्रह्मेंद्रस्वामींच्या मठात रोज पूजातीर्थासाठीं जाऊन त्यांनीं भार्गवरामांची मोठ्या भक्तिभावाने उपासना केली. तथापि, त्या उपासनेचे फळ, त्यांच्या अपेक्षेनुसार, पुत्ररूपाने प्राप्त होण्याऐवजीं त्याना गोडस गुटगुटीत मुलगी झाली.

तीच अनघा.

तिच्या जन्मानें त्या अपत्यहीन घरात आनंद आणला.

पण अनघा हें त्यांचें शेवटलें अपत्य ठरलें. त्यामुळें, उमाबाईंची पुत्रमुख पाहाण्याचीं इच्छा जरी अपुरी राहिली, तरी आपल्या सुदृढ, सुरेख मुलीकडे

पाहून त्या आनंद मानीत आणि कौतुकानें म्हणत कीं, "हिचा पहिला मुलगा आम्ही माडीवर घेऊं. तोच वंशवेल वाढवील आमचा! — "

म्हणून अनघाला पधरावें वर्ष लागताच उमाबाईनीं तिच्या लग्नाबद्दल दादासाहेबाच्या मागे सारखी भुणभुण सुरू केली. वयाच्या मानाने ती उंच आणि उफाड दिसत असे. खेळणे, धावणें, पोहणें, घोडयावर बसणे वगैरे निरनिराळया प्रकारच्या व्यायामाचा नाद दादासाहेबानीं तिला लावल्यामुळे तिचें मन आणि शरीर या दोहोंची वाढ अनिर्बंध झाली; व डोंगरी कबुतराच्या ठुमकदार ठेवणींत जसा नाजूकपणाची नजाकत आणि जंगलीपणाचा जोम याचा मनोहर मिलाफ झालेला असतो, तसा तिचा बाधा त्या खुल्या व्यायामामुळें कोमल पण कणखर आणि रेखीव पण रगदार झाला होता. साताऱ्यातील माणेकजी आणि कूपर या दोन्ही धनाढ्य पारशी घराण्याशीं दादासाहेबाचा वकील या नात्यानें घनिष्ठ संबध होता; व अनघा त्याच्याबरोबर नेहमीं या दोन्ही कुटुंबाच्या बंगल्यावर जात असे. त्यामुळें, तिच्या ठिकाणी पाश्चात्य राहणीविषयीं आवड निर्माण होऊन, तिच्या वर्तनात स्वैरतेचा आभास उत्पन्न व्हावा अशा प्रकारची धिटाई आली. पेरीन, पिरोज, रतन आणि अलू या त्याच्या चार समवयस्क मुलींबरोबर जो टेनिस खेळण्याचा नाद तिला लागला, त्यामुळे तिच्या शरिराच्या सौष्ठवाला चापल्याची जोड मिळून, तिच्या गतींत लय, विभ्रमात ओज आणि दृष्टीत निर्भयता आली. पारशी कुटुंबाच्या साहचर्यामुळें तिच्यात पडत चाललेला तो फरक उमाबाईना मात्र मोठा भीतिप्रद वाटे. त्याच्या मनात येई, साहेबी थाटावर चाललेली आपली ही एकुलती एक मुलगी जर उद्या एखाद्या पारशी तरुणाचा हात धरून कुठें निघून गेली, तर आपल्या जुन्या बाळबोध घराण्याला केवढा बट्टा लागेल? म्हणून ती मॅट्रिकच्या वर्गांत जातांच तिचें लग्न करून टाकण्याचा हट्ट त्यानीं दादासाहेबापाशीं धरला; व त्यानाहि पत्नीची ती भीति विचारार्ह वाटून त्यानीं स्थळे पहावयाला सुरवात केली.

दादासाहेबांचे एक लहानपणचे सहाध्यायी कर्नल नूलकर हे मुंबईच्या डॉक्टर मंडळींतील एक बडे धेंड होते. वैद्यकीच्या अभ्यासासाठीं विलायतेस जाण्याच्या विचारात असलेल्या त्यांच्या एकुलत्या एका देखण्या मुलाशीं अनघाचा विवाह व्हावा, म्हणून दादासाहेबांनीं खटपट सुरू केली. साताऱ्यासारख्या मागासलेल्या शहरातील एका जुनाट घराण्यातल्या मॅट्रिकच्या वर्गांत असलेल्या मुलीशीं लग्न करण्याची त्या मुलाची मुळींच इच्छा नव्हती. पण, लष्करी राहणीच्या चवचाल ढंगामुळें कफल्लक होऊन बसलेल्या कर्नल-साहेबांना साताऱ्याच्या डोंगरखोऱ्यातले हें भारी सावज हातचे सुटूं देणें शहाणपणाचें वाटलें नाहीं; व म्हणून मुलगा आणि बायको यांची मोठ्या मुष्किलीनें समजूत घालून ते त्यांच्यासह मुलगी पाहाण्यासाठीं सातारला आले.

दादासाहेबांनीं आपल्या एका बड्या वकील-मित्राच्या घरीं त्यांची उतरण्याची उत्कृष्ट व्यवस्था केली होती. संध्याकाळीं चारच्या सुमारास मुलगी पाहाण्यासाठीं कर्नलसाहेब आपल्या पत्नी आणि चिरंजीव यांच्यासह दादा-साहेबांकडे आले. दादासाहेबांनीं त्यांचे स्वागत सुंदर केलें. पण चहा, फराळ, धूम्रपान, हवापाण्याची चौकशी वगैरे कार्यक्रमात तास उलटून गेला, तरी मुलगी बाहेर येण्याचें कांहींच चिन्ह दिसेना. तेव्हां पाहुणे मंडळी चमकून जाऊन चुळबुळ करूं लागलीं.

शेवटीं डॉक्टरीणबाई कर्नलसाहेबांकडे सरोष कटाक्ष फेंकीत फण-काऱ्यानें उद्गारल्या, “ आज दिवस चांगला नाहीं वाटतं मुलगी पाह्यला ? तसं असेल, तर अगोदर पंचांग बघून का नाहीं बोलावणं केलं आपल्याला ? साताऱ्ची रीतभात कांहीं मुलखावेगळीच दिसतेय !—”

त्यांनीं हाणलेला तो रामटोला अंगावर आदळताच बिचारे दादासाहेब अगदीं ओशाळून गेले; व हात जोडून म्हणाले, “ आपण माफ करा आम्हाला, वहिनीसाहेब ! मुलगी कुठं बाहेर गेली आहे, ती अजून आली नाहीं. त्यामुळं खोळंबा होतोय आपला याची जाणीव आहे आम्हांला. मोटर मघाशींच गेली आहे तिला आणायला.—”

" म्हणजे ? ती कुठं गेली आहे हे माहीत नाहीं कीं काय आपल्याला ? चांगलंच बाळबोध वळण दिसतंय म्हणायचं ! आपल्या जुन्यापुराण्या सातारा शहरानं आमच्या सुधारलेल्या बकाल मुंबई शहरावर मात केली खरोखरी ! घरीं आपल्याला पाहायला यायचे आहेत मुंबईहून मुद्दाम आपल्या वडलाचे स्नेही, हे सांगितलं नव्हतं वाटतं तिला तिच्या मातुश्रींनीं ? नवलच आहे बाई ऐकावं तें एक एक—"

आपल्या लठ्ठ दडात घट्ट रुतून बसलेलें केयूरक थोडे खालीं ओढण्याचा प्रयत्न करीत डॉक्टरीणबाई रागारागानें उद्गारल्या.

तोंच शोफर आत येऊन अदबीनें दादासाहेबाना म्हणाला, " छोट्या बाईसाहेब म्हणतात, खेळ संपल्यावर होमीसाहेब शहरात यायचे आहेत, त्याच्याबरोबरच येईन मी त्याच्या गाडींतून !—"

त्यानें सांगितलेला तो निरोप ऐकताच दादासाहेबाचा चेहरा खाडकन् उतरला; पण आपल्या मनाचा क्षोभ आवरून त्यानीं शोफरला अगदीं शांतपणाने विचारले,—

" तूं सांगितलं नाहीस त्यांना मुंबईची बडी पाहुणेमंडळी आलेली आहेत घरीं म्हणून ?—"

" हो, सांगितलं—"

" मग काय म्हणाल्या त्या ?—"

शोफर यावर प्रथम काहीं बोलला नाही. त्याने एकवार साभिप्राय दादासाहेबाकडे पाहिले आणि नंतर तो अगदीं लीनतेनें म्हणाला, " बाईसाहेब खेळात अगदी गर्क होत्या. त्याचं लक्ष नाही गेलं माझ्या बोलण्याकडे. म्हणून थोडा वेळ थाबून परत आलों—"

" ठीक ! पण तूं जसा आलास तसाच पुन्हा गाडी घेऊन जा आणि तिला घेतल्याशिवाय परत येऊं नकोस—"

दादासाहेब किंचित् रुष्ट, हुकमी आवाजात उद्गारले.

नंतर ते कर्नलसाहेबाकडे वळले आणि बळेंच स्मित करून आर्जवी सुरात म्हणाले, " आमच्या अनूला टेनिसचा फार शोक आहे बघा! एकदा ती खेळायला लागली म्हणजे भान नाहीं रहात तिला कशाचेंहि. हे पाहा तिनं आतापर्यंत जिंकलेले कप—"

त्यानीं समोर छोट्या बिलोरी कपाटात ओळीनें उभ्या केलेल्या चांदीच्या लहानमोठ्या कपांकडे आणि ढालींकडे कौतुकानें बोट दाखविलें.

" करायचे आहेत काय ते कप पाहून? असले दिखाऊ कप आम्हाला दाखवीत बसण्यापेक्षा ती जर चहाचे कप घेऊन आमच्यासमोर आली असती, तर सार्थक तरी झालं असतं आमच्या इतक्या लांबून आज इथं येण्याचं! आम्हाला एकुलती एक सून घरात आणायची, ती काहीं जिमखान्यावर जाऊन टेनिस खेळण्यासाठी नाहीं हो!—"

" आई, पण सातारची एवढी नामांकित टेनिस चॅंपियन एकदा पाह्यला मिळाली असती तर बरं झालं असतं—"

चिरंजीव त्या कपाकडे पाहात मध्येंच कुतूहलानें उद्गारले.

" मग पाहा की जाऊन त्या कोणा पारशाकडे ती खेळतेय तें! खालीं आहेच मोटर उभी आयती. अलीकडल्या मुलाची आवड चमत्कारिकच आहे बाई!—"

" अग, चमत्कारिक कसली? हा कॉलेजात रोज टेनिस खेळतो मुलीं-रोबर, त्यामुळं याला साहजिकच वाटतंय, कीं इतके कप जिंकणाऱ्या मुलीला एकदा तरी पहावं म्हणून—"

कर्नलसाहेबानीं आपल्या पत्नीची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

त्याबरोबर डॉक्टरीणबाई आपल्या बोजड नाकाचा नथीनें भारावलेला लाल शेंडा रागानें उडवीत कडाडल्या—

" मग टेनिस कोर्टावरच का नाहीं ठेवलात हा पाहाण्याचा समारंभ? आणि माझ्यासारख्या जुन्यापुराण्या बाईला कशाला आणलीत मुलगी

पाहाण्यासाठीं इतक्या लांब ? छे, छे ! तुम्ही बापलेक खुशाल जाऊन पाहा त्या मुलीला; न् पडली पसंत तर लग्नहि करूं दे याला तिच्याशीं ! नाहीं तरी हा जाणारच आहे विलायतेला लग्न झाल्याबरोबर ! तेव्हां वरातच मुळीं परस्पर जाऊ दे सातान्याहून थेट विलायतेस ! माझी मेलीची सुनमुख पाहाण्याची हौस नाहीं पुरली तर नाहीं पुरली. आजकालचीं तरुण मुलं आपल्या हौसेसाठीं न् सुखासाठीं लग्न करतात. त्याना हवे आहेत कुठं आई-बाप ? त्यातून बाप पैशासाठीं तरी हवा असतो मुलाना. पण आई बापडी दूध आटल्याबरोबर भाकड होऊन बसते नाही रे ? केळीचा घड काढल्यावर जशी केळ कापून टाकतात, तसं जिणं आहे खरोखरी आम्हा बायकाचं ! जा बाबा, टेनिस कोर्टावरच लग्न उरकून घे आपलं त्या होमीसाहेबाच्या साक्षीनं आणि मुंबईला जो गाडीतून उतरशील तो तसाच थेट विलायतेच्या बोटीवर चढ आपल्या बायकोसह ! वाटलं मला सुनमुख पाहावंसं, तर बोटीवर येऊन मी साखर घालीन तुमच्या तोंडात. तीसुद्धा तुम्हीं मला बघून तोंड वाकडं नाहीं केलंत तर हो—"

" अग आई, तूं काय भलभलतं बोलते आहेस हें ? आणि इतकं रागवायला काय झाल तुला ?— "

" काहीं झालं नाहीं खरंच ! आपण इथं आल्याला तब्बल दोन तास होतील आतां, आणि तरी मुलीला खेळ सोडून इकडे यायला वेळ होत नाहीं, ही काय रीत झाली का ? तुम्हा बापलेकांना पसंत असेल ही रीत तर माझं काहीं म्हणणं नाहीं हो ! पण मी मात्र निघालें आता. मुलीच नाहीं तर नाहीं, पण निदान यांच्या रामाचं तरी दर्शन घेईन म्हणतें—'

डॉक्टरीणबाई तणतणतच उठून उभ्या राहिल्या—

आणि वधूपरीक्षेचा तो समारंभहि तत्क्षणींच संपुष्टांत आला.

• • •

त्या दिवशीं सूर्यास्तानंतर जेव्हा अनघा घरीं परत आली, तेव्हा उमाबाईनीं ढुंकूनहि तिच्याकडे पाहिलें नाहीं. त्या तुळशीपुढें दिवा लावून संतप्त मनानें माळ ओढीत बसल्या होत्या.

पण दादासाहेब मात्र तिला रागारागानें म्हणाले, "अनू, हें शोभलं का तुला !—"

"काय केलं न शोभण्यासारखं दादा, मीं !—"

तिनें आपली रॅकेट प्रेसमध्यें बसवीत फणकाऱ्यानें विचारलें.

"काय केलं ? अग, कर्नेलसाहेब तुला पाहाण्यासाठीं आपल्या कुटुंबाला न् चिरंजीवांना घेऊन मुद्दाम मुंबईहून इथं आले न् तूं आपली खुशाल होमीसाहेबाच्या बंगल्यावर जाऊन टेनिस खेळत बसलीस ! ही काय रीत झाली का मुलीची !—"

"पण दादा, मी तुम्हाला स्पष्ट सांगितलं होतं कीं, माझी परीक्षा आता चार महिन्यावर आलेली असल्यामुळे परीक्षा संपेपर्यंत तुम्ही माझ्या लग्नाची गडबड करूं नका म्हणून ! खरं ना ?—"

"हो. पण तुझी आई थांबायला तयार नाही हें माहीत आहे ना तुला ?—"

"आई थांबायला तयार नसेल. पण तुम्ही आजपर्यंत किती तरी वेळा म्हणाला आहात मला, तुला बी.ए. पर्यंत शिकवीन न् पुण्याला शिकायला ठेवीन म्हणून. तुम्हाला जर इतक्या घाईनं मला घराबाहेर काढून द्यायची होती, तर कशाला केलेत इतके लाड माझे आणि कशाला वाढवलीत मला मुलासारखी ? मी परकरी होते तेव्हाच लग्न करून द्यायचं होतंत माझं ! हीच जर मी मुलगा असतें, तर तुम्हीं कधीं असतीत का माझ्या लग्नाची अशी घाई ? मी मुलगी झाले, हाच कीं नाहीं माझा गुन्हा ?—"

बोलता बोलता तिचा आवाज भरून आला. आपल्या डोळ्यात दाटणारे अश्रु आपल्या वडलांना दिसूं नयेत, म्हणून तिनें चटकन् तोंड फिरविलें आणि ती जावयाला निघाली.

तत्क्षणींच दादासाहेब तिच्याजवळ गेले; त्यांनी तिच्या कमरेभोंवतीं हात लपेटून तिला आपल्या कवेंत घेतली; व तिच्या डोळयांतलीं आसवें पुसून ते उद्गारले, "रडूं नको, बेटा! तुला बी. ए. पर्यंत शिकवूं नये आणि इतक्या लवकर लग्न करून दुसऱ्याच्या घरीं पाठवावं, असं कसं वाटेल मला? अग, किती झालं तरी तूं आम्हाला एकटी एक आहेस, पोरी! पण कर्नलसाहेबाच्या मुलाला एकदा पाह्यचं तर होतंस! त्यांना किती अपमानकारक वाटलं बरं तुझं सारं वर्तन? तुला लग्न करायचं नाहीं इतक्यात, तर तसं सांगायचं होतंस तूं आम्हाला मागाहून! पण त्या मुलाला एकदा पाह्यला काय हरकत होती? आपल्याकडे आलेल्या पाहुणेमंडळींचा असा अपमान करणं शोभतं का तुला?"

"त्याबद्दल मी क्षमा मागायला तयार आहें त्यांची त्याच्यापुढं लोटांगणं घालून. पण, लग्न जर इतक्यात करायचं नाहीं, तर मग मुलगा तरी पाह्यचा कशाला? शिवाय, मला हें स्वतःला दाखवणं न् दुसऱ्याला पाहाणं दोन्हीहि अगदीं नापसंत आहेत, दादा--"

"या दोन्ही गोष्टी जर तुला पसंत नाहींत, तर तुझं लग्न होणार तरी कसं, पोरी?—"

"तें भविष्यकाल ठरवील, दादा! आज कशाला त्याची काळजी?—"

• • •

अनघाच्या त्या उद्गाराची सत्यता सहा वर्षांच्या आतच दादासाहेबांच्या प्रत्ययाला मोठ्या क्षोभजनक रीतीनें आली.

ती प्रवेशपरीक्षेंत संस्कृतमध्यें सर्व प्रांतात पहिली आल्यामुळें तिच्या लग्नाचा आग्रह धरणें उमाबाईनांहि योग्य वाटलें नाहीं; व दादासाहेबांनीं तिच्या इच्छेनुसार तिला पुण्यास पुढील शिक्षणासाठीं पाठविलें.

बी. ए. पर्यंतचा तिचा अभ्यासक्रम संथपणानें पार पडला; व बी. ए.तहि ती पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाली. त्या वेळीं उमाबाईनीं पुन्हा तिच्या लग्नाचा प्रश्न उपस्थित केला. पण 'एम्. ए. झाल्यानंतर तुम्ही ठरवाल

त्याच्या गळ्यात मी मुकाट्याने माळ घालीन,' असें वचन आपल्या मातापितराना देऊन अनघा पुढील अभ्यासासाठी कॉलेजच्या वसतिगृहातच येऊन राहिली.

आदर्श विद्यार्थिनी आणि आदर्श खेळाडू असें क्वचितच एकत्र दृष्टीस पडणारें दुहेरी यश तिने आपल्या संस्कृतातील पांडित्यानें आणि टेनिस मधील नैपुण्यानें संपादन केले होते; व त्यामुळे आत्मप्रत्ययाचा, बौद्धिक आणि शारीरिक प्रभावाचा एक प्रकारचा मनोहर दर्प तिच्या प्रत्येक दृष्टिक्षेपांत आणि प्रत्येक पदन्यासात प्रकट होत असे. टेनिसच्या सामन्याचे तिला जणूं वेड होतें. आतरविद्यालयीन किंवा आतरविश्वविद्यालयीन कोणताहि सामना असो, त्यात भाग घेऊन आपल्या कॉलेजसाठी कप किंवा ढाल जिंकणें, हा तिच्या अभ्यासाचाच जणूं एक भाग होऊन बसला होता. त्या क्रीडेच्या सतत होणाऱ्या व्यायामामुळें तिच्या शरिराला धड जनानी नव्हे आणि धड मर्दानीहि नव्हे अशी जी पीळदार सुरेखता आली होती, ती कोणाच्याहि डोळ्यात तत्क्षणींच भरत असे. विशेषतः, तिच्या कटि-भागाची निमुळती कृशता आणि उरोभागाची उभार पुष्टता याच्यांतील विरोध जसा विलोभनीय वाटे, तसेंच चढते रुंद कपाळ आणि चिंचोळी खळीदार हनुवटी याच्यातील विरोधहि तिच्या त्या लांबट चेहऱ्याला एक तऱ्हेची लाडिक चारुता आणीत असे.

त्यामुळें, ती हातांत रॅकेट घेऊन क्रीडांगणावर डौलानें झपाझप पावलें टाकीत आली, म्हणजे प्रेक्षकाच्या अंतःकरणात निरनिराळ्या भावनाचे कल्लोळ उठत असत. टेनिस खेळणाऱ्या आपल्या इतर काहीं सहाध्यायिनीं-प्रमाणें तिनें केस कापले नव्हते; तर आपल्या लांबसडक काळ्याभोर केसाची दुपेडी वेणी घालून आणि ती नागिणीच्या वेटोळ्याप्रमाणें जाळ्यात नीट बसवून ती क्रीडांगणावर येत असे. खेळ संपल्यावर डोक्यावरलें जाळें काढून टाकून जेव्हा वेणीचे ते दोन्ही पेड ती मोकळे सोडून देई, तेव्हा पांढरा शुभ्र फ्रॉक घातलेल्या तिच्या तन्वंगाला एक निराळीच शोभा प्राप्त होत असे. त्यामुळें, टेनिसच्या क्रीडांगणावर तिला खेळतांना पाहणें हें कॉलेजच्या

विद्यार्थ्यांचें एक व्यसन होऊन बसलें होतें; व तिच्याबरोबर एखाद् दुसरा तरी डाव खेळण्याचा मोह प्राध्यापकानाहि पडत असे.

कॉलेजच्या वर्षारंभींच पहिला संमिश्र सामना होता त्या दिवशीं.

मृग आणि आर्द्रा ही दोन नक्षत्रे वरसून गेल्यामुळें आकाश किंचित् निवळलें होते. सभोंवतालच्या रखरखीत टेकड्यावर वर्षाऋतूच्या सिंचनामुळें हिरवळीची रोमराजी थरारून उठली होती; व कालग्याकाठची झाडी सगळी न्हाऊन निघाल्यामुळे तिच्या हिरव्या रंगाला मनोहर तजेला आला होता. त्यातून ती आषाढाची पहिली साज होती. क्षितिजावर जागजागीं थबकलेल्या काळ्या पाढऱ्या ढगाच्या गर्दीतून सूर्य आपले मंदोष्ण किरण सृष्टीवर फेकीत होता; व नैऋत्येच्या कोंपऱ्यात मधून मधून तळपणारी वीज आपल्या लखलखाटानें ढगानीं घेरलल्या सूर्याच्या मावळत्या तेजावर मात करीत होती. दूर अंतरावर कुठें तरी पडत असलेल्या पावसाचे जे गर्द निळे पट्टे क्षितिजाच्या पश्चिम भागावर दिसत होते, त्यातून सूर्याचें बिंब जेव्हा मध्येच दृष्टीस [illegible] तेव्हा स्वतःच्या मस्तकावर कोसळणाऱ्या स्वर्गंगेच्या झोतात पृथ्वी बुडून जाऊं नये म्हणून शंकरानें दयार्द्र होऊन आपला तृतीय नेत्र तिला दटावण्यासाठीं उघडला आहे की काय असा भास होई; व त्या दिशेने येणाऱ्या थंड वाऱ्याच्या झुळुकेबरोबर जो पाण्याचा एखाद दुसराच टपोरा थेंब अंगावर मधूनच पडे, तो त्या दयाघनाचा करुणाश्रु असावा, असे मनाला वाटे.

त्या प्रसन्न, प्रोत्साहक वातावरणात अनघा ज्या वेळीं क्रीडांगणावर आली, त्या वेळीं तिला कल्पनाहि नव्हती कीं, त्या दिवशीचा खेळ हा तिच्या दैवाचा खेळ ठरणार होता.

ती येताच कॉलेजचे प्रिन्सिपल्, कांहीं प्राध्यापक, विद्यार्थिनी आणि विद्यार्थी यांनीं तिचें सहर्ष स्वागत केलें. प्रिन्सिपल्च्या मागल्या बाजूला हातांत रॅकेट घेऊन उभा असलेला एक धिप्पाड तरुण मात्र त्या स्वागतांत सामील न होता आपल्याकडे कुतूहलानें रोखून पाहात आहे, असा भास तिला झाला. पण त्याची तीक्ष्ण नजर टाळून ती आपल्या मैत्रिणींशीं बोलूं लागली.

तोच प्रिन्सिपल् तिला म्हणाले, " मिस् आगटे, मला आज ओळख करून द्यायची आहे तुमची एका नव्या खेळाडूशी—"

तो त्याचा उद्गार ऐकताच ती काही न बोलता विनयानें त्याच्या समोर येऊन उभी राहिली.

" हे आपल्या कॉलेजातले रसायन आणि अर्थशास्त्र याचे नवे प्राध्यापक डॉ. अभय पंडित. या आपल्या कॉलेजातल्या एम्. ए. च्या विद्यार्थिनी कु. अनघा आगटे. मिस् आगटे या आपल्या कॉलेजचे भूषण आहेत, डॉ. पंडित ! या संस्कृत पडिता आहेत हें तर झालंच; पण आश्चर्याची गोष्ट अशी कीं, त्याबरोबरच या आपल्या कॉलेजच्या उत्कृष्ट खेळाडूहि आहेत. खरोखरी अजिंक्य म्हटलं तरी शोभेल—"

प्रिन्सिपल्साहेबांच्या मिशाळ जिवणीभोवतीं स्मिताच्या दाट सुरकुत्या पडल्या. त्यांच्या त्या पोक्त, गंभीर चेहऱ्यापेक्षाहि लहानच पण तेजस्वी डोळ्यातून अनघाविषयींचा वात्सल्ययुक्त आदर स्पष्ट व्यक्त झाला होता.

त्या तरुणानें नमस्कारपूर्वक तिच्या नजरेला नजर देत विचारलें, " मिस् ए. आगटे म्हणून ' टाइम्स ' मध्ये ज्याचा पुष्कळदा फोटो आलेला आहे, त्याच या पुण्याच्या टेनिस चँपियन का ?—"

" हो. त्याच या आमच्या अनघा आगटे—"

प्रिन्सिपल्साहेबानीं साभिमान उत्तर दिलें.

" अनघा ? नाव थोडं अपरिचित वाटतं, नाहीं ? कधीं ऐकिवात आलेलं नाहीं—"

" हो, ' अनघा ' हें नाव असलेली स्त्री हिंदुस्थानात मी बहुधा पहिली आणि एकटीच असेन. अनघा म्हणजे निष्पाप, निरागस—'

" माफ करा हं ! मला संस्कृत येत नाहीं मुळींच. म्हणून आपलं नांव ऐकल्यावर बुचकळयांत पडलों मी—"

" माझ्या नांवाच्या बाबतींत बुचकळ्यात पडलेले आपण कांहीं पहिलेच नाहीं मीं पाह्यलेले !—"

अनघा हंसून म्हणाली आणि प्रिन्सिपल्साहेबांकडे वळून तिनें विचारलें—

" मग आज कोण खेळणार प्रथम ?—"

" तुम्हीच खेळा दोघं. आज तुमचा दोघाचा सामना पाह्यचा ठरवलाय आम्हीं. हेहि चागले पटाईत खेळाडू आहेत हं, मिस् आगटे!—"

प्रिन्सिपल्साहेबांनीं तिच्याकडे साभिप्राय दृष्टिक्षेप करीत हंसून म्हटलें.

त्यावर अभय हंसत हंसत उद्गारला—

" याच्यापुढे माझ्या पटाईतपणाची प्रशंसा आपण न केलेली बरी—"

त्याच क्षणीं त्याच्या गव्हाळ्या वर्णाचें सौंदर्य तिला प्रथम जाणवलें. पिवळ्या चाफ्याच्या फुलात जी एक तांबूस रंगाची झाक असते, त्या प्रकारची त्याची अंगकाति होती. हंसताना त्याच्या ओठाचीं किंचित् आंत दबलेलीं पातळ दलें विलग होताच त्याची बारीक शुभ्र दंतावलि झळकली. त्याबरोबर काळ्याभोर केसानीं झाकलेलें उंच कपाळ, अंतर्भेदी विशाल डोळे, टोंकदार सरळ नाक आणि रेखीव भुवयाना शोभेल अशी जिवणीची मर्यादा दाखविणारी मिशीची बारीक रेखा याची मोहकता त्या दंतावलीच्या द्युतींत तिच्या नजरेंत भरली. त्याची पुष्ट गोल गर्दन, भरदार चपळ बांधा, पीळदार बळकट हात आणि त्या हाताचे रुंद घट्ट तळवे पाहून तो चांगला खेळाडू असावा, अशी तिच्या मनाची खात्री झाली; व एक प्रकारच्या ईर्ष्येनें तिनें खेळावयाला प्रारंभ केला.

पण अनघाची ती ईर्ष्या फार वेळ टिकली नाहीं. खेळाला सुरुवात होतांच, का कोण जाणें, तिला आयुष्यात आज प्रथमच असे वाटलें कीं, त्या तरुणाचा पराभव आपण करूं नये. म्हणून, सुमारे पाऊण तास मोठ्या कौशल्यानें खेळल्यावर, तिनें सेट पूर्ण होण्यापूर्वीच थकल्याची सबब सागून खेळ थांबविला.

तो अनपेक्षित प्रकार पाहून क्रीडांगणावर हजर असलेले सारेच लोक विस्मित झाले; व तिच्या सहाध्यायिनींनीं एकमेकींकडे पाहून सूचक स्मितहि केलें. पण अनघा मात्र अगदीं गंभीर होती.

खेळ बंद केल्यावर पेयें घेतांना अभय तिला म्हणाला—

"खरोखरीच अप्रतिम खेळता आपण! इतका सुंदर खेळ मीं पाहिला नव्हता कधीं. आपल्या हातून पराभव होण्यातसुद्धा आनंद वाटावा मनाला अशी जादू आहे आपल्या खेळात!—"

पण त्यानें केलेली ती प्रशंसा गोड वाटण्याच्या मनःस्थितींत आज अनघा नव्हती. कारण तिचे अभिमानी मन तिला सारखे विचारीत होतें, प्रतिस्पर्ध्यांवर मात करण्यासाठी सदैव ईर्ष्येनें सळसळणारी तूं आज या अनोळखी तरुणापुढें का नमलीस?—

म्हणून त्याचे ते प्रशंसोद्गार ऐकले न ऐकल्यासारखे करून तिनें त्याला विचारलें, "आपण रसायन आणि अर्थशास्त्र या दोन विषयांचे प्राध्यापक असल्याचें मघाशीं प्रिन्सिपल्साहेबांनीं सांगितलें, त्याचा नीट उलगडा नाहीं झाला मला. आपण हे दोन विसदृश विषय घेऊन त्यात एम्. ए. झालांत?—"

"हो. मी प्रथम रसायन घेऊन केंब्रिज विद्यापीठाचा डी. एस्सी. झालों आणि नंतर अर्थशास्त्र घेऊन लंडन विद्यापीठाचा एम्. ए. झालों—"

"दोन वेगळ्या विषयात पदव्या घ्यायला कांहीं विशेष कारण?—"

"कारण? कारण थोडसं चमत्कारिक आहे. मी विलायतेंत असताना सकलातवाला, पाम दत्तप्रभृति मार्क्सवादी कार्यकर्त्यांशीं माझा निकट संबंध आला. त्यामुळं मला अर्थशास्त्राची गोडी लागली. तेव्हा त्याचं पद्धतशीर अध्ययन केलेलं असावं म्हणून मीं मुद्दाम अर्थशास्त्राची पदवी घेतली—"

"आपण मळचे कठले?—"

" तसं पाह्यलं तर आम्ही मूळचे गोव्याचे आहोंत. आमचे पूर्वज जिवबा-दादा बक्षीबरोबर ग्वाल्हेरला आले; व आमचं एक घराणं इनामदार म्हणून आजहि तिथें सुस्थितींत आहे. माझे आजोबा हिंदी मध्यप्रांतात—आतां नवं नाव घ्यायचं झालं तर 'महाकोसल' म्हणावं लागेल !—हरद्याला वकील होते. पण माझे वडील पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजातून शिकून आल्या-वर नागपूरला सिटी इंजिनिअर म्हणून स्थायिक झाले. या दृष्टीनं मी नाग-पूरचा आहे असच म्हणावं लागेल आता—"

" मग त्या प्रांतात इतकीं कॉलेजं असतांना आणि सायन्स कॉलेज तर नवीनच निघालेलं असताना आपण पुण्यास कां आलात ?—"

" पुण्यातल्या शिक्षणसंस्था या स्वार्थत्यागाच्या आणि सार्वजनिक जीव-नाच्या शाळा समजल्या जात असल्यामुळें त्याचा अनुभव घ्यावा म्हणून मुद्दामच मी आलों इथं. शिवाय मला शिकण्याची आणि शिकवण्याची अशी दुहेरी इच्छा असल्यामुळं सर्व वैज्ञानिक उपकरणांनीं समृद्ध असलेलं आपलं हे कॉलेज सोयीचं वाटलं मला—"

" काहीं संशोधन चाललंय सध्या ?—"

" संशोधन हें बडं नाव देण्यासारखं काहीं करीत नाहीं मी सध्या. पण रानडे इन्स्टिटयूटचे प्रो. लिमये आणि गोखले इन्स्टिटयूटचे प्रो. गाडगीळ या दोघाच्याहि हाताखालीं काम करून थोडी थोडी माहिती मिळवण्याचा प्रयत्न करतोंय् मी. ज्ञानोपासनेला वाहून घेतलेल्या त्यांच्यासारख्या तज्ज्ञांना काम करतांना पाहाणं हेंसुद्धा शिक्षण आहे नव्हे का एक प्रकारचं ? — "

" हो—"

" पण आपण स्वत:विषयीं कांहींच सांगितलं नाहीं मला अद्याप—"

" माझ्याविषयीं जें सांगण्यासारखं होतं तें प्रिन्सिपल्साहेबांनीं सांगितलंच मघाशीं आपल्याला. मी सातारचे रा. ब. दादासाहेब आगटे यांची मुलगी. इथंच सगळं संरतं माझं वर्णन. सातारा, पुणें आणि मुंबई यांच्या पलीकडलं [illegible] पलीकडलं जग मीं पाहिलेलं नाहीं अद्याप—"

" जग पाहाण्यासाठीं प्रवास करावा लागतो असं थोडंच आहे ? मग उद्यां आपण येणार आहात ना खेळायला ?— "

" मी रोजच खेळते. रोज ठराविक वेळ खेळल्याशिवाय उल्हास वाटत नाहीं माझ्या मनाला. बुद्धीला जसं वाचन, मनाला जसं चिंतन, तसा शरिराला खेळ— "

" माझंहि रोज खेळल्याशिवाय निभत नाहीं. पोहणं आणि खेळणं हे जवळजवळ रोजचे व्यायाम आहेत माझे. आपल्याला पोहायचा नाद आहे ?— "

" हो. पण माझ्या प्रकृतीला थंड पाणी मानवत नाहीं. त्यामुळं तो नाद सोडून द्यावा लागला मला अखेर. अधिक आगळं पोहणं झालं कीं लगेच खोकला होतो मला—— "

" मग इथं क्रीडांगणावर रोज भेट होईल आपली, अशी अपेक्षा करूं मी ?— "

त्यानें तिच्या दृष्टींत दृष्टि मिसळून विचारलें.

क्षणार्ध, अगदीं क्षणार्धच ती गोंधळली.

त्याचे ते तीक्ष्ण डोळे आपल्या हृदयाचा जणूं ठाव घेत आहेत, असें तिला वाटलें; व त्या डोळ्याचा वेध टाळून तिनें उत्तर दिलें—

" हो. बहुधा व्हावी. पण मी आमच्या वसतिगृहाच्या क्रीडांगणावरच खेळतें बहुतेक— "

" पण तिथं आम्हाला यायला परवानगी नसेल ?— "

" नाही. फक्त निमंत्रित सन्मान्य पाहुणे म्हणून येता येईल मधून मधून आपल्याला आणि तेहि प्रिन्सिपल्साहेबाच्या परवानगीनं— "

" आपण समानशील आहोंत, तेव्हा तुमचा पाहुणा होण्यापेक्षां मित्र होणंच प्रिय वाटेल मला—— "

आणि त्यानें हंसत हंसत हस्तादोलनासाठीं हात पुढें केला.

क्षणैक तिला असें वाटलें कीं, उलट नमस्कार करून त्याचा हस्तस्पर्श टाळावा. पण, लगेच तिच्या मनात आलें, तसें करणें शिष्टाचाराला सोडून होईल, आपण त्याचा अपमान केल्यासारखा त्याला वाटेल—

म्हणून तिने हात पुढें केला—

त्याबरोबर तो चटदिशीं आपल्या हातात घेऊन त्यानें अशा रीतीनें दाबला, कीं तिच्या साऱ्या अंगावर थरारून रोमांच उठले.

वसतिगृहात येताना तिच्या मनात आलें, आजपर्यंत अनेक खेळाडूंशीं आपण मनसोक्त गप्पा मारल्या आहेत, खाद्यपेयांचा आस्वाद घेतला आहे आणि हस्तांदोलनहि केलेले आहे. मग आजच आपले मन इतके विचलित का व्हावें ? आपलें शरीर रोमांचित का व्हावे ? पुरुषाबरोबर खेळताना किंवा बोलताना आपल्याला कधीं न वाटलेली भीति, न वाटलेला संकोच आणि न वाटलेली लज्जा आजच कां वाटावी ? होमीसाहेबांचा मुलगा रुस्तुम हा या तरुणापेक्षा किती तरी देखणा, अगदीं गोरापान आणि लालबुंद होता. पण, त्याच्याबरोबर खेळताना, गप्पा मारताना किंवा मोटारींतून हिंडतांना त्याचे पौरुष कधींहिं आपल्याला जाणवलें नाहीं; त्याच्याजवळ मोटर चालवायला शिकत असता अनेकदा त्याचा स्पर्श झालेला असतानाहि कधीं आपल्या अंगावर रोमांच उठले नाहींत कीं मनाचा क्षोभ झाला नाहीं. मग आज या तरुणाबरोबर खेळताना, बोलतांना किंवा हस्तांदोलन करताना आपल्या मनाचा तोल का सुटावा ?—

—या प्रश्नाचें उत्तर तिला सुचेना. उलट तिचें मन अधिकच अस्वस्थ, अधिकच पर्युत्सुक होत गेलें.

म्हणून, दुसऱ्या दिवशी कॉलेजच्या क्रीडांगणावर खेळावयाला जावयाचें नाहीं, असें तिनें ठरविलें. आपण त्याला टाळलें, म्हणजे त्याचा विसर आपल्या मनाला पडेल, असा स्वतःचा समज तिनें करून घेतला.

पण अनघाचा तो समज चुकीचा ठरला. दुसऱ्या दिवशीं सायंकाळ जसजशी जवळ येत चालला, तसतसें कॉलेजच्या क्रीडांगणावर जाण्यासाठीं तिचें मन आतुर होत गेलें. त्या तरुणाला भेटण्याकरिता उतावळ्या झालेल्या आपल्या मनाला आवरण्याची धडपड ती करीत असतानाच क्रीडांगणावरील चपराशानें तिला एक लिफाफा आणून दिला. तो तिनें कापऱ्या हातानें फोडला. त्यात इंग्रजींत लिहिलेले पुढील पत्र होतें—

प्रिय कु. आगटे,

आपण आज कॉलेजच्या क्रीडांगणावर याल का ? मला आपला सुंदर खेळ पुन्हा एकवार पहाण्याची इच्छा आहे. आपण आलांत, तर मला फार आनंद होईल.

आपला

अभय पंडित

तिनें घाईघाईनें तें पत्र ब्लाऊझच्या खिशात कोंबलें; व ती कपडे बदलून क्रीडांगणावर गेली.

तो आपली वाट पाहात उभा आहे, हें त्याच्या सोत्कंठ नेत्रावरून लगेच तिच्या लक्षात आलें. पण तो तिच्याजवळ आला नाहीं आणि तीहि त्याच्या जवळ गेली नाहीं.

प्रथम एका सहाध्यायिनीबरोबर ती एक सेट खेळली. खेळ संपल्यावर ती एकटीच विश्रांति घेत एका बाजूला बसली असता तो हळूच तिच्याजवळ येऊन म्हणाला—

“ माझ्या विनंतीला मान देऊन इथं आल्याबद्दल मनापासून आभार हं !—”

त्यावर तिनें हंसून त्याला विचारलें, “ आपल्याला माझा खेळ नुसता पाह्यचा होता कीं माझ्याशीं खेळायचीहि इच्छा होती आपली ?·

“ आपल्याला काय वाटतं ?—”

त्यानें उलट हंसून विचारलें.

" पत्रावरून काहीच निश्चित बोध झाला नाहीं मला. पण, आपण हणत असाल, तर तयारी आहे माझी—"

" पण एका अटीवर—"

" अट ? कोणती अट ?—"

" आज ज्याची जीत होईल, त्यानं उद्या दुसऱ्याला जिंकण्याची संधि देली पाहिजे—"

" ही अट नेहमीसाठीं राहील का ?—"

" पुढचं आज काय सागूं मी ? आजच्या खेळाला मात्र ही अट ागू आहे—"

" आजच्या दिवसापुरती मान्य करते मी ती—"

आणि लगेच त्यानीं खेळावयाला सुरुवात केली. दोघेहि ईर्ष्येने खेळत ोती. पण, ती त्याच्यावर मात करील अशी जी प्रेक्षकाची अपेक्षा होती, ती ात्र फसली.

खेळ संपल्यावर पेयें घेताना तो हंसत हंसत तिला म्हणाला, " आपण फार उदार आहात—"

" कशी काय ?—"

" आज मला जिंकायची संधि देऊन आपण पर्यायानं आपल्या विशिष्ट क्रीडापद्धतीचं मला शिक्षण द्यायला सुरुवात केली—"

त्याच्या त्या मार्मिक उद्गारानें खेळातील निसटत्या पराभवामुळें किंचित् ओशाळलेले तिचें मन हरखलें आणि ती हंसून त्याला म्हणाली—

" आपल्यासारखा शिष्य मिळायला भाग्य लागतं—"

" मीं आज आपल्याला होस्टेलपर्यंत पोंचवून दिलं तर चालेल का ? तेथं जवळच एका कॉटेजमध्यें राहतों मी. म्हणून म्हणतों, बरोबरच जाऊं या—"

" हरकत नाहीं माझी—"

आणि तीं दोघें कालव्याच्या काठाकाठानें बोलत बोलत वसतिगृहाकडे जावयाला निघालीं.

चालता चालता तो तिला म्हणाला—

" माझी एक विनंती आहे आपल्याला—"

" विनंती ?—"

तिने एकदम त्याच्याकडे वळून विस्मयाने विचारलें. आणि ती हंसून पुढें म्हणाली—

" मला वाटत, आपण औपचारिक शब्द न वापरता यापुढं माझ्याशीं सरळ बोलाल तर बरं होईल. मघाशीं अट घातलीत. आता विनंती करताहात. सायन्स घेणारीं माणसं वागण्यात सरळ न् वास्तववादी असतात अशी कल्पना होती माझी—"

" म्हणजे माझ्या वागण्यात सरळपणाचा अभाव आहे असं म्हणायचंय का आपल्याला ?—"

" छे, छे ! तसं म्हणायचं नाही मला. पण, मला वाटत, आपण शिष्टाचार बाजूला सारून एकमेकाशीं मोकळेपणानं वागायची वेळ आली आहे आता. बरं, पण आपली काय विनंती आहे ?—"

" विनंती अगदीं साधी आहे. माझ्या मनात रसायनशास्त्राचा पारिभाषिक शब्दकोश तयार करायचाय मराठींत. कारण, आज ना उद्या आपलं सगळं शिक्षण मातृभाषेतून होणार. विशेषतः सध्या चालू असलेले प्रयत्न यशस्वी होऊन जर महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन झालं, तर वैज्ञानिक शिक्षणाच्या दृष्टीनं पारिभाषिक कोशाचा प्रश्न प्रथम हातीं घ्यावा लागेल आपल्याला—"

" पण यांत माझा संबंध कुठं येतो ? मला तर सायन्सचा गंधसुद्धा नाहीं—"

" नसेल, पण आपण संस्कृत पंडिता आहात. नव्या शास्त्राची परिभाषा तयार करण्याच्या कामीं आपल्यासारख्या पंडितेचं साह्य जर मिळालं, तर आमचं काम अतिशयच सोप होईल. सर्व हिंदुस्थानाची शास्त्रीय परिभाषा एक असली पाहिजे; व तशी शास्त्रीय परिभाषा निर्माण करायची, म्हणजे ती संस्कृतांतूनच करावी लागणार, हें निश्चित आहे. म्हणून मी आपल्यापाशीं संस्कृत शिकावं असं म्हणतों—"

" आपल्याला संस्कृत शिकवायला हरकत नाहीं माझी; पण मला एक भीति वाटते—-"

" भीति ?—"

" हो. उद्या आपण संस्कृतचे डॉक्टर व्हाल न् मला मागें टाकाल—-"

" एवढंच ना? ती भीति दूर करायचा उपाय सोपा आहे अगदीं. तो म्हणजे आपण दोघानीं एकदमच डॉक्टर व्हायचं !—"

तो हंसत हंसत म्हणाला. तीं दोघें आता वसतिगृहापाशीं आलीं होतीं.

संधिप्रकाश अद्याप पुरता लोपला नव्हता. पश्चिम क्षितिजावर तृतीयेची चंद्रकोर गुरगरणाऱ्या ढगाच्या रागातून वाट काढीत होती. तिचें सौम्य गुलाबी तेज डोळ्याना सुखवीत होतें; तर क्षितिजाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत मधूनच लखलखणारी वीज आपल्या तेजस्ताडवानें डोळे दिपवीत होती. एकमेकांना बिलगून मालाकार उडत असलेल्या बगळ्याच्या पाढऱ्याशुभ्र पंक्ति त्या संमिश्र प्रकाशात वर्षर्तूतील संगमोत्कंठेचें स्मरण देत होत्या; तर झाडींतील काजव्याचा चमचमाट आपल्या मोहक लकाकीनें ती स्मृति उद्दीपित करीत होता. काजव्याच्या झुळझुळत्या कलरवाला लाभलेली बेडकांच्या तारस्वराची साथ वर्षर्तूच्या घनगभीर वृंदवादनातील (Orchestra) वैचित्र्य प्रकट करीत होती; व आंब्याच्या झाडावर एकटाच बसलेला कोकिळ मध्येंच ज्या वेळीं मुक्त कंठानें आक्रंदे, त्या वेळीं त्याच्या त्या चढत्या, भेदक, प्रणयार्त सुरानीं तें विविध गंधानीं भारावलेलें आर्द्र वातावरण कंपित होऊन जात असे.

होस्टेलच्या कटघरापाशीं येताच त्याने हस्तादोलनासाठीं हात पुढें केला आणि तिचा हात घट्ट दाबून म्हटलें, " आता उद्यां संध्याकाळीं पुन्हा क्रीडागणावर भेट––"

तिनें आपला हात सोडवून घेतला आणि ती काहींहि न बोलता वसतिगृहात आली.

त्याचे तें वाढतें साहचर्य हा लवकरच कॉलेजात सार्वत्रिक चर्चेचा विषय झाला.

पण दोघांनींहि त्या चर्चेकडे दुर्लक्ष्य केलें.

प्राध्यापकाच्या विश्रामिकेंतहि ( Common-room ) केव्हा केव्हां कोणी एकादें सूचक विधान त्याच्या प्रणयविहाराबद्दल करीत असे. पण अभयनें चुकूनहि कधी त्याची दखल घेतली नाहीं.

• • •

पण, मार्गशीर्षांतील पूर्णिमेला अभयच्या वाढदिवशीं जो प्रकार घडला, त्यामुळें कॉलेजचे सारें वातावरण एकदम अत्यंत प्रक्षुब्ध होऊन गेलें.

आदल्या दिवशीं सायंकाळीं तीं दोघे नेहमीप्रमाणें खेळून परत जात असता त्यानें तिला म्हटले, " उद्या माझा वाढदिवस आहे, अनघा—"

" कितवा वाढदिवस ?—"

" उद्यां सव्वीस वर्षे पूर्ण होऊन सत्ताविसावं लागेल मला––"

" तुम्हीं मला आधीं सांगायला हवी होतीत ही गोष्ट. म्हणजे मीं तयारी केली असती तुमचा वाढदिवस साजरा करायची—"

" पण मीं केलेली तयारी तर ऐकून घ्या तुम्ही—'

" काय तयारी केली आहे तुम्हीं ?—"

" माझा जन्म पूर्णिमेला सायंकाळीं चंद्रोदयाच्या वेळीं झाला. त्या वेळेपासून तों चंद्रास्तापर्यंत आपण दोघानीं एकत्र वेळ घालवायचा उद्या——"

" ते कसं शक्य आहे मला, अभय? होस्टेलमधून रात्रभर बाहेर राहण्यासाठी मला खास परवानगी घ्यावी लागेल——"

" माझी इच्छा मी सांगितली तुम्हाला. उद्या सायंकाळीं खेळ संपल्यावर आपण तडक आमच्या कॉटेजवर जायचं; तिथं एकत्र जेवायच; न् नंतर चंद्रास्त होईपर्यंत भटकायच, अशी कल्पना आहे माझी——"

" कल्पना चांगली आहे. पण मी फार तर रात्रीं दहापर्यंतच राहूं शकेन तुमच्याबरोबर आणि तेंहि खास परवानगीनं. नंतर होस्टेलमध्यें गेलेंच पाहिजे मला——"

" पण दहापर्यंत तरी रहाल ना?——"

" हो— "

पण, त्या दिवशीं सायंकाळीं अनघा जी अभयबरोबर त्याच्या कॉटेजवर गेली, ती दुसऱ्या दिवशीं सकाळीं सूर्योदयानंतर वसतिगृहात परत आली.

अर्थात् होस्टेलच्या रेक्टरनें तिला तिच्या या वर्तनाबद्दल जाब विचारला; व तिनेंहि आपण सारी रात्र प्रो. डॉ. पंडित यांच्याबरोबर होतो, असें सरळ लेखी उत्तर त्याला दिलें.

ते तिचे उत्तर म्हणजे कॉलेजच्या प्राध्यापक वर्गातील अभयच्या वाईटावर असलेल्या गटाला त्याचें उच्चाटन करण्यासाठीं अमोघ साधनच मिळाल्यासारखें झालें.

कॉलेजच्या प्राध्यापकवर्गात आणि प्रशासक मंडळात राजकीय मतभेद तर होतेच; पण अंतर्गत चुरसहि फार तीव्र होती. कॉलेजात जे दोन गट सत्तेसाठीं सतत एकमेकाशीं झगडत होते, त्यांच्या त्या स्पर्धेपासून अभय

अगदीं अलिप्त होता; व तो अद्याप आजीव सदस्य झालेला नसल्यामुळें त्याला त्या स्पर्धेशीं कांहीं कर्तव्यहि नव्हतें. पण, रसायन आणि अर्थशास्त्र या दोन विषयांतील त्याचें असामान्य प्रावीण्य, आदर्श प्राध्यापक आणि उत्तम खेळाडू अशा दोन्ही नात्यांनी त्याला विद्यार्थ्यांत लाभलेली लोकप्रियता, त्याचा अविरत चालणारा बहुविध विद्याभ्यासग, त्याच्या सखोल विद्वत्तेचा मनोज्ञ आविष्कार करणारें विलोभनीय वक्तृत्व व कॉलेजच्या हिताच्या दृष्टीनें प्रिन्सिपल्साहेबांचा त्याच्यावर असलेला लोभ या साऱ्या कारणामुळे इतर प्राध्यापकांना त्याच्याविषयीं साहजिकच असूया वाटे. विशेषतः, सायन्सचे बाकीचे प्राध्यापक हे परदेशातून श्रेष्ठ पदव्या संपादन करून आलेले नसल्याकारणानें, त्यांना त्याचें आगमन दुःसह होऊन बसलें होतें. त्यातच तो मार्क्सवादी होता; व आपलीं मतें कॉलेजातील चर्चासभांतून स्पष्ट बोलूनहि दाखवीत असे. त्यामुळें इतर प्राध्यापकांच्या त्याच्याविषयींच्या मत्सराला राजकीय मतद्वेषाची जोड मिळाल्यासारखी झाली होती.

पण इतके दिवस त्याच्याविरुद्ध ब्र काढावयालाहि कोणाला कांहीं जागा नव्हती. त्याचा आणि अनघाचा स्नेह सर्वांच्या डोळ्यांसमोर वाढत चालला होता. पण, त्या दोघांनींहि जोंपर्यंत मर्यादा सोडली नव्हती, तोंपर्यंत त्या स्नेहाकडे बोट दाखवून अभयवर आघात करणें अशक्य होतें.

पण पूर्णिमेच्या रात्रीं घडलेल्या या प्रकारामुळें त्याच्या हितशत्रूंना त्याच्यावर वार घालावयाला बिनतोड संधि मिळाली.

प्रिन्सिपल्साहेबांचा विचार तें प्रकरण आतल्या आत मिटविण्याचा होता. कारण अभयसारख्या अत्यंत बुद्धिमान् उदयोन्मुख वैज्ञानिकाला हातचा गमावण्याची त्यांची तयारी नव्हती. म्हणून, अनघाचा जबाब रेक्टरकडून त्यांच्याकडे येताच त्यांनीं अभयला आपल्या बंगल्यावर भेटीला बोलावलें आणि तो जबाब त्याच्यापुढें ठेवून विचारलें--

"मिस् आगटे यांनीं जें हें लिहिलंय, तें खरं आहे का, डॉ. पंडित ?-"

"हो--"

" अगदीं अक्षरशः खरं ?—"

" हो—"

" मग तुम्हीं स्वतःच का नाहीं कानावर घातलीत ही गोष्ट तावडतोब माझ्या ? मला जर हें तुम्हीं त्याच दिवशी सकाळीं येऊन सांगितलं असतंत, तर रेक्टरच्या रिपोर्टापर्यंत मीं पाळी येऊंच दिली नसती—"

पण अभय कांहींच बोलला नाहीं. तेव्हा त्यानीं विचारले—

" झाला हा प्रकार अत्यंत गैर झाला असं वाटत नाहीं तुम्हाला, पंडित ?—"

" कोणत्या दृष्टीनें गैर ?—"

" सर्वच दृष्टींनीं गैर !—"

" माफ करा. मला वाटत नाहीं तसं. आपण फार तर शिस्तीच्या दृष्टीनं दोष देऊं शकाल आम्हाला—"

" असं कसं म्हणता तुम्ही ? तुम्हीं कॉलेजांतले प्राध्यापक आहात आणि मिस् आगटे या विद्यार्थिनी आहेत. कॉलेजांतले प्राध्यापक जर विद्यार्थिनींशीं अशा प्रकारचं वर्तन करूं लागले, तर सगळं संपलंच म्हणायचं ! आपल्या या वर्तनाचा इतर प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्यावर,—कॉलेजची शिस्त आणि लौकिक याच्यावर काय परिणाम होईल, याचा थोडासुद्धां विचार केला नाहींत तुम्हीं अशा रीतीनं वागताना !—"

प्रिन्सिपल्साहेबाचा आवाज चढत चालला होता. त्यानीं कपाळाला आलेला घाम उपरण्यानें पुसला; व नाकावरला चष्मा हातात घेऊन अभयला विचारले—

" एका प्रश्नाचं सरळ उत्तर द्याल तुम्ही मला ?—"

" प्रश्न कळल्याशिवाय कसं सांगूं मी ?—"

" हें पहा पंडित, मीं तुम्हाला वडलांसारखा आहे खरोखरी. तुम्ही आमच्या कॉलेजांत आल्यापासून तुम्हाला मीं किती प्रेमानं वागवलं याची जाणीव आहे तुम्हाला ! आणि तरी तुम्ही असं उत्तर देतां मला ?—"

पण अभय अगदीं स्तब्ध होता. प्रिन्सिपल्साहेबानीं घसा साफ केला आणि अगदीं हुकमी आवाजात विचारलें——

" हं पहा पंडित, सरळ उत्तर द्या मला. तुम्ही लग्न करणार आहात का मिस् आगटे याच्याशीं ? तसं काहीं ठरलंय का तुमचं दोघांचं ?——"

पण अभय गप्प राहिला. तेव्हा त्यानीं चिडून म्हटले——

" बोला, बोला ! बोलत का नाही तुम्ही ? तुम्ही जर मला लग्न ठरलं असल्याचं सांगितलंत, तर ताबडतोब स्वरूप बदलेल या प्रकरणाच ; न् तुम्हाला कॉलेजात ठेवून घेऊ शकेन मी. हं, बोला लवकर !——"

त्यानीं टेबलावर जोराने मूठ आपटली. पण ते जितके क्षुब्ध, तितकाच अभय शांत होता.

त्यानें अगदीं मथपणानें म्हटले——

" आपल्या प्रश्नाचं उत्तर आज देणं अशक्य आहे मला——"

" अहो, सारी रात्र तुम्ही दोघं एकत्र राह्यलात हें कॉलेजात आता ज्याच्या त्याच्या तोंडीं झालंय अशा स्थितींत दुसरा कोण लग्न करायला तयार होणार आहे मिस् आगट्याशी ! तुमच्या या सगळ्या अविचारी वर्तनामुळं त्या मुलीचं जन्माचं नुकसान जर व्हायला नको असंल, तर तुम्हाला तिच्याशीं लग्न केल्याशिवाय गत्यंतर नाही, पंडित ! हं, चला, चटकन 'हो' म्हणा. म्हणजे सगळा प्रश्न झट्दिशीं सुटेल !——"

अभय रागाने अगदीं लाल होऊन गेला होता. पण बोलण्याच्या भरात ती गोष्ट प्रिन्सिपल्साहेबाच्या लक्षात आली नाहीं. त्याचाहि मनःक्षोभ आतां अगदीं अनावर झाला होता. ते शेवटीं रागानें खेकसून म्हणाले——

" मी इतका जीव तोडून कळकळीनं बोलतोय, पण मला विश्वासात घ्यायची इच्छा नाहीं तुमची, पंडित ! अहो, आता तरी थोडे विचारानं वागा. तुम्ही 'हो' म्हणा. मी तिच्या वडलांना इथल्या इथं पत्र लिहितों लग्नाबद्दल ! ते चांगले स्नेही आहेत माझे——"

पण अभयनें अगदीं शांतपणानें उत्तर दिलें--

" मी आपणाला मघाशीं उत्तर दिलं, तेंच कायम. माझी या विषयावर जास्त बोलण्याची इच्छा नाहीं--"

तो उठून उभा राहिला. तेहि उभे राहिले आणि मोठ्या कळवळ्यानें त्याला म्हणाले--

" हें पहा पंडित, तुमची मनःस्थिति जाणतों मी. पण आपल्याला दोघानाहि उजळ माथ्यानं उभं राहता आलं पाहिजे जगापुढं. तसं व्हायचं म्हणजे लग्न जाहीर करण्याशिवाय मार्ग नाहीं आता दुसरा या पेचातून बाहेर पडायला! तुम्ही विचार करा सगळ्या गोष्टींचा शांतपणानं न् परवा इथ याच वेळीं भेटा मला--"

• • •

पण, दुसऱ्या दिवशीं या प्रकरणाची साग्रसंगीत सुरस वृत्तांत पुण्यातल्या एका प्रमुख दैनिकानें प्रसिद्ध करून त्यावर झणझणीत अग्रलेखहि लिहिल्यामुळें, प्रिन्सिपल्साहेबाना अभयचा राजीनामा स्वीकारणें भाग पडलें.

ते हें प्रकरण आतल्या आत मिटवतील, अशी भीति अभयच्या वाईटावर असलेल्या प्राध्यापकाना प्रथमपासूनच वाटत होती; व रेक्टरचा रिपोर्ट त्याच्याकडे गेल्यानंतरहि जेव्हा अभय नेहमीप्रमाणे कॉलेजात आलेला त्याच्या दृष्टीस पडला, तेव्हा वृत्तपत्राच्या चव्हाट्यावर हें प्रकरण नेल्याशिवाय त्याचें उच्चाटन आपल्याला घडवून आणता येणार नाहीं, अशी त्याची खात्री होऊन चुकली. म्हणून आपल्या गटाच्या दैनिकातून त्यानीं कॉलेजांत झालेल्या या गैरशिस्त प्रकारावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करीत असल्याबद्दल प्रिन्सिपल्साहेबावर शस्त्र धरलें.

पुण्याच्या एका दैनिकानें हें प्रकरण हातीं घेताच साऱ्या महाराष्ट्रातील वृत्तपत्रातून त्याला भडक प्रसिद्धी मिळाली; व शिक्षणसंस्थातील शिस्त आणि प्राध्यापकाची नीतिमत्ता या प्रश्नाच्या तात्त्विक चर्चेला ऊत येऊन अभय-

हा सार्वत्रिक टीका आणि टवाळी याचा विषय होऊन बसला. मार्क्स-वादोद्भूतनवनीति आणि नवमतवाद याचा जो पुरस्कार या वेळी कांहीं तरुण लेखक जोरानें करीत होते, त्याच्याशीं या प्रकरणाचा संबंध जोडून अशा स्वैराचारी प्राध्यापकाना शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रातून हाकून लावले पाहिजे, अशीहि ओरड कांहीं वृत्तपत्रातून सुरू झाली.

त्यामुळे, तिसऱ्या दिवशीं सायंकाळीं तो जेव्हा ठरल्याप्रमाणे प्रिन्सिपल्-साहेबाना भेटावयाला गेला, तेव्हा ते सरळ त्याला म्हणाले, "काय पंडित, लग्न ठरलं असल्याचं जाहीर करण्याची तयारी आहे कीं नाहीं तुमची? नसेल तर राजीनाम्याशिवाय मार्ग नाहीं आता दुसरा!—"

"मीं राजीनामा लिहूनच आणलाय माझा—"

अभयनें अगदीं शांतपणानें उत्तर दिले आणि आपल्या हातातला लिफाफा त्याच्यापुढें ठेवला.

प्रिन्सिपल्साहेब कांहीं क्षण अगदीं स्तब्ध होते. नंतर त्यानीं उपरण्यानें कपाळ पुसलें आणि नाकावरला चष्मा हातात घेऊन रेंकत रेंकत म्हटलें—

"हें पाहा पंडित, हा प्रश्न कांहीं तुम्ही समजता तितका साधा किंवा सोपा नाहीं. तुम्ही आमचं कॉलेज सोडून गेलात म्हणजे हें प्रकरण मिटेल असं समजूं नका. आयुष्याच्या अगदी सुरुवातीलाच हा एक डाग लागल्यासारखा झाला आहे तुम्हाला; न् लोक जन्मभर त्याच्याकडे बोट दाखवून तेजोभंग करतील तुमचा. तुमचं जर लग्न झालं नाहीं त्या मुलीशीं, तर कोणत्याहि जबाबदार शिक्षणसंस्थेंत थारा मिळणार नाहीं तुम्हाला! म्हणून तुम्ही दोघानीं जर लग्न करायचं ठरवलं असेल, तर राजीनामा देण्याची कांहीं गरज नाहीं. तसं जाहीर करून मोकळे होऊं आपण—"

"मीं सर्व गोष्टीचा विचार करूनच राजीनामा दिला आहे—"

"तुम्हीं एका गोष्टीचा नीट विचार केला आहे का, पंडित?—"

"कोणत्या?—"

" त्या मुलीच्या भवितव्याचा ! इतका बोभाटा झाल्यानंतर आता जर तुम्हीं तिच्याशीं लग्न केलं नाहींत, तर तिचं जन्माचं नुकसान होईल—"

त्यानीं ते वाक्य उच्चारताच अभय अगदी तुटकपणानें उद्गारला—

" मला या विषयावर काहींहि बोलण्याची इच्छा नाहीं. माझा राजीनामा आपण स्वीकारावा, एवढीच विनती आहे माझी आपल्याला—"

आणि त्याना नमस्कार करून तो तडक त्याच्या बंगल्यातून बाहेर पडला.

तेथून तसाच तो सारस्वत कॉलनींत त्याच्या एका मित्राकडे गेला. अनघा त्याची वाटच पाहात होती. तिने त्याला विचारले—"

" काय झालं ?—"

" काहीं नाहीं; राजीनामा देऊन आलों—"

" राजीनामा स्वीकारला त्यानीं ?—"

" त्याची इच्छा नव्हती मला सोडण्याची; म्हणून त्यानी फार छेडलें मला. आपलं लग्न ठरलं असल्याचं जाहीर करून हे प्रकरण मिटवावं असं मनात होतं त्याच्या—"

" मग तुम्हीं लग्न ठरल्याचं कां नाहीं सांगितलंत त्याना ?—"

" कसं सांगणार ? तुझ्या वडलाची संमति घेतल्याशिवाय तसं काहींहि कोणाला सांगणं योग्य होणार नाहीं —"

" पण जी गोष्ट आपण करायची ठरवली आहे, ती त्याना सांगायला काय हरकत होती ? उद्या दादानीं आपल्या लग्नाला संमति दिली नाहीं, तर लग्नाचा विचार सोडून देणार आहांत का आपण ?—"

" खात्रीनं नाहीं. पण, त्यांना सगळ्या गोष्टी सरळ कळवून आणि शक्य तर त्यांची संमति घेऊन जें काय करायचं तें करूं—"

" पण, अशा रीतीनं कॉलेजातून तुम्हाला राजीनामा देऊन निघावं लागणं अनिष्ट नाही का ?—"

" पण वृत्तपत्रातून इतकी नालस्ती झाल्यावर आतां कॉलेजात रहाणं तरी कितपत इष्ट होईल ? आज विद्यार्थ्यांना माझ्याविषयीं जो आदर आणि धाक वाटतो, तो यानंतर वाटेल का ? म्हणून मीं कॉलेज सोडायचं ठरवलय—"

" मग आता पुढें ?—"

" आज प्रथम मी तुझ्या वडलाना पत्र घालून रीतसर मागणी करणार; न् त्याचं उत्तर काय येते ते पाहून पुढला कार्यक्रम ठरवणार—"

• • •

अभयचे पत्र हातीं पडताच दादासाहेब उमाबाईसह मोटरनें पुण्याला आले; व त्यानीं तडक वसतिगृहांत जाऊन अनघाची भेट घेतली. वृत्तपत्रात नावे न घेता आलेला मोघम वृत्तात आणि कुत्सित टीका त्याच्य पाहाण्यात आली होती. पण, आपली व्यासगी, क्रीडाप्रिय मुलगी ही त्या प्रणयप्रकरणातील नायिका असेल, अशी शंकाहि त्याच्या मनाला शिवली नव्हती. त्यामुळें अभयचें पत्र वाचताच ते अगदीं रागावून गेले.

मोटारींतून उतरल्याबरोबर ते अनघाला म्हणाले—

"अनू, तूं काय केलंस हें ? तुला जे स्वातंत्र्य आम्हीं दिलं, त्याचा छान उपयोग केलास तूं हा !—"

" काय केलं मी, दादा ? मी कुणाचा हात धरून पळून गेलें, का तुमच्या परवानगीशिवाय लग्न केलं कुणाशीं ?—"

" पण वर्तमानपत्रानीं काय लिहिलंय तें पाह्यलंस ना ?—"

" मीं कांहीं पाह्यलं नाहीं आणि मला काहीं पाहाण्याची इच्छाहि पण नाहीं. वर्तमानपत्रं म्हणजे समाजातल्या दुर्जनाची सार्वजनिक मुखं. वर्तमानपत्राचे सपादक आणि वार्ताहर हे सीतेची नालस्ती करणाऱ्या परटाचे

वंशज शोभतात खरोखरी! त्याच्या तोंडी कोणी लागावं? आम्हाला जर मनसोक्त वागायचं असतं, तर त्यानीं तुम्हाला पत्र घालून मागणी कशाला केली असती? खरंच, दादा, तुम्ही त्याची प्रथम भेट घेऊन नंतर मला भेटायला हवं होतंत—"

"म्हणजे आम्ही आता फक्त अक्षता टाकाव्यात तुम्हा दोघावर असं म्हणणं आहे का तुझं?—"

"नाही, दादा. असं कसं म्हणेन मी? तुम्हीं जर त्याना भेटल्यानंतरहि नकार दिलात, तर लग्न करणार नाहीं मी त्याच्याशी तुमच्या इच्छेविरुद्ध!—"

"पोरी, तूं मोठी लाघवी आहेस. गोड बोलून न् गळीं पडून आपल्या मनासारख्या सगळ्या गोष्टी करवून घ्यायची कला छान साधली आहे तुला!—"

दादासाहेब तिला घेऊनच अभयकडे गेले. त्याचे रूप, बुद्धिमत्ता, निरनिराळ्या विषयातील प्रावीण्य आणि त्याहिपेक्षा त्याच्या वर्तनातील विलक्षण सरळपणा यामुळे त्याच्याविषयी त्याचा अतिशय अनुकूल ग्रह झाला. उमाबाईनाहि तो पसंत पडला; पण आपल्या एकुलत्या एका मुलीचें लग्न स्वतःच्या विशिष्ट पोटजातीबाहर व्हावे, ही गोष्ट मात्र त्याना रुचली नाहीं. तथापि त्या मुग्ध राहिल्या.

त्याला भेटून परत आल्यावर दादासाहेबानीं हंसत हंसत अनघाला विचारले, "मग लग्नाचा मुहूर्त केव्हा ठरवलाय तुम्हीं, पोरी?—"

"मुहूर्त जर आम्हीं ठरवला असता, तर तुम्हाला कळवला नसता का तो पत्रात त्यानीं, दादा?—"

"मग मुहूर्त कोणता ठरवायचा?—"

"तो तुमच्या सोयीचा न् मर्जीचा प्रश्न नाहीं का?—"

"मी वैशाखांतला ठरवणार आहे—"

"का बरं?—"

उमाबाईनी आश्चर्याने त्याच्याकडे पाहात विचारलें. त्या पुढें म्हणाल्या, "एकदा ठरलेलं लग्न कधींहि लांबणीवर टाकूं नये, असं जुनीं माणसं म्हणतात, तें माहीत आहे ना? त्यातून आता इतका बोभाटा झाल्यानंतर तरी हें लग्न तांबडतोब व्हायला हवं——"

"मला हे समजत नाहीं का? पण प्रेमाचें हे आधुनिक खूळ आणि खेळ दोन्ही मला अगदीं अविश्वसनीय वाटतात. त्यातून हा विलायतची हवा खाऊन आलेला तरुण! सगळी चौकशी नीट केल्यावर मग मुहूर्त ठरवूं—"

"दादा, तुम्हाला मुहूर्त जेव्हा कधीं धरायचा असेल तेव्हा धरा, पण उगाच नावं नका ठेवूं त्याना——"

"अबब! काय फणकारा आला पाहा पोरीला!——"

दादासाहेब अनघाची हनुवटी धरून हंसत हंसत उद्गारले.

"अग, लग्न होईपर्यंत तर थाब, बेटा! पुरते सहा महिने ओळखीला झाले नाहींत, तोंच त्या नवख्या तरुणाचा कैवार घेऊन आमच्याशीं भांडणार का? 'अर्थोहि कन्या परकीय एव' हेंच खरं! पण, लक्षात ठेव पोरी, उन्हाळ्यापर्यंत जर हे तुमचं प्रेम कायम टिकलं, तर वैशाखात सातारला थाट उडवून देऊं लग्नाचा. तोंपर्यंत माझी चौकशीहि होईल सगळी पूर्ण——"

दादासाहेबानीं सगळ्या प्रकारची चौकशी केल्यानंतर अभयच्या वडलांना पत्र घातलें. त्यांच्या इच्छेनुसार मुलगी पाहाण्याचा विधि झाला; व वैशाखांत मोठ्या थाटानें त्या दोघाचें लग्न झालें.

• • •

लग्नानंतर जूनच्या तिसऱ्या रविवारीं सकाळीं जेव्हा तीं दोघें नागपूरला आलीं, तेव्हा अनघाला आपलें नवे घर पाहून प्रथम फार आनंद झाला.

तीं दोघें टांग्यातून खालीं उतरून आत येत असता बगीचाच्या फाटकाच्या कमानीवरील कृष्णकमळाच्या वेलाचीं निळी फुलें जेव्हा अनघाच्या दृष्टीस

पडलीं, तेव्हा तो बंगला हर्षोत्फुल्ल नेत्रांनीं जणूं आपलें स्वागत करीत आहे, असें तिला वाटलें. अभयच्या वडलांनीं त्याच्या स्वागतार्थ मॉडेल मिल्स रोडवरील आपला तो बंगला सुंदर सजवला होता. तो तिमजली टुमदार बंगला, त्याच्या भोंवतालचा लहानसाच पण सुबक बगीचा आणि शेजारी असलेली पारशी कुटुंबाची सुसंस्कृत वसति पाहून अनघाचें मन प्रसन्न झालें.

पण ती प्रसन्नता पुरती चोवीस तासहि टिकली नाहीं.

दुसऱ्या दिवशीं पहाटे, तीं दोघे गच्चीवर साखरझोपेंत गुग असतां, मॉडेल मिल्सच्या भसाड्या भोंग्यानें जेव्हां पूर्वरात्रीच्या भयंकर उकाड्यानंतर त्यांना लागलेल्या त्या सुखनिद्रेचा आपल्या भेसूर आवाजानें भंग केला, तेव्हां त्या बंगल्याविषयींची तिची रम्य कल्पनाहि भंगून गेली; व त्यानंतर गिरणीकडे धावत पळत येणाऱ्या कामगार स्त्री-पुरुषांचीं तीं मोठमोठ्यानें चाललेलीं अर्वाच्य बोलणीं आणि दिवसभर प्रत्येक भोंग्यागणिक होणारी त्यांची वर्दळ पाहून तिचें मन गांगरून गेलें. इतकेंच नव्हे, तर अशा या गोंगाटाच्या ओंगळ वातावरणांत पारशी लोकांनीं इतके चांगले बंगले कसे बांधले आणि येथें राहाणें त्यांना कसें परवडलें, याबद्दल तिला अचंबा वाटला. गिरण समोरच असल्यामुळे कापसाचे धागे आणि कोळशाचे कण यांचा थर नवीन घेतलेल्या सुंदर सामानावर सारखा पसरत होता. तो पुसून सामान स्वच्छ करावयाला जेव्हां तिनें रोताइणीला सांगितलें, तेव्हां ती नव्या मालकिणीच्या अज्ञानाबद्दल नवल वाटून हसत हंसत उद्गारली, "हा तर रोजचाच रोणा आहे इथला, बाईजी! ही मिलची वस्ती आहे ना—"

म्हणून, संध्याकाळीं तो कॉलेजांतून परत आल्यावर तीं दोघें गच्चीवर गप्पा मारीत बसलीं असतां ती त्याला म्हणाली, "अण्णाजींनी धंतोली किंवा सिव्हिल लाइन्स सोडून असल्या गचाळ वस्तींत इतका छान बंगला बांधला याचं आश्चर्य वाटतं मला—"

" अग, आश्चर्य वाटण्यासारखं काय आहे त्यात ? ते सिटी इंजिनिअर होते. त्याच्या वजनामुळं ही जागा त्यांना अक्षरशः मातीमोलानं मिळाली; न् सामान आणि मजुरीहि स्वस्त पडली. म्हणून बंगला बांधला इथं त्यांनीं मी विलायतेंत असताना. माझ्या शिक्षणावर इतका पैसा खर्च केल्यानंतर धंतोलीवर जागा घेऊन बंगला बांधणं कसं शक्य होतं त्यांना ? लोक तर असं म्हणतात कीं, अण्णाजींनीं फुकटात बंगला बांधला हा म्युनिसिपालिटीच सामान वापरून !—"

" लोक काय, तोंडाला येईल तें बोलतात ! मी साताऱ्याला असताना होमीसाहेबाकडे टेनिस खेळायला जात असे रोज. त्यामुळें त्याचा मुलगा रुस्तुम याच्याशीं मी लग्न करणार आहें अशी कंडी उठवली होती लोकांनीं ! आपल्या दोघांच्या बाबतींत तरी काय वाईट बोलायचं शिल्लक ठेवलंय लोकांनीं ? लोकांचं काहीं सांगूं नका तुम्ही मला ! भवभूतीनं म्हटल्याप्रमाणे लोक हे जिभेचा पट्टा चालविण्याच्या बाबतींत दुर्जन असतात खरोखरी ! पण, हा बंगला काहीं अण्णाजींनी चांगल्या ठिकाणीं बांधला नाही, एवढं मात्र खरं—"

" चुकतेस तूं ! त्यांनीं असं पाह्यलं कीं आपला एकुलता एक मुलगा विलायतेंतून शिकून येणार, तेव्हा त्याच्यासाठीं आपल्या जवळची पुंजी खर्च करून जो बंगला बांधायचा, तो त्यातल्या त्यात आधुनिक वस्तींत बांधावा. म्हणून दोन्ही बाजूंनी पारशांचीं नव्या धर्तीची घरे असलेल्या शहरातल्या त्यातल्या त्यात स्वच्छ रस्त्यावर त्यांनी हा बंगला बांधला असावा. मी विलायतेंतून परत येईन कीं नाही, याबद्दलच मुळीं शंका होती त्यांना. कारण, माझ्याबरोबर तिथं गेलेला माझा मावसभाऊ चित्तरंजन माजरेकर हा लग्न करून विलायतेंतच स्थायिक झाला. त्यामुळ मी परत आल्यावर माझ्याबद्दल केलेला नवस फेडण्यासाठीं आई मला घेऊन मुद्दाम गोव्याला गेली होती ! आपला हा बंगला पुढमाग नागपूर विद्यापीठाला देऊन टाकायचा विचार आहे माझा. म्हणजे, तो बांधण्यासाठीं अण्णाजींनीं जर खरोखरच काहीं पाप केलं असेल, तर त्याचं क्षालन होऊन जाईल पूर्णपणं !— "

" भलतच काही तरी ! आपल्या संसाराच्या सुरुवातीलाच कशाला तुम्ही घर देऊन टाकण्याचा संकल्प करता आतापासून ! माणस इतक्या हौसेनं आणि इतके कष्ट करून जी घरं बाधतात, ती आपल्यासाठीं आणि आपल्या मुलाबाळांसाठी बाधतात. दान करण्यासाठीं नव्हे ! मी उलट असं म्हणेन कीं, आपल्याला शक्य असेल, तर हा बंगला विकून आपण धंतोलीवर छोटासा बगला घ्यावा— "

" छे, छे ! धंतोलीवर राहण्याची कल्पना मला मुळींच पसंत नाहीं. तुला शहराबाहेर राह्यची इच्छाच असेल, तर अजनीजवळ अण्णाजींनी जो छाटासा बागबंगला बाधून ठेवला आहे, तिथ राह्यला जाऊ या आपण ! पण धंतोलीचं मात्र नाव काढू नकोस ! आहे काय त्या धंतोलींत ? बुदबळाच्या पटातल्या घरासारखे जागा मोजून न् आखून बाधलेले निर्जीव बगले ! इथं शहराच्या एका टोकाला राहूनहि लोकजीवनाचे जे निरनिराळे थर आणि प्रकार पाहाण्याची संधि आपल्याला या बगल्यामुळें मिळेल, ती मजा काही धंतोलीच्या त्या कृत्रिम कारकुनी राहणीच्या हिशेबात दृष्टीस पडायची नाहीं कधीं. ! आमचं हे नागपूर काही तुमच्या पुण्या-मुंबईसारखं पाढरपेशं किंवा औद्योगिक शहर नाहीं. या शहरात एम्प्रेस मिल्ससारख्या बड्या गिरणीपासून एका मैलाच्या आतच हातमागावर कापड विणणाऱ्या कोष्टयाची घरं आढळतील; न् राजकुलीन मराठ्याच्या पडदानशीन महिलाप्रमाणंच कचुकी न घालता समाजात निर्भयतेनं वावरणाऱ्या जंगली कोसलकामिनीहि पाहायला मिळतील. नागपूरच्या जनतेत ब्राह्मण, प्रभु, मराठा, कुणबी, तेली, कलार, कोष्टी, महार, गोंड वगैरे निरनिराळ्या सुसंस्कृत आणि असंस्कृत जातींची जी सरामसळ झालेली आहे, तिच्यामुळं या शहराच्या जीवनाला एक प्रकारचं रगेल आणि रंगेल वैचित्र्य आलेलं असून, हिंदुस्थानातील नागर, औद्योगिक, कृषिक आणि वन्य अशा साऱ्या संस्कृतींची विविधता त्यात बघायला सापडते. गोंड, मराठे आणि इंग्रज या तिघाच्याहि सत्तेचीं जिवंत स्मारकं आज या शहरात एकमेकांच्या शेजारीं खडी आहेत. ज्याला आपल्या विराट् समाजाच्या अनंत अंगोपांगांचं निरीक्षण किंवा चित्रण करायचं असेल, त्याला नागपूरसारखं दुसरं

ठिकाण महाराष्ट्रात मिळणार नाही. कारण हिंदुस्थानातल्या बहुतेक सगळ्या संस्कृतींचा, धर्मांचा आणि जातींचा संगम आणि संकर या मध्यवर्ति शहरात झालेला आहे. म्हणून धंतोलीच्या शांत, सुबक पण निःसत्व वातावरणात राहण्यापेक्षा मला शहराच्या या जिवंत, जोषदार गजबजाटात राहणं जास्त आवडतं— ''

• • •

पण, साताऱ्याच्या शुद्ध डोंगराळ हवेंत वाढलेल्या आणि पुण्याच्या नागर सुसंस्कृत वातावरणात शिकलेल्या अनघाला नागपूर शहरातील तें धूलि–धूम–धूसर वातावरण, ती सणावाराची गडबड आणि ती निरनिराळ्या चळवळींची दंगल अगदीं आवडत नसे.

अभयनें मुंबईच्या कॉलेजात किंवा इन्स्टिटयूटमध्यें प्राध्यापकाची जागा मिळवावी, अशी तिची इच्छा होती; व लग्नानंतर तीं दोघें मधुचंद्रासाठी महाबळेश्वरला गेलीं असता तिने त्याला तसें सुचविलेंहि होते. तो केंब्रिज विद्यापीठाचा डॉक्टर असल्यामुळें त्याला ती गोष्ट सहज शक्य होती. पण, पुणें ज्या कारणामुळे त्याला सोडावे लागलें आणि त्यासंबंधी जो गवगवा पुण्या-मुंबईच्या वृत्तपत्रांतून झला, तो सर्वच प्रकार लक्षात घेऊन त्यानें नागपूरला स्थायिक होण्याचें ठरविले: व नागपूर विद्यापीठासारख्या नवीन विद्यापीठाची आपल्या हातून काहीं विशिष्ट सेवा घडली तर पाहावी, या उद्देशानें त्याने तेथील सायन्स कॉलेजातील जागा पत्करली.

सायन्स कॉलेजात प्राध्यापक म्हणून दाखल झाल्यावर त्यानें जी एक गोष्ट केली, तिच्यामुळें त्याचें जीवन अतिशयच व्यग्र होऊन गेलें.

आपली स्वतःची प्रयोगशाळा असावी अशी इच्छा त्याला पुष्कळ दिवसापासून होती. त्याच्या बगल्याचा तिसरा मजला हा अर्धा गच्ची आणि अर्धा दिवाणखाना अशा स्वरूपाचा होता. या दिवाणखान्यात त्यानें आपली प्रयोगशाळा थाटली; व कॉलेजातून परत आल्यावर त्याचा बहुतेक वेळ तिथें निरनिराळे प्रयोग करण्यांत जात असे. बंगल्याच्या खालच्या मजल्यावर

स्वयंपाकघर आणि बैठक, दुसऱ्या मजल्यावर ग्रंथशाळा आणि शय्यागृह व तिसऱ्या मजल्यावर प्रयोगशाळा आणि गच्ची अशी व्यवस्था त्यानें केली. त्याचे निवडक मित्र आणि विद्यार्थी याच्याशिवाय कोणालाहि वरच्या दोन मजल्यावर प्रवेश मिळत नसे. त्याचा संसार थाटून दिल्यावर त्याचे आई-वडील द्वारकेला गेले. त्यामुळे, घरात जें अनिर्बंध, अनुकूल, निवात वातावरण उत्पन्न झाले, त्याचा उपयोग त्यानें ज्ञानोपासनेसाठीं करण्याचा निश्चय केला. रसायनशास्त्र, अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र हे त्याचे आवडते विषय होते. त्यासंबंधीचे अद्यावत् ग्रंथ, उपकरणें, टिपणें, छायाचित्रें वगैरेंचा संग्रह वरच्या दोन मजल्यावर सुव्यवस्थित रीतीनें केलेला होता; व त्या संग्रहाच्या सान्निध्यात वाचन किंवा संशोधन करण्यात त्याचा बहुतेक वेळ जात असे.

लग्न होऊन नागपूरला स्थायिक झाल्यावर अशा प्रकारचें वळण त्याच्या आयुष्याला लागेल, अशी कल्पनाहि अनघाच्या मनाला कधीं शिवली नव्हती. लहानपणापासून तिचें सगळें आयुष्य वैभवात, क्रीडेंत आणि व्यासंगात गेलेलें होते. क्रीडा आणि अभ्यास याच्याशिवाय दुसरा कोणताच छंद, दुसऱ्या कोणत्याच जीवनाच्या अंगाची जाणीव तिच्या मनाला नव्हती. कॉलेजात असताना तिला अभयविषयीं जें आकर्षण वाटलें, तेंहि त्याचें क्रीडानैपुण्य, सुंदर पीळदार शरीर, निरनिराळ्या शास्त्रातील गति आणि अल्पवयातच लाभलेली प्रतिष्ठा या कारणामुळें जी मनोज्ञता त्याच्या पौरुषाला आलेली होती, तिच्यामुळेंच खरोखरी वाटले. त्या मनोज्ञतेच्या मागें जी मुक्तात्मता आणि स्वतंत्रप्रज्ञता होती, त्या पौरुषामध्यें जो कलंदराच्या बेडर वृत्तीचा जोष होता, तो तिला दिसला नव्हता. नागपुरास आल्यावर त्याच्या मुक्तात्मतेचे निरनिराळे विलास आणि विक्षेप तिच्या प्रत्ययाला हळूहळू येऊं लागले. त्याला तिच्याविषयीं विलक्षण प्रेम आणि कौतुक होतें. पण, त्या प्रेमांतहि जी अनासक्तीची छटा आणि त्या कौतुकातहि जी चिकित्सेची दृष्टि मधून मधून डोकावत असे, ती तिला अगदी दुःसह होई. त्याचें स्पर्शसुख रात्रभर आपल्याला लाभावें, असें तिला वाटे. उलट, त्याच्या डोक्यांत एखादी कल्पना घोळत असली किंवा एखादा प्रबंध त्याला लिहावयाचा असला, म्हणजे तो रात्रीं केव्हा उठून वाचावयाला किंवा लिहावयाला बसेल, याचा काहीं नेम

नसे. तिला इंग्रजी बोलपटाविषयीं अतिशय आवड होती. उलट, वैज्ञानिक, ऐतिहासिक किंवा वाङ्मयीन बोलपट सोडल्यास त्याला चलच्चित्राविषयीं एक प्रकारचा उबग होता. या सर्व कारणामुळे, त्याच्या संसारात जरी आता तिसऱ्या कोणत्याहि व्यक्तीच्या अस्तित्वाचा अडथळा नव्हता, तरीसुद्धां त्याचें बौद्धिक तादात्म्य होऊं शकलें नाही.

त्याच्या वागण्यात जी कलंदरी वृत्तीची स्वैरता होती, तिचेंहि अनघाला नवल वाटत असे. मोटारींतून कॉलेजात जाताना जो सुंदर अद्यावत् पद्धतीचा पाश्चात्य पोशाख तो घालीत असे, त्याची कुचेष्टा तो नेहमीं 'खोगीर' या शब्दानें करावयाचा. संध्याकाळीं घरीं आल्यावर हें 'खोगीर' फेकून देऊन बहुधा तो गच्चीवर उघडा बसे; किंवा नुसता हाफ् शर्ट अंगात घालून तिच्यासह उमरेड रस्त्यावर भटकावयाला जात असे. त्याच्या शेजारच्याच एका इमारतींत नागपुरातील कम्युनिस्ट पक्षाचे 'कम्यून' होतें. त्या 'कम्यून' मधून तो केव्हा कोणत्या केस पिंजारलेल्या, दाढी वाढलेल्या आणि अतिरिक्त धूम्रपानामुळे ओंठ काळवंडलेल्या भाईला जेवावयाला घरीं आणील, याचा नेम नसे. मग रात्री दोन वाजेपर्यंत सगळ्या जगाच्या राजकारणाचा काथ्याकूट चाले. कम्युनिस्टाच्या या गटातच त्याचा एक लहानपणापासूनचा बहुश्रुत सारंगिया मित्र होता. तोंडात भला लांब त्रिची चिरूट शिलगावून मुडेछाट पेहरण घातलेली या मस्त मौलाची स्वारी त्याच्याकडे झुकली, म्हणजे सूर्योदय होईपर्यंत वादन किंवा गप्पाष्टकें चालावयाचीं! त्याच्या बंगल्यापासून पाऊण मैलावर नाग नदीच्या पलीकडे कॅथॉलिक मिशनचें 'गरीब घर' होतें. तो स्वतः तेथील गोवानीज् सिस्टर्सशीं गप्पा मारावयाला कधीं कधीं जात असे; व त्याहि मधून मधून त्यांच्या घरीं येत असत. त्याचे संभाषण एकदा कोंकणींतून सुरू झालें, म्हणजे अनघाला नुसतें प्रेक्षकाचें काम करावें लागे! बंगल्याच्या मागल्या बाजूला नाल्याच्या काठीं छत्तिसगडी राऊताची वस्ती होती; व त्याच्या पलीकडे महारवाडा होता. या वस्तींतहि तो वारंवार जात असे. राऊतांची गाणीं, नाच आणि महाराचे सण, कुळाचार वगैरेंची माहिती गोळा

असे. समाजांतील दलित, पीडित, पतित, वंचित, विकृत आणि व्यथित अशा लोकाची खुरटलेलीं आणि मरगळलेलीं जीवने मूळातून न्याहाळून पाहणें, त्याच्या पतनाचीं, विकृतींचीं आणि व्यथाचीं कारणे शोधून काढणे व त्याची दुःखे समजावून घेऊन ती हलकीं करण्यासाठीं झटणें, हे जणूं त्याचे व्यसन होऊन बसलें होते. त्यामुळे, त्याच्या जिज्ञासु जीवनाला जी गाढता, विशालता आणि कोमलता आली होती, ती जरी अनघाला कौतुकास्पद वाटत असे, तरी त्याच्या त्या निरनिराळ्या छंदात आणि नादात तिचे स्वतःचे नागर मन मात्र कधींहि रमले नाहीं.

पण त्या सगळ्या व्यापातहि त्या दोघाचा रोज टेनिस खेळण्याचा क्रम मात्र कधी चुकला नाही. सकाळीं पहिला चहा झाल्यावर आणि सायंकाळीं फिरावयाला जाण्यापूर्वी बंगल्याच्या मागल्या बाजूला जें क्रीडागण त्यानें मुद्दाम तयार करविले होतें, त्यावर ती दोघे चार-पाच सेट तरी रोज खेळत. तो खेळ चालू असताना मात्र तिला असें वाटे कीं, त्याच्या आणि आपल्या तादात्म्याचे सगळ्यात सुखकर क्षण जर कोणते असतील, तर ते या क्रीडानदाचे होत.

तरीसुद्धां केव्हा केव्हा तिच्या मनात अशी शंका येई कीं, याच्या या व्यापक संशोधनशील जीवनात खरोखरी आपल्याला काहीं स्थान आहे का ? की आपण केवळ त्याची गृहशोभा आहोत ?

• • •

पण, अभयचें आपल्यावरील प्रेम किती गाढ आहे, याची प्रचीति तिला लवकरच आली.

उन्हाळ्याच्या सुरुवातीला जेव्हा तिला डोहाळ्याचा अतिशय त्रास होऊं लागला, तेव्हा कॉलेजातील वेळ सोडून तो सारा दिवस तिच्या बिछान्या-पाशीं बसून आपलीं कामें करीत असे. पाचवा महिना लागल्यावर गर्भपाताचीं लक्षणें होऊन तिची प्रकृति फारच खालावली. तेव्हा डॉक्टरांनीं शस्त्रक्रिया करण्याचें ठरविलें. पण अनघा त्या गोष्टीला मुळींच तयार

होईना. डॉक्टरानीं तिला स्पष्ट सांगितलें कीं, गर्भ कापून काढल्याशिवाय काहीं तुम्ही या दुखण्यातून वाचणार नाहीं. पण, आपल्या पोटातला गर्भ कापून काढण्याची कल्पना तिला इतकी अमानुष वाटली कीं, " असल्या या शस्त्रक्रियेपेक्षा मी मरायला तयार होईन, " असें उत्तर तिनें डॉक्टराना दिलें! या वादातच एक दिवस वाया गेल्यामुळे तिची प्रकृति अतिशयच बिघडून, " बारा तासात शस्त्रक्रिया न केल्यास ती हातीं लागणार नाहीं, " असा निर्णय डॉक्टरानीं दिला. अखेर, अभयने परोपरीनें समजूत घालून तिचें मन शस्त्रक्रियेसाठीं तयार केलें; व त्या प्रसंगातून ती निभावली.

शस्त्रक्रियेनंतर आलेली क्षीणता थोडी कमी होताच अभय तिला घेऊन महाबळेश्वरला गेला. तेथील प्रोत्साहक वातावरणात तिची प्रकृति सावरली पण मन मात्र प्रसन्न झालें नाहीं.

त्या गर्भच्छेदाचा तिच्या मनावर अत्यंत विदारक परिणाम झाला. आपला पहिला गर्भांकुर अशा रीतीनें खुडला गेला, हा एक आपल्या वैवाहिक जीवनाला अपशकुनच आहे, अशी तिची भावना झाली; व आपल्याला मूल व्हावें अशी उत्कट इच्छा असूनहि गर्भधारणेबद्दल तिच्या मनाला धाक बसला.

आणि उन्हाळा संपल्यावर एक प्रकारच्या अनुत्साहित मनःस्थितींतच तीं दोघे नागपूरला परत आलीं.

पण त्यानंतर त्यांचे पुरते सहा महिनेहि सुखांत गेले नाहींत. हिंवाळयाच्या अखेर तिला पुन्हा दिवस गेले. तेव्हा, या खेपेस पूर्वीसारखा कोणताहि त्रास तिला होऊं नये, म्हणून अभयनें पहिल्यापासूनच वैद्यकीय उपचार सुरू करण्याची दक्षता घेतली. तरीसुद्धा तिला पाचवा महिना लागतो न लागतो, तोंच गर्भपाताचीं लक्षणें दिसूं लागून, तिला पराकाष्ठेचें दुःख झालें. पण अभयनें तिला धीर देऊन उपचारासाठीं मुंबईस आणलें. परंतु, मुंबईच्या सर्व तज्ज्ञ डॉक्टरांचे गर्भपात थांबविण्याचे प्रयत्न विफल ठरून, पुन्हा शस्त्रक्रियेचा प्रसंग आला.. इतकें नव्हे, तर तिच्या गर्भाशयात विकृति उत्पन्न झालेली असल्यामुळें तोहि काढून टाकणें अवश्य आहे, असें डॉक्टरांचें मत पडलें.

हा त्याचा निर्णय जेव्हा अभयनें तिला सांगितला, तेंव्हां ती दुःखाति· शयानें इतकी काहीं वेडी होऊन गेली कीं, तिची कशा रीतीनें समजूत घालावी आणि तिचे प्राण वाचवावे, हे त्याला समजेना. म्हणून त्याने दादासाहेबांना तार करून बोलावले. पण, ते आल्यावर उमाबाई तिचें सांत्वन करून शस्त्रक्रियेसाठीं तिच्या मनाची तयारी करतील अशी जी त्याची अपेक्षा होती, ती व्यर्थ ठरली. उलट, या मुलीच्या जन्मानतर आपल्याला मूल न होऊन जसा आपला वंश खुटला, तसाच तीहि गर्भधारणेला कायमची असमर्थ होऊन तिचाहि वंशक्षय होणार, हे कळताच त्यांना परमावधीचें दुःख झालें; व गर्भ आणि गर्भाशय न काढता अन्य कोणत्याहि मानवी किंवा दैवी उपायांनीं तिला वाचविण्याचा प्रयत्न करावा, असा हट्ट त्यांनीं धरला. वस्तुतः, ती या वेळीं इतकी अशक्त झालेली होती कीं, प्रत्येक क्षण तिच्या प्राणरक्षणाच्या दृष्टीनें मोलाचा होता. इतकेंच नव्हे, तर प्रथम तिला रक्त देऊन नंतर शस्त्र· क्रिया केली, तरच ती यशस्वी होईल, असे डॉक्टरांनीं त्याला स्पष्ट सांगितले होते. तेव्हा त्याने स्वतःचे रक्त तिला द्यावयाचें ठरविलें. पण ती शस्त्रक्रियेला काहीं केल्या कबूल होईना.

शेवटीं अभयनें अगदीं निकरावर येऊन तिला विचारलें—

" अनू, तुझं माझ्यावर प्रेम आहे ना?—"

" का बरं? अशी शंका का आली तुम्हाला आज?—"

" तूं ऑपरेशन करून घ्यायला तयार होत नाहींस म्हणून शंका आली मला. तुला माहीत आहे कीं, तूं जर या दुखण्यात गेलीस तर मला संसार म्हणून काहीं उरणार नाहीं. आणि तरी तूं हट्टानं मृत्यूला कवटाळण्याचा अविचार चालविला आहेस—"

" पण, मला जर मूल होणार नसेल, तर मी जगून तरी काय फायदा?—"

" तूं मुलासाठीं जगणार का माझ्यासाठीं जगणार, अनू? तुला मी प्रिय आहे, तो केवळ मुलं होण्यासाठीं प्रिय आहे का? —"

" नाही ! तुम्ही मला प्रिय आहात, ते तुम्ही म्हणूनच प्रिय आहात. पण स्त्रीच्या जन्माचं साफल्य आपल्या प्रियकराला पुत्ररूपानं पुनर्जन्म देण्यात असतं. आपल्याला प्रिय असलेले आपल्या वल्लभाचे रूपगुण संततीच्या रूपानं पुन्हा निर्माण करण्याइतका दुसरा आनंद, दुसरा अभिमान नाहीं स्त्रीच्या जीवनात ! स्त्रीला ' जाया ' हे नाव ज्यानी दिलं, त्यानीं तिचा हा स्वभाव, हा मनोधर्म अचूक ओळखला. आपल्या प्रियकरापासून जर आपल्याला अपत्य झालं नाही, तर स्त्रीला तें प्रेम आणि तो संसार व्यर्थ वाटतो. तुम्ही मला अत्यंत प्रिय आहात, म्हणूनच तुमच्यापासून मूल होणं हेंहि मला प्रिय आहे--"

" मलाहि समजतात या सगळ्या गोष्टी ! पण, तुझं जर माझ्यावर प्रेम असेल, तुला जर त्या प्रेमाखातर माझ्यासाठीं जगायचं असेल, तर मूल होण्याची शक्यता कायमची गमावूनच तुला जगावं लागणार आहे आता ! नाहीं झालं मूल तर नाही झालं ! पण आपण दोघ तर एकमेकाच्या जन्माला पुरूं ना ? आपल्यापैकीं कुणी तरी एक ऐन तारुण्यात मरण्यापेक्षा तें जास्त इष्ट नाहीं का ?--"

अनघा कांही बोलली नाही. तिच्या डोळ्याना धारा लागल्या होत्या.

त्यानें हळूच तिचे मस्तक आपल्या हाताच्या तळव्यावर घेतलें; व तिच्या कानाशीं तोंड नेऊन तो अत्यंत आर्तवाणीनें उद्गारला--

" अनू, माझ्यासाठीं, माझ्यासाठीं जगलं पाहिजे तुला--"

तिच्या डोळ्यांतून अविरत वाहणाऱ्या अश्रुधारानीं त्याचा हात भिजून गेला.

आणि ती रडत रडतच उद्गारली--

" मी तयार आहें --"

● ● ●

त्यानंतर सहा महिन्यानीं जेव्हा अनघा नागपूरला परत आली, तेव्हा तिच्यात अंतर्बाह्य अगदीं विलक्षण बदल होऊन गेला होता.

तिच्या त्या लांबसडक सुंदर केशकलापात मधून मधून रजतरेषा चमकूं लागल्या होत्या; व तिच्या डोळ्यांचें तेज भोंवतालीं पडलेल्या खळ्यामुळें झाकोळून गेलें होतें.

पण, त्याहिपेक्षा तिच्या वृत्तींत जी विमनस्कता उत्पन्न झाली होती, ती पाहून अभयला अतिशयच भय वाटलें.

तिची जीवनेच्छा अत्यंत क्षीण झाली आहे, हें तिच्या दृष्टींत आणि कृतीत त्याला क्षणोक्षणीं प्रतीत होत असे. हाडीं ताप मुरलेल्या माणसाला जशी अन्नाविषयीं कोणत्याहि प्रकारची रुचि उरू नये, त्याला जसे सगळे षड्रस कडू जहर लागावेत, त्याप्रमाणे जीवनाविषयीं कोणत्याहि प्रकारची रुचि तिच्या दुःखदग्ध मनाला उरली नव्हती. पूर्वी तीं दोघें जेवावयाला बसलीं, म्हणजे स्वतः मुद्दाम तयार केलेला एखाद-दुसरा खमंग पदार्थ त्याला आग्रह करून वाढणाऱ्या अनघाला आता टेबलावर कोणते पदार्थ गडितनें आणून ठेवलेले आहेत, याचें भान नसे; व अभयलाच उलट तिला आग्रह करून तिच्या पोटात दोन घास कसे जास्त जातील याची काळजी घ्यावी लागे. आपला बोलपटाविषयींचा कंटाळा बाजूला सारून आठवड्यातून तीन वेळा तीन निरनिराळ्या चित्रमंदिरात तो तिला घेऊन जाऊं लागला. पण, केव्हा चित्रपट सुरू झाल्यावर तिला सुस्ती येई, तर केव्हा अर्ध्या चित्रपटातून ती कंटाळून उठून घरीं परत येत असे. थारेपालट झाल्यानें कदाचित् तिच्या वृत्तींत फरक पडेल, असें त्याला वाटलें. म्हणून, अंजनी जेलच्या पलीकडे फुग्याच्या कारखान्यालगत त्याचा जो लहानसा बागबंगला होता, तेथें रहावयाला जाण्याचा विचार त्यानें केला. ती आपली कल्पना त्यानें तिला सांगताच ती म्हणाली—

“ काय करायचंय तिथं राह्यला जाऊन आता? आपलं लग्न झालं, त्या वेळीं मला हौस होती धंतोलीवर जाऊन राहण्याची. पण आतां आपण इथं राह्यलों काय न् धंतोलीवर राह्यलों काय, सगळं सारखंच आहे मला!

उलट, नागपूरच्या हद्दींबाहेर, त्या ओसाड जागीं जाऊन राह्यलं, म्हणजे वनवास कपाळीं आल्यासारखा वाटायचा--"

"पण तिथंच राह्यला जावं असा कांहीं आग्रह नाहीं माझा. आपण धंतोलीवर कुठंहि भाड्यानं बंगला घेऊन राहूं शकतों--"

"पण धंतोलीची कृत्रिम, तुटक रहाणी, तिथलं नकली सामाजिक जीवन आणि तिथल्या बड्या लोकांची आत्मकेंद्रित वृत्ति तुम्हाला पसंत नसल्या-मुळेंच तर शहरात राह्यलों ना इतके दिवस आपण? मग आतांच कशाला धंतोलीवर राह्यला जायच?—"

"तुझ्या मनाला बरं वाटेल म्हणूनं—"

"माझ्या मनाला बरं वाटण्यासारखं काय आहे धंतोलीत? तुमच सान्निध्य हीच एक माझ्या मनाला बरं वाटण्यासारखी गोष्ट उरलेली आहे जगात आता--"

"पण आपल्याला हे घर लाभलं नाहीं असं म्हणत होते दादा आपण महाबळेश्वरला असताना--"

"जुन्या माणसाच्या कांहीं तरीच समजुती! आपल्याला लग्न लाभलं नाहीं असंसुद्धां म्हणेल आई उद्या. पण म्हणून काय आपण एकमेकांना सोडून देणार आहोंत का? या घरात आपला जम चांगला बसलाय; सगळ्या सुखसोईहि करून घेतल्याहेत आपण. आता कुठं उगाच जाऊन भाड्याच्या घरात राह्यचं?--"

तिच्या या युक्तिवादाने तो कुंठित होऊन गेला.

पण, तिची मंद होत चाललेली जिजीविषा पुन्हा कशा रीतीनें उद्दीपित करावी, हा एकच प्रश्न सदैव त्याच्या डोळ्यापुढें उभा होता; व तो सोड-विण्यासाठी त्याची धडपड सारखी सुरू होती.

महाबळेश्वरहून परत आल्यापासून गेल्या सात आठ महिन्यांत तिने टेनिसच्या रॅकेटला एकदाहि हात लावला नव्हता. तो जेव्हां आपल्या विद्यार्थ्यांबरोबर खेळे, तेव्हा ती क्रीडांगणावर येऊन बसत असे. पण, त्यानें जर

कधीं तिच्याबरोबर खेळण्याची गोष्ट काढली, तर ती अशक्तपणाचें निमित्त सांगून नकार देत असे. त्याला सारखें असें वाटे कीं, ती जर पूर्वींप्रमाणें टेनिस खेळावयाला लागली, तर निदान क्रीडानंद तरी तिच्या जीवनात पुन्हा उत्पन्न होईल आणि तिच्या वठत चाललेल्या जिजीविषला नवा फुलोरा फुटेल--

म्हणून एक दिवस सायंकाळीं खेळ संपल्यावर तो चहा घेतांना तिला म्हणाला--

"उद्यापासून आपण दोघानीं खेळायचं हं, अनू?--"

"कां बरं?--"

"या मुलाबरोबर खेळून कांहीं समाधान होत नाहीं माझं. तूच खरी सामनेवाली आहेस माझी!--"

त्यानें हंसून म्हटलें. पण ती मात्र अगदीं गंभीर होती.

"मग काय खेळणार ना तूं उद्यापासून? एकदा तू खेळायला सुरुवात केलीस, म्हणजे शक्ति येईल आपोआप. गेल्या खेपेस मुंबईहून येताना ज्या नव्या सुंदर रॅकेट्स् आणल्या आहेत ना आपण, त्या काढून उद्या मुहूर्त करूं या आपल्या सामन्याचा!--"

तो हंसत हंसत म्हणाला; पण ती स्तब्धच होती.

तेव्हां त्यानें तिचा हात धरून विचारलें--

"तूं बोलत कां नाहींस, अनू?--"

"मी बोललेलं तुम्हाला आवडणार नाहीं म्हणून--"

"मला न आवडण्यासारखं काय आहे तुझ्याजवळ बोलायला, हें कळूं द्या तरी मला एकदा--"

पण ती कांहीं बोलली नाहीं. तेव्हां तो उठला, तिचें अवनत मुख त्यानें दोन्ही हातानीं वर उचललें आणि तिच्या दृष्टींत दृष्टि मिसळून तो उद्गारला--

"अनू, आपल्या दोघात काहींहि गुपित, कसलाहि आडपडदा नाहीं, असं समजत होतों मी आजपर्यंत. तेव्हां हें जें काय तुझ्या मनात डाचत आहे, तें सागितलं पाहिजेस तूं मला आताच्या आता——"

पण तिच्या तोंडून शब्द फुटेना. फक्त डोळ्यांतून घळघळा अश्रु वाहूं लागले.

"हें काय वेडयासारखं, अनू? तूं मला सागितल्याबरोबर भार हलका होईल तुझ्या मनावरला. हं, बोल बोल——"

"टेनिसच्या रॅकेटला हात लावायचा नाहीं अशी शपथ घेतली आहे मी गेल्या खेपेस मुंबईला असताना—"

ती रडत रडत उद्गारली.

ते शब्द तिनें उच्चारले मात्र, तो झट्दिशीं तिच्या तोंडाभोवतालचे आपले हात काढून घेऊन बाजूला झाला.

तिनें वर पाहिलें—

—त्याचे ओंठ थरथरत होते, एकांत एक घट्ट आवळून धरलेले हात लटलटत होते.

ती तत्क्षणींच उठून त्याच्याजवळ गेली आणि आपले दोन्ही हात त्याच्या गळ्यांत घालून, त्याच्या अवनत दुःखविव्हल दृष्टींत आपली दृष्टि मिसळून उद्गारली—

"रागावलात ना तुम्ही माझ्यावर? मला पक्कं माहीत होतं, मीं हें सांगितल्यावर तुम्हाला राग येईल माझा, अतिशय दुःख होईल तुमच्या मनाला, म्हणून मी बोलले नव्हतें आजपर्यंत. तुम्ही बोलत का नाहीं, अभय? माझ्या-कडे पाहा, माझ्याशीं बोला ना!—"

त्यानें तिच्या दोन भुवयामधल्या नितळ जागेवर ज्या तीव्र मनोवेदनाच्या दाट रेषा उठल्या होत्या, त्यावर आपले ओंठ टेकले आणि तिला घट्ट जवळ घेऊन म्हटले——

"अनू, तूं काय केलेंस हें? कशाला घेतलीस तूं ही शपथ ? आपल्या जीवनात जो एकच एक निर्विकल्प, निरागस आनंदाचा विषय आता उरला होता, तो नाहींसा करून टाकलास तूं, याची जाणीव आहे का तुला? ज्या क्रीडेच्या नादानं आपल्याला दोघाना एकत्र आणल आणि ज्या क्रीडेच्या उन्मादात आपली प्रीति बहरली, त्या क्रीडेवर का सूड घेतलास तूं हा ?–"

" त्या क्रीडेमुळें माझा सर्वनाश झाला असं विचारातीं लक्षात आलं माझ्या—"

" काय भ बालतस तूं हे ? आपल्या दुर्दैवाचा राग आपण त्या बिचाऱ्या खेळावर काढण्यात काय अर्थ आहे ?—"

" मी भलतंच बोलत नाहीं, अभय. मुंबईस असतांना मी पूर्ण विचार करूनच रॅकेटला पुन्हा जन्मात कधीं हात लावायचा नाहीं. असं ठरवून टाकलं. लहानपणीं आई मला नेहमीं म्हणायची, " मुलींनीं असले खेळ फार खेळणं चागलं नाहीं बरं ! तुझ्या या खेळाच्या हव्यासामुळं तूं अजिबात अंग धरीत नाहींस, बेटा ! या वयात शरिराचा कमरेखालचा भाग गरगरून जाऊन रुंद व्हायला हवा. पण त्याऐवजीं आपल्या चपला घोडीसारखे सडसडीत लांब होत चालले आहेत पाय तुझे ! बगळ्याचं वरचं गोल शरीर जसं त्याच्या दोन पायांच्या काड्यावर उभं असतं, तशी कळा येत चालली आहे तुझ्या बांध्याला ! गरगरीत गोंडस बाधा असायला हवा या वयात तुझ्यासारख्या उफाड्या अंगाच्या मुलीचा ! पण तूं आपली कळकासारखी उंचच उंच होत चालली आहेस ! कसं तुझं लग्न होईल न् कधीं तुला मुलं होतील, देव जाणे ! तूं आता सोडून दे हा खेळ अजिबात. " आईचं हें बोलणं त्या वेळीं रुचलं नाहीं मला. पण आता मात्र असं वाटतं कीं, त्या खेळाच्या व्यसनामुळंच माझं शरीर गर्भधारणेला अपात्र ठरलं न् हें विफल जिणं आलं माझ्या कपाळी—"

" कांहीं तरीच कल्पना आहे तुझी ही, अनू ! टेनिस खेळणाऱ्या बायकाना काय मुलं होत नाहींत का ? पाश्चात्य देशांत ज्या टेनिस चॅंपियन्स आहेत, त्या काय सगळ्या अविवाहित आहेत ? "

" बऱ्याच अविवाहित असतात; न् ज्या विवाहित असतात त्याना मुल होतात कीं नाही कोण जाणे ! इतर बायका टेनिस खेळत असल्या तरी त्या हौस म्हणून खेळतात.. पण माझं मात्र टेनिस हे व्यसन आणि वेड होऊन बसलं होतं. त्या व्यसनानं बळी घेतला अखेर माझ्या स्त्रीत्वाचा ! म्हणून मीं मुंबईला असताना ठरवून टाकलं की, रॅकेटला पुन्हा हात म्हणून लावायचा नाहीं—"

" पण तुझं हे सगळं तर्कट खरं आहे असं जरी क्षणभर धरून चाललं, तरीसुद्धा एक गोष्ट तूं लक्षात घ्यायला हवीस, असं वाटतं मला—"

" आता काय लक्षांत घ्यायचं उरलंय आणखी?—"

" हे पाहा, नाही तरी आता मूल होण्याची आशा नाहीच आपल्याला. मग ज्या खेळान तुझ्यां जीवनात इतकी ईर्ष्या आणि इतका आनंद उत्पन्न केला होता विद्यार्थिदशेत असताना, त्या खेळात पुन्हा मन घालून तूं जागतिक कीर्ति का मिळवूं नयेस ? आपला संसार संपलाच आहे आता एका दृष्टीन. मग, ज्या खेळात नैपुण्य मिळवून तूं एका काळीं इतकं नांव कमावलं होतंस, त्या खेळात यापुढं सारं आयुष्य घालून तू सार्थक का नये करूंस आपल्या जीवनाचं ? त्यामुळं एक नवा आनंद, एक निराळा उत्साह उत्पन्न होईल आपल्या संसारात—"

" हें सगळं लग्नापूर्वी सुचवलं असतंत तुम्हीं मला, तर फार बरं झालं असतं, अभय ! आपण दोघं एकत्र यायला टेनिस कारण झाला हे खरं. पण, तुमच्याशीं मी जे लग्न केलं, तें स्त्री म्हणून केलं; खेळाडू म्हणून नव्हे. तें लग्न ज्या खेळामुळं विफल झालं, त्या लग्नाचा बहर ज्या खेळामुळं वठून झडून गेला, तो खेळ कसा खेळावासा वाटेल मला पुन्हा ? टेनिसची रॅकेट ही कुऱ्हाड ठरली माझ्या स्त्रीत्वावरली !—"

• • •

अनघाची जीवनेच्छा प्रज्वलित करण्याचे हे प्रयत्न फसल्यानंतर अभयच्या मनांत एक अगदीं निराळीच कल्पना आली; व म्हणून त्यानें 'पुअर हौस'मध्ये जाऊन सिस्टर झेवियेरा हिचा सल्ला घेतला.

सिस्टरचें त्याच्यावर पुत्रतुल्य प्रेम होतें. एक तर तो गोव्याचा होता, व दुसरें असें कीं, ज्या मूळच्या सारस्वत ब्राह्मण घराण्यातील सिस्टरचे पूर्वज सेंट झेवियरच्या काळात बाटवले जाऊन ख्रिस्ती धर्मात खेचले गेले होते, त्या केकरे घराण्यातली त्याची आई होती. थेट गोव्याहून इकडे आलेल्या आपल्या आईमुळें तो जें मोडकेंतोडकें कोंकणी बोलत असे, तें सिस्टरला लहान मुलाच्या बोबड्या बोलासारखें गोड वाटे. सिस्टरची जिवंत धर्मश्रद्धा आणि दलिताविषयींची असीम दयाबुद्धि याच्यामुळें त्या वृद्ध संन्यासिनी-विषयीं त्यालाहि विलक्षण प्रेमादर वाटे. म्हणून अनघाच्या खचलेल्या मनाचे पुनरुज्जीवन करण्याच्या [illegible]तींत, आपल्या आवडत्या ' मावशी'चा सल्ला घेण्याचें त्यानें ठरविलें.

अनघाच्या सगळ्या दुःखाचे, सगळ्या निराशेचें मूळ, आता आपल्याला मूल होण्याची शक्यता नाहीं, या एकाच जाणिवेंत होतें. त्या जाणिवेची तीव्रता जर कोणत्या उपायानें कमी करता आली, तर तिच्या जीवनात पुन्हा आनंद उत्पन्न होऊं शकेल, असा सिस्टरचा अभिप्राय पडला.

निरपत्यता हे अनघाचें जीवन-शल्य होऊन बसले होतें. तें शल्य कोणत्य उपायानें तिच्या जीवनातून काढून टाकता येईल ? त्या जीवनशल्याची तीव्रत आणि दाहकता कोणत्या उपायाने कमी करता येईल ?—

—अभयला जो उपाय सुचला तो असा कीं, अगदीं तान्हे मूल दत्तक घेऊन तें स्वतःचे म्हणून वाढवावें. पण आपलें तान्हें मूल जन्मल्या-दिवशींच दुसऱ्या स्त्रीच्या ओटीत घालावयाला कोणती सुस्थितींतील माता तयार होईल ? अनघाला जर सख्खी बहीण असती तर तिनें कदाचित् असा त्याग विफलतेच्या दुःखानें पोळलेल्या आपल्या बहिणीसाठीं केला असता. पण परकी स्त्री असला त्याग करावयाला कशी तयार होईल ?

यावर सिस्टरनें त्यांला असें सुचविलें कीं, सिव्हिल लाइन्समधील त्यांच्या ऑर्फनेजमध्यें जी जन्मतांच टाकून दिलेलीं अर्भकें पुष्कळदां येतात, त्यातलें एखादे सुंदर मूल अनघाच्या पदरात घातलें, तर त्याचा लळा लागून तिच्या मनाची तगमग कमी होईल.

त्याला ती कल्पना पटली.

पण, लगेच त्याच्यापुढे असा प्रश्न उभा राहिला कीं, अशा रीतीनें तान्हे मूल पदरात घेण्यासाठी अनघाचे मन वळवायचे कोणीं आणि कसें ? तो प्रश्न जितका नाजूक तितकाच बिकट होता. पण वृद्ध सिस्टरनें एक प्रकारच्या आत्मविश्वासाने ती जबाबदारी पत्करली.

शहरात किंवा सिव्हिल लाइन्समध्ये जाताना अभयच्या घरासमोर आपला बैलटांगा थांबवावयाचा आणि अनघाशीं थोडा वेळ गप्पा मारून पुढें जावयाचें, असा सिस्टरचा नेहमींचा क्रम होता. अभयने ती कल्पना तिला सुचविल्या दिवसापासून ती मधून मधून त्या ऑर्फनेजविषयीं अनघाजवळ बोले, व तेथें येणारीं सुंदर लेंकरें प्रतिष्ठित घराण्यातल्या वंध्य स्त्रिया कशी गुपचूप ओटींत घेऊन स्वतःचीं म्हणून वाढवितात, याचीहि काहीं उदाहरणे सिस्टरनें तिला सांगितलीं. पण त्या सगळ्या गोष्टी ऐकल्यावरहि अनघाने तें ऑर्फनेज पाहण्याची उत्सुकता कधीं दाखविली नाहीं. तथापि सिस्टरचा अनुनय मात्र सारखा चालू होता.

एक दिवस सकाळीं ती अचानक त्याच्या घरीं आली आणि अभयला म्हणाली—

काल सकाळीं एक गोजिरवाणं लेंकरूं आमच्या ऑर्फनेजमध्ये आलं. उपजल्याबरोबर कपड्यात गुंडाळून कुणीतरी ऑर्फनेजच्या दारात आणून ठेवलं होतं तें ! लेंकरूं इतकं साजरं आहे अनुताई, कीं नजर हलत नाही त्याच्यावरून ! तुम्हीं चलता का पाह्यला दुपारीं ?—"

"काय करायचंय तें मूल पाहून आपल्याला ?—"

अनघानें सिस्टरकडे न बघतां अगदीं तुटकपणानें अभयला विचारलें.

"पाह्यला काय हरकत आहे, अनू ? ऑर्फनेजहि अनायासं बघितल्यासारखं होईल. मग चलतेस का मी कॉलेजातून आल्यावर ? तिथूनच पुढं पिक्चरला जाऊं आपण. आज एलिझाबेथ ब्राऊनिंगवरलं बॅरेट्स ऑफ् विम्पल स्ट्रीट हें सुंदर पिक्चर आहे—"

" तें पिक्चर पाह्यला जातांना सहज वाटेत म्हणून ऑर्फनेज बघायला हरकत नाहीं माझी—"

संध्याकाळीं चारच्या सुमारास तो कॉलेजातून परत आल्यावर तीं दोघें सिस्टरबरोबर त्या ऑर्फनेजमध्ये गेलीं. ऑर्फनेजची व्यवस्था खरोखरीच उत्तम होती; व अनाथ अर्भकाविषयींची तेथील भगिनींची कळकळ पाहून अनघाला फार कौतुक वाटलें. ऑर्फनेजची माहिती देताना, अशा अनाथ मुलाना ओटींत घेण्यात मातृपदाचें साफल्य, वात्सल्य आणि भूतदया याचा कसा पवित्र संगम झालेला असतो, याचे मोठे हृदयस्पर्शी वर्णन सिस्टर झेवियरा आपल्या करुणकोमल किनऱ्या आवाजात करीत होती.

बोलता बोलता तिने एका भगिनीला हळूच विचारलें, " काल सकाळीं सापडलेलं ते लेकरूं कुठ ठेवलंयू, सिस्टर ?—"

" तें निजलंय आतां. आणूं का दाखवायला ?—"

" नको, नको. कशाला उगाच झोपमोड करता त्या लेकराची ?—" अनघा उद्गारली.

पण सिस्टरनें लगेच म्हटले, " तें मुळींच उठायचं नाहीं, अनुताई ! तुम्हाला कल्पना नाहीं लेकराच्या झोंपेची. झोंपलेलं मूल पाहणं, म्हणजे, प्रभूचं बालरूप पाहण्यासारखं आहे खरोखरी !—"

तोंच त्या दुसऱ्या सिस्टरनें पांढऱ्या शुभ्र कपड्यात गुंडाळलेल तें मूल आणून त्याच्यासमोर धरलें.

खरोखरीच नक्षत्रासारखें मूल होतें तें. अनघा त्याच्याकडे टक लावून पहात होती. पहातां पहातां तिचे डोळे भरून आले.

सिस्टर झेवियरनें तिच्या खांद्यावर हात ठेवला आणि कळवळून म्हटलें "रडूं नका, अनुताई ! असं सुंदर लेकरूं पाह्यला मिळायचं नाहीं पुन्हां—"

" कसे हो हात धजले त्याला टाकायला त्याच्या आईचे, सिस्टर ?—"

" काय करील बिचारी ! समाजाच्या भीतीनं तिनं हा पोटचा गोळा आणून टाकला आमच्या दारात. प्रभूनंच बुद्धि दिली तिला ही. त्याची दया आहे ही मूर्तिमंत !—"

सिस्टरचा आवाज भरून आला. अनघा स्तब्ध होती. तिच्या डोळयातून अश्रु वहात होते.

"तुम्ही घेता का हे लेकरूं आपल्या ओटींत?—"

सिस्टरने तिच्या पाठीवरून हात फिरवीत हळूच विचारलें.

तो प्रश्न कानावर पडताच अनघा एकदम तिच्यापासून दूर झाली आणि तिने सिस्टरला आवेशाने विचारले—

"हें मूल ओटींत घेऊन काय करूं मी, सिस्टर?—"

"का बरं? आज जर तुम्हीं हें मूल ओटींत घेतलंत, तर तुमचंच होईल तें जन्माचं! मग तुम्हीच त्याचे मायबाप—"

"हे तुमचं म्हणणं या लेकराच्या दृष्टीनं खरं ठरेल कदाचित्. पण आम्हाला कसं वाटेल हे मूल आमचं? जे मूल याचंहि नाहीं आणि माझंहि नाहीं, तें मूल ओटींत घेऊन का माझ्या जिवाची तहान शांत होणार आहे? छे, छे! तुम्ही ब्रह्मचारिणी, संन्यासिनी आहात, सिस्टर. तुम्हाला कधीं कल्पना नाहीं यायची विवाहित स्त्रीच्या मनाची! एकदा गर्भवती होऊन अपत्यसुखाला आचवलेल्या अभागिनीच्या हृदयाची!!—"

"असं कसं म्हणता तुम्ही? ओटींत घेतलेल्या लेंकराना आपल्या पोटच्या गोळयाप्रमाणं वाढवणाऱ्या अनेक स्त्रिया पाहिलेल्या आहेत मी, अनुताई—"

"पाहिल्या असतील. वांझ स्त्रियांच्या बाबतींत घडत असेल कदाचित् तसं. पण मी वांझ नाही, सिस्टर! मी दुर्दैवी, परम दुर्दैवी आहे. मला मूल हवं, तें याचं आणि माझं मूल हवं, याच्यापासून माझ्या पोटीं आलेलं मूल हवं. अशी जर माझी भावना नसती, तर स्वतःला मूल होणं अशक्य असल्याचं कळल्यावर याचं दुसरं लग्न करून देऊन सवतीचं मूल आपलं मानायला काय हरकत होती मला! मीं जें मूल आपलं मानलं, तें माझं नसलं, तरी याचं मूल आहे, एवढं तरी समाधान लाभलं असतं ना त्या बाबतींत माझ्या मनाला? अडाण्यांच्या बायका आपल्याला मूल होत नाहीं

असं दिसल्यावर स्वतः आपल्या हातानीं नवऱ्याचं दुसरं लग्न करून देतात न् सवतीचीं मुलं आपलीं म्हणून वाढवतात, हे आमच्या भोंवतालच्या वस्तींत पाहातेंच आहे मी. पण, माझं मन अशा रीतीनं समाधान मानून घ्यायला तयार व्हायचं नाही, हें मी जाणून आहे. मला मूल हवं, तें याचं आणि माझं मूल हवं; याच्या आणि माझ्या प्रेमाचं मूल हव ! छे, छे, सिस्टर, तुम्हाला समजायची नाहीं माझी ही भावना कधीं. तुम्ही आपलं स्त्रीत्व कौमार्यांतच आपल्या हातानी खुडून, नष्ट करून टाकलंत. पतिप्रेमाचा दिव्य आस्वाद घेतलेल्या आणि त्या प्रेमाचं मधुर फळ दुर्दैवानं कायमचं गमावून बसलेल्या माझ्यासारख्या हतभागी स्त्रीच्या मनाची काय कल्पना येणार तुम्हाला, सिस्टर ? तुम्हीं व्यर्थ आणलंत मला इथं !——"

• • •

पण, त्यानंतर लवकरच त्याच्या आयुष्यात ज्या दोन व्यक्ति अभावितपणें आल्या, त्यामुळे अनघाच्या वठलेल्या जीवनाला पुन्हा टवटवी आली.

हें पाहा अनू, आज एका बाबतींत तुझा सल्ला न् संमति हवी आहे मला —"

त्या दिवशीं सायंकाळीं अभय कॉलेजातून परत आल्यावर चहा घेताना म्हणाला.

" माझी पुष्कळ दिवसापासून इच्छा होती कीं, आपल्या या प्रयोगशाळेंत माझ्या हाताखाली काम करायला कुणी तरी चांगला, चुणचुणीत, कष्टाळू मुलगा मिळावा. तसा योग आलाय आज सुदैवानं. या सेशनला आमच्या कॉलेजात अमरावतीच्या हायस्कुलातून प्रवेशपरिक्षेत केमिस्ट्रीमध्यें प्रावीण्य मिळवून पहिल्या वर्गात आलेला एक अगदीं गरीब मुलगा दाखल झाला. त्याचं नाव नचिकेत देशमुख. आमच्या डेमॉन्स्ट्रेटरनें मला सांगितलं तो फार होतकरू मुलगा आहे म्हणून. त्यामुळं मी त्याला मदत करतोंय पहिल्यापासून. गेल्या सहामाहीच्या परीक्षेत त्याची तयारी दिसून आली मला व त्यानांहि माझ्या हाताखालीं काम करायची गोष्ट काढली आपण होऊन डेमॉन्स्ट्रेटर-

जवळ. म्हणून मी त्याला इथ आपल्या घरीच राह्यला बोलवावयाच्या विचारात आहे. उद्या सकाळी येईल तो. तूं पाहून घे त्याला. तुला जर तो पसंत पडला, तर त्याला राह्यला बोलावीन मी—"

"किती वयाचा आहे?—"

"सत्रा वर्षांचा असावा. आपलं मुख्य भांडवल म्हणजे ग्रंथसंग्रह आणि प्रयोगशाळा. या दोहोंची काळजी तो घेऊं शकेल अस वाटतं. शिवाय माझ्या रोजच्या कामातहि मदत होईल त्याची मला. सध्या जें माझं संशोधन चालू आहे, त्यात एक माणूस सतत साथ द्यायला हवा आहे मला. ती अपेक्षा तो पूर्ण करूं शकतो का पाहू या. मुलगा मोठा विनयशील, निष्ठावंत आणि दक्ष आहे असं दिसतं. पण, अखेर अनुभवानं काय ठरेल तें खरं—"

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आठच्या ठोक्याला नचिकेत आला. चपराशानें त्याला तडक दुसऱ्या मजल्यावरील ग्रंथशाळेंत नेलें. अभय लिहिण्यांत गर्क होता. नचिकेतने समोर उभे राहून अदबीनें नमस्कार करताच अभय वर पाहून त्याला म्हणाला—

हें पाहा नचिकेत, या घरांत राह्यचं म्हणजे माझ्यापेक्षा बाईंच्या मर्जीला उतरल पाहिजेस तू. हे घर त्याचं आहे. त्याना जो प्रिय होईल, तोच या घरात हक्कानं राहू शकेल. तूं जर त्याचं प्रेम न् विश्वास संपादन केलास, तर तुला आईची आठवण होऊं देणार नाहींत त्या कधीं—"

बोलता बोलतां त्याचा आवाज किंचित् घोगरा होत गेल्याचा भास नचिकेतला झाला. त्याला अभयविषयीं पराकाष्ठेचे आकर्षण आणि आदर होता. सायन्स कॉंग्रेसच्या रसायनशाखेचे अध्यक्षपद भूषविलेले आणि आपल्या संशोधनात व्यत्यय येईल म्हणून कॉलेजचे प्रिन्सिपल्पद नाकारलेले त्यागी आणि प्रतिभाशाली प्राध्यापक म्हणून त्याची त्यावेळीं सर्वदूर ख्याति झालेली होती. कॉलेजांत आल्यावर पहिल्याच दिवशीं जेव्हा नचिकेतनें अभयला पाहिलें, तेव्हा—कोण जाणे का ते!—, त्याच्या मनाची अशी भावना होऊन गेली कीं, आपण जर त्याच्या सान्निध्यात राहिलों, तर आपलें जन्माचें कल्याण होईल. त्यामुळें त्याची ओळख करून घेण्याची,

त्याच्या सहवासाचा लाभ करून घेण्याची तळमळ नचिकेतच्या मनाला लागली. नचिकेतचें प्रयोगपाटव पाहून डेमॉन्स्ट्रेटरची मर्जी त्याच्यावर बसली, व तो स्वतः अगदीं तरुण असल्यामुळें त्या दोघात एकप्रकारचा स्नेहभावहि निर्माण झाला. त्याच्या तोंडून नचिकेतने अभयच्या वैयक्तिक जीवनाची सर्व माहिती हळूहळू काढून घेतली. अखेर एक दिवस त्याच्या हाताखालीं काम करण्याचा आपला हेतु त्यानें डेमॉन्स्ट्रेटरजवळ बोलून दाखवला.

त्यावेळी डेमॉन्स्ट्रेटर त्याला म्हणाला, " हें पाहा देशमुख, डॉ. पंडित याच्याविषयीं विचार करतांना त्याच्या एकटयाविषयीं विचार करून चालणार नाहीं. इतर पुरुषाप्रमाणें ते एकटे नाहींत. त्याच्या पत्नी अनघा आणि ते अशीं दोघं मिळून डॉ. पंडित ही व्यक्ति बनलेली आहे. तीं दोघं सदैव एकत्र असतात, एकत्र हिंडतात आणि एकात्मतेनें सगळं जीवन व्यतीत करतात. कोणत्याहि पतिपत्नींत इतकं तादात्म्य, इतकं अद्वैत मीं पाहिलेले नाही. डॉक्टराच्या सान्निध्यात राह्यचं म्हणजे त्या दोघांच्या सान्निध्यात राह्यचंय, हें लक्षात ठेवा तुम्ही--"

डेमॉन्स्ट्रेटरच्या या उद्गाराची आठवण अभयचें तें वाक्य ऐकताच नचिकेतला झाली. त्यानें आजपर्यंत इतक्या जवळून अभयला कधीं पाहिलें नव्हते. आपल्या डोळयाना भेदून अंतरंगात घुसणाऱ्या त्याच्या त्या विशाल नेत्रात एकप्रकारची विलक्षण तीक्ष्ण लकाकी आहे, असे त्याला वाटलें. समोरचे केस मागे हटत चालल्यामुळें अभयचे मूळचें उंच कपाळ आता अधिकच भव्य दिसत होते; व विंचरून चापचोप बसविलेल्या केसाची मेहरप त्याच्या उजव्या भुंवईपर्यंत येऊन थडकलेली होती. तिच्या अगदीं शेवटल्या पाढऱ्या सफेत रेषेमुळें एक प्रकारचें खिन्न गांभीर्य त्याच्या एरवीं मोठ्या लोभस वाटणाऱ्या चेहऱ्याला आलेलें होतें. त्याची ताठ पुष्ट मान, बनियननें झांकलेली रुंद भरदार छाती आणि पिळदार, बळकट हात त्याने यावेळीं घातलेल्या शुभ्र मलमलीच्या हाफशर्ट-मधून मोठे मोहक दिसत होते.

पण, त्याहिपेक्षा नचिकेतला आश्चर्य वाटलें, तें त्याच्या हातांच्या रुंद तळव्याचे. ते तळवे मासल खरे, पण अतिशयच घट्ट आणि बळकट होते. परंतु त्याबरोबरच त्याचीं लांब निमुळतीं बोटे मात्र बोलताना सारखीं थरथरत होतीं. आपल्या बोटाचा तो कंप नचिकेतच्या लक्षात येऊं नये म्हणूनच कीं काय, तो टेबलावरल्या तांबड्या-निळाय पेन्सिलीशीं त्या बोटांनीं चाळा करीत होता.

त्याचे ते बळकट तळवे आणि तीं थरथरणारी बोटें पाहून नचिकेतच्या मनात आले, डॉक्टरसाहेबाच्या हाताचे हे तळवे त्याच्या कठोर, स्थिर बुद्धीची आणि हीं बोटें कोमल, भावनोत्कट मनाची तर साक्ष देत नसतील ना ?

अभयने तें शेवटले वाक्य उच्चारलें आणि टेबलाला असलेली विजेची घंटी दाबली. तिच्या खणखणाटाने नचिकेतला त्या विचारतंद्रेंतून खेचून बाहेर आणलें.

"हें पाहा, बाई येतीलच आता इतक्यात चहा घेऊन—"

तो त्याला समोरच्या खुर्चीवर बसण्याची खूण करून म्हणाला.

तोच अनघा आत आली.

ती मोतिया रंगाचें तलम पातळ नेसली होती; व गुलाबी खड्याच्या कुड्या तिच्या कानात लकाकत होत्या. मोत्यात गुफलेल्या मंगळसूत्राच्या एकावलीचे जडावाचे पदक तिच्या उन्नत वक्षस्थळाच्या मध्यरेषेवर जो सखल भाग होता, तिथें रुळत होतें. बिनबाह्यांचा फिक्या गुलाबी रंगाचा जो ब्लाऊज तिने घातला होता, त्यामुळे तिच्या पोळदार लांब हाताची धवल कांति खुलून दिसत होती. तिच्या डाव्या हातांत सोन्याचें रिस्ट वॉच होतें; पण बांगड्या मात्र अजिबात नव्हत्या. गोऱ्यापान उंच मानेवर विसावलेल्या एकपेडी अंबाड्यावरील अबोलीच्या वेणीवर खोंचलेलें गुलाबाचें धवधवीत सपर्ण फूल तिच्या प्रत्येक पदन्यासाबरोबर जणूं तिच्या कानाच्या कोमल पाळ्याचें चुंबन घेण्यासाठीं धडपड करीत होतें. तिच्या

त्या टपोऱ्या डोळ्याभोंवतालचीं काळीं वलयें आणि त्या डोळ्यांतून डोकावणारी करुण भावनेची छटा यांच्यामुळें एरवीं उग्र भासणाऱ्या तिच्या बुद्धिप्रभ मुद्रेला एक प्रकारचें उदास, विलोभनीय मार्दव आलें आहे, असें नचिकेतला वाटलें.

ती आत आल्याबरोबर अभय उठून उभा राहिला; व त्यानें तिला म्हटलें—

" मी काल तुझ्याजवळ ज्याच्याविषयीं बोललों होतों, तो हाच विद्यार्थी नचिकेत देशमुख—"

आणि तो नचिकेतकडे पाहात हंसून म्हणाला—

" तूं ओळखलच असशील याना, नचिकेत—"

" हो—"

त्यानें नम्रतेनें म्हटलें आणि अनघाला लवून नमस्कार केला.

अनघा आत आल्याक्षणींच नचिकेत उठून उभा राहिला होता. तिला पाहून गोंधळलेलें—भीति, आश्चर्य आणि आनंद यांच्या संमिश्र भावनांनीं उचंबळून आलेलें—आपलें मन थाऱ्यावर आणण्यासाठीं त्याची आतल्या आत धडपड चालली होती. आपल्या लहानशा आयुष्यांत अमरावतीला पुष्कळ सुशिक्षित, सुसंस्कृत, प्रेमी म्हणून गाजलेलीं देखणीं जोडपीं त्यानें पाहिलीं होतीं. पण, आज हें जें दाम्पत्य त्याच्यासमोर उभें होतें, त्याचें सौंदर्य, जीवन आणि प्रेम हीं काहीं निराळ्याच प्रकारचीं, अगदीं अपूर्व आणि अद्वितीय असावींत, असें त्याला वाटलें.

तोंच अनघा म्हणाली—

" चहा वाट पाहातोय आंतल्या टेबलावर—"

आणि ती पलीकडल्या बाजूला असलेल्या नक्षीदार सुंदर चंदनी दडग्याकडे वळली.

अभय तिच्या पाठीशींच होता.

त्यांच्या मागोमाग आत जाताना, त्या दोघांत अधिक उंच कोण आहे, हें नचिकेतला समजेना. अभय हा उंच पण घेरदार आम्रवृक्षासारखा, तर अनघा ही सुरूच्या उंच सडसडीत वृक्षासारखी त्याला वाटली.

त्या चंदनी पडद्यामागें एका छोट्या टेबलावर चहाचें सामान ठेवलेलें होतें; व त्याच्या सभोंवतीं हिरव्या रंगाच्या तीन वेताच्या खुर्च्या मांडलेल्या होत्या. अनघा आणि अभय समोरासमोर बसलीं. तिनें खूण करताच तो तिसऱ्या खुर्चीवर बसला.

चहा ओततांना अनघानें त्याला विचारलें—

" तुमचं मूळ गाव कोणतं? घरीं कोण कोण मंडळी आहेत तुमच्या?—"

" माझं गाव वरूड. माझे वडील वैद्य आहेत तिथं. आम्ही फक्त दोघं भावंडं आहोंत. माझ्या धाकट्या बहिणीचं लग्न नुकतंच झालं गेल्या वैशाखात—"

" बहिणीला का शिकविली नाहींत तुम्ही आपल्या?—"

" अग, याचंच शिक्षण तर शिष्यवृत्तीवर चाललंय सध्यां. मग बहिणीला कुठून शिकविणार याचे वडील?—"

" का! घरची शेती नाहीं का मुळींच?—"

" शेती आहे, पण ती परवडत नाहीं. वडलांच्या फिरत्या वैद्यकीचं उत्पन्न हाच आधार आहे आमचा—"

" मग तूं जसा आलास याच्याकडे, तशी बहिणीलाहि का नाहीं आणलीस मझ्याकडे? तिच्या लग्नाची इतकी घाई कशाला केलीत? तूं तेवढं कॉलेजांत जाऊन पुढं शिकावंस न् तिनं इतक्या लहान वयात संसाराच्या खस्ता खाव्यात, हा कुठला न्याय? तिलाहि आणायची होतीस आपल्याबरोबर आमच्याकडे—"

अनेकवचनावरून एकदम एकवचनावर येऊन तिनें अत्यंत वात्सल्यानें काढलेले ते उद्गार त्याच्या हृदयाला भिडले; व आपलें हृदय भरून येत आहे, असें त्याला वाटलें.

तोंच अभय म्हणाला—

" तूं त्याच्या बहिणीला सांभाळायला तयार झाली असतीस असं काय स्वप्न पडलं होतं त्याला, अनू?—"

" आपल्या घरात कोणालाहि थारा मिळतो हें या वेटाळात न् तुमच्या कॉलेजातहि माहीत आहे सगळयाना. तुमचा तो लाडका शिष्य प्रल्हाद याच्याच वर्गात असेल ना ? त्याच्या बहिणीला नाहीं का सगळया खर्चाचा पत्कर घेऊन शाळेंत घातली आपण ? नाहीं तर तीहि महारवाडयातल्या इतर पोरींप्रमाणं शेण न् काटक्या गोळा करीत हिंडली असती गावभर—"

" पण हा अमरावतीचा मुलगा आहे, अनू. तुझ्या या समाजसेवेचा लौकिक अजून काहीं वऱ्हाडपर्यंत जाऊन पोंचलेला दिसत नाहीं ! शिवाय अनाथ-अपंगाना तात्पुरता आश्रय देऊन किंवा गोरगरिबाना पैशाची मदत करून मार्गाला लावण वेगळं न् एका कुलीन मुलीची जबाबदारी घेण वेगळं. दोहोंत फरक नाहीं का ?— "

" हो. पण तीहि जबाबदारी घेतली असती मीं. अरे, पण तूं चहा कां घेत नाहींस, नचिकेत ? यानीं तर सगळीं बिस्किटं, टोस्ट न् केळीं संपवलीं आपल्या प्लेटमधलीं ! तूं जर असा संकोच करशील, तर आमच्या टेबलावरल एक शीत नाहीं राहू द्यायचे हे तुझ्यासाठीं !— "

" पण, तुला कांहीं काळजी करायचं कारण नाहीं, नचिकेत ! मी जितकं जास्त खातों, तितकंच ही कमी खाते. त्यामुळं हिच्या वाटचं सगळं जेवण तुला मिळेल ! शिवाय मी जास्त खातों यालाहि हीच जबाबदार आहे खरोखरी. कारण, लग्न झाल्यावर मला मासे खाणं सोडून द्यावं लागलं हिच्यासाठीं—— "

" हें मुळींच खरं नाहीं तुमचं म्हणणं. तुम्हीं माझ्यासाठीं नाहीं मासे खाण सोडलंत. तुम्हाला फक्त समुद्रांतले मासे आवडतात. ते नागपूरला रोज कुठून मिळणार ? त्यामुळं मासे सुटले तुमचे. माझ्यासाठीं तुम्हीं सिगरेट सोडली असं म्हणाल तर मात्र कबूल करीन मी—— "

" उपकारच झाले मोठे ! पण हें पहा नचिकेत, माझ्या खादाडपणामुळं तुला आलाच एखादे वेळीं उपाशी राहण्याचा प्रसंग, तरी भ्यायचं कारण नाहीं. या खोलींतल्या कपाटात नाना प्रकारचे खाद्य पदार्थ बरण्यातून भरून ठेवलेले आहेत हिनं माझ्यासाठीं ! त्यावर हात मारू शकतोस तूं ! वास्तविक ही

लायब्ररी आहे माझी. पण, इथंसुद्धां खाण्याच्या पदार्थांचं कपाट उभं करून हिनं बिघडवून टाकलंय गंभीर न् पवित्र वातावरण या ग्रंथशाळेचं–"

"त्याचं कारण कळेलच तुला आपोआप. हे एकदा लिहायला वाचायला बसले किंवा तिसऱ्या मजल्यावरच्या प्रयोगशाळेत उभे राहून काम करायला लागले, म्हणजे याना भान रहात नाहीं कशाचंच ! आणि लिहिण्याची किंवा प्रयोगाची समाधि उतरली म्हणजे मग भूक भूक करित लागतात माझ्या मागें ! त्या वेळीं या कपाटातल्या बरण्या येतात माझ्या मदतीला धावून ! पहाटे दोन वाजतासुद्धा मी दोसा न् बोर्नव्हिटा तयार करून दिलाय यांना. हे कोणत्या वेळीं न् काय खायला मागतील याचा नेम नाहीं काहीं— "

"ही सगळी अतिशयोक्ति आहे ब' का रे— "

"ही अतिशयोक्ति आहे का स्वभावोक्ति आहे, हें सहवासानं कळेलच तुला लवकर. पण एक गोष्ट मात्र लक्षात ठेव. हे संसारी असले, तरी योगी आहेत खरोखरी. भूक, झोंप, करमणूक यातलं काहीं लागत नाहीं यांना; न् कुणाहिशिवाय अडत नाहीं याचं. तूं याना कितीहि आवडलास तरी तुझी पाठ फिरल्याबरोबर विसरतील हे तुला. समोर आहेस, तोंपर्यंत सगळी आवड न् गरज ! धर्मशाळेसारखं मन आहे याचं. कोणीहि यावं, चार दिवस हक्कानं रहावं न् निघून जावं—"

"पण या धर्मशाळेंतहि कांहीं कुलूप घालून ठेवलेल्या राखीव खोल्या आहेत हें विसरू नकोस तू—"

"असतील पण त्यांतली एक तरी खोली कोणाच्या वांट्याला आली आहे का गेल्या सात आठ वर्षांत ? आणि जसं याचं मन, तसंच आमचं घर. दोन्हीहि धर्मशाळाच ! कोणीहि केव्हाहि यावं, काहींहि मागावं न् संतुष्ट होऊन जावं—"

"पण एक लक्षात ठेव, नचिकेत. या दोन्हीहि धर्मशाळांची मालकीणच हें सगळं सांगतेय तुला. तिला जर तू प्रसन्न करूं शकलास, तर या दोन्ही धर्मशाळांचा वारस होशील तूं— "

पहिल्याच भेटीला झालेल्या या विनोदी संभाषणात किती खोल अर्थ भरलेला आहे, हें लवकरच नचिकेतच्या प्रत्ययाला आलें. त्याला ऋतूंत झालेला फरक अगदीं सोसत नसे. त्यामुळें, फेब्रुवारीअखेर उन्हाळ्याच्या सुरवातीला जेव्हां तो तापानें आजारी पडल्यामुळे रोजच्याप्रमाणें वसतिगृहातून त्याच्याकडे येऊं शकला नाहीं, तेव्हा अभयनें काहीं त्याची चौकशी केली नाहीं. तो लागोपाठ दोन दिवस गैरहजर राहिला. त्यामुळे अनघा मात्र अतिशय अस्वस्थ होऊन त्याची चौकशी करण्यासाठीं तिसऱ्या दिवशीं संध्याकाळीं मुद्दाम वसतिगृहात गली; व त्याला तापानें फणफणलेला पाहून तिने तसाच मोटारींतून त्याला घरीं आणला.

त्याची ती अवस्था पाहून अभय त्याला रागानें म्हणाला, "का रे, तुला ताप आला, तर कळवायचं नाहीं तसं मला लगेच ? मी काय अंतर्ज्ञानी आहे का तुला ताप आला आहे हें मला समजायला ? तूं मला चिठ्ठी का नाहीं पाठवलीस ? आता हा ताप जर मुदतीवर गेला, तर जबाबदार कोण त्याच्याबद्दल ? —"

"जबाबदार कोण ! जबाबदार तुम्ही—"

अनघा त्याला म्हणाली.

त्यावर त्यानें चमकून तिला विचारलें—

"मी काय म्हणून ?—"

"अहो, तुम्ही स्वयंनियुक्त पालक झाला आहांत ना त्याचे ? मग तुमचं कर्तव्य नव्हतं का त्याची चौकशी करणं हें ?—"

"तो काय माझ्या वर्गात आहे का त्याची चौकशी मीं करायला ? माझा न् त्याचा काहीं संबंध येत नाहीं कॉलेजात—"

"कॉलेजात नसेल येत. पण घरीं तर येतो ना ? ज्या मुलाला तुम्हीं आपला मानून घरीं हाताखालीं काम करायला आणलात, तो दोन दिवस गैरहजर राहिला, तर त्याची चौकशी करण हें कर्तव्य नाहीं का तुमचं ?"

"कॉलेजांतलीं मुलं वाटेल तेव्हां गैरहजर राहतात बेजबाबदारपणानं ! त्यांची चौकशी करायची ठरवली, तर तो एक स्वतंत्रच व्याप होऊन बसेल माझ्या मागचा !—"

"अहो, पण हा मुलगा तुमच्या घरीं राहणारा आहे–"

"छे, छे! अद्याप घरीं राहायला आलेला नाहीं तो आपल्या. गेले दोन महिने त्याच्या चाचणीचा प्रयोग चालू आहे. तो जर यशस्वी ठरला, तर पुढल्या टर्मला तो घरीं राहायला येईल आपल्या–"

"तें कांहीं नाहीं. प्रयोग आजच संपला म्हणून सांगतें मी तुम्हांला. आज तो जो आपल्या घरीं आलाय, तो काहीं आता पुन्हा परत जायचा नाहीं वसतिगृहात राहायला. नचिकेत, आजपासून हेंच तुझं घर, बेटा!–"

अनघानें त्याच्या धगधगणाऱ्या कपाळावर हात ठेवून म्हटलें. त्याबरोबर त्याच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले. तिनें खालीं वांकून त्याच्या कपाळाचें चुंबन घेतलें आणि त्याला विचारलें—

"आईची आठवण होते का, बेटा! तार करायला सांगूं का त्यांना तुझ्या घरीं?–"

"नको, नको. तुम्हीच आई आहांत माझ्या आजपासून, बाई!–"

• • •

पण नचिकेत त्या दोघांच्या आयुष्यांत एकटाच आला नाहीं. त्यानें आपल्या पाठोपाठ आणखी एक व्यक्ति त्या घरांत आणली.

ती व्यक्ति म्हणजे निरुपमा देशपांडे.

निरुपमा ही नचिकेताची मावसबहीण. तिचे वडील पचमढी येथें सरकारी बगीचाचे सुपरिंटेंडट होते. बी. ए. झाल्यावर तिनें नागपूरच्या पारशी गर्ल्स हायस्कूलमध्यें शिक्षिकेची नोकरी धरली; व जेलरोडच्या अगदीं टोकाला असलेल्या एका छोट्या बंगलींत ती एकटीच रहात असे. चित्र, संगीत वगैरे कलांचा तिला नाद होता आणि समाजसेवा करण्याचीहि इच्छा होती. त्यामुळें नोकरी लागून आर्थिक स्वास्थ्य प्राप्त होताच तिनें महिलापरिषदेच्या कामांत मन घातलें. स्त्रियांच्या इतरहि स्थानिक संस्थांत ती हौसेनें काम करीत असे. नागपुरातील रसिक तरुण–तरुणींचें जें एक नाट्यमंडळ शहरांतील सुप्रसिद्ध दानशूर रसिकाग्रणींच्या आश्रयाखालीं स्थापन झालें होतें, त्याची ती प्रमुख सदस्य होती; व सुबक बांधा, सुरेल आवाज

आणि समंजस अभिनय या गुणांमुळें तिनें मंडळाच्या मधून मधून होणाऱ्या नाटकांत चांगलें नाव कमावलें होतें विशेषतः, त्या मंडळांतील एका कम्युनिस्ट मताच्या वादनपटु नाटककारानें कला, राजकारण आणि ध्येयवाद यांतील संघर्ष चित्रित करणारें जें प्रभावी नाटक लिहिलें होतें, त्यांत नायिकेची तेजस्वी भूमिका तिनें उत्कृष्ट रीतीनें वठविल्यामुळें नागपुरांतील अनेक तरुणांचें लक्ष त्या कलाभिज्ञ अविवाहित प्रमदेकडे वेधलें गेलें.

निरुपमा सुंदर नव्हती. पण गोंडस ठेंगणा बांधा, वाटोळ्या लोभस तोंडाला काळयाभोर मेहरपीसारखी शोभणारी ऊर्मिल केशरचना, तोंडातल्या तोंडात लाजत बोलण्याची लडिवाळ लकब, चेहऱ्याच्या गोधूमवर्णाला उजळणारें मृदु मंदस्मित आणि आधुनिक पद्धतीची आकर्षक वेषभूषा या गुणांमुळें ती अतिशयच मोहक वाटत असे. तिचे गोल नाजूक हात हा तिच्या वर्गांतील विद्यार्थ्यांच्या कुतूहलाचा एक विषय होता. कॉलेजांतील चर्चासभेंत बोलण्याच्या भरात जेव्हां एकदां तिनें आपल्या त्या केळीच्या कोंबासारख्या हाताची चिमुकली मूठ टेबलावर आपटली, तेव्हां टेबल तर हादरलें नाहींच पण विद्यार्थ्यांत मात्र हंशा पिकला; व एक वात्रट विद्यार्थी उठून तिला म्हणाला, " अहो मिस् देशपांडे, कशाला त्या केशरी खव्याच्या करंज्या टेबलावर आदळतां उगाच ? त्यामुळें तुमचा मुद्दा मनावर ठसण्याऐवजीं आम्हा मुलांच्या मनांत मात्र निराळयाच भावना उत्पन्न होतात ! "

निरुपमा बी. ए. झाल्यावर तिच्या वडिलांनीं तिच्यासाठीं स्थळें पाहावयाला सुरुवात केली. पण, तिनें एक दिवस त्यांना असें स्पष्ट सांगून टाकलें कीं, " या प्रांतांतील मराठांची पहिली डॉक्टर होण्याची महत्त्वाकांक्षा आहे माझी. तेव्हां तुम्ही माझ्या लग्नाच्या भानगडींत पडूं नका—"

लगेच तिनें नागपूरला येऊन पारशी स्कूलमध्यें नोकरी धरली; व एम. ए. झाल्यावर 'मराठी रंगभूमि' हा विषय डॉक्टरेटसाठीं घेऊन अभ्यासाला प्रारंभ केला. नागपूरच्या नाट्यमंडळाशीं असलेला तिचा संबंध हा त्या अभ्यासाचाच एक भाग होता.

त्या वर्षींच्या उन्हाळयांत नचिकेत निरुपमाबरोबर प्रथमच पचमढीला गेला. आजारांतून बरा झाल्यावर तो वरूडला गेला असतां त्याच्या आईनें

आपल्या थोरल्या बहिणीला पत्र घालून त्याला हवापालट करण्यासाठीं पचमढीला धाडण्याची इच्छा व्यक्त केली. तेव्हां तिनें त्याला निरुपमाबरोबर पचमढीला पाठविण्याविषयीं त्याच्या आईला कळविलें. तत्पूर्वी त्याचा आणि निरुपमाचा संबंध आलेला असला, तरी तो अगदीं बेताचा. त्या दोघांच्या वयात सहा सात वर्षांचें अंतर असल्यामुळे आणि त्याचें सर्व आयुष्यहि वरूडला गेल्यामुळें निरुपमाशीं त्याचा विशेष संबंध कधीं आला नव्हता. पचमढीच्या या मुक्कामातच तीं दोन भावंडे पहिल्यांदां एकत्र आलीं.

अनघा आणि अभय यांच्याविषयीं तो जें भीतियुक्त प्रेमानें सारखें बोले, तें ऐकून निरुपमाचें त्यांच्याविषयींचें कुतूहल जागृत झालें. अभयची कीर्ति तिच्या कानावर कॉलेजात असतानाच आली होती. पण अनघाविषयीं मात्र तिला कांहींच कल्पना नव्हती. तिच्या सौंदर्याच्या, बुद्धिमत्तेच्या, विद्वत्तेच्या आणि वात्सल्याच्या अनेक गोष्टी त्यानें निरुपमाला सांगितल्या; व तिचीं जीं पत्रें त्याला महाबळेश्वराहून येत, तींहि तो निरुपमाला वाचून दाखवीत असे. त्यामुळें अनघाची ओळख करून घेण्याचा तीव्र उत्कंठा तिच्या मनांत उत्पन्न झाली.

पण नचिकेतबरोबर निव्वळ त्याची बहीण म्हणून त्याच्याकडे जाण्याची मात्र तिची इच्छा नव्हती. म्हणून, दिवाळीच्या सुमारास जेव्हां त्यांच्या मंडळाचा नाट्यप्रयोग होण्याचें ठरलें, तेव्हां तिनें पहिल्या रांगेतलीं दोन तिकिटें नचिकेतकडे पत्रासह पाठवून त्या पत्रांत त्या दोघांना नाटकाला घेऊन येण्याची आग्रहपूर्वक विनंती केली होती; व शिवाय मंडळाच्या कार्यवाहालाहि त्यांच्याकडे निमंत्रण द्यावयाला पाठविलें होतें. अभय कदाचित् नुसत्या नचिकेतच्या विनंतीनें नाटकाला गेला नसता; पण, मंडळाचे कार्यवाह स्वतः आमंत्रण देऊन गेल्यामुळें, त्यानें अनघा आणि नचिकेत यांच्याबरोबर नाटकाला जाण्याचें कबूल केलें.

नागपूरच्या कम्युनिस्ट नाटककाराचें तें दुसरें नाटक होतें; व त्याचा पहिला प्रयोग त्या दिवशीं व्हावयाचा होता. रंगमंदिर निमंत्रित पाहुणे

आणि प्रेक्षक यांनीं चिकार भरलेलें होतें. काँग्रेसची तत्त्वप्रणाली, राजकारण आणि कारभार यातील हर एक प्रकारचा काळा बाजार, हर एक प्रकारच्या तर्कच्युति आणि तत्त्वच्युति त्या नाटकांत अत्यंत परिणामकारक रीतानें चव्हाट्यावर आणल्या होत्या; व कांहीं प्रमुख स्थानिक राजकीय व्यक्ति आणि त्यांचें चारित्र्य यांचे मार्मिक प्रतिबिंब त्यात पडलेले होतें. त्यामुळें नाटक अतिशयच रंगलें. विशेषतः निरुपमाची नायिकेची भूमिका सुंदर वठली. अभय प्रथम एक अंक पाहून जाण्याच्या विचाराने आला होता. पण, नाटकातील मार्क्सवादाचे सूचक प्रतिपादन आणि प्रभावी नाट्य पाहून तो इतका कांहीं खूष झाला कीं, त्याने शेवटपर्यंत मोठ्या गोडीनें नाटक पाहिलें.

दुसऱ्या अंकाच्या शेवटीं मंडळाच्या कार्यवाहांनीं त्या दोघांना आंत येण्याची विनंती केली. म्हणून तो आणि अनघा नचिकेतसह रंगपटात गेलीं. तिथें नाट्यमंडळाचे मुख्य आधारस्तंभ असलेले रसिकाग्रणी, नाटककार आणि प्रमुख नट यांची त्यांच्याशीं ओळख करून देण्यात आल्यावर त्या सर्वांचे एकत्र कॉफीपान झालें. तिसऱ्या अंकाची घंटा होतांच मंडळी रंगमंदिरात जावयाला उठली.

तेव्हां नचिकेत हळूच अनघाला म्हणाला, " माझ्या ताईची इच्छा आहे तुम्ही जरा आत यावं अशी—"

" तुझ्या ताई म्हणजे निरुपमा देशपांडे ना ? आताच ओळख झाली कीं माझी त्यांच्याशीं—"

" हो. पण ओळख इथं मंडळींत झाली म्हणून तिनं आंत बोलावलंय तुम्हांला. अजून पूर्ण पांच मिनिटं आहेत खेळ सुरू व्हायला—"

" मला एकटीलाच बोलावलंय कीं डॉक्टरांनासुद्धां !—"

" नाहीं. तुम्हाला एकटीलाच—"

अनघा त्याच्याबरोबर आत गेली. निरुपमा वेषभूषा पूर्ण करून त्यांची वाट पाहातच उभी होती. अनघा आत येतांच तिनें नमस्कार करून विचारलें—

" कसं काय वाटलं काम आपल्याला माझं ?—"

" फार छान. नाटक तर चांगलं आहेच. पण आपण भूमिका उत्तम वठवल्यामुळेच त्याला रंग भरलाय खरोखरी इतका—"

" मीं मुद्दाम आपल्याला आत येण्याची तसदी दिली, ती एक विनंती करण्यासाठीं—"

" विनंती कशाबद्दल ?—"

" मी डॉक्टरेटसाठीं ' मराठी रंगभूमि ' हा विषय घेतलाय न् त्याची तयारी करतेय सध्या. त्या विषयाचा संस्कृतशीं पावलोपावली संबंध येतो आणि मला तर संस्कृत विशेष येत नाहीं. तशीं विल्सन, कीथ वगैरेंचीं संस्कृत रंगभूमीविषयींचीं पुस्तकें वाचलीं आहेत मीं. पण तेवढ्यानें भागेल असं वाटत नाहीं. म्हणून माझी विनती आहे आपल्याला, कीं आपण या बाबतींत मदत करावी मला—"

" आनंदानं मदत करीन मी. पण, माझा संस्कृतचा व्यासंग सुटल्याला आतां दहा वर्षे होत आलीं आहेत हें लक्षात ठेवा तुम्ही—"

अनघानें हंसत हंसत म्हटलें. तोंच घंटा झाली आणि ती नचिकेतबरोबर रंगमंदिरात आली.

त्या दोघींच्या गाढ स्नेहाचा तो प्रारंभ ठरला.

निरुपमा बुद्धिमान्, सुविद्य, कलाकुशल पण एका परीनें दुर्दैवी होती. तिचें सगळें शिक्षण नागपूरला वसतिगृहात राहून झाल्यामुळें कौटुंबिक प्रेमसुखाचा आस्वाद तिनें मुळींच घेतलेला नव्हता. शिक्षण संपल्यावर ती अविवाहित राहिल्यामुळें आणि पुढें नाटकातहि कामें करूं लागल्यामुळें तिच्या आई-वडलांच्या मनांत तिच्याविषयीं एक प्रकारची अढी उत्पन्न होऊन ती आपल्या कुटुंबाला दुरावल्यासारखी झाली होती. त्यामुळें रूप, गुण, बुद्धि आणि अनुभव या बाबतींत आपल्यापेक्षां सरस असलेल्या अनघाशीं तिचा निकट संबंध येतांच त्या दोघींचा स्नेह झपाट्यानें वाढत

गेला; व त्या मधुभाषिणीनें हळूहळू अनघाला भगिनीमंडळ, नाट्यमंडळ, महिलापरिषद वगैरे संस्थांच्या व्यापात मोठ्या चातुर्यानें ओढलें.

अनघाच्या जीवनांत निरुपमानें दुहेरी आनंद उत्पन्न केला. अनघा ही आपल्या आईबापाचें एकुलतें एक अपत्य असल्यामुळें एक प्रकारची एकाकिता आरंभापासून तिच्या जीवनाला आली होती. पाठचीं भावंडें नाहींत आणि घरच्या श्रीमंतीमुळें बरोबरीच्या मैत्रिणी नाहींत, अशा एकलकोंड्या स्थितींत तिचें बाळपण गेलें होतें. ज्या दोन पारशी कुटुंबाशीं तिचा निकट संबंध आला व ज्यांच्यामुळें टेनिसच्या खेळाची इतकी गोडी तिला लागली, त्यांच्या विशिष्ट राहणीचे कांहीं संस्कार जरी तिच्या मनावर झाले, तरी त्यांच्याशीं ती समरस मात्र होऊं शकली नाहीं. त्यामुळें, तिचा स्वभाव अंतर्मुख आणि अभिमानी झाला होता. लग्नानंतर पहिल्या चार वर्षांत गर्भावस्था आणि त्यानंतरचीं भयंकर दुखणीं यांच्यांत संसारांतील आरंभींचे उमेदीचे दिवस गेल्यामुळें, तिच्या या स्वाभाविक अंतर्मुखतेला उदासीनतेची जोड मिळून, स्वतःच्या घरापलीकडे तिला जग म्हणून कांहीं उरलें नव्हतें.

या भयाण एकाकी अवस्थेंत कुढणाऱ्या अनघाच्या दुःखी मनाला निरुपमानें हळूहळू बाहेर काढलें. त्या दोघींच्या वयांत फार तर आठ-नऊ वर्षांचें अंतर असेल. त्यामुळें अनघाला ती धाकट्या बहिणीसारखी वाटे. निरुपमामुळें निरनिराळ्या संस्थांत अनघाचा प्रवेश झाल्यावर तिच्या विशिष्ट गुणामुळें त्या त्या संस्थांतून तिला लवकरच प्रामुख्य मिळालें; व दिवसभर पुरून उरावींत इतकीं कामें या तिच्या नव्या व्यापांतून उत्पन्न झालीं. इतकेंच नव्हे, तर त्या त्या संस्थांच्या अधिकारपदावर आरूढ झाल्यामुळें, अनघाला स्वतंत्र सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होऊन तिच्या खुरटलेल्या अस्मितेला पुन्हा बहर येऊं लागला.

निरुपमाच्या साहचर्यामुळें तिच्यांत झालेलें हें परिवर्तन अभयला अत्यंत आल्हाददायक वाटलें. लग्न झाल्यापासून गेलीं सात आठ वर्षे तोच तिचा एकमेव आधार आणि आनंद, एकच एक विसावा आणि विरंगुळा होऊन बसला होता. ती आपल्यावर सर्वथैव अवलंबून आहे ही गोष्ट

लक्षात घेऊन तो विलक्षण सहृदयतेनें तिच्याशीं वागे; व प्रसंगीं आपलीं कामें बाजूला ठेवूनहि आपल्यापासून शक्य तें सुख तिला देण्याचा प्रयत्न करीत असे. किंबहुना, स्वतःला अत्यंत प्रिय असलेल्या संशोधनापेक्षाहि तिला सुखी करणें हीच त्याची लग्नापासून गेलीं सात आठ वर्षे मुख्य जबाबदारी होऊन बसली होती; व तो ती कर्तव्यबुद्धीनें अत्यंत दक्षतेनें पार पाडीत असे. पण, तिच्या एकाकी, दुःखदग्ध, परावलंबी जीवनाच्या दुर्वह भाराखालीं आपण हळूहळू खचत आहोंत, आपल्या आकांक्षा आणि शक्ति चिरडून, गुदमरून जात आहेत, याची जाणीव केव्हां केव्हां तीव्रतेनें होऊन त्याच्या खंबीर मनावर अलीकडे निराशेची छाया पडत चालली होती. तथापि आपल्या या मनस्तापाची झळ त्यानें चुकूनहि तिला कधीं लागू दिली नाहीं.

निरुपमानें अनघाच्या हतोत्साह जीवनात नवा आनंद आणि नवे उद्योग उत्पन्न करून त्या दुरवस्थेंतून आपल्याला सोडविलें, याबद्दल अभयला तिच्याविषयीं पराकाष्ठेची कृतज्ञता वाटली. पण, असामान्य बुद्धिमत्ता, प्रसन्न विरागिता आणि अनन्य ज्ञानोपासना या त्याच्या गुणांमुळें निरुपमाला त्याच्याविषयीं जो निरतिशय आदर वाटे, त्यामुळें ती कधीं त्याच्याशीं मोकळेपणानें वागूं शकली नाहीं; व स्वतःच्या सर्व प्रकारच्या जबाबदारींची त्याला सूक्ष्म जाणीव असल्याकारणानें तोहि तिच्याशीं मोकळा होऊं शकला नाहीं. त्यामुळें त्याची ती तिच्याविषयींची कृतज्ञता तिला अज्ञातच राहिली.

आपल्याविषयीं अभयला कांहीं तरी विशेष वाटत असावें, अशी कल्पना निरुपमाला येण्याचा प्रसंग फक्त एकदाच आला. त्याच्या एका नवीन क्रांतिकारक शोधामुळें सायन्स कॉंग्रेसचें अध्यक्षपद त्याला मिळून त्या कॉंग्रेसच्या अधिवेशनासाठीं जेव्हां त्या दोघांनीं नचिकेतसह अलाहाबादला जाण्याचें ठरविलें, तेव्हां त्या निमित्तानें होणारा त्या बाजूचा हरिद्वारपर्यंतचा दीर्घ प्रवास निरुपमाला बरोबर घेतल्यास अनघाला अधिक सुखावह होईल, असें तो म्हणाला; व तिला ती कल्पना पटून तिनें निरुपमाला आपल्या-

बरोबर येण्याबद्दल गळ घातली. नचिकेतनें जेव्हा ती कल्पना अभयची असल्याबद्दल निरुपमाला सांगितलें, तेव्हा तिला आनंद तर झालाच, पण आश्चर्यहि वाटलें.

पण, त्याच्याविषयीं निरुपमाला वाटणारा भीतियुक्त आदर शतगुणित व्हावा, असा एक प्रसंग या त्यांच्या प्रवासांत अचानक घडला.

ऋषिकेश येथें स्वामी रामतीर्थांच्या आश्रमाजवळ होडींत बसून तीं गंगापार होत असतां अनघा गंगेंत पडतां पडतां वाचली. तेथें गंगेच्या प्रवाहाला फार वेग होता आणि वाराहि जोरानें वाहात होता. एक पाय दगडावर ठेवून दुसरा पाय होडीवर ठेवण्याच्या बेतात अनघा असतां वाऱ्याच्या झोतानें एकदम लाटेबरोबर होडी बाजूला होऊन तिचा तोल गेला. अभय तिच्या पाठीशींच उभा होता. त्यानें तत्क्षणींच तिला हातानें मागें ओढून आपल्या अंगावर घेतली.

नंतर होडींत बसल्यावर ती त्याला म्हणाली, " मी जर वाहून गेलें असतें या प्रवाहात, तर तुम्ही सुटला असतात आज माझ्या बंधनातून, अभय !—"

" तुझं कसलं बंधन आहे मला, अनू ? आणि तें बंधन यदाकदाचित् सुटलं किंवा तुटलं, तरी अशी कोणती मोकळीक मिळायची आहे मला त्यामुळें ?—"

" कां बरं ? तुम्ही आज यशाच्या शिखरावर आहात. पण माझ्यामुळं तुमचा संसार वठून गेला आहे ऐन उमेदीच्या काळात. मी जर आज प्रवाहात वाहून गेले असतें, तर तुम्ही मोकळे झाला असतात नव्यानं संसार थाटायला—"

" ती कल्पनासुद्धां मनात आणूं नकोस तूं ! मग तूं मला ओळखलं नाहींस अजून, अनू ! माझ्या आयुष्यातली पहिली आणि शेवटली स्त्री तूं आहेस. तुझ्याबरोबर माझा संसार सुरू झाला आणि तुझ्याबरोबरच तो संपेल. माझ्या आयुष्यात दुसरी स्त्री आली नाहीं आणि येणारहि नाहीं—"

• • •

त्यानंतर वर्षभरानें ओढवलेल्या भीषण प्रसंगात नचिकेत आणि निरुपमा या दोघांचेंहि त्याच्यावरचें प्रेम कसोटीला उतरलें.

अभयनें राजकारणात प्रत्यक्ष भाग कधींच घेतला नव्हता. पण, तो मार्क्सवादी आहे, हें सर्वश्रुत होतें; व त्याचें घर हा डाव्या गटाच्या कार्यकर्त्यांचा एक आसरा आहे, याची जाणीव पोलिस खात्यालाहि होती.

तथापि आपल्या मताची अकारण वाच्यता करण्याची त्याची वृत्ति नव्हती. वर्गात किंवा कॉलेजातील चर्चा–सभेंत एखाद वेळीं बोलण्याचा योग आला किंवा स्वतःला देशाभिमानी म्हणविणाऱ्या एखाद्या खादीधारी विद्यार्थ्यानें नाहक डिवचलें, तर मात्र तो अगदीं शांत पण तर्ककर्कश पद्धतीनें गांधीवादाच्या अशास्त्रीयतेचे विवरण करीत असे. चरखा आणि खादी या दोहोंच्याहि तो अगदीं विरुद्ध होता; व गांधीवाद आणि मार्क्सवाद यांच्यावर जो तज्ज्ञांचा वादविवाद युनिव्हर्सिटी युनियननें स्वातंत्र्यप्राप्तीच्या महोत्सवानंतर मुद्दाम घडवून आणला होता, त्यात बोलताना, "हिंदुस्थानला विज्ञानपूर्व युगात नेणाऱ्या गांधीवादाच्या प्रतिगामी प्रयत्नाचें चरखा हें मूर्तिमंत प्रतीक आहे," असें मर्मवाक्य त्यानें उच्चारलें होतें. याच भाषणात त्यानें असाहि इषारा दिला होता कीं, "जागतिक शक्तींच्या संघर्षामुळेंच मुख्यतः हिंदुस्थानला फारसे प्रयास न पडता जें स्वातंत्र्य प्राप्त झालें आहे, त्याची परिणति समाजवादी लोकशाहींत होऊन स्वयंपूर्ण हिंदी राष्ट्र निर्माण व्हावें आणि त्यानें आशियातील परतंत्र देशांना पाश्चात्य साम्राज्यशाहीच्या पाशांतून मुक्त करावें अशी जर आपली आकांक्षा असेल, तर गांधीवादाचा त्याग करून आपल्याला मार्क्सवादातील मुख्य तत्त्वाचा अंगीकार करावा लागेल, याबद्दल मला यत्किंचितहि शंका नाहीं."

अभयच्या या सडेतोड भाषणावर नागपुरांतील कांहीं कॉंग्रेसपक्षीय वृत्तपत्रांनीं टीकेची झोड उठविली; व राष्ट्रपित्याच्या जीवन तत्त्वज्ञानाची अशी विदारक मीमांसा करणारा मनुष्य सरकारी कॉलेजांत प्राध्यापक आणि विद्यापीठाच्या रसायनशाखेचा प्रमुख कसा राहूं शकतो, असाहि प्रश्न उपस्थित केला. पण, मंत्रिमंडळाला काय किंवा विद्यापीठाच्या पदाधिकाऱ्यांना काय, त्याच्या अखिल भारतीय कीर्तीमुळें त्याला हात लावणें सोईचें वाटलें नाहीं.

काँग्रेसपक्षीय वृत्तपत्रांप्रमाणेच स्वतःला काँग्रेसनिष्ठ, गांधीवादी म्हणविणाऱ्या कॉलेजातील कांहीं विद्यार्थ्यांना हि गांधीवादावरील त्याची ती प्रखर टीका अतिशय झोंबली; व त्याचें कॉलेजातील वर्चस्व आणि लोकप्रियता हें त्याना एक शल्य होऊन बसलें.

पण, विद्यार्थ्यांच्या मनात आपल्याविषयीं अशा प्रकारचा कांहीं दंश उत्पन्न झालेला असेल, अशी कल्पनाहि स्वतच्या व्यवसायात सदैव निमग्न असलेल्या अभयच्या मनात कधीं आली नाहीं.

त्यामुळें, म. गांधी यांच्या अमानुष खुनानंतर दुसऱ्याच दिवशीं नागपूर शहरात जी दंगल सुरू झाली, तिची झळ कदाचित् आपल्या घराला लागण्याचा संभव आहे, असें जेव्हा ता. १ फेब्रुवारी रोजीं सकाळीं नचिकेतनें त्याला चहाच्या वेळीं सांगितलें, तेव्हां त्याला तें मुळींच खरें वाटलें नाहीं.

उलट तो त्याला म्हणाला, "या वेटाळांतले लोक वाटेला जायचे नाहींत आपल्या कधीं. गेल्या दहा वर्षांत आम्ही हर एक प्रसंगीं उपयोगी पडलों आहोंत त्यांच्या. १९४२ च्या धामधुमींत आम्हीं अनेकांना आश्रय दिला आमच्या घरात; न् पोलिसाच्या तावडींतूनहि सोडविण्याची शक्य ती खटपट केली. माझा त्या चळवळीवर विश्वास नव्हता पण आमच्या ओळखीचे जे लोक त्या चळवळींत रगडले गेले, त्याना शक्य तें सहाय्य करण्याचा प्रयत्न केला आम्हीं. अनूं तर किती तरी विद्यार्थ्यांना वाचवलय त्या प्रसंगात—"

"पण किती केलं तरी आपण शेवटीं ब्राह्मण आहोंत, डॉक्टरसाहेब! शिवाय, तुम्ही तीन महिन्यांपूर्वी गांधीवादाच्या विरुद्ध भाषण केलं होतंत, हें लक्षात आहे लोकांच्या. कॉंग्रेस मंत्रिमंडळानं तुम्हाला कॉलेजातून काढून टाकावं, असा प्रचार केला होता काँग्रेसपक्षीय वृत्तपत्रांनीं त्या वेळीं. पण तुमच्या कीर्तीच्या धाकामुळ मंत्रिमंडळ धजलं नाहीं तुमच्यावर शिस्त धरायला! तथापि ती कीर्ति कांहीं असल्या दंगलीच्या काळात आपला बचाव करूं शकणार नाहीं—"

"तुला माहीत आहे नचिकेत, "आनंदं ब्रह्मणो विद्वान् न बिभेति कदाचन"! खरा विद्वान्, खरा वैज्ञानिक हा मृत्युंजय असतो आणि

असला पाहिजे. कारण, आपल्या सर्व पार्थिव वासना—भावनांचें हवन त्यानें ज्ञानाग्नींत केलेलें असतें. मी जर लोकक्षोभाला किंवा मृत्यूला भ्यालों, तर वसिष्ठापासून तों आइन्स्टिनपर्यंत जे ज्ञानी पुरुष जगात होऊन गेले आणि आजहि आहेत, त्यांच्या परंपरेंत बसायला अपात्र ठरेन!—"

"पण नाझींचा हैदोस युरोपात सुरू झाल्यावर आइन्स्टिनसारखे अनेक वैज्ञानिक अमेरिकेंत आश्रयार्थ गेले, हेंहि गेल्या महायुद्धात पाहिलय आपण—"

"तूं म्हणतोस तें खरं आहे. पण, काँग्रेस पक्षाचें राज्य म्हणजे कांहीं हिटलरशाही नव्हे कीं, जींत नाझी पक्षातील गुंडांनीं वाटेल त्याच घर लुटावं न् वाटेल त्याचा जीव घ्यावा! मी असं समजतों कीं, स्वतःला जातिधर्म-निरपेक्ष म्हणविणारं काँग्रेसच राज्य हें न्यायाचं आणि कायद्याच राज्य आहे; व त्यात निदान माझ्यासारख्या राजकारणापासून अलिप्त राहून पक्षातीत वृत्तीनं ज्ञानोपासना करणाऱ्या विद्यार्थ्याला तरी भय नाहीं—"

पण हा त्याचा अंदाज अजिबात चुकला.

ता. २ फेब्रुवारी रोजीं सकाळीं जो प्रक्षुब्ध जमावाचा प्रचंड लोंढा महालांतील दुकानांची लूट आणि जाळपोळ करीत मॉडेल मिल्स रस्त्याकडे वळला, त्याची धाड दुपारीं तीनच्या सुमारास त्याच्या घरावर येऊन थडकली. जमाव आपल्या घरावर चाल करून येणार असल्याचीं चिन्हें दिसताच नचिकेतनें समोर मिलच्या कचेरींत जाऊन पोलीस अधिकाऱ्यांना फोन केले. पण व्यर्थ शेवटीं त्यानें आपल्या धंतोलीवरील एका मित्राला फोन करून कॉलेजचे प्रिन्सिपल् आणि निरुपमा यांना ही बातमी कळविण्याची विनती केली; व तो घरीं परत आला.

तों त्याच्या दृष्टीस पडलें कीं, अभय आणि अनघा हीं दुसऱ्या मजल्याच्या सज्जात उभीं असून, अंगणांत येऊन थडकलेल्या जमावाला शांत करण्यासाठीं अभय हिंदींतून मोठ्यानें बोलत आहे.

अभयचें तें भाषण चालू असतानाच जमावातील एक तरुण शिवी हासडून ओरडला—

" यहि साला बम्मन है जिनोने कॉलजमें महात्माजीकु गाली दिया !–"

त्याबरोबर—

" मारो, पीटो सालेकू !—"

—असा एकच आवाज साऱ्या जमावातून उठला आणि लोक दारें फोडून घरात घुसले.

तें भयंकर दृश्य पाहून नचिकेत क्षणैक स्तिमित झाला. त्याच्या डोळया-पुढें अंधारी आली, घशाला कोरड पडली. समोर सज्जात उभीं असलेलीं तीं दोघं त्याला एकाएकीं दिसेनाशीं झालीं ; अभयचा आवाज त्याला ऐकूं येईनासा झाला.

पण काही क्षणच—

—-त्या भीषण दृश्यानें त्याला प्रथम काहीं क्षण जसें स्तिमित, बधिर केलें, तसेंच लगेच जागृत, उद्दीपितहि केलें.

जमाव तळमजल्यावरील सामान फोडण्यात, फेकण्यांत, लुटण्यात आणि जाळण्यात मग्न झालेला होता. माडीचे दोन्ही जिने आतून बंद केलेले असल्यामुळें त्या क्षणीं तीं दोघे वर सुरक्षित उभीं होतीं. मागल्या अंगणात जो छोटा जिना माडीवरून खालीं येण्यासाठीं होता, त्याकडे अद्याप पुढल्या दारीं असलेल्या जमावाचें लक्ष गेलेलें नव्हतें.

नचिकेत त्या जिन्यानें वर गेला ; व आतून बंद केलेल्या दारावर चढून त्याने हवाकशातून त्याचे बोल्ट काढले. त्याबरोबर दारें उघडलीं. तो चोर-पावलानीं आत गेला आणि सज्जात उभ्या असलेल्या त्या पतिपत्नींना त्यानें आत येण्याबद्दल खूण केली.

अभय अगदीं शांत होता ; पण अनघा मात्र संतापानें थरथर कांपत होती.

त्यानें त्या दोघाना म्हटलें, " डॉक्टरसाहेब, आता आपण येथें थाबलों, तर कदाचित् जिवावरहि बेतेल तुमच्या ! तुम्हीं मुकाट्यानं माझ्याबरोबर बाहेर पडा मागल्या जिन्यानं न् मी नेतों तिकडे चला माझ्या पाठोपाठ—"

" तूं हिला घेऊन जा, नचिकेत. मी थाबतों इथंच—"

" छे छे ! भलतीच चूक करूं नका तुम्हीं या वेळीं. बाईंना कदाचित् त्रास देणार नाहींत लोक. पण, तुम्ही जर जमावाच्या हातीं लागलात, तर हे आततायी गुंड तुमचं काय करतील हें सांगवत नाहीं मला—"

" मग तुम्हीच जा अभय, याच्याबरोबर. मी थांबते इथं—"

" नाहीं, नाहीं, बाई ! इथं थांबून विषाची परीक्षा पाहण्यात काही अर्थ नाहीं. तुम्ही दोघंहि चला माझ्या मागोमाग. प्रत्येक क्षण लाख मोलाचा आहे या वेळी. चला ना डॉक्टरसाहेब, माझ्याबरोबर !—"

त्यानें जोरानें अभयचा हात पकडला आणि त्याला ओढीत जिन्याकडे आणलें. जिन्याच्या शेवटल्या पायरीजवळ एक काळासावळा बळकट तरुण हातात लाठी घेऊन उभा होता. त्याला नचिकेतनें म्हटले-—

" प्रल्हाद, तूं घेऊन जा याना नाल्यातून आपल्या घरीं. भास्करला वर पाठव. मी बाईंना घेऊन येतोंच तुमच्या पाठोपाठ--"

त्या तरुणानें अभयचा हात धरला. त्याबरोबर अभयनें त्याला विचारलें--

" प्रल्हाद, तूं कुठं नेतो आहेस मला ?--"

" माझ्या घरीं. एकदा तिथं आपण पोंचल्यावर मग भय नाहीं आपल्याला काहीं, साहेब. आमच्या महारवाड्यावर चाल करायची हिंमत नाहीं कोणाची—"

ते दोघे डोळ्याआड होतात न होतात, तोंच माडीचा दरवाजा फुटला आणि जमाव वर येऊं लागला.

त्याबरोबर अनघा पुढें झाली आणि म्हणाली—

" इथं पुस्तकाशिवाय दुसरं काहींहि नाहीं. मेहेरबानी करून या पुस्तकाना हात लावूं नका—"

जमावाच्या आघाडीला असलेल्या एका लाठियाळ तरुणाला तिनें हात जोडून म्हटलें.

पण तो तुच्छतेनें हंसून उद्गारला—

" बाई, बऱ्या बोलानं बाजूला व्हा तुम्ही. पुस्तकं असोत किंवा देवाच्या मूर्ति असोत. या घरातलं काहींहि शिल्लक राहणार नाहीं आज—"

" पण का ? पुस्तकानीं काय केलय तुमच ? हीं पुस्तकं जाळून काय मिळणार आहे तुम्हाला ?—"

" ते विचारूं नका तुम्ही ! आज या घरातलं काहींहि शिल्लक ठेवणार नाहीं आम्ही एवढं नक्की ! साहेब कुठं आहेत ?--"

" ते तिसऱ्या मजल्यावर आहेत--"

तिच्या पाठीशीं उभ्या असलेल्या नचिकेतने चटकन् उत्तर दिलें.

" मग हा मजला रिकामा केल्यावर त्याची भेट होईलच आपोआप ! आज काहीं ते सुटत नाहींत आमच्या हातातून !--"

तो तरुण विकट हास्य करून उद्गारला.

नंतर त्याने अनघाला म्हटलें, "बाई, तुम्ही मुकाट्यानें बाहेर व्हा आधीं. तुम्हाला वाट मोकळी करून देतों मी--"

पण अनघा जागची हलली नाहीं. जिन्याच्या तोंडाशी कठड्यावर हात ठेवून ती अगदीं निश्चल उभी होती.

माडीवर जाण्यासाठीं आतुर झालेल्या जमावाचा कल्ला जोरानें सुरू होता. म्हणून नचिकेत तिला म्हणाला—

" बाई, इथं थांबण्यात अर्थ नाहीं आतां. भास्कर, हात धर बाईचा एक तूं. आपण खालीं घेऊन जाऊं या त्याना--"

" नाहीं, नाहीं. या माडीवर त्याचं ग्रंथसर्वस्व आहे; त्यानीं केलेल्या निरनिराळ्या प्रयोगाचा परिपाक आहे; त्यानीं केलेलीं नाना प्रकारचीं बहुमोल टिपणें आहेत. हें सगळं ज्ञानधन नष्ट होऊन गेल्यावर मग काय करतील ते ? नाहीं, नाहीं नचिकेत ! तुम्ही जबरदस्तीनं नेऊं नका मला. मी इथं थांबलें, तर तीं बहुमोल टिपणं तरी वांचतील या निर्बुद्ध दुष्टांच्या तावडींतून!-"

“ नाहीं, नाहीं, बाई ! एक चिठोरंसुद्धा वाचणार नाहीं. डॉक्टरसाहेबाच्या डोक्यातून तीं सगळीं टिपणं बाहेर पडतील पुन्हा. तुम्ही आशा सोडा आता इथली न् बाहेर पडा आमच्याबरोबर——”

त्या दोघा मुलानीं तिचे हात धरून तिला ओढीतच खालीं आणली.

ती संतापानें थरथरा कापत होती; तिचे ते विशाल नेत्र त्वेषानें जणूं जळत होते.

“ हटो, हटो ! बाईकू रस्ता दो ! भीड मत करो——”

असे उद्गार ती खालीं येताच उठले आणि तिला वाट देण्यासाठीं जमाव पांगला.

पण ती घरातून बाहेर पडली मात्र——

——“ साले बम्मनकी ऐसी तैसी ! गयी साली मार्वत ! !——”

——असे आवाज उठले आणि एकदम हंशा पिकला.

खालीं येतांच अंगणांत पेटविलेली सामानाची होळी अनघाच्या नजरेस पडली.

——वरून धडाधड पुस्तकें येऊन त्या होळींत पडत होतीं——

तिनें अगदीं शून्य, अगदीं भकास दृष्टीनें त्या होळीकडे पाहिलें आणि ती हसून उद्गारली——

“ यासाठींच का त्यानीं जन्मभर विद्येची उपासना केली ? विद्येचा आणि ज्ञानाचा अशा रीतीनं विध्वंस करणाऱ्या लोकाचं काय भलं व्हायचंय ?—”

ती पुन्हा हंसली. तिनें आपले दोन्ही हात छातीवर ठेवले होते. तिची दृष्टि वरून धडाधड खालीं येऊन होळींत पडणाऱ्या त्या पुस्तकावर खिळली होती.

तिचें तें हंसणें ऐकून नचिकेतच्या अंगावर कांटा उभा राहिला.

तें हास्य म्हणजे हताश, हतबल क्रोधाचा विकट उद्गार होता.

नचिकेतनें तिचा दंड पकडला आणि काकुळतीनें म्हटलें—

" चला, चला, बाई ! हा नाश पाहूं नका तुम्ही आपल्या डोळ्यानीं—"

" हा नाश पाहाण्यातहि एक आनंद आहे, नचिकेत. ज्यानीं कुणाचं कधीं अकल्याण केलं नाहीं, आपल्या देशाच्या ऊर्जितासाटीं ज्यानीं सारं आयुष्य सशोधनात घालविलं आणि ज्ञानार्जनाशिवाय दुसरा कोणताहि विचार ज्याच्या मनाला कधीं शिवला नाहीं, त्याच्या त्या निरक्षेप ज्ञानोपासनेचा हा नाश पाहाण्यातहि आनद आहे एक प्रकारचा ! श्रीकृष्णानं आपली सोन्याची द्वारका स्वतःच्या डोळ्यानीं जळून भस्म झालेली पाहीली. तो सोहळा आमच्या नशिबीं आला, हे आमचं केवढं भाग्य !—"

ती हंसत होती आणि बोलत होती.

त्या होळीकडे टक लावून पाहाणारे तिचे ते निश्चल डोळे एक विचित्रच तेजानें लकाकत होते.

नचिकेतला तिच्याकडे पाहावेना.

आपल्या शेजारीं उभ्या असलेल्या विद्यार्थ्याला तो म्हणाला, " भास्कर आतां जर बाईना आपण इथून नेल नाहीं तर वेड लागेल त्यांना ! चल चल ! ओढून, उचलून जसं जमेल तसं नेऊं या याना इथून—

आणि, ती नको नको म्हणत असता, त्या दोघानीं तिला जबरदस्तीनं ओढून मागल्या रस्त्याकडे नेली.

नाला ओलांडून त्यांनीं तिला महारवाड्याकडे आणली, तेव्हां तिनं विचारलें, " तुम्ही कुठं नेता आहात मला, नचिकेत ?—"

" डॉक्टरसाहेबांना नेलंय तिथं—"

ती कांहीं बोलली नाहीं.

प्रल्हादच्या घरापाशीं आल्यावर नचिकेतानें हाक मारली--

" प्रल्हाद, प्रल्हाद--"

त्या हाकेबरोबर प्रल्हादनें वरच्या गच्चींतून खालीं पाहिले.

" दुसरं कोणी नाहीं. आम्हीच आलो आहोंत बाईना घेऊन. दार उघड लवकर--"

त्याने खाली येऊन दार उघडलें.

त्याबरोबर अनघाने त्याला विचारले, " कुठं आहेत ते ? खरोखरीच आहेत ना ते या घरात ? नाहीं तर ते जिथं असतील तिथं घेऊन चला मला--"

" नाहीं, बाई ! साहेब या घरातच आहेत आणि अगदी सुरक्षित आहेत. आपण आत येऊन पाहा तरी--"

प्रल्हादनें तिचा हात धरून म्हटलें.

आणि तो तिला आत घेऊन गेला.

तिथें जमिनीवर पसरलेल्या बिछान्यावर पडून अभय वाचीत होता.

ती दृष्टीस पडताक्षणीच तो उठून उभा राहिला आणि हर्षभरानें हात पुढें करून उद्गारला—

" अखेर तुला आणली इथं या बहाद्दर पोरांनीं !—"

तिनें धावतच पुढे येऊन त्याला मिठी मारली.

आणि मोठ्यामोठ्यानें हुंदके द्यावयाला प्रारंभ केला.

ते तिघे टकमका तें दृश्य पाहात होते.

तो तिच्या मस्तकावरून हात फिरवीत तिला म्हणाला—

" रडूं नको, अनू ! इतकं वाईट वाटण्यासारखं काय आहे त्यांत ?—"

" नाहीं कसं ? आपलं घर गेलं. तुमचीं पुस्तकं न् प्रयोगशाळा गेली. कांहीं कांहीं शिल्लक ठेवलं नाहीं त्यानी--"

" कांहीं चिंता नाहीं. आपण दोघं तर सुरक्षित आहोंत ना? मी उभा आहें, तोंपर्यंत कांहीं कमी पडणार नाहीं आपल्याला—"

" पण तुमचीं पुस्तकं? तुमचीं टिपण?—"

" पुस्तकं मिळतील पुन्हा आणि टिपणं आहेत माझ्या डोक्यात—"

पण ती हुंदके देत होती. तिचें सारें अंग थरथरा कापत होतें.

त्यानें तिला हळूच त्या गादीवर बसविलें.

तोंच प्रल्हाद पाण्यानें भरलेला गडवा घेऊन आला.

अभयनें रुमाल ओला करून तिचें तोंड स्वच्छ पुसलें आणि तो तिला हसून म्हणाला,—

" हे पाहा, अनू! आपल्या आयुष्यात आजचा हा दिवस आपण अगदीं पूर्ण विसरून जायचं न् नव्या संसाराला प्रारंभ करायचा उद्यापासून. तुझ्या डोळ्यात पुन्हा आसवं येता कामा नयेत आता! प्रल्हाद, चहा आण बाईसाठीं. बसा रे तुम्ही—"

" डॉक्टरसाहेब, आपण ओळखलं नाहीं याला—"

अभयनें नचिकेताच्या मागे उभ्या असलेल्या तिसऱ्या विद्यार्थ्याकडे जिज्ञासेनें पाहिलें.

" हा भास्कर गुप्ते, हिस्लॉप कॉलेजांतला. हा नेहमीं येतो माझ्याकडे. पण आपल्या लक्षांत नाहीं. आज फार मदत झाली याची आपल्याला—"

" मी तुझे आभारसुद्धा मानूं शकत नाहीं भास्कर, या स्थितींत—"

" आपला लोभ माझ्यावर जन्मभर राहला म्हणजे पुरे आहे मला—"

" तें तुझ्या हुषारीवर न् उद्योगावर अवलंबून राहील, भास्कर! आजच्या कामगिरीचा उपयोग होऊं शकणार नाहीं त्या बाबतींत, हें सांगूं शकतों मी तुला स्वानुभवावरून—"

नचिकेतानें त्याला हसून म्हटलें.

आता सूर्यास्ताची वेळ झाली होती. शहरात कर्फ्यू जारी झालेला असल्यामुळें गोंगाट पूर्वीइतका जोराने कानावर येत नव्हता. महारवाड्यात तर पूर्ण शांतता होती.

अनघा अभयच्या मांडीवर डोकें ठेवून निपचित पडली होती. अजूनहि मधून मधून तिला हुंदके येत होते. तो सारखा तिच्या पाठीवरून हात फिरवीत होता.

त्यांना पूर्ण एकांत मिळावा, म्हणून ते तिघे विद्यार्थी गच्चीवर जाऊन बसले.

वर गेल्यावर नचिकेत प्रल्हादला म्हणाला, "माझ्या आयुष्याचं सार्थक झालं असं वाटतं मला आज चार वर्षांपूर्वी याच दिवसांत मी विषमज्वरानं आजारी पडलों असतां बाईंनीं मला वाचवलं त्यांनी; नू तेव्हापासून पोटच्या गोळ्यासारखी माया केली आहे त्यांनीं माझ्यावर. आज या संकटात मी थोडा तरी उपयोगी पडूं शकलों त्यांच्या याबद्दल धन्यता वाटते मला! नाहीं तर आपण काय करूं शकणार होतों त्यांच्यासाठीं, प्रल्हाद!—"

"खरं आहे तुझं म्हणणं, नचिकेत. मी बारा वर्षांचा असल्यापासून साहेब खर्च करताहेत माझ्या शिक्षणाचा त्यांच्यामुळं मी बी. एस्सी पर्यंत येऊन पोंचलों माझ्या बहिणीला तर केवळ बाईंच्या कळकळीमुळें शाळा दिसली. आज सकाळीं जेव्हा तूं सांगत आलास ते संकटात आहेत म्हणून, तेव्हा धोंडा उठला माझ्या पोटात खरोखरी—"

ते गप्पांत गर्क असतानाच मोटारीचा कर्णा वाजला. म्हणून भास्करनें चटकन् उठून पाहिले आणि तो आश्चर्यानें उद्गारला—

"तुमच्या प्रिन्सिपल्साहेबांची मोटार नाल्यापाशीं थांबली आहे, नचिकेत—"

"खरं? उशिरा का होईना, मघाशीं इतकी धडपड करून निरूताईला केलेला फोन अखेर कामीं आला म्हणायचा—"

" पण त्यांची गाडी या चोळात येणं शक्य नाहीं, नचिकेत— "

" चला, आपण पाहून येऊं कोण आलंय तें, प्रल्हाद—"

ते तिघे खाली येतात, तोंच निरुपमानें मारलेल्या हाका त्याच्या कानावर आल्या आणि नचिकेतने दार उघडलें.

त्याबरोबर निरुपमा, सायन्स कॉलेजचे मद्रासी प्रिन्सिपल् आणि एक सशस्त्र पोलीस अधिकारी असे तिघे आत आले.

त्याना पाहातांच नचिकेतनें आनंदातिशयाने निरुपमाला विचारलें, " तुला कोणीं सांगितल ते इथं आहेत म्हणून, निरूताई?— "

" अरे, तूंच नाहीं का निरोप पाठवलास फोनवरून डॉक्टरांना घेऊन प्रल्हादकडे जातोय म्हणून ? त्या अंदाजानं आलों आम्ही इथं— "

निरुपमाचा आवाज ऐकताच अनघा उठून बसली आणि अभयला म्हणाली—

" निरूचा आवाज ऐकल्यासारखा वाटतो—"

" हो बाहेर आली आहेत मंडळी कोणीतरी— "

तोंच प्रिन्सिपलसाहेबांना घेऊन निरुपमा आंत आली.

ते आंत येतांच अभयला नमस्कार करून आपल्या मखमली मृदु आवाजात उद्गारले—

" मला फार फार वाईट वाटतं डॉ. पंडित, आज घडलेल्या या लाजिरवाण्या प्रकारांबद्दल. आम्ही इथं येताना वाटेत घर पाहलं आपलं. कांहींसुद्धा शिल्लक ठेवलेलं नाहीं ! ( *I am sorry, indeed reru sorry, Dr. Pandit, for to-day's disgraceful happenings. We have seen your house on our way to this place. Everything has been completely destroyed.* )—"

" हा सगळा जमावाच्या प्रक्षोभाचा प्रताप आहे, डॉ. अय्यर. आपण काय करणार त्याला ? आपण असलीं संकटं नम्रतेनें आणि शौर्यानें सोसली पाहिजेत ! ( *All this is due to mob fury, Dr. Ayyar. How can we help it? We must bear our cross meekly and bravely* )—"

" खरं आहे आपलं म्हणणं. मी इथं येण्यापूर्वी मुख्य प्रधानाशीं फोनवर बोललों. त्यांनींहि मनापासून खेद व्यक्त केला तुमच्यावर ओढवलेल्या या प्रसंगाबद्दल ! ते तुमची सगळी व्यवस्था करायला तयार आहेत असेंब्ली रेस्ट हौसमध्यें. आपण तिथं चला, नाहीं तर माझ्या बंगल्यावर रहा सगळं शांत होईपर्यंत— "

" मला वाटतं अक्का, तुम्ही माझ्याकडे येणंच अधिक सुखाचं होईल तुला— "

निरुपमा मध्येंच उद्गारली.

" पण संरक्षण काय आहे तिथं ?— "

प्रिन्सिपल्साहेबानीं तिला विचारलें.

" जे संरक्षण रेस्ट हौसवर किंवा आपल्या बंगल्यावर मिळेल, तें माझ्या घरीं नाहीं का मिळूं शकणार सरकारच्या मनात असलं तर ? मला वाटतं अक्का, तुम्हीं माझ्या इथंच चला आतां— "

" ठीक आहे. संरक्षण कुठंहि मिळूं शकेल. आपल्याला काय वाटतं, डॉ. पंडित ?— "

प्रिन्सिपल्साहेबाचा तो प्रश्न ऐकताच अभयनें अनघाकडे पाहिलें.

तेव्हां ती चटकन् उद्गारली—

" मला वाटतं, निरुताईकडेच जाऊं या आपण. आतां आपला जीव घेण्यापेक्षां अधिक कोण काय वाईट करूं शकणार आहे आपलं ?— "

निरुपमाचें जीवन एका परीनें आपल्याप्रमाणेंच एकाकी आणि दुःखी आहे, याची जाणीव अनघाला तिच्या घरच्या पाऊण महिन्यातल्या त्या वास्तव्यांतच प्रथम झाली.

सदा प्रसन्न, हंसतमुख असलेली, दिवसाचे तिन्ही प्रहर साडया बदलणारी आणि प्रत्येक बोलपटात प्रसाधनाचा जो नवा मोहक प्रकार दृष्टीस पडेल तो दक्षतेने उचलणारी निरुपमा !--तिच्या त्या आत्मकेंद्रित, कलासक्त, उद्योगी जीवनात काहीं शल्य असावे, अशी कल्पनाहि कधीं अनघाच्या मनाला शिवली नव्हती. एके दिवशीं सायंकाळीं त्या दोघी भगिनीमंडळातून परत येत असता गतजीवनातल्या निरनिराळ्या प्रसंगांवरून बोलता बोलतां अनघा एकदम उद्गारली—

" आपल्यामुळं एका व्यक्तीला एकाकी आयुष्य कंठावं लागतंय या कल्पनेनं केव्हां केव्हां मध्यरात्रीं गाढ झोपेंतूनसुद्धां दचकून जागी होतें मी एखादे वेळीं !—,,

" हें काय भलतंच बोलतेस तूं, अक्का ?—"

" मी भलतं बोलत नाहीं, ताई. जें खरोखरी घडलं, तेंच बोलतेंय—"

" ते कसं काय ?—"

" लहानपणीं सातारला असताना होमीसाहेबाकडे रोज टेनिस खेळायला जायची मी. पण त्याचा मुलगा रुस्तुम याच्या मनांत माझ्याशीं लग्न करण्याची इच्छा असेल अशी कल्पनाहि कधीं शिवली नाही माझ्या मनाला. लोक वाटेल तें बोलत असत आमच्याविषयीं. पण, मी तो लोकांच्या कुटाळक्या करण्याच्या प्रवृत्तीचा एक प्रकार आहे, असें समजून चालत असें. त्यामुळ, आपली ही इच्छा जेव्हा त्यानें एक दिवस अगदीं प्राजळपणानं बोलून दाखविली, तेव्हां मला खरोखरी धक्का बसल्यासारखा झाला—"

"पण धक्का बसण्यासारखं काय होतं ग, त्यांत ?—"

" कारण, माझ्या मनात मुळीं लग्नाचीच कल्पना आली नव्हती तोंपर्यंत कधीं. माझ सगळं लक्ष अभ्यासात न् खेळात असे. आम्ही महाबळेश्वरला

असतांना एके दिवशीं संध्याकाळीं मला त्यांच्या बंगल्यावरून परतायला उशीर झाल्यामुळं तो मला पोंचवायला म्हणून माझ्याबरोबर आला. तो गाडी चालवीत होता न् मी शेजारीं बसलें होतें. एरवीं तो सारखा बडबडत, हसत, खिदळत असायचा. पण त्या दिवशीं अगदीं गभीर, अगदीं अबोल होता. म्हणून मीं सहज त्याला विचारलं, " रुस्तुम, आज तुमचा कांहीं खटका उडाला का होमीसाहेबांशी ? तुम्ही बोलत का नाहीं ? " त्याबरोबर त्यानें चटकन् माझ्याकडे वळून मला विचारलें, " मी बोलतों पण तूं मनापासून उत्तर देशील मला, अनू ? मला फक्त एकच गोष्ट विचारायचीय तुला आज. ती विचारावी कीं नाहीं या फिकिरींत पडलोय मी मघापासून. विचारू का ?" " हो. विचारा ना, मी अगदीं मनापासून उत्तर देईन तुम्हाला," मीं त्याला म्हटलें. तें वाक्य मीं उच्चारलें मात्र, त्यानें आपले डोळे माझ्यावर रोखले आणि मला विचारलें, " अनू, तूं लग्न करशील माझ्याशीं ? तुझ्या उत्तरावर जीवन अवलंबून आहे माझं सगळं ! "—"

" मग तूं काय उत्तर दिलंस त्याला, अक्का ? —"

" त्याचा तो अनपेक्षित प्रश्न ऐकून मी अगदीं गोंधळून गांगरून गेलें. पण ती वेळ गुळमुळीत बोलण्याची नव्हती. म्हणून मीं मन दगडामारखं घट्ट करून त्याला म्हटलं, " रुस्तुम, तुम्ही असा कांहीं प्रश्न मला विचाराल, असं स्वप्नांतहि आलं नव्हतं माझ्या. ज्या प्रश्नासंबंधींचा विचारहि कधीं माझ्या मनाला शिवला नाहीं, त्या प्रश्नाचं काय उत्तर देणार मी तुम्हांला ?" तो कांहींक्षण अगदीं स्तब्ध होता. नंतर भरल्या आवाजांत तो उद्गारला, " तूं निराशा केलीस माझी, अनू ! " त्यावर मीं म्हटलें, " माझा निरुपाय आहे, रुस्तुम. माफ करा मला ! —" पण तेव्हापासून, या क्षणापर्यंत तो अविवाहित आहे, निरू. आम्ही दरवर्षी महाबळेश्वरला जातों. पण त्यानंतर तो कांहीं पुन्हा भेटला नाहीं मला कधीं—"

"पण तुला कधींच आठवण होत नाहीं का ग त्याची ?—"

"होते केव्हा केव्हा. पण ती आता सांगितलं त्याप्रमाणं. मनाच्या कुठल्या तरी खोल कुहरात त्या प्रसंगाची आठवण दडून बसली आहे. ती एखाद वेळीं अचानक झोपेच्या भरांत किंवा स्वप्नात डोकं वर काढते आणि मग मला वाईट वाटतं फार त्याच्याबद्दल. डॉक्टराच्याच वयाचा आहे तो पण घरीं इतकं ऐश्वर्य असून सुद्धा अगदीं एकट्यान आयुष्य काढतोय बिचारा !—"

"बिचारा ! किती तिऱ्हाईतपणानं बोलतेस ग तूं त्याच्याविषयीं ! तो तुझ्यासाठीं सारा जन्म तळमळत घालवणार न् तूं एखाद्या जखमी सावजा-विषयीं शिकाऱ्यानं बेपर्वाईन बोलावं तसं बोलते आहेस त्याच्याविषयीं, अक्का !—"

"मग काय करूं ग मी ? तो इतका देखणा, डॉक्टरापेक्षांसुद्धां इतरांना सुंदर वाटण्यासारखा असूनदेखील माझ्या मनात कधीं आलं नाहीं त्याच्या-विषयीं कांहीं. त्याला माझा काय उपाय आहे ? प्रेम हें काय अनुकंपेतून उपन्न होत असतं का, निरू ? तथापि, तो अविवाहित राहूला आपण कारण झालों, याबद्दल मात्र वाईट वाटतं मला फार. पण, ज्या स्त्रीला आपल्याविषयी प्रेम नाही आणि जी स्त्री आपल्याला कधीं लाभण्याचाहि संभव नाहीं, तिच्यासाठीं झुरत जन्म काढणं, हा निवळ वेडेपणा नाहीं का खरोखरी ? मला समजत नाहीं त्यान अविवाहित राहून काय साधलें तें !—"

"किती निर्दय आहेस ग तूं, आक्का !—"

निपरुमा एकदम उद्गारली. तिचे डोळे भरून आले होते.

"काय झालं ग तुला, निरू ?—"

"कांहीं नाहीं—"

ती मान फिरवून अगदीं तुटकपणानें उद्गारली.

पण अनघानें तिचा हात आपल्या हातात घेऊन म्हटलें—

" माझ्यापासून लपवते आहेस तूं आज कसलं तरी दुःख. खरं सांग मला, निरू. मला सांगितलंस, तर मी शक्य तें करीन त्या बाबतींत—"

" त्या बाबतींत कांहीं करण्यासारखं नाही आता, अक्का. ते सगळं संपून गेलंय कधींच—"

" तरीसुद्धां सांग तूं मला—"

" घरीं गेल्यावर सांगतें मी—"

अनघाला समजेना आपण असें कोणतें भयंकर वाक्य उच्चारलें, कीं ज्यामुळें निरुपमाच्या हृदयातली एखादी जुनी जखम डिवचली जाऊन तिनें आपल्याला एकदम निर्दय म्हणावें ? आणि असे कोणते दुःख तिच्या हृदयात डाचत आहे, कीं जें आपल्या उद्गारानें चाळवलें जावें ?

त्या दोघी घरी पोंचल्यावर निरुपमाने प्रथम तोंड धुतलें; विजेच्या शेगडीवर तितक्यात तयार झालेला चहा टेबलावर ठेवला; व कपबशाची मांडामांड केल्यावर ती अनघाला म्हणाली—

" अक्का, मी तुला सांगतें सगळं. पण तें तूं ऐकल्याक्षणींच विसरून गेलं पाहिजेस—"

" तें पाहीन मी. पण सांग तर आधी—"

" मी कॉलेजात असताना बी. ए. च्या वर्गांत गोंदियाचा अनिल मेहता नावाचा गुजराती विद्यार्थी होता. कॉलेजच्या स्नेहसंमेलनात जें मुलींचं नाटक झालं, त्यातल्या माझ्या कामावर खूष होऊन त्यानं मला स्वतःतर्फे खास सुवर्णपदक दिलं न् ओळख करून घेतली माझी. पुढें आमचे संबंध वाढत गेले. फार प्रेमळ आणि सुस्वरूप होता ग तो—"

ती बोलता बोलतां एकदम थांबली; व तिनें किटलींतून चहा दोन्ही कपांत ओतला. नंतर त्याचा एक घोट घेऊन ती पुढें म्हणाली—

" उन्हाळ्याच्या सुटींत आम्हीं लग्न करायचं ठरवलं. आणाभाकासुद्धां घाल्या न् तो सुटी सुरू झाल्यावर गोंदियाला निघून गेला. तिथून त्याचं एक दिवस अचानक पत्र आलं मला—"

ती पुन्हा थबकली. चहाचे आणखी काहीं घोट तिनें घेतले आणि नंतर म्हणाली—

"त्या पत्रात त्यान लिहिलं होतं कीं, "माझ्या वडलाना मी महाराष्ट्रीय मुलीशी लग्न करावं हे मुळींच पसंत नाहीं. मी जर हट्टानं तुझ्याशीं लग्न केलं, तर ते बेवारस ठरवतील मला !"—"

"त्याचे वडील खूप श्रीमंत होते का —"

"हो. भंडारा जिल्ह्यातल्या सर्वांत मोठ्या बिडी—कारखान्याचे मालक. मुंबईलासुद्धा इमारती आहेत त्याच्या. तो नवसासायासानं झालेला त्याचा एकुलता एक मुलगा. त्यामुळं, आम्हीं लग्न केल्यावर जरी कदाचित् काहीं दिवस त्यानीं आमच्याशीं संबध टेवला नसता, तरी काहीं काळानं त्यानीं खात्रीनं आम्हाला घरात घेतलं असतं. मला हें सगळं स्पष्ट दिसत होतं आणि म्हणून मीं तसं त्याला लगेच लिहिलंहि—"

"मग त्याचं काय उत्तर आलं ?—"

"त्यानं मला असं कळवलं की, "वडलाच्या विरुद्ध जाऊन तुझ्याशीं लग्न करण्याच धैर्य मला नाही." आणि तिथंच संपलं संगळं—"

तिच्या डोळ्यातून टिपें पडूं लागलीं.

काहीं क्षण दोघींहि अगदीं स्तब्ध होत्या.

नंतर अनघानें तिच्या पाठीवरून हात फिरवून म्हटलें, "तिथंच संपलं सगळं असं जें तूं म्हणालीस ना, तेच चुकलं तुझं. तूं काय आता अविवाहित रहाणार आहेस का निरू, जन्मभर त्याची मानसपूजा करीत ?—"

निरुपमा काहीं बोलली नाहीं. तिच्या डोळ्यातून सारखे अश्रु वहात होते.

"तसा जर तुझा विचार असेल ताई, तर तो चूक आहे अगदीं. मी आज रात्रीं डॉक्टरांना सांगतें सगळं. ते अगदीं उमद्या तरुणाशीं लग्न करून देतील तुझं—"

"तूं चुकतेस, अक्का ! माझ्यापुढं प्रश्न आहे तो लग्नाचा नाहीं. माझ्याभोंवतीं आज इतक्या प्रेमी तरुणाचा घोळका आहे कीं, मीं नुसती अनुकूलता दर्शविताक्षणींच त्यातला कोणीहि तरुण माळ घालील माझ्या गळयात ! पण आज तरी माझ्या मनाची भावना अशी आहे कीं, मी विसरूं शकणार नाहीं त्याला. आणि त्याची स्मृति माझ्या हृदयात धगधगत असता दुसऱ्या पुरुषाशीं संसार करणं ही प्रतारणा होईल केवळ. ती करण्याची इच्छा नाहीं माझी—"

"हा सगळा कल्पनेचा खेळ आहे तुझ्या, निरू. तुम्ही अलीकडल्या मुली नाटकं—कादंबऱ्या वाचता, चित्रपट पाहता न् त्यावरून जीवनाविषयीच्या काहींतरी भडक अचाट कल्पना बनवता ! वास्तविकाशीं काहींहि संबंध नसतो त्या कल्पनाचा. चागल्या सुशील, सुस्वरूप, संपन्न तरुणाशी जर उद्या तुझं लग्न झालं, तर विसरून जाशील तूं त्या अनिलला. उगाच भलत्या कल्पना डोक्यात घेऊन आयुष्य वाया घालवूं नकोस आपलं—"

"तुला कल्पना यायची नाहीं अक्का, कधीं माझ्या मनाची. तुझ्या सुदैवानं तुझं ज्याच्यावर प्रेम जडलं त्याच्याशींच तुझा विवाह होऊन प्रियकर हाच पति झाला तुझा. प्रेमभगाच्या यातनाची काय कल्पना येणार तुला ? तारुण्याच्या ऐन उमेदींत एकावर प्रेम जडावं आणि लग्न दुसऱ्याशींच करणं भाग पडावं, यासारखी आपत्ति नाहीं स्त्रीवर दुसरी. प्रियकर एक असावा आणि पति दुसराच व्हावा, या विरोधी विदारक घटनेमुळे स्त्रीच्या मनोजीवनात जें द्वंद्व उत्पन्न होतं, त्याच्या मानसिक न् शारीरिक दुष्परिणामाची काहीं जाणीव नाहीं तुला, अक्का ! स्त्री सगळं काहीं विसरूं शकेल, पण, ज्याच्या मधुर, मादक प्रेमस्पर्शानें तिच्या जीवनाला प्रीतीचा पहिला बहर येतो, त्या पुरुषाला विसरणं सर्वथैव अशक्य आहे तिला. जीवनाविषयींची तिचीं सगळीं सुखस्वप्नं त्याच्या स्पर्शानं उमलतात; न् प्रेमभग झाल्यावर मग त्या स्वप्नाचीं शल्यं सान्या जन्मभर मनात डाचत राहतात ! छे, छे, अक्का ! तूं अजाण आहेस या बाबतींत अगदीं. म्हणूनच मीं निर्दय म्हटलं तुला—"

"मी निर्दय असेन किंवा नसेन. तुझ्या मनाचीहि मला कल्पना येणं कदाचित शक्य नसेल. पण तुझं लग्न हें मात्र झालंच पाहिजे. निरू. आज

तूं तरुण आहेस; मिळवती आहेस; तुझ्या रूप–गुणावर लुब्ध झालेले अनेक तरुण तुझ्याभोंवतीं आज रुंजी घालताहेत. त्यामुळें तुला जीवनाची एकाकिता जाणवत नाहीं तितकी. पण, उद्या वय झाल्यावर, शरीर आणि मन थकल्या-वर हें एकाकी जीवन असह्य होईल तुला; न् सारखं वाटेल कीं कोणा तरी सहृदय मित्राचा आधार असावा आपल्याला. म्हणून म्हणतें, वय गेलं नाहीं तोंवर लग्न करून घे. या एकलकोंडया, उदास जिण्यांत काहीं अर्थ नाहीं—"

"तूं बोलतेस तें मलाहि समजतं, अक्का! पण, मन तयार नाहीं, त्याला काय करूं? तरी मी फारशी पुढें गेले नाहीं. नेहमीं सावध राह्यलें आणि स्वतःला आवरलं. पण ज्या मुली पुढं जातात, वाहवतात न् नतर फशीं पडतात, त्याचें जिणं कायमचं दुःखमय होतं. लग्न केल्यावर, मुलंबाळं झाल्यावरसुद्धा पहिल्या आठवणी मनातून जाता जात नाहीत. सदा वाहात रहाणाऱ्या जखमाप्रमाणं त्या जीवनातले सगळे रस शोषीत सदैव धगधगत राहातात हृदयामध्यें. त्यामुळं लग्न करायचं भय वाटतं—"

"इथंच चुकतं बघ तुम्हा अलीकडल्या मुलींचं! लग्नाची भीति वाटायचं कारण काय? तुम्हा मुलींच्या आयुष्यात जसे काहीं प्रकार घडून गेलेले अस-तात, तसेच मुलाच्याहि आयुष्यात घडून गेलेले असतात. पण ते कचरतात का कधीं लग्नाच्या बोहल्यावर चढायला? मग तुम्हाला तरी या पूर्वस्मृतींचं, पूर्वायुष्याचं एवढं भय का वाटावं? आजच्या काळात पूर्वायुष्य हें जितकं मुलींना असतं, त्याच्याहिपेक्षा जास्त खरोखरी मुलांना असतं; न् हें सगळं गृहीत धरूनच समंजसपणानं लग्नं करायला हवींत तरुणतरुणींनीं यापुढं. एकदा वय निघून गेल्यावर, जीवनातले सगळे रस शुष्क होऊन आटून गेल्यावर मग लग्न करण्यात काहीं स्वारस्य नाहीं. ज्यानं तुझा विश्वासघात केला, त्यानं एव्हांना सुंदर संसार थाटला असेल आपला दुसऱ्या मुलीशीं लग्न करून! आणि तूं मात्र त्याचं स्मरण करित अविवाहित राह्यचंस हा कुठला ग न्याय? —"

तिचे ते उद्गार ऐकून निरुपमाच्या डोळ्यात पुन्हा अश्रु उभे राहिले. तेव्हा अनघा तिला किंचित् रागानेंच म्हणाली—

"रडूं नकोस बाई तू अशी, निरू! तुझे हे अश्रु स्त्रीजातीच्या दुर्बलतेचे द्योतक वाटतात मला. दैवानं एखादा क्रूर आघात अचानक केला न् त्यामुळं जर मन खचून गेलं, तर ते स्वाभाविक म्हणेन मी. पण, चंचल मनाच्या भित्र्या पुरुषाशीं गाठ पडल्यामुळ जी फसवणूक झाली, तिच्याबद्दल आनंद मानायचा कीं दुःख? अशा कचदिल, लंपट तरुणाच्या तावडींतून तूं सुटलीस याबद्दल धन्यवाद दिले पाहिजेत तूं खरोखरी आपल्या दैवाला. त्या पहिल्या दुःखद अनुभवापासून धडा घेऊन तूं अधिक चागल्या सहचराची निवड करायला हवीस आता. तुझं हे रडणं अगदीं पसंत नाहीं मला. मग तूं निर्दय म्हटलंस मला तरी चालेल!—"

• • •

त्या वर्षी उन्हाळ्याच्या प्रारंभीं जेव्हा तीं दोघें नेहमींप्रमाणें महाबळेश्वरला गेलीं, तेव्हा अनघानें निरुपमा आणि नचिकेत या दोघानाहि आपल्याबरोबर मोठ्या आग्रहानें नेतलें. मात्र निरुपमाने तिला अशी अट घातली कीं, पुढल्या वर्षीच्या उन्हाळ्यात त्या दोघांनीं महाबळेश्वरला न जाता पचमढीला येऊन तिच्या वडलाचा पाहुणचार घेतला पाहिजे. अनघानें ती अट मान्य केल्यावर ती त्याच्याबरोबर महाबळेश्वरला आली.

पण, मेच्या शेवटल्या आठवड्यात महाबळेश्वरला पहिला पाऊस पडताच, निरुपमा इटारसीमार्गानें परस्पर पचमढीला आपल्या घरीं गेली.

महाबळेश्वरचा त्याचा तो वसंतऋतूंतील मुक्काम या खेपेस राजकीय दृष्ट्या महत्त्वाचा गेला.

गांधीवधानंतर जो भयंकर प्रसंग त्याच्यावर ओढवला, त्याचा वृत्तांत सर्व वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाला होता. त्यामुळें रोज निरनिराळे लोक त्यांच्या समाचाराला येत; व त्या वेळीं होणाऱ्या चर्चेंत त्यांचा वेळ मजेंत निघून जाई. महाराष्ट्रातील समाजवादी पक्षाचें शिबिरहि त्या सुमारास महाबळेश्वरला चालू होतें. समाजवादी नेत्याच्या आग्रहावरुन त्या शिबिरांत 'मार्क्सवादाच्या पलीकडे' आणि 'भारतीय समाजाचें भवितव्य' या दोन विषयावर त्यांचीं विचारपूर्ण व्याख्यानें झालीं.

यांतकीं पहिल्या व्याख्यानात, मार्क्सवादानें गेल्या शंभर वर्षांत जगाच्या दृष्टिकोनात घडवून आणलेल्या क्रांतीचें, पाश्चात्य लोकशाहीवर झालेल्या त्याच्या परिणामाचें, त्यानें उत्पन्न केलेल्या नव्या अर्थनैतिक मूल्याचें आणि सोव्हिएट सरकारने चालविलेल्या त्याच्या प्रयोगाचें वर्णन अभयनें प्रथम केलें व नंतर, " अर्थ ही मानवी व्यवहाराचें नियंत्रण करणारी आणि त्यात परिवर्तन घडवून आणणारी सर्वंकष महान् शक्ति आहे, " हा मार्क्स-वादातील सिद्धांत जरी निर्विवाद ग्राह्य होण्यासारखा असला, तरी मार्क्सचा अनात्मवाद, तदनुसार केवळ आर्थिक दृष्टीनें मानवेतिहासाचा अन्वयार्थ लावण्याचा त्याचा आग्रह, त्याचें विरोध–विकासाचें तत्त्व आणि त्याचा ऐतिहासिक नियतिवाद हीं चारीं प्रमेयें असमंजस असल्याचें सांगून, हिंदुस्थानाची विशिष्ट परिस्थिति आणि तत्त्वज्ञान याच्या अनुषंगानें मार्क्स-वादाचें भारतीकरण करून जीवनाचें नवे तत्त्वज्ञान आपण निर्माण केलें पाहिजे, अशी उपपत्ति त्याने मांडली.

" मी मार्क्सवादी असलों, तरी कम्युनिस्ट नाहीं !— " या सूचक वाक्याने जेव्हा अभयनें आपल्या या व्याख्यानाला प्रारंभ केला, तेव्हां समाजवादी कार्यकर्त्यांना धक्का बसल्यासारखा झाला. कारण, तो कम्युनिस्ट आहे, असाच त्याचा ग्रह झालेला होता. त्याने आपल्या व्याख्यानाच्या ओघात आपण गांधीवादी असल्याचा आभास उत्पन्न करण्याच्या समाजवादी पक्षाच्या दुटप्पी, चंचल धोरणावर जी टीका केली, ती जरी त्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना आवडली नाहीं, तरी त्यानें केलेलें मार्क्सवादाचें विश्लेषण आणि त्या वादाच्या भारतीकरणाची कल्पना मात्र त्यांना विचारार्ह वाटली.

या पहिल्या तात्त्विक व्याख्यानापेक्षाहि त्याचें दुसरें व्याख्यान अधिक विदारक झालें. स्वतंत्र हिंदुस्थानातील आजचे कॉंग्रेसपक्षीय सरकार जरी स्वतःला गांधीवादी म्हणवीत असलें, तरी त्याचें आर्थिक, लष्करी आणि परराष्ट्रीय धोरण हें गांधीवादाशीं सर्वथैव विसंगत असून, गांधीजींच्या नांवाचा किंवा तत्त्वांचा उद्घोष न करता, सरळ आधुनिक पाश्चात्य नमुन्याचें वर्धिष्णु भांडवलशाही सरकार म्हणून त्यानें राज्य केल्यास निदान दांभिकतेचा दोष तरी त्याला लागणार नाहीं. अशा आशयाची प्रस्तावना

त्यानें प्रथम केली; व नंतर, आजच्या प्रतिगामी आर्थिक धोरणामुळें हिंदुस्थानात वर्गकलह होण्यासारखी परिस्थिति दुर्दैवानें उत्पन्न होत असून, भाषावार प्रांतरचना न झाल्यास देशाची आणखी विघटना होण्याचा संभव आहे, असें भय त्यानें व्यक्त केलें.

या व्याख्यानानंतर जेव्हां सोशॅलिस्ट कार्यकर्त्यांना त्यानें आपल्या निवासस्थानीं अल्पोपाहार दिला, तेव्हा झालेल्या चर्चेंत वर्गकलह आणि देशाचें विघटन या दोन संभाव्य आपत्तिंबद्दलच्या आपल्या कल्पना त्याने अधिक विशद केल्या.

या चर्चेंत कामगार चळवळी सरकारी नियंत्रणाखालीं आणण्याच्या धोरणावर जेव्हा एका कार्यकर्त्यानें टीका केली, तेव्हा तो म्हणाला, " आजचें आपलें सरकार हे धड गांधीवादी नाहीं, धड समाजवादी नाहीं आणि धड भांडवलवादीहि नाहीं. तें ब्रिटिश सरकारला सोडूं इच्छित नाही आणि सोव्हिएट सरकारला तोडूं इच्छित नाहीं, यातच त्याच्या धोरणातील सारी दुर्बलता आणि तत्त्वच्युति साठविलेली आहे. कामगाराच्या चळवळी सरकारी हुकमतीखालीं आणून त्याच्या हिताचे काही कायदे केले, म्हणजे उद्योग-धंद्याचें राष्ट्रीयीकरण करण्याची गरज नाहीं, अशी आपल्या काहीं पुढाऱ्याची समजूत दिसते; व वर्गकलहहि या पद्धतीनें आपण टाळूं शकूं, असा त्याना विश्वास वाटतो. पण, नेमक्या या त्याच्या धोरणामुळेच वर्गकलह विकोपाला जाण्याची जास्त शक्यता आहे. संस्थानापासून पाटीलकीपर्यंत सगळ्या प्रकारची सरंजामशाही नष्ट करण्यासाठीं जें आपले सरकार प्रशंसनीय निर्धाराने प्रवृत्त झालेलें आहे, तें भांडवलशाहीला मात्र हात लावायला धजूं नये, या विसंगतीचा अनिष्ट परिणाम श्रमजीवी बहुजनसमाजाच्या मनावर झाल्याशिवाय कसा राहील ? आपल्या सरकारचा मुख्य प्रयत्न आज देशाच्या राजकारणातील सर्व विघटक विषबीजें ( Disintegrating factors ) नष्ट करणें हा असला पाहिजे. पण भाषावार प्रांतरचनेच्या बाबतींतील आडमुठ्या तत्त्व-भ्रष्ट धोरणावरून तरी तशी त्याची वृत्ति आहे असें म्हणवत नाहीं—"

या मुद्द्यावरून बोलतांना मुंबईच्या प्रश्नासंबंधीं समाजवादी पक्षानें सुरवातीला जी मुग्धता धारण केली होती आणि त्याच्या नेत्यांत जें दुमत प्रगट

झालें होतें, त्यावर टीका करून तो म्हणाला, "मुंबई शहरासाठीं जर संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न लाबणीवर टाकण्यात आला, तर महाराष्ट्रांतील बहुजनसमाज कम्युनिस्ट क्रांतीच्या मार्गाला लागेल, अशी भीति मला वाटते. भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नाकडे भांडवलशाही दृष्टीनें पाहिलें जात आहे, असाच त्या धोरणाचा अर्थ करण्यात येईल; व त्यामुळें कम्युनिस्ट क्रांतीशिवाय महाराष्ट्र एकीकरणाला दुसरा उपाय नाहीं, अशी विचारसरणी मराठी जनतेंत बळावेल—"

यावर एका कार्यकर्त्यानें त्याला विचारले, "सध्याच्या संक्रमणकाळांत भाषावार प्रांतरचना करणें सोयीचें होणार नाहीं, असे नाहीं का वाटत तुम्हाला ?—"

"छे! मला अगदीं तुमच्या उलट वाटतें. भाषावार प्रांतरचना ही या संक्रमणकाळात, म्हणजे नवी राज्यघटना अंमलात येण्याच्या वेळींच, करावयाची प्राथमिक मूलभूत गोष्ट आहे असें मी समजतों. स्वराज्य शास्त्रीय, सुस्थिर पायावर उभारलें जाण्यासाठी सर्व संस्थानाचा विलय होणें हें जितकें आवश्यक आहे, तितकेंच हल्लींचे बहुभाषी भेसळ प्रांत मोडून टाकून एकभाषी, एकात्म प्रांतघटक निर्माण करणें हेहि आवश्यक आहे. एक वयवी, पृथगात्म घटक हा मुळीं फेडरल घटनेचा पाया आहे. तो पाया या संक्रमणकाळातच पद्धतशीर रीतीनें न घातल्यास हल्लींचीं भाषिक भांडणें विकोपाला जाऊन कदाचित् प्रादेशिक यादवीपर्यंत प्रसंग येईल, अशीहि भीति मला वाटते—"

"प्रादेशिक यादवी ?—"

"होय. मीं अगदीं बुद्धिपुरःसर शब्दप्रयोग केला आहे हा! हिंदी संघराज्याचें आजचें स्वरूप तुम्ही लक्षांत घ्या, म्हणजे मला ही भीति कां वाटते, हें तुम्हांला आपोआप कळून येईल. आसाम, बंगाल आणि ओरिसा हे तीन छोटे प्रांत सोडल्यास, हिमालयापासून नर्मदेपर्यंत सारा उत्तर भारत हा सामान्यतः हिंदी भाषी आहे; व आजच्या आपल्या घटनापरिषदेंत काय किंवा मध्यवर्ती पार्लमेंटात काय, या हिंदी-भाषी गटाचेंच बहुमत

आहे. उत्तर भारत हा सतत आठशें वर्षे मुसलमानी सत्तेखालीं पारतंत्र्यात राहिलेला असल्यामुळें त्याची मनोवृत्ति, संस्कृति, चारित्र्य आणि राहणी हीं सगळीं मुसलमानी सत्ता झुगारून पुनःपुनः स्वतंत्र झालेल्या दक्षिण भारताहून भिन्न आहेत. शिवाय, उत्तर भारत हा भौमिक, हिमालयामुळे सरिद्बहुल व म्हणून सुपीक आहे; तर दक्षिण भारत हा समुद्रवलयांकित, डोंगराळ आणि खडकाळ व म्हणून त्या मानाने नापीक आहे. विंध्याद्रि आणि नर्मदा यानीं विभागलेल्या भरतखंडाच्या दोन भागातील ही प्रादेशिक भिन्नताहि त्याच्या राज्यघटनेविषयीं आणि भवितव्याविषयी विचार करताना ध्यानात घ्यावयाला हवी. ही प्रादेशिक, सांस्कृतिक आणि मानसिक तिहेरी भिन्नता डोळ्यापुढे ठेवून दक्षिण भारतातील प्रांताना त्याच्या विशिष्ट प्रकृतिनुसार पूर्ण विकसित होण्याची संधि देण्यातच संघराज्याच्या स्थैर्याचें बीज आहे. नर्मदेखालच्या दक्षिण भारतातील कोणते प्रांत जर उत्तरभारतातील हिंदी भाषी समाजाला भाषिक दृष्ट्या त्यातल्या त्यात जवळ असतील, तर ते गुजराती आणि मराठी या संस्कृतोद्भव भाषांचे प्रांत होत. महाराष्ट्रांत अगदीं नामदेवाच्या काळापासून तों आतापर्यंत गेलीं सातशें वर्षे मराठी संत, साहित्यिक आणि समाजाग्रणी हे मराठी आणि हिंदी अशा दोन्ही भाषांत वाङ्मय निर्माण करीत असल्याची जी परंपरा दृष्टीस पडते, ती याच कारणामुळें. पण, गुजरात आणि महाराष्ट्र हे दोन प्रांत सोडल्यास, बाकीचा दक्षिण भारत हा द्राविड आहे; व हिंदी-भाषांयांच्या मुठींत असलेल्या आजच्या राज्ययंत्रात आपला सांस्कृतिक कोंडमारा होत असल्याची जी त्याची तक्रार आहे, ती मला सकारण आणि न्याय्य वाटते. उत्तर आणि दक्षिण भारतातील या सर्व प्रकारच्या भिन्नतेची जाणीव असल्यामुळेंच भाषावार प्रांतरचना ही तावडतोब अमलात आणावयाची प्राथमिक आणि मौलिक राज्यव्यवस्था आहे, असें मी समजतों म्हणूनच एकराष्ट्रीयत्वासंबंधीच्या चुकीच्या आक्रमक कल्पनांच्या आहारीं जाऊन भाषावार प्रांतरचनेच्या बाबतींत ज्या कालहरणाच्या धोरणाचा अवलंब सध्या करण्यांत आलेला आहे, त्यामुळें प्रांताप्रांतात धुमसत असलेला असंतोष उफाळून त्याचें पर्यवसान कदाचित् प्रादेशिक यादवींत होईल, अशीं

दुश्चिन्हें मला दिसतात. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळीं एकराष्ट्रीयत्वासबंधींच्या भ्रामक आग्रहामुळें देशाची धर्मवार फाळणी एकदा होऊन गेलाच आहे. आता स्वातंत्र्योत्तर काळात तशा प्रकारचे विघटक अंत:कलह उद्भवून देशाचे आणखी तुकडे पडूं नयेत, म्हणून तरी निदान भाषावार प्रांत नव्या घटनेच्या निर्मितीच्या वेळींच निर्माण करण्यात आले पाहिजेत. नाही तर मला आपल्या देशाचे भवितव्य काहीं ठाक दिसत नाही—"

"पण हीच गोष्ट पाकिस्तानलाहि लागू नाहीं का ?—"

"आहे ना ! मला पाकिस्तान हें कृत्रिम राष्ट्र वाटतें; व इंग्रजाचा पाठिंबा आहे, तोपर्यंतच तें टिकलें तर टिकेल. पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम पाकिस्तान यांच्यात कोणत्याहि प्रकारची एकात्मता नाहीं; व पश्चिम पाकिस्तानचे सिंध, पंजाब, सीमा आणि बलुचिस्तान हे प्रदेशहि परस्पर-विसदृश आहेत. त्यामुळें, ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या भेदनीतीची ही बनावट अवलाद नष्ट होणार, हे निश्चित—"

"पण पाकिस्तान नष्ट होणार म्हणजे तें जाणार कुठें ?—"

"जाणार हिंदुस्थानात ! दुसरीकडे कुठे जाणार ते ? आज पाकिस्तानला जर कोणती एक भावना प्राणभूत आणि पायाभूत असेल, तर ती ब्रिटिशांनीं हिंदुस्थानचे तुकडे पाडण्यासाठीं चिथावून परिपुष्ट केलेली इस्लामी धर्मभावना होय. उद्या मार्क्सवादाचा प्रसार पाकिस्तानात होताच ही भावना आणि त्याबरोबरच तिच्यावर उभारलेले पाकिस्तानहि कोसळून पडेल; व त्याचे घटक हे स्वायत्त प्रांत म्हणून पुन्हा हिंदुस्थानात समाविष्ट होतील. कदाचित् बंगालच्या पूर्व आणि पश्चिम शकलाचें एकीकरण होऊन तेथें हिंदुस्थानातील पहिले मार्क्सवादी लोकसत्ताक स्थापन होण्याचीहि शक्यता आहे. पाकिस्तानची ही विघटना सुकर करण्यासाठीं-देखील भाषावार प्रांतरचना तावडतोब होणें आवश्यक ठरतें—"

"म्हणजे तुम्हांला पुन्हा हिंदुस्थान अखंड होण्याची आशा वाटते?—"

"आशा कां म्हणून ? खात्रीच ! पण माझा हा अखंड हिंदुस्थान म्हणजे भिन्नधर्मी आणि भिन्नभाषी प्रदेशांना आणि समाजांना पूर्ण स्वायत्तता

देणाऱ्या समाजवादी संघराज्याचा अखंड हिंदुस्थान ! असा अनेक पृथगात्म राष्ट्रकाचे आणि समाजाचें समाजसत्ताक संघराज्य असलेला अखंड हिंदुस्थान जर आपण निर्माण करू शकलो, तर, मला वाटतें, आशिया खंडात तो आदर्श भारतीय राष्ट्रकुटुंब स्थापन करूं शकेल. हिंदुस्थान आजच्या जगातील कोणत्याहि स्पर्धिष्णु राष्ट्रगटात सामील होणार नाहीं, अशी जी भाषा आपले पुढारी मधून मधून बोलतात, ती अगदी समर्पक आहे. पण, ती भाषा जर खरी ठरावयाची असेल, तर हिंदुस्थानाची राज्यघटना आणि राजकीय धोरण हीं दोन्ही जास्तींत जास्त समावेशक, लवचिक पण सुदृढ आणि संस्कृतिप्रधान असावयाला हवींत—"

"या बाबतींत महाराष्ट्राला काय करता येण्यासारखे आहे ?—"

"महाराष्ट्राला पुष्कळ करता येण्यासारखे आहे. गांधीवधापासून महाराष्ट्राविषयीं एक प्रकारची प्रतिकूल भावना इतर प्रांतात आणि आपल्या राजकीय नेत्यातहि उत्पन्न झालेली असून, युरोपच्या स्वास्थ्यासाठीं जर्मनीचीं शकलें कायम ठेवण्याचा प्रयत्न जसा सध्या चालू आहे, त्याप्रमाणे हिंदुस्थानाच्या स्वास्थ्यासाठीं महाराष्ट्राचीहि आजची तुकडेवारी कायम ठेवावी, असे उद्गार अलीकडे केव्हा केव्हा जबाबदार व्यक्तींच्याहि तोंडून निघतात, असें माझ्या कानावर आलें आहे. आपल्याविषयीं अशी विपरीत भावना अन्यप्रांतीयांत आणि आपल्या नेत्यातहि निर्माण व्हावयाला कोणतीं ऐतिहासिक किंवा राजनैतिक कारणे घडलेलीं आहेत, याची शांत मनानें नीट छाननी करून, महाराष्ट्रानें जरूर तर आपल्या प्रकृतिधर्मातहि परिवर्तन घडवून आणावयाला हवें, असें मी म्हणेन. पण, त्याबरोबरच मी असेंहि म्हणतों कीं, कोणत्याहि राष्ट्रकाचा किंवा समाजाचा असा तेजोवध करणें कोणालाहि शक्य नाहीं. इटली, पोलंड आणि आयर्लंड यांच्या पुनरुत्थानाचीं उदाहरणें आपल्या डोळ्यापुढें आहेतच. तेव्हां, तीन शतकांपूर्वी महाराष्ट्रावर पाच मुस्लिम पादशाह्यांचें जुलमी वर्चस्व चालू असताहि त्या भयंकर आक्रमणांतून डोकें वर काढून ज्या महाराष्ट्रानें सर्व हिंदुस्थान स्वतंत्र करण्याचा प्रयत्न केला, त्याला असल्या कोणत्याहि कुटिल डावपेचाची पर्वा करण्याचे कारण नाहीं—"

" आपल्या या कल्पना आपण ग्रथरूपानें लोकांपुढें का ठेवीत नाहीं ?–"

अभयच्या या वक्तृत्वपूर्ण विवेचनावर मोहित झालेल्या एका तरुण कार्यकर्त्यानें त्याला विचारलें.

" कारण उघड आहे. मी राजकारणी नाहीं; वैज्ञानिक आहें—"

" पण पॅलेस्टाईनमधील यहुदी राष्ट्राचा निर्माता डॉ. विझमन् हाहि वैज्ञानिकच होता—"

त्या तरुणानें त्याला मध्येंच छेडलें.

तेव्हां अभय हंसत हंसत त्याला म्हणाला—

" तुम्ही म्हणतां तें खरें आहे. पण माझ्या ठिकाणीं विझमनची प्रतिभा आणि सामर्थ्य हीं दोन्ही नाहींत. माझ्या मर्यादा मी जाणून आहें—"

● ● ●

महाबळेश्वरच्या त्या मुक्कामात जी एक विलक्षण गोष्ट निरुपमाच्या निदर्शनाला आली, त्या गोष्टीमुळें तिच्या मनाला धक्का बसल्यासारखा झाला.

ती गोष्ट म्हणजे अनघा आणि उमाबाई यांच्यातील अबोला.

त्या अबोल्याचें कारण अनघाला विचारून पाहावें, असें कितीतरी वेळां तिच्या मनात आलें; पण तिला धीर झाला नाहीं.

अखेर, तिच्या मुक्कामाच्या शेवटल्या दिवशीं सायंकाळीं, त्या दोघी एकट्याच फिरावयाला गेल्या असतां, निरुपमानें तिला विचारलें—

" अक्का, तूं आपल्या आईशीं एकदासुद्धां बोलतांना माझ्या दृष्टीस पडली नाहींस, हें कसं ग ?"

तो तिचा प्रश्न ऐकतांच अनघाचा चेहरा एकदम लाल झाला. त्याबरोबर निरुपमा तिच्या अंगाला बिलगून उद्गारली—

" अक्का ग, माफ कर मला; मीं भलताच प्रश्न विचारला तुला !—"

" छे, छे ! अगदीं योग्य प्रश्न विचारलास तूं, ताई !—"

अनघानें अगदीं शांतपणानें उत्तर दिलें. नंतर कांहीं क्षण थांबून तिनें म्हटलें---

" आईचा माझ्यावरला राग हें एक शल्य आहे माझ्या जीवनातलं, निरू. मला मूल नाहीं म्हणून तिचा राग आहे माझ्यावर. तिला असं वाटतं, आपली ही कर्मकरंटी पोर माहेर आणि मासर या दोहोंच्याहि कुल-क्षयाला कारण झाली— "

बोलता बोलता अनघाच्या डोळ्यांत अश्रु आले.

" पण त्यांत तुझा काय दोष ग ?— "

" अग, दोष नाहीं आणि आहेहि. आमच्या लग्नाच्या वेळीं आईला मोठी आशा होती कीं, मला अनेक मुलं होतील आणि त्यांतला एक मुलगा आपण दत्तक घेऊं. पण झालं सगळं उलट ! त्यामुळं तिनं बोलणं सोडलं माझ्याशीं-- "

" छान ! शोभतं का ग हें आईच्या अंतःकरणाला ?— "

" तिला दोष देऊं नकोस तूं, ताई. मीं तिची जन्माची निराशा केली. मला तिचा तो माझ्याविषयींचा राग आणि उबग अगदीं स्वाभाविक वाटतो. कारण मीं अभागिनीनं साऱ्यांचीच निराशा केली. माझी आईच काय, पण माझ्या सासूबाईहि बोलत नाहींत माझ्याशीं. त्यामुळं डॉक्टरांनीं इथल्या जाणं सोडलं. निपुत्रिकेचं तोंड कोणालाच पाहावंसं वाटत नाहीं. तुला कल्पना नाहीं यायची माझ्या या दुःखाची, निरू ! माझा जन्म वाया गेला, माझं स्त्रीत्व विफल झालं, असं सारखं वाटत असतं माझ्या मनाला— "

अनघाच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले.

कांहीं वेळ त्या दोघीहि स्तब्ध होत्या.

नंतर निरुपमानें विचारलें---

" तुझ्या आईला किंवा सासूबाईंना तुला मूल न झाल्याबद्दल दुःख वाटणं अगदीं स्वाभाविक आहे. कारण त्या जुन्या काळातल्या आहेत. पण तुला कां वाईट वाटावं एवढं त्याबद्दल ?-- "

" का नये वाटूं ?-- "

" मग काय मूल होण्यासाठी तूं प्रेमविवाह केलास डॉक्टरांशीं ? आपण पुरुषावर जे प्रेम करतो ते काय प्रजोत्पादनासाठीं करतों का, अक्का ? प्रजोत्पादन हा एक आनुषंगिक गौण परिणाम आहे प्रणयक्रीडेचा. एकमेकावर अनुरक्त असलेल्या स्त्रीपुरुषाचं मीलन म्हणजे काही प्रजोत्पादनासाठीं घडवून आणलेलं पशूच मीलन नव्हे. स्त्रीपुरुष परस्परावर जे प्रेम करतात, त्या प्रेमाची तृप्ति आणि परिणति मीलनानं होते. प्रणयी युग्माचं मीलन म्हणजे क्रीडा आहे केवळ एक ! मूल न होण्याबद्दलचं तुझं दुःख मला अगदीं समंजस वाटत नाही, अक्का !-- "

" कारण, तूं अविवाहित आहेस, निरू ! विवाहित स्त्रीच्या हृदयाची कल्पना नाहीं तुला. आपण प्रेमविवाह संततीसाठी करीत नाहीं, हें अगदीं खरं; पण, प्रेमविवाह केल्यावर संतति होऊन स्त्रीपुरुषाच्या मीलनाला जी मधुर दृढता येते, प्रिया आणि प्रियकर याच्यामध्यें जो नवा आत्मबंध त्या अपत्याच्या रूपानं उत्पन्न होतो, तो लक्षात घेऊनच भवभूतीनं अपत्याला ' आनंदग्रंथि ' म्हटलय !-- "

" म्हटलं असेल ! पण आज तें खरं मानायला तुझ्यासारख्या हळव्या मनाच्या भावनाप्रधान स्त्रीशिवाय कोणीहि तयार होणार नाहीं, अक्का ! संतति हेंच ज्या वेळी विवाहाचं आणि संसाराचं ध्येय होतं, त्या काळात भवभूतीची ही कल्पना खरी असेल कदाचित्. पण आज संतति हें संकट वाटायला लागलं आहे तरुण विवाहित जोडप्याना. आणि, त्याला केवळ आर्थिक कारणं आहेत, असंहि समजण्याचं कारण नाहीं. आज संतति ही प्रणयाची परिपूर्ति किंवा संसाराच साफल्य समजलं जात नाही. उलट प्रणयक्रीडेच पर्यवसान प्रजोत्पादनात होऊ नये म्हणून दक्षता घेतली जाते कटाक्षान. उद्यां शास्त्रीय प्रगतीच्या जोरावर संभोगाशिवाय जर संतति उत्पन्न करण शक्य झालं, तर संभोग हा केवळ एक क्रीडेचा प्रकार होऊन बसेल; व स्त्रीचं पावित्र्य आणि लैंगिक नीति यांच्याविषयींच्या सगळ्या रूढ कल्पना बदलून जातील. संभोग आणि सृजन यांची जी सांगड आज

निसर्गानें घातलेली आहे, तिच्यामुळंच खरोखरी विवाह आणि संसार यात संततीला इतकं महत्त्व प्राप्त झालेलं आहे. ती सागड तुटल्यावर आणि संभोगाशिवाय कृत्रिम उपायांनीं संतति निर्माण करणं सुकर झाल्यावर विवाह आणि कुटुंबपद्धति या दोन्हीहि संस्थाना फारसा अर्थ उरणार नाही ! तूं अगदीं एखाद्या जुन्या काळातल्या स्त्रीसारखा विचार करतेस या सगळ्या गोष्टींचा, अक्का !—"

"मग तुझे नवे विचार काय आहेत ते तरी ऐकूं देत मला एकदां, निरू—"

"माझ्या विचारात कांहींहि नवीन किंवा अपूर्व नाहीं, अक्का. स्त्री-जीवनासंबंधीं तूं जें बोलतेस तें किती असमंजस आहे, हे तुझं तुलासुद्धा सहज कळून येईल विचारांतीं. तुझ्या म्हणण्याप्रमाणं संतति हेच जर प्रीतीचं आणि जीवनाचं एकमेव साफल्य असेल, तर जॉर्ज इलियट, मॅडम क्युरी, ॲनी बेझट, सिस्टर निवेदिता किंवा सरोजिनी नायडू याच्यासारख्या स्त्रियाचं जीवन विफल झालं असंच म्हणावं लागेल, नाहीं का ? आणि सगळ्या विचारी जगाच्या कौतुकाचा विषय होऊन बसलेलं वेब दंपत्याचं प्रेमहि वाया गेलं, असंच समजावं लागेल, नाहीं का ? बुद्धिमान् आणि बुद्धिनिष्ठ स्त्रीपुरुषाच्या प्रीतीला बौद्धिक साहचर्याची जोड मिळाल्यास त्याचं प्रणयजीवन हें मानवजातीच्या बुद्धिविकासाला कसं कारण होतं, त्याचा संसार हा कसा मूर्तिमंत बुद्धियोग होऊन बसतो, याचा वेब–दंपत्य हा आदर्श आहे खरोखरी. पण तुझ्यासारख्या स्त्रीच्या दृष्टीनं त्याचा तो कृतार्थ संसार, तो प्रीतिपूर्ण बुद्धियोग शुष्क ठरायचा एखादे वेळीं ! संसार आणि संतति याच्या व्यतिरिक्त स्त्रीचं जीवन सफल करायला इतर किती तरी गोष्टी, किती तरी साधनं आणि साध्यं उपलब्ध आहेत जगात; न् आज हजारों बुद्धिमान् स्त्रिया अविवाहित राहून ज्ञानाची उपासना किंवा लोकाची सेवा करून आपल्या आयुष्याचं सार्थक करीत आहेत. तूं इतकी विद्वान् असूनहि स्त्रीच्या जीवनाला अलीकडे प्राप्त झालेलें हें नवें अधिक कार्यक्षम, विशाल, उन्नत स्वरूप तुला दिसूं नये, हें नवल आहे खरोखरी—"

"त्याचा अर्थ एवढाच कीं, मी एक सामान्य संसारकरू स्त्री आहे अगदीं ! तूं जें हें स्त्रियाच्या इतर क्षेत्रांतल्या कर्तृत्वाविषयीं बोललीस, तें

माझ्यासारख्या सर्वसामान्य स्त्रियाना लागू होण्यासारखं नाहीं, निरू. त्याचं जीवनसाफल्य लग्न, संसार आणि संतति या त्रिपुटींतच साठविलेलें असतं; न् त्याच स्त्रिया खरोखरी मानव्याची परंपरा, संस्कृतीचं आणि संसाराचं सातत्य अखंड चालू ठेवतात. शिवाय मानसशास्त्राच्याहि दृष्टीनं या प्रश्नाकडे पाहिला हवं. स्त्रीप्रेमाचं साफल्य आपल्या प्रियकराला पुनर्जन्म देण्यात आहे. अत्यंत बुद्धिमान्, राजकारणात किंवा ज्ञानोपासनेंत निमग्न झालेल्या स्त्रियानासुद्धा जें एखादुसरं तरी मूल आपल्याला हवंसं वाटतं, ते खरोखरी या नैसर्गिक भावनेच्या आंतरिक ओढीमुळं. अनिल मेहतासारख्या भित्र्या पुरुषावरलं आपलं प्रेम व्यर्थ झाल्याबद्दल तुलासुद्धा जें इतकं दुःख वाटतं, तें कशामुळं? प्रणयाशिवाय स्त्रीच्या जीवनाला सफलता आणणारीं इतर अनेक साध्यं आहेत याची इतकी उत्कट जाणीव असतानासुद्धा त्याच्या आठवणीनं तुझ्या जिवाची जी इतकी तगमग होते, ती कशामुळं? तू थोडा विचार करून पाहा आपल्या मनाशीं, निरू. म्हणजे तुला कळून येईल कीं, तुझ्या न् माझ्या मनोवृत्तीत तूं समजतेस तसा काहीं फरक नाहीं—"

निरुपमा काहीं बोलली नाहीं.

तेव्हा अनघा काहीं क्षण थांबून नंतर म्हणाली—

"मी जेव्हा स्वतःच्या मनाशीं विचार करतें, तेव्हा माझा मलाच प्रश्न पडतो कीं, डॉक्टर आणि मी दोघेहि सारखींच शिकलेलीं असता त्याच्या आणि माझ्या वृत्तीत इतका फरक का असावा? त्याना संसार आणि संतति याच्याविषयीं आसक्ति नसावी न् माझं मन त्या बाबतींत इतकं आसक्त, इतकं अधू का असावं? ते आपल्या प्रयोगशाळेत काम करीत उभे असतात न् मी त्याना चहाची किंवा जेवणाची आठवण द्यायला त्यांच्यामागे येऊन उभी राहतें, तेव्हाहि त्याची ती ज्ञाननिष्ठा, ती समाधि पाहून माझ्या मनात येतं कीं, या त्याच्या ज्ञानमय जीवनाशीं मी समरस का होऊं शकत नाहीं? त्यांच्या या समाधीचा साक्षात्कार मला का होऊं नये! आणि, मग मला वाटतं कीं, स्त्री आणि पुरुष याच्या प्रकृतींत कांहीं तरी महत्त्वाचा, कांहीं तरी मूलभूत फरक आहे. स्त्री ही मृदुप्रकृति, तर पुरुष

हा उग्रप्रकृति आहे; स्त्री ही प्रीतिप्रधान, तर पुरुष हा बुद्धिप्रधान आहे. प्रीति आणि बुद्धि हीं सृजनाचीं दोन सर्वश्रेष्ठ साधनं निर्माण केलीं आहेत निसर्गानं. स्त्री ही प्रीतीच्या जोरावर सृजन करून जगाचं सातत्य कायम ठेवते; तर पुरुष हा बुद्धीच्या जोरावर सृजन करून जगाचा विकास घडवून आणतो स्त्री आणि पुरुष यांच्या प्रकृतीत हा जो मूलभूत फरक आहे, त्याच्यात जो हा नैसर्गिक भेद आणि जें हें स्वाभाविक द्वंद्व आहे, तो भेद आणि तें द्वंद्व यांच्यातील रुचिर संघर्षामुळें संसाराला रम्यता आली, जीवनाला वैचित्र्य आल आणि जगाचा इतका विकास झाला. प्रीति आणि बुद्धि यांच्या या द्वंद्वामुळे जीवनाला लाभलेली गति आणि गौरव पाहिला, म्हणजे मला केव्हा केव्हा असं वाटत की, मार्क्सवादातील विरोध-विकासाच्या तत्त्वापेक्षा आपल्या उपनिषदातलं द्वंद्वाचं तत्त्वच अधिक प्रभावी आहे. शास्त्रीय संशोधन यशस्वी होऊन संभोग आणि सृजन यांची सांगड केव्हां तुटेल तेव्हा तुटो; पण, मला मात्र असं वाटतं कीं, प्रणयक्रीडेच्या परम आनंदाची परिणति सृजनात होण्यात स्त्रीजन्म आणि स्त्रीप्रेम यांच जें साफल्य आहे, त्याची दिव्य माधुरी पुढें संभोगाशिवाय कृत्रिम उपायांनीं होणाऱ्या सृजनात राहणार नाही. द्वंद्वातून प्रगति आणि संतति हा मुळीं निसर्गाचा नियमच दिसतो. तो मोडून कृत्रिम उपायांनीं प्रगति आणि संतति साधण्यात माणसाच्या बुद्धीचा कदाचित् गौरव असला तरी प्रीतीचा आनंद मात्र खचित नाहीं— ”

“ अक्का, माफ कर मला मी मघाशी जें तुला एकदम बोललें त्याबद्दल. मीं काहीं तुझ्यासारखा खोल विचार केलेला नाहीं सगळ्या गोष्टींचा— ”

“ अग, माफ काय करायचं त्यात, निरू ? मलासुद्धां केव्हा केव्हा असं वाटतं कीं, बियाट्रिस वेबप्रमाणं आपल्याला सहकार्य का करता येऊं नये डॉक्टरांशीं त्यांच्या कामात ? म्हणूनच मी म्हटल मघाशी तुला कीं, मीं शिकलेली असलें, विद्वान् समजली जात असलें, तरी सामान्य स्त्री आहे खरोखरी; आणि, सामान्य संसारकरू स्त्रीला जसा आपला पति प्रिय असतो, मुलबाळं हवींशीं वाटतात, तशी वृत्ति आहे माझी बुद्धिमत्ता किंवा विद्वत्ता यांच्यापेक्षां स्त्रीत्व हेंच मुख्य आहे माझ्या जीवनात— ”

" पण स्त्रीची हीच स्वाभाविक वृत्ति आहे असं म्हणतेस ना तूं ?"—

" हो, मला तरी तसं वाटतं. प्रीति आणि वात्सल्य यानीं जिचं जीवन व्यापलेलं आणि सफल केलेलं आहे, तीच खरी स्त्री. आपल्या प्रियकराला जी पुनर्जन्म देऊं शकत नाहीं, त्या अभागिनीचं प्रणय-जीवन निष्फळ ठरल, असंच मी तरी म्हणेन. म्हणूनच आईचा आणि सासूबाईचा माझ्या-वरला राग मला अगदीं स्वाभाविक वाटतो. स्त्रीचं प्राथमिक जीवनकर्तव्य जी पार पाडूं शकली नाही, त्या माझ्यासारख्या निपुत्रिकेचं दर्शन त्याना दुःसह व्हावं, यात काय नवल ? तूं जर इथं आली नसतीस निरू, तर माझ्या जीवनातल हें शल्य कळलं नसत तुला कधा—"

• • •

जूनअखेर तीं दोघें महाबळेश्वराहून जीं परत आलीं, तीं अंजनीमध्यें फुग्याच्या कारखान्याजवळील आपल्या प्लॉटवर बांधलेल्या नव्या घरात राहा-वयाला गेली. त्या टुमदार घरात निरुपमानें त्याचा संसार अगोदरच थाटून ठेवला होता.

तें लहानसें घर अनघाला अनेक दृष्टींनीं आवडलें. मॉडेल मिल्स् रस्त्या-वरील त्याच्या जुन्या बंगल्याप्रमाणे या घराभोवतीं कोणत्याहि प्रकारची घाण किंवा वर्दळ नव्हती. त्याच्या भोंवतालचे वातावरण अगदीं स्वच्छ आणि प्रसन्न होते. तेथून धंतोली थोडी दूर पडत असे खरी; पण ती दूरता शांततेला पोषकच होती. तो प्लॉट अर्ध्या एकरापेक्षा थोडा जास्त होता; व पंधरा वर्षांपूर्वी तो विकत घेतल्यानंतर अभयच्या वडलानीं तेथें मोठी विहीर खणून सुंदर बगीचा लावला होता घराच्या तिन्ही बाजूना खुल्या ओवऱ्या काढलेल्या होत्या. त्या ओवऱ्याच्या प्रवेशद्वारावर कृष्णकमळ, चमेली आणि चित्राग याचे वेल चढविलेले असल्यामुळें त्याच्या पर्णभारानें मंडित केलेल्या त्या घराला निरुपमानें दिलेले 'पर्णकुटी' हे नांव खरोखरीच शोभत असे. त्याच्या चारी बाजूना आंबा, निंब, बूच, जाभूळ, शिरीष, बकुळ, अशोक, चांफा वगैरे लहानमोठीं झाडें लावलेली होतीं; व मुख्य प्रवेशद्वाराच्या दोहों

बाजूंना दोन गुरूचे वाळवृक्ष, वाऱ्याच्या झुळकेबरोबर विनम्र होत, पहारा देत खडे होते. ऊन आणि धूळ याचें निवारण करणारी त्या साऱ्या झाडाची शीतल, सुगंधी छाया डोळ्याना जितकी सुखकर वाटे, तितकेच समोर वर्धा रोड आणि खामला रोड याच्या रुदावत गेलेल्या त्रिकोणात असलेले संत्र्याचे गर्द हिरवे बगीचेहि मनाला आल्हाद देत. विहिरीवर मोट चाले, त्या वेळीं होणारा बैलाच्या गळ्यातील घंटाचा नाद किंवा मोटेतून कोसळणाऱ्या पाण्याचा खळाळ कानावर पडताच आपण खेड्याच्या निवात परिसरात आहोंत असा भास होई; तर तेथून पाऊण मैलावर असलेल्या इंपयार्डमधील आगगाड्याचा अहोरात्र चालणारा खडखडाट, रोज दुपारीं डोक्यावरून जाणाऱ्या विमानाची घरघर किंवा लष्करी लॉऱ्याचा बेफाम धडधडाट आपण शहरानजीक असल्याची जाणीव मनाला धसमुसळेपणानें करून देई.

त्या पर्णकुटींतून रात्रीचा देखावा तर अतिशयच रमणीय दिसत असे. चोहों दिशाना टेकल्यासारख्या वाटणाऱ्या विशाल नभोगोलावरील नक्षत्राचें नियत, नीरव परिभ्रमण जसे विश्वचक्राच्या अखंड, अनंत गतिशीलतेचे स्मरण करून देई, तशीच अंजनीच्या पुलावरल्या उंचच उंच विद्युद्दीपाचें प्रखर तेज मानवी मनाच्या दुर्दम, दुरत उद्यमशीलतेची आठवण देत असे. अवसेच्या रात्रीं तीं नक्षत्रे आणि ते दिवे आसमंतात् उजळून क्षितिजाला बिलगलेल्या अधाराची भयाणता द्विगुणित करीत; तर पुनवेच्या रात्रीं चंद्राच्या दिव्य प्रभेंत त्याचे तेज लुप्त होऊन क्षितिजाच्या निळ्या कडा त्या चंदेरी रसात बुडून जात असत. मृगाच्या पहिल्या अवखळ अपुऱ्या वर्षावाने तडकलेली तृषार्त भूमि सूर्यास्तानंतर थंड होत जाणाऱ्या वातावरणात जे उष्ण उसासे मधून मधून टाकी, त्याचा गंध मनाला पर्युत्सुक करीत असे; व नुकत्याच शिंपल्या गेलेल्या सत्र्याच्या बगीचातून खेळून आलेला गार वारा ती पर्युत्सुकता वाढवीत असे. चित्रमंदिरातील संगीताचे यंत्रानें दूर दूर फेकलेले सूर ज्या वेळीं वायुलहरींवर तरंगत त्या नगरसीमेपर्यंत येऊन पोंचत, त्या वेळीं त्या विविध सुराना अशी कांहां कोमल मंदता येत असे कीं, त्याच्या ओझरत्या स्पर्शानें मनाला तोंपर्यंत माहीत नसलेल्या मनातल्या अनेक अबोध भावना अचानक चाळवल्या जात.

त्यामुळें, रात्रीं दहा वाजता, अंधाराच्या निबिड आवरणात सर्व स्थिरचर गुरफटून गेल्यावर, एकमेकाना बिलगून, विश्रब्धपणानें गप्पा मारीत किंवा परस्पराच्या मूक सान्निध्याचा मधुर आस्वाद घेत, दूर दूर भटकणें त्या दोघाना फार आवडत असे.

किंबहुना तें स्थलातर म्हणजे त्यांच्या त्या अंतर्मुख, आत्मलीन, एकाकी आयुष्यातील जणूं मनोज्ञ मन्वंतरच ठरलें.

त्याच्या या नव्या घराचें बाह्य वातावरण जसें अगदीं भिन्न होतें, तसेंच अंतरंगहि अगदीं भिन्न होते.

साताऱ्याहून नागपुरास येताना जूनच्या दुसऱ्या आठवड्यांत अभयनें मुद्दाम काही दिवस मुंबईला राहून काचेचें, चिनी मातीचें, एव्हर सिल्व्हरचें आणि प्लास्टिकचें नाना प्रकारचें सुंदर संसारोपयोगी सामान खरेदी करून तें पुढे पाठवून दिले. त्याचप्रमाणे नागपूरच्या आपल्या एका बोहरी मित्राला त्याने खुर्च्या, टेबलें, तिपाया वगैरे काहीं वेताचें आणि कांहीं लांकडी असें सामान अगदीं नवीन धर्तीचें तयार करावयाला सागितलें होत. तीं दोघे नागपूरला येऊन पोंचण्यापूर्वींच हें सर्व सामान त्याच्या नव्या घरीं येऊन पडले होते; व निरुपमानें त्याची मांडणीहि अगदीं आकर्षक केली होती.

नागपूर मेलमधून उतरून त्या नव्या घरीं आल्यावर निरुपमानें जेव्हां त्या दोघाना चहा घेण्यासाठीं आतल्या खोलींत नेलें, तेव्हा तेथें मध्यभागीं असलेलें काचेचें ते लखलखीत, सुबक जेवण--टेबल, त्याच्या डाव्या बाजूला भिंतीजवळ उभा केलेला आरस्पानी स्टॅंड व त्यावर ठेवलेलीं कांचेचीं, एव्हर सिल्व्हरचीं आणि प्लास्टिकचीं सुंदर भांडीं पाहून अनघा हर्षभरानें उद्गारली,—

"हा थाट पाहिल्यावर आता कोण म्हणेल आपलं घर लुटलं गेलं होतं म्हणून !—"

"आणि कोणीं म्हणावं, अशी माझी इच्छाहि पण नाहीं. मीं तुला किती तरी वेळां सांगितलंय अनू, कीं आपल्या पंचागांत जसा केव्हां केव्हां

एखाद्या तिथीचा क्षय असतो ना, तसा १९४८ च्या कॅलेंडरमधल्या दोन फेब्रुवारीचा क्षय झाला असे समजून ती तारीख अगदीं विसरून गेलं पाहिजे आपण. आपल्या जुन्या घरात दोन पिढ्याचं जुन्या पद्धतीचं अवजड सामान होतं. तें सारं जाऊन त्याच्याऐवजीं हें नव्या पद्धतीचं अधिक उपयुक्त आणि अधिक सुंदर सामान आलं आपल्या या नव्या घरात, हा तरी एक फायदाच नाहीं का झाला आपला त्या प्रसंगामुळं ?—"

"पण आपलीं चादीचीं भाडीं किती सुंदर होतीं !—"

"असतील. पण तीं काहीं आपण कधीं वापरूं शकलों नाहीं निश्चिंत मनानं. सणासुदीला किंवा समारंभाला काय त्याचा उपयोग झाला असेल तेवढाच. जी वस्तु सदैव तिजोरींत किंवा बँकेंत राहणार, ती आपल्या मालकीची असली काय न् नसली काय सारखंच नाहीं का ? आपण ज्या वस्तु रोज वापरतों, उपयोगात आणतों आणि उपभोगतों, त्याच खरोखरी आपल्या मालकीच्या. तिजोरींत किंवा बँकेंत ठेवलेल्या वस्तूंची मालकी ही मानसिक आणि काल्पनिकच समजायला हवी. त्याच्यापासून प्रत्यक्ष सुख काय मिळत आपल्याला ? तिजोरींतल्या आणि बँकेंतल्या वस्तु आपल्या मालकीच्या आहेत या मानसिक समाधानावरच जर आयुष्य काढायचं असेल, तर मग ब्रिटिश म्युझियमहि आपल्या मालकीचा आहे असं मानायला काहीं हरकत नाहीं !—"

निरुपमानें टेबलावर आणून ठेवलेल्या प्लेटमधील अंड्याच्या गरम घिरड्यावर मिरपूड टाकीत अभयनें हंसत हंसत म्हटलें.

"तुमचं आपलं काहीं तरीच तर्कट ! हीं काचेचीं, एव्हर सिल्व्हरचीं आणि प्लास्टिकचीं भाडीं कितीहि सुंदर असलीं, तरी त्या चादीच्या भांड्यांची सर येईल का यांना ?—"

"येण्याची गरजच नाहीं मुळीं. कारण, तुझी ही तुलना मुळांतच चूक आहे, अनू. हीं भाडीं रोजच्या वापराचीं आहेत; तीं फक्त प्रदर्शनार्थ मधून मधून काढायचीं होतीं. हीं फुटलीं, हरवलीं, तरी फारसं वाईट वाटणार

नाहीं तुझ्या मनाला. पण, मला आठवतं, एकदा दिवाळींत श्रीखंड वाढायला काढलेला तो चांदीचा मोठा थोरला वाडगा नंतर जेव्हा कुठं सापडेना, तेव्हा पोलिसात वर्दी देण्यापर्यंत पाळी आणली होतीस तूं घाबरीघुबरी होऊन! तसला मनस्तापाचा प्रसंग यायचा नाहीं या नव्या भांड्याच्या बाबतींत कधीं. आणि संसारात मनस्तापाचे कमींत कमी प्रसंग येणं यापरतं दुसरं भाग्य कोणतं असूं शकेल ?—"

"मग जुन्या माणसांनीं तीन तीन पिढ्या पुरेल इतकी संपत्ति जी मिळविली न् साठवून ठेवली, ती व्यर्थच म्हणायची सगळी तुमच्या दृष्टीनं—"

"अगदीं उघड आहे. तूं मुंबईला पाह्यलं नाहीस का तीन-तीन, चार-चार खोल्यांच्या ब्लॉकमध्यें नवी सुशिक्षित जोडपी कसा टुमदार, सुटसुटीत संसार करतात तो? तोच खरा आधुनिक संसार. यांत्रिक निर्मितीच्या या काळात कोणत्याच प्रकारच्या वस्तूंचा वाजवीपेक्षा जास्त संग्रह करण्याची गरज नाहीं. पहिल्या महायुद्धापूर्वी मानवी जीवन संथ होतं. यांत्रिक संस्कृतीच्या विकासाला नुकतीच सुरुवात झालेली असल्यामुळं जीवनाला फारशी गति प्राप्त झाली नव्हती. त्यामुळं संसाराची शाश्वती गृहीत धरून सात पिढ्या टिकणारीं मजबूत, मोठालीं घरं बांधण्यात आणि तीन पिढ्या टिकणारं भक्कम विपुल सामान साठवण्यात लोक धन्यता मानीत. आज दुसऱ्या महायुद्धा नंतर तो शाश्वतीचा काळ उरलेला नाहीं. पहिल्या महायुद्धानं तत्पूर्वीच्या स्थिरजीवी, स्थितिप्रिय, मंदगामी जगाला काहीं शतकं पुढं फरफटीत ओढीत आणलं, तर या दुसऱ्या महायुद्धानं जणूं नवा कल्पारंभच घडवून आणला! त्यानं निर्माण केलेल्या या अणुयुगात जीवनाच्या गतीला इतका विलक्षण वेग आलेला आहे कीं, कोणत्याच प्रकारची शाश्वती आता संसारांत उरलेली नाहीं. आपल्या संतकवींनीं "अशाश्वत संग्रह कोण करी?" असा जो प्रश्न निवृत्तीच्या भावनेनं जुन्या जगाला केला होता, तोच प्रश्न आतां प्रवृत्तीच्या भावनेनं नव्या जगाला वैज्ञानिकांनीं करण्याचा प्रसंग आला आहे! आपण मुंबईस असतांना मरीन ड्राइव्हवर फिरायला गेलों,

म्हणजे समुद्रकाठच्या त्या साचेबंद खुराडेवजा विद्रूप इमारती, तो दिव्याचा डोळ्याना त्रस्त करणारा भडक झगझगाट, मलबार हिलच्या सौंदर्याला बट्टा लावणाऱ्या त्या वेडयाविद्या रंगीबेरंगी जाहिराती, पादचाऱ्यांना पावलों-पावलीं अडविणारी ती मोटारींची रीघ आणि चौपाटीच्या घाणेरडया वाळवंटावर मुंग्यासारखीं एकमेकाना खेटून चालणारीं तीं हजारों माणसं पाहून माझ्या मनांत केव्हा केव्हा येई कीं, छप्पन्न कोटि यादवांनीं गजबज-लेली श्रीकृष्णाची सोन्याची द्वारका जशी समुद्रात बुडाली किंवा त्रिपुरासुराची ऐश्वर्यसंपन्न नगरें जशीं शंकरानें जाळून भस्म करून टाकलीं, तशी या मुंबईची पुढल्या महायुद्धात, हिरोशिमा आणि नागासाकी याच्याप्रमाणं, अण्वस्त्राच्या तडाख्यात सापडून राखरागोळी होणार नाहीं कशावरून ?—"

"म्हणजे तुमच्या या अणुयुगात लोकांनीं शहरं वसवूं नयेत, घरं बांधूं नयेत, संसार करूं नये, असं म्हणायचंय का तुम्हाला ?—"

"छे, छे ! मला असं काहींच म्हणायचं नाहीं. मला फक्त एवढंच म्हणायचंय कीं, जीवन आणि संसार याच्याविषयींच्या सगळ्या जुन्या कल्पना या अणुयुगात आपल्याला टाकून दिल्या पाहिजेत. तीन पिढ्याचा किंवा सात पिढ्याचा जो विचार करायचा, तो सर्व समाजासाठीं केला पाहिजे; आपल्या मुलाबाळांपुरता किंवा कुटुंबापुरता करणं अविचाराचं ठरेल यापुढें. अनासक्ति हा या अणुयुगाचा धर्म झाला पाहिजे. त्या धर्माचं आचरण करणारे निष्काम कर्मयोगीच जगाची प्रगति करूं शकतील; जग हें नश्वर आहे, मिथ्या आहे, माया आहे, हें आपल्या जुन्या वेदान्त्यानीं जें सांगितलंय, त्यापेक्षा अगदीं निराळ्या वैज्ञानिक अर्थानं तें तसं आहे हें ओळखून आपण जगाविषयीं विचार केला पाहिजे आणि तदनुसार आपल्या जीवनाची घडण बनवली पाहिजे. आपला जुना वेदान्त मीं फारसा वाचलेला नाहीं; पण आम्हा वैज्ञानिकाचा नवा वेदान्त मात्र असा आहे—"

"या वेदांताचा काथ्याकूट करण्यांत चहा निवून चालला अक्का, तुझा—"

निरुपमानें अनघाच्या समोरचा भरलेला कप बाजूला ठेवला; व दुसऱ्या कपात चहा ओतावयाला सुरुवात केली.

तेव्हां त्या कपावर हात ठेवून अनघा तिला म्हणाली,—

" नको ग ! तो चालेल मला निवलेला चहा, निरू. आम्हीं सकाळीं बडनेऱ्याला चहा घेतलाय भरपूर एकदां—"

" अग, पण मी हा ताजा दोसा केलाय मुद्दाम तुझ्यासाठीं, त्याला तरी हात लाव. तोसुद्धा निवून गेला असेल बघ—"

" मला दोसा नाहीं वाढलात तुम्हीं, निरुताई ?—"

अभयनें आपल्यापुढील अंडयाच्या धिरडयाची रिकामी प्लेट बाजूला सारून हंसत हंसत विचारलें.

" तुमच्यासमोर धिरडं नाहीं का आणून ठेवलं अंडयाचं तिनं आंत आल्याबरोबर ? तरी आणखी दोसा हवाय का तुम्हाला ? मग जेवणार काय तुम्ही दुपारीं ?—"

" दुपारचं दुपारीं पाहूं ! आतां जी ताजी खमंग वस्तु मुद्दाम तयार केली आहे निरुताईनीं, ती तर बघूं या कशी झाली आहे ती—"

" मी आणतेंच बरं का तुमच्यासाठीं ताजा गरम दोसा—"

निरुपमानें किंचित् ओशाळून त्याला म्हटलें आणि ती स्वयंपाकघरात जाण्यासाठीं उठली.

" तुम्ही वेदाताच्या कितीहि गप्पा मारल्यात, तरी जिभेवर अगदीं ताबा नाहीं तुमचा—"

" कारण, आमचा वेदात भौतिक आहे, वास्तविक आहे; आध्यात्मिक आणि काल्पनिक नाहीं. जुन्या पिढींतले धार्मिक लोक तोंडानं संसार असार असल्याच्या गप्पा मारतील; पण संसाराविषयींची त्यांची आसक्ति मरणाच्या क्षणींसुद्धा सुटायची नाहीं. उलट, आम्ही संसार हा सत्य मानतों; पण त्याच्याविषयीं वेडगळ आसक्ति मात्र आम्हाला नाहीं. आमचा वेदांत हा गृहीत कल्पनांच्या ब्रह्मघोटाळ्यांतून पैदा झालेला अंधश्रद्धेचा मृत वेदांत नाहीं; तर वास्तवाच्या कठोर साक्षात्कारांतून उत्स्फूर्त झालेला जिवंत, जागृत वेदांत आहे—"

" मग जवळ असलेले सगळे पैसे ख़र्च करून हें नवं घर तरी कशाला बांधलंत तुम्हीं ? न् मुंबईहून इतकं सामान, इतकीं पुस्तकं न् लॅबोरेटरीसाठीं इतकीं उपकरणं तरी कशाला खरेदी करून आणलींत तुम्ही ?—"

" कशाला खरेदी केलीं ? जोंपर्यंत आपण दोघं जिवंत आहोंत, तोंपर्यंत आपल्याला दोघाना सुखानं राहातां यावं आणि उत्साहानं काम करता यावं, म्हणून केलीं. मला पुष्कळ दिवस जगायचंय, पुष्कळ काम करायचय आणि तुलाहि शक्य तितक्या सुखात ठेवायचंय माझ्या सुखासाठीं ! म्हणून हें नवं घर न् हा नवा संसार आहे—"

" फक्त आपण दोघं तेवढीं या नव्या घरात न् नव्या संसारात जुनी !–"

अनघानें हंसून म्हटले.

तोंच निरुपमानें दोश्याची प्लेट त्याच्यापुढें ठेवली.

त्याचा एक तुकडा कांद्याच्या चकतीसह तोंडात टाकून तो म्हणाला—

" नाहीं. आपणहि दोघं नवीं आहोंत, अनू ! आपलीं शरीरं जुनीं असतील; पण गेल्या वर्षीं ज्या प्रकारचं आपलं मन होतं, त्या प्रकारचं तें आज आहे असं आपण खात्रीनं म्हणूं शकणार नाहीं. दोन फेब्रुवारीच्या दिव्यातून आपलं मन जें न खचता, न पिचता ईर्ष्येनं बाहेर पडलं, ते नवं अधिक तेजस्वी, अधिक निर्भय रूप घेऊन बाहेर पडलेलं आहे जुन्या संस्कारांचीं आपल्या मनावर चढलेलीं पुटं सगळीं पुरतीं निघून गेलेलीं नसल्यामुळं आपल्यात जो हा बदल झाला आहे न् जो हा नवीनपणा आला आहे, त्याचा केव्हा केव्हा विसर पडतो आपल्याला. पण आपलीं मनं आता पूर्वींचीं राहिलेलीं नाहींत, हें निश्चित तुला आठवतं, आपलं लग्न झाल्यावर मी जेव्हा एकदां गंमतीनं म्हटलं होतं आपल्या जुन्या घराविषयीं तें नागपूर विद्यापीठाला देऊन टाकीन म्हणून, तेव्हा ती कल्पना आवडली नव्हती तुला. पण, यंदां महाबळेश्वरला असताना आपल्या लग्नाच्या गेल्या वाढदिवशीं जेव्हा मीं आपली सर्व मिळकत विद्यापीठाला देऊन टाकण्याचा माझा संकल्प तुला सांगितला, तेव्हा तूं संमति दिलीस तत्क्षणींच—"

"खरं. पण त्याचं कारण माझं मन बदललं हे मात्र नव्हे. दहा वर्षांपूर्वी जेव्हा तुम्हीं आपलं घर विद्यापीठाला देऊन टाकण्याची कल्पना मजजवळ बोलून दाखवलीत, तेव्हा आपल्याला मुलं होण्याची आशा होती. आता कसलीच आशा उरलेली नाहीं, म्हणून मीं तुमच्या त्या संकल्पाला संमति दिली. तुमचा त्याग हा निरुपाधिक, निर्हेतुक असेल; पण माझा त्याग मात्र निराशेच्या पोटीं निपजलेला आहे, अभय !—"

तें वाक्य उच्चारतांना तिचे डोळे भरून आले.

तेव्हा इतका वेळ त्या दोघाचा संवाद ऐकत असलेली निरुपमा तिला म्हणाली,—

"पण अक्का, आता तूं तो चहा संपव एकदां न् सगळं घर माझ्याबरोबर हिंडून पाहा—"

त्याबरोबर कपातला उरलेला चहा एका घोटात संपवून उठता उठतां अनघा म्हणाली—

"काय पाह्यचंय ? तूं अगदीं कलापूर्ण मांडणी केली असशील सगळ्या वस्तूंची. पण तुझा स्वतःचा संसार तूं केव्हा मांडणार, ग निरू ?—"

"त्याचा संसार आपणच मांडून देऊं, अनू. माझ्या मनात एक कल्पना आहे—"

"या वेळीं आपल्यापुढं काहीं माझा संसार मांडायचा प्रश्न नाहीं, डॉक्टर. मीं लावलेली व्यवस्था तुम्हाला दोघाना कितपत सोईची वाटते हें प्रथम पाहूं या—"

निरुपमानें तटकन् त्यानें सुरू केलेला तिच्या लग्नाचा तो विषय तोडून टाकला; व आपण सगळें घर किती व्यवस्थित लावलें आहे, हें त्या दोघाना सर्वत्र हिंडून दाखविलें.

त्या दोघांना घेऊन मधल्या बैठकीच्या दिवाणखान्यात आल्यावर तिनें बटन दाबून नलिका–दीपाचा (Tube-light) पारवा प्रकाश तेथल्या

सुंदर सामानावर पाडला. त्या प्रकाशात दिवाणखान्याच्या चार कोपऱ्यांत निळ्या उंच लाकडी स्टँडवर ठेवलेले महावीर, बुद्ध, ख्रिस्त आणि गांधी यांचे पांढरे शुभ्र पुतळे पाहून अभय उद्गारला—

" अनू, तूं हे पुतळे मुंबईहून आणताना केलेली एक चूक आतां लक्षांत आली माझ्या—"

" कोणती चूक ?—"

" या चार पुतळ्याच्या जोडीला तूं स्टालिन किंवा निदान लेनिन यांचा तरी पुतळा आणायला हवा होतास—"

" आशिया खंडातल्या चार धर्मपुरुषाचे पुतळे आहेत हे. स्टालिन किंवा लेनिन हे कितीहि थोर किंवा पराक्रमी असले, तरी धर्मपुरुष नाहींत—"

" मी त्या अर्थानं नाहीं बोललों. गांधींचा हा पुतळा पाहिल्यावर माझ्या मनांत आलं, आपल्या जुन्या घरात जर हा पुतळा असता, तर कदाचित् गांधीभक्ताच्या तावडींतून घर बचावलं असतं त्या वेळीं आपलं ! बिचाऱ्या गांधीजींचं राजकारण त्याच्याबरोबरच संपलं. आता यापुढला काळ कम्युनिस्टाच्या राजकारणाचा आहे. तेव्हा, लेनिन किंवा स्टालिन यापैकीं कोणा तरी एकाचा पुतळा जर आपल्या घरात असला, तर पुढल्या एखाद्या उत्पातात त्याच्याकडे बोट दाखवून बचाव करून घेता येईल आपला ! त्या दृष्टीनं हे चारी पुतळे निरुपयोगी आहेत—"

" असूं देत असले तर ! मीं माझ्या भावनेसाठीं आणले आहेत ते—"

" पण—आतां ही थट्टा नव्हे बरं का ! —मला अगदीं आवडत नाहीं ही मूर्तिपूजा, अनू ! आणि त्यांतून दिवाणखान्यांत हें प्रदर्शन कशाला ?—"

" आपण एक गोष्ट विसरलात, डॉक्टरसाहेब !—हें घर माझं आहे. तेव्हां मला वाटेल ती वस्तु वाटेल त्या ठिकाणीं ठेवीन मी इथं—"

अनघा हंसत हंसत म्हणाली.

" मग काहीं म्हणणं नाहीं माझं ! आम्ही शब्द परत घेतों आपले—"

" शब्द परत घ्यायची गरज नाहीं. उद्या काहीं हे पुतळे दिसायचे नाहींत आपल्याला इथं. मी ते माझ्या बैठकीच्या खोलींत ठेवीन. मग तर झालं ना ? या घरात एक बडे वैज्ञानिक राहतात, हे विसरूनच गेलें होतें मी खरोखरी—"

अनघानें त्याच्या खांद्यावर हात ठेवून हंसत हंसत म्हटलें. नंतर ती निरुपमाकडे पाहून त्याला म्हणाली,—

" या दिवाणखान्याची सजावट बघितल्यावर माझ्या मनात अगदीं निराळीच कल्पना आली आज—"

" कोणती कल्पना ?—"

" माझ्या मनात असं आलं कीं, निरुपमाचा जर असा सुंदर संसार आपण थाटून दिला, तरच तिचं हें ऋण आपल्या हातून फिटलं असं म्हणता येईल—"

" काहीं ऋणाचा भार जन्मभर वाहण्यांतच मजा असते, अनू. याचं ऋण त्या कोटींतलं आहे. तें फेडण्याची कल्पनाच कधीं येत नाहीं माझ्या मनात. पण याचा संसार आपण थाटून दिला पाहिजे असं जें तूं म्हणतेस, तें माझ्याहि मनात आहे—"

• • •

पण निरुपमाचा संसार थाटून देण्याचा त्या दोघांचा प्रयत्न यशस्वी झाला नाहीं.

आणि, त्या प्रयत्नांत तिच्या मनोवृत्तीच्या पूर्वी कधीं न दिसलेल्या ज्या छटा अनघाच्या प्रथमच प्रत्ययाला आल्या, त्या पाहून तिला अतिशयच आश्चर्य वाटलें.

कॉलेज सुरू झाल्यावर अभयनें आपले दोघे नवीन सहकारी डॉ. पांडे आणि डॉ. संजीवराव यांना मुद्दाम आपल्या घरीं चहाला बोलावून निरुप-

माशीं त्याचा परिचय करून दिला. त्या तिघाची एकमेकाशीं ओळख करून देण्यात त्याचा जो उद्देश होता, तो मात्र त्यानें त्याच्यापैकीं कोणालाच सागितला नाहीं. फक्त त्यानंतर जेवणाच्या वेळी तो अनघाला म्हणाला,—

" तूं निरुपमाला लवकर विचारून घे त्या दोघापैकी कोण तिला अधिक पसंत वाटतो तें—"

" पण त्याना ती पसंत आहे का ? ते दोघे युरोपात जाऊन आलेले आहेत. तिच्या पसंतीपेक्षा त्याच्या पसंतीला जास्त महत्त्व आहे असं वाटतं मला—"

" खरं आहे तुझं म्हणणं. पण, डॉ. पाडे हा माझा विद्यार्थी आहे, अनू. तो कॉलेजात असतानाच त्याचं लग्न झालं होतं. पण एक मूल होऊन बायको वारली त्याची. त्यानतर तो विलायतेला गेला. निरुपमानं जर त्याला पसंत केलं, तर तो आनंदानं लग्न करील तिच्याशी. तो माझ्या शब्दाबाहेर जायचा नाहीं—"

" आणि त्याच्या पहिल्या बायकोचं मूल ?—"

" ती मुलगी बिचारी काय आड येणार आहे त्याच्या संसाराच्या ? ती आज ना उद्या लग्न होऊन दुसरीकडे जाणार—"

" तें खरं. पण त्याच्या पहिल्या लग्नाची घडोघडी आठवण देणारं तें चालतं बोलतं स्मारक राहील ना मूर्तिमंत निरूच्या डोळ्यापुढं सदोदित ! अशा प्रकारचा, एक मूल असलेला बिजवर तिला पसंत पडतो की नाहीं, कोण जाणे !—"

" पण तूंच कशाला आधीं शंका काढतेस या ? तो बिजवर असला, तर ती पंचविशी उलटलेली प्रौढ कुमारिका आहे. त्याच्या न् तिच्या वयात फार तर पाच-सहा वर्षांचं अंतर असेल. तो पसंत नच पडला, तर संजीव-रावासाठीं प्रयत्न करूं आपण—"

" त्याला काय पसंत पडणार आहे ती ? तो स्वतः इतका देखणा आहे, कीं, मला नाहीं वाटत तो तिच्याशीं लग्न करायला तयार होईल म्हणून !

शिवाय तो मंगलुरी आणि ही महाराष्ट्रीय. ‘ कानडीनें केला मराठा भ्रतार ’ अशी अवस्था व्हायची तिची—”

“ अग, गुजराती माणसापेक्षा का मंगलुरी अधिक परका वाटणार आहे तिला ? त्याला मराठी छान समजतं. त्याची ती डॉक्टर मावशी गेलीं वीस वर्षें नागपुरात काम करीत असल्यामुळं, तो जरी बंगलोरहून आलेला असला, तरी नागपूरच्या वातावरणाशीं समरस होऊं शकेल—”

“ नागपूरच्या वातावरणाशीं समरस होण्याचा प्रश्न नाहीं. भाषा, विचार, राहणी, परिस्थितीचा फरक वगैरे सगळ्याच गोष्टी जाणवतात अशा प्रकारच्या आंतरप्रांतीय लग्नात—”

“ तें कबूल आहे मला; पण तसा विशेष जाणवण्यासारखा फरक नाहीं त्या दोघात, अनू ! निरनिराळ्या प्रांतातल्या लोकांत लग्नं होऊं नयेत असं म्हणायचंय का तुला ?—”

“ छे, छे ! असं म्हणणं नाहीं माझं. उलट, आंतरजातीय आणि आंतरप्रांतीय विवाहामुळं आपला भारतीय समाज अधिक एकात्म, अधिक एकजीव होईल असंच मलाहि वाटतं. पण, लग्न ही जितकी सामाजिक बाब आहे, त्याहिपेक्षा जास्त ती वैयक्तिक बाब आहे, असं समजतें मी. केवळ सामाजिक सुधारणा किंवा उपयुक्तता पाहून भागणार नाहीं त्या बाबतींत. वैयक्तिक आवडनिवड हीच मुख्य मानायला हवी लग्न ठरवतांना—”

“ म्हणूनच माझं असं म्हणणं आहे कीं, तूं आपलीं मतं निष्कारण सांगूं नकोस तिला आधीं. तिच्या मनात काय आहे, तें समजावून घे प्रथम. तिचा कल ज्या कोणाकडे झुकत असेल, त्याच्यासाठीं प्रयत्न करूं नंतर आपण. पण, डॉ. पाडे हा जर तिला पसंत पडला, तर फार बरं वाटेल मला. तो जितका बुद्धिमान्, तितकाच सालस न् एकमार्गी आहे—”

“ पण, ती अनेकमार्गी आहे, हें विसरूं नका तुम्ही ! तथापि मी विचारून पाहतें तिला—”

दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं त्या दोघी भगिनीमंडळांतून परत येत असतां अनघानें निरुपमाला विचारलें,—

"तुला कसे काय वाटले ग, कालचे ते दोघे डॉक्टर ?--"

"चागले वाटले. पण तो संजीवराव जास्त देखणा न् तरतरीत आहे, नाही ?—"

"हो. पण मला पाडे जास्त आवडला—"

"का ?--"

"फार सालस वाटला मला तो—"

"पण सालसपणा हा गुण नाहीं अक्का, सध्याच्या जगात—"

"मग काय चंटपणा हा गुण आहे का ?—"

"हो—"

निरुपमा मिस्किलपणानें हंसत हंसत म्हणाली; व अनघाचा हात आपल्या हातात घेऊन तिनें पुढें म्हटले—

"तुम्ही ज्या काळात शिकलात, प्रेमविवाह केलात न् संसार थाटलात, तो काळ वेगळा होता, अक्का; न् आजचा काळ वेगळा आहे अगदीं—"

"तें मलाहि समजतं, निरू. पण, काळ कितीहि बदलला असला, तरी जीवनाचीं जीं मूल्यं न् ज्या निष्ठा शाश्वत समजल्या जातात, तीं मूल्यं न् त्या निष्ठा काहीं बदलत नाहींत कधीं. समुद्र, पर्वत न् नद्या हीं जशीं गतिशील जीवनांत असलेल्या मूलभूत स्थैर्याची साक्ष देत आपआपल्या ठिकाणीं हजारों वर्षे कायम आहेत, तसंच काहीं मूलभूत जीवनमूल्यांचंहि आहे—"

"हेंहि खरं नाहीं तुझं म्हणणं, अक्का. दहा हजार वर्षांपूर्वी जिथं ... होता, तिथं आज कदाचित् वाळवंट असेल; न् जिथं पर्वत होता, तिथं आज कदाचित् समुद्र असेल. जीवनाचींहि शाश्वत अशीं मूल्यं कोणतींच नाहींत. जीवन जसं गतिशील आणि सापेक्ष, तशींच त्याचीं सारीं मूल्यंहि! पातिव्रत्य, शाकाहार, जातिभेद, अस्पृश्यता वगैरेंबद्दलचीं गेल्या शंभर वर्षांत बदललेलीं आपलीं मतं जीवनाचीं मूल्यं किती अस्थिर आहेत, याची साक्ष देतात !— "

" जीवनमूल्यासंबंधींच्या तुझ्या या कल्पना मुळातच चूक आहेत, निरू. शाश्वत जीवनमूल्य आणि कालमानानुसारें बदलणारी 'समाज-नीति यांचा घोटाळा करते आहेस तूं. पण हा भलता वाद आता कशाला? मग तो पाडे तुला नापसंत आहे असं समजायचं का ?— "

" कोणत्या दृष्टीनं नापसंत ?— "

" लग्नाच्या—— "

अनघाच्या त्या सरळ उत्तरानें निरुपमा क्षणभर गोंधळली. पण लगेच तिनें स्वतःला सावरून तिला म्हटलें——

" लग्नाच्या दृष्टीनं त्यांच्यासंबंधीं विचार करायचा झाला, तर पुष्कळच गोष्टी पाहाव्या लागतील—— "

" त्या कोणत्या तें स्पष्ट साग— "

" मी आता जे लग्न करणार, तें पैसा, दर्जा आणि रूप पाहून करणार. त्यात भावनेचा भाग फारसा नाहीं; सोईचा न् सुखाचा आहे. त्या दृष्टीनं पाडे काहीं वाईट नाहींत. पण संजीवरावाविषयीं विचार नाहीं केलास तूं या दृष्टीनं ?—— "

" तोहि विचार आहेच. पण, पाडे डॉक्टराच्या आटोक्यातले आहेत, तसं संजीवरावाचं नाहीं—— "

" पण पाड्याची माहिती हवी मला— "

" पहिली गोष्ट म्हणजे ते बिजवर आहेत— "

" पण पहिल्या लग्नाचं मूल आहे का त्याना काहीं ?—— "

" एक मुलगी आहे—— "

" आणखी इतर कोण मंडळी आहेत घरीं ?

" तसं संयुक्त कुटुंबच आहे त्यांचं. शहरांत मोठा थोरला वाडा आहे. आई-वडील आहेत, भाऊ-भावजयी आहेत— "

" मग मी कितवी सून होईन ग त्याच्या वडलाची त्याच्याशीं लग्न केलं तर ?— "

" बहुधा तिसरी. मला वाटतं, दोन थोरले भाऊ आहेत त्याना— "

" मग मला लग्न करणं शक्य नाहीं त्याच्याशीं — "

" कां ? तिसरी सून होण्यात फार कमीपणा आहे का ?— "

" छे, छे ! मला मुळीं सूनच होण्याची इच्छा नाहीं कुणाची; मी फक्त पत्नी व्हायला तयार आहे. त्याव्यतिरिक्त दुसरं कोणतंहि नातं नको आहे मला— "

" पण, संसारात एकच नातं कसं शक्य आहे, निरू ?— "

" का ? तुझंच उदाहरण घे. तूं फक्त डॉक्टराची पत्नी आहेस. दुसऱ्या कोणत्या नात्याचा जंजाळ आहे तुझ्या मागं ?— "

" का ? मी सूनहि आहे कीं— " .

" असशील, पण फक्त नावाला. सासू-सासरे इथं्ला आणि तुम्ही नवराबायको नागपूरला. तुमच्याप्रमाणं वागायची जर पाडयाची तयारी असेल, तर मी लग्न करायला कबूल आहे त्याच्याशी. पण पत्नीशिवाय दुसऱ्या कोणत्याहि नात्याचा पाश मी लावून घेणार नाहीं माझ्यामागं—"

" ते कसं शक्य आहे ग ?—"

" का नाहीं शक्य ? आमचं लग्न झाल्यावर त्यानी धंतोलीवर वेगळं बिऱ्हाड करावं. म्हणजे संयुक्त कुटुंबाच्या कोंडीत राहण्याचा प्रसंग येणार नाहीं माझ्यावर— "

"प्रसंग कसला आला आहे ग त्यात ?—"

" तुला काय कल्पना आहे त्याची, अक्का ! लग्न झाल्या दिवसापासून राजाराणीसारखीं राहत आहात तुम्हीं दोघं एकटीं ! तुला काय कल्पना असणार आहे संयुक्त कुटुंबातल्या कोंडमाऱ्याची ? संयुक्त कुटुबांत सून म्हणून राह्यचं म्हणजे स्वतःच्या सगळ्या आवडी-निवडी, आशा—आकांक्षा

वासना-कामना चिरडून, मारून टाकून, त्या कुटुंबाची जी काय एक परंपरा चालत आलेली असेल, त्या परंपरेशीं समरस होऊन राह्यचं !—थोडक्यात, स्वतःचं अस्तित्व, व्यक्तित्व, अस्मिता स्वतःच्या हातानीं मारून टाकायची कुटुंबाच्या व्यापक कल्याणासाठीं. माझी मुळींच तयारी नाहीं अशा प्रकारं आपली आत्महत्या करून घ्यायला !—"

"मग काय तुझ्यासाठीं स्वतःचे आईबाप, स्वतःचं कुटुंब सोडावं म्हणतेस त्यांनीं ? —"

"हो. समर्थांनी म्हटलंच आहे—' 'देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगाच्या तुटी ।' अमूर्त, अदृश्य, अज्ञेय देवाच्या सख्यत्वासाठीं जर जिवलगाना तोडायचे, तर इथं तर मूर्तिमंत जन्मसखीशीं तादात्म्य होण्याचा प्रश्न आहे !—"

निरुपमा हंसत हंसत उद्गारली. पण दुसऱ्याच क्षणीं तिचा चेहरा गंभीर झाला आणि ती म्हणाली—

"संयुक्त कुटुंबाचा संसार हा माझा संसार होणार नाहीं, अक्का ! सर्वांचा जो काय सामायिक संसार असेल, त्यातच आम्हीं दोघं ! ही स्थिति पत्करायला तयार नाहीं मी. मला संसार हवा, तो सर्वस्वीं माझा हवा; न् त्या संसारात तिसरं कोणीहि नको मला. स्त्री जशी पुरुषासाठीं आपलं सगळं कुटुंब सोडते, तसं पुरुषानंहि सोडलं पाहिजे स्त्रीसाठी आपलं सगळं कुटुंब ! जो पुरुष माझ्यासाठीं स्वतःचं सगळं कुटुंब सोडायला तयार होईल, त्याच्याशींच लग्न करीन मी. माझं घर ही त्याच्या गोतावळ्याची धर्मशाळा नाहीं होतां कामा !—"

"मग त्याची पहिली मुलगीसुद्धा चालणार नाहीं तुला तुमच्या संसारात आलेली !—"

"आली नाहीं, तर उत्तमच. पण, आलीच, तर निभावून घेईन मी तिला—"

'आणखी कोणत्या अटी आहेत तुझ्या, बाई ?—"

" आता आणखी अटी त्या काय सांगणार ? पण एक गोष्ट मात्र स्पष्ट आहे; न् ती त्यानीं लक्षांत घेतली पाहिजे. ती गोष्ट ही कीं, आमचं लग्न आता प्रौढ वयात व्हायच असल्यामुळं, आमच धोरण एकमेकाना सांभाळून घेण्याचं असलं पाहिजे. आम्हीं दोघंहि भिन्न परिस्थितींत वाढलेलों आहोंत; भिन्न शिक्षण घेतलेलं आहे; न् आजपर्यंतचा जीवनाचाहि आमचा अनुभव अगदीं भिन्न आहे. या सगळ्या भिन्नतेतून साधर्म्य उत्पन्न करावं लागणार आहे आम्हाला लग्नानंतर ! आमच्यापैकीं कोणी यापुढं दुसऱ्यात बदल करूं शकेल, कोणी दुसऱ्यावर कांहीं परिणाम करूं शकेल, अशी आशा मला तरी वाटत नाहीं. अशा प्रकारच्या सगळ्या भिन्नतेंतूनहि प्रीतीच्या प्रभावानं तादात्म्य उत्पन्न होऊं शकतं प्रौढ स्त्रीपुरुषात. पण हा काहीं प्रीतिविवाह नाहीं; हा आहे सुखविवाह. तेव्हा, एकमेकाना जास्तींत जास्त सुख देण्याच, एकमेकाची जास्तींत जास्त सोय बघण्याचं धोरण असेल, तरच यशस्वी होऊं शकेल हा विवाह. म्हणून म्हणतें, तुम्हीं उगाच घाई करूं नका माझ्या लग्नाची. नाहीं तरीं आता पंचविशी उलटलीच आहे माझी. यदाकदाचित् नाहींच झालं लग्न, तरी तुझ्यासारख्या मैत्रिणीच्या सहवासात आनंदानं उरलेलं आयुष्य काढीन मी—"

" इतक्या वैतागानं का बोलतेस तूं स्वत.विषयीं, निरू ?—"

" मग काय करूं ग ? तुझं आपलं ठीक आहे. तुझा प्रियकर हाच पति झाला तुझा. माझ्या बाबतींत उलटं व्हायचंय. माझा पति हा प्रियकर होणार आहे माझा. तें जर जमलं नाहीं, तर सगळंच संपलं. तसला तो जुगार खेळण्यापेक्षा अविवाहित राहलेलं काय वाईट ? निदान माझं स्वातंत्र्य तरी कायम राहील. ज्या संसारसुखाच्या प्राप्तीबद्दल कोणत्याच प्रकारची खात्री नाहीं, त्याच्या आशेनें भलतेच पाश स्वतःच्या मागं कशाला लावून घेऊं मी ?—"

" पण तुला लग्न करण्याची इच्छा आहे ना ?—"

" इच्छा आहे आणि नाहींहि. तुझा प्रीतिपूर्ण संसार पाहला, म्हणजे लग्न करावंसं वाटतं मला केव्हा केव्हा. पण, मला पति हवा तो अगदीं

एकटा हवा. त्याच्याबरोबर त्याचं जुनं कुटुंब नको किंवा त्याच्या कुटुंबाची घटक होण्याचीहि इच्छा नाहीं माझी. माझा पति न् मी मिळून नवं कुटुंब उत्पन्न करूं आम्ही आमचं—"

वैवाहिक जीवनाविषयींचे निरुपमाचे हे विचार अनघाला फारसे आवडले नाहींत. ती शेवटीं उद्वेगानें तिला म्हणाली—

" स्वतःचं कुटुंब बायकोसाठीं सोडायला तयार होणारा संपन्न पदवीधर नवरा तुला आपल्या महाराष्ट्र समाजात मिळणं कठीण आहे, निरू. तुला एखादा देशोधडीला लागलेला निर्वासितच पत्करावा लागेल अखेर—"

" फार उत्तम ! निर्वासित चालेल मला. ज्याला देश नाहीं, घर नाहीं आणि स्वतःचीं माणसं नाहींत, अशा एकाद्या धाडसी, कर्तबगार माणसाचा संसार थाटण्याची, त्याच्या उध्वस्त जीवनात नवा आनंद निर्माण करण्याची संधि जर मला लाभली, तर मी धन्य समजेन स्वतःला खरोखरी, अक्का ! स्वतःच्या जातींत, समाजात किंवा प्रांतात लग्न करून रूढ, अळणी आयुष्य कंठण्यापेक्षा अगदीं निराळ्या परिस्थितींतून आलेल्या माणसाबरोबर संसार करण्यात मजा आहे एक प्रकारची—"

" मला समजत नाहीं निरू, तुम्हा अलीकडल्या तरुण मुलींचीं मनं कशीं बनलेलीं आहेत तें ! आपल्याला काय वाटतं, काय हवं आहे, याची तुमची तुम्हाला तरी जाणीव आहे का नीट !—"

" कशी असावी ? जुनी कुटुंबव्यवस्था आणि समाजरचना यांनीं जीवनाला घातलेल्या सर्व प्रकारच्या मर्यादा, सर्व बाजूंनीं चालविलेला जीवनाचा कोंडमारा आम्ही प्रत्यक्ष पाहातच आहोंत रोज. त्या कुटुंबव्यवस्थेचा आणि समाजरचनेचा धड जीर्णोद्धार केला जात नाहीं किंवा धड विध्वंसहि केला जात नाहीं. या अर्धवट परिस्थितींत जें संक्रमण यदृच्छेनं चालू आहे, त्याचं पर्यवसान अखेर कशा रीतीनं होईल, जी नवी व्यवस्था आणि जो नवा समाज त्यातून उदयाला येणार त्याचं नाम–रूप काय राहील, याचीहि कांहीं निश्चित कल्पना येत नाहीं अद्याप,

अशा या चमत्कारिक, अनिश्चित काळात आमचे विचार अर्धवट किंवा अपरिपक्क असावेत, आमचीं मनं गोंधळलेलीं आणि पावलं अडखळलेलीं असावींत, यात आमचा काय दोष आहे, अक्का ?—"

तिच्या त्या प्रतिप्रश्नाने अनघा कुंठित झाली. पण, ज्या तळमळीनें ते उद्गार तिनें काढले होते, ती तळमळ तिच्या हृदयाला भिडली; व तिनें निरुपमाला म्हटलें—

" किती कडवटपणाने बोलतेस ग तूं, निरू ?—"

" मग दुसरं काय बोलूं ग मी ? अक्का, तुम्ही ज्या काळात संसाराला सुरवात केलीत, त्या काळात मध्यमवर्ग सुस्थितींत होता; जीवनाचीं जीं काय बरींवाईट मूल्य असतील, तीं निश्चित आणि स्थिर होतीं; व तुमचे सुखवस्तु आईबाप खंबीरपणानें उभे होते तुमच्या पाठीशीं तुमचं रक्षण करायला. पण, या दुसऱ्या महायुद्धानं मध्यमवर्ग मातीला मिळवला; त्याचीं सगळीं जीवनमूल्यं नष्ट करून टाकलीं; व आर्थिक शाश्वतीच्या अभावामुळं आजच्या उमलत्या पिढीचा आत्मविश्वास नाहींसा करून टाकला. खात्रीची नोकरी नाहीं, म्हणून तरुण मुलगे लग्नाची जबाबदारी घ्यायला तयार होत नाहींत. शिवाय, त्यांच्या स्वतःच्या आयुष्यात कितीहि वेडेवाकडे प्रकार घडलेले असले, तरी त्याना बायको म्हणून जी मुलगी हवी, ती मात्र अगदीं कोरी करकरीत असली पाहिजे ! या त्याच्या वृत्तीमुळं आज महाराष्ट्रांतील किती सुशिक्षित तरुण मुली दुःसह झालेल्या कौमार्याचं निष्फळ जिणं कंठीत बापाच्या घरीं कुढत दिवस काढीत आहेत, याची कल्पना आहे का तुला ? तुझ्यापुढं फक्त माझ्या लग्नाचा प्रश्न आहे, अक्का. पण, माझ्या लग्नाचा अवघड होऊन बसलेला प्रश्न हें प्रतीक आहे एक खरोखरी आजच्या आपल्या कुजलेल्या मध्यमवर्गीय जीवनाचं—"

अनघा काहीं बोलली नाहीं. पण, तरुण मुलींच्या मनोजीवनाची एक निराळीच बाजू आज आपल्या दृष्टीस पडली, असें मात्र तिला वाटलें.

रात्रीं फिरावयाला जातांना हा सारा संवाद जेव्हां तिनें अभयला सांगितला, तेव्हां तो तिला म्हणाला—

" आपल्याला निरुपमाच लग्न जमवणं कठीण जाईल असं वाटतच होतं मला. पंचविशी उलटलेल्या तरुण मुलींची लग्न दुसऱ्यांनी जमवणं चुकीचंच आहे खरोखरी सगळ्या दृष्टींनी ! पण, तिचे जे विचार तूं मला सांगितलेस, ते मात्र मला वावगे वाटले नाहींत फारसे--"

" असं कसं म्हणता तुम्ही ? आपल्याशीं लग्न करूं इच्छिणाऱ्या पुरुषानं स्वतःचं कुटुंब सोडून देऊन वेगळं राह्यलं पाहिजे, हें जें तिचं म्हणणं आहे, ते बरोबर वाटतं का तुम्हाला ?--"

" हो. तूं तिच्या दृष्टीन विचार करून पाहा, अनू. इतकं वय झालेल्या, इतकं शिकलेल्या आणि आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असलेल्या तिच्यासारख्या तरुण स्त्रीला यापुढं एका निराळ्याच अपरिचित कुटुंबांत जाऊन राहणं आणि त्याच्याशीं समरस होणं कसं शक्य आहे ? माझं तर असं स्पष्ट मत आहे कीं, पंचविशी उलटलेल्या आणि स्वतःच्या पायावर उभ्या असलेल्या स्त्रीला आपल्या प्रियकराशींसुद्धां एका मर्यादेपलीकडे समरस होणं शक्य नाहीं. प्रौढ वयातलं प्रेम आणि समरसता हीं दोन्ही समर्याद असतात; त्यात वासनेचा उन्माद कदाचित् असला, तरी भावनेची उत्कटता नसते; व नव्या अनुभूतिविषयींची जिज्ञासा कदाचित् असली, तरी पहिल्या प्रीतीची उत्कंठा नसते प्रौढ वयातलं लग्न हे निरुपमानं म्हटल्याप्रमाणं खरोखरीच सोईसाठीं आणि सुखासाठीं असत--"

" याचा अर्थ असा कीं, यापुढं कुटुंबसंस्था टिकणार नाहीं व लग्नासाठीं अवश्य असलेलं सौहार्द आणि त्यातून लग्नानंतर उत्पन्न होणारे संबध हे त्या विवाहित दंपत्यापुरतेच मर्यादित राहतील. आज लग्न हा कुटुंबसंस्थेचा पाया समजला जातो. तें लग्नाचं महत्त्व राहणार नाहीं यापुढं-"

" आजच तें महत्त्व नष्ट झालंय माझ्या दृष्टीनं. तूं आपल्यावरूनच पाहा, अनू. आपला दोघांचा काय संबंध आहे माझ्या आईवडिलांशीं आणि त्यांच्या नातेवाइकांशीं ! विशेषतः, आंतरजातीय आणि आंतर-प्रांतीय लग्नं जसजशीं जास्त होतील, तसतसे जुने कौटुंबिक संबंध तुटत

जातील आणि नवे निर्माण होतील. पण मला याबद्दल वाईट वाटत नाहीं. मीं असं गृहीत धरून चाललोंय कीं, पुढल्या मार्क्सवादी विज्ञानयुगात कुटुंबसंस्था अजिबात राहणार नाहीं; व संभोग आणि सृजन याचा आज असलेला अभेद्य संबंध तोडण्याच्या प्रयोगात वैज्ञानिकाना यश येऊन जर संभोगाशिवाय उत्तम संतति उत्पन्न करणं शक्य झालं, तर विवाहसंस्थाहि नष्ट होऊन जाईल. आणि मग, सत्यकाम जाबालाप्रमाणं, आईच्या नावानं मुलं ओळखलीं जातील ! पण या स्थित्यंतराबद्दल निदान भारतीयाना तरी विषाद वाटायचं कारण नाहीं. कारण, आपल्या या भरतखंडात स्त्रीसत्ताक कुटुंबपद्धति आजहि काहीं ठिकाणीं प्रचलित असून, आईच्या नावानं संतति ओळखली जाणं हें गौण समजलं जात नाहीं. आपली आजची समाजरचना आणि तिला आधारभूत असलेलीं नैतिक मूल्यं हीं आता टिकणं अशक्य आहे, अनू. मार्क्सचा विरोध-विकासाचा सिद्धांत हा कदाचित् तितका निरपवाद ठरणार नाहीं. पण, अर्थ ही मानवी व्यवहारात उलथापालथ घडवून आणणारी आणि त्याचं नियंत्रण करणारी महान् सर्वंकष शक्ति आहे. या त्याच्या सिद्धाताचा प्रभाव मात्र प्रत्यहीं अनुभवतों आहोंत आपण ! त्या सिद्धाताच्या प्रभावानंच आपली सनातन समाजरचना आज कोसळून पडण्याच्या बेतात आहे—"

"जुनीं नैतिक मूल्यं आजच्या बदललेल्या परिस्थितींत टिकणार नाहींत, हें तुमचं म्हणणं खरं आहे. तुम्ही वर्णन करता तें स्थित्यंतर अपरिहार्यहि असेल, अभय ! पण मला त्याची कल्पना भयानक वाटते—"

"कारण तूं भावनेनं सगळ्या गोष्टींचा विचार करतेस. पण या स्थित्यंतरातहि एक तत्त्व मात्र अगदीं अचल, अगदीं त्रिकालाबाधित आहे--"

" कोणतं तत्त्व तें ?—"

"स्त्री-पुरुषाचं परस्पराविषयींचं प्रेम. त्या प्रेमांतून सर्व मानवी जीवनाचा उगम झाला आणि तें प्रेम हेंच त्याची एकमेव आधारभूत शक्ति आहे.

संभोग आणि सृजन याचा संबंध जरी कदाचित् तुटला, तरीसुद्धा तें प्रेम हेंच मानवी जीवनातील सर्वांत रम्य काव्य आणि सर्वांत श्रेष्ठ सामर्थ्य राहील. प्रीति ही जीवनाची आदिशक्ति आहे. तिचा नाश हाच खरा प्रलय ठरेल जगातला--"

" हे सगळं खरं. पण, त्या प्रीतीचं जें मधुर स्वरूप आजच्या संसारात आपण अनुभवतों आहोंत, तें पुढें राहील का ? " अद्वैतं सुखदुःखयोरनुगतं सर्वास्ववस्थासु यद् । " असं ज्याचं वर्णन भवभूतीनं केल आहे, तें दिव्य दंपत्यप्रेम पुढं राहील का ?--"

" त्याची काळजी आपण का करावी ! आपल्या लहानशा आयुष्यांत आपण त्या प्रेमाचा आस्वाद मनसोक्त घेतला, हें काय कमी भाग्य आहे आपलं, अनू !--"

तें शेवटलें वाक्य उच्चारीत असता अभयनें तिला हातानें लपेटून जवळ घेतली.

श्रावण महिन्यांतल्या कुंद चादण्याची धूसर रम्यता त्यांच्या सभोंवतीं पसरली होती. सायंकाळीं जोराची सर येऊन गेल्यामुळें स्वच्छ झालेल्या पश्चिम क्षितिजावर जो एकच काळाभोर ढग आता कडेपासून वरपर्यंत निमुळता होत पसरला होता, त्याच्या टोंकाशीं लखलखत असलेली चंद्रकला पाहून, भगवान् चंद्रमौलींच्या भव्य जटाजूटाचें स्मरण होत होतें. गाढ झोंपेंत अचानक पडलेल्या अस्पष्ट स्वप्नासारखें तें विरळ आर्द्र चांदणें म्हणजे उन्हाळयात सतत तीन महिने होरपळून निघालेल्या धरित्रीवर धूर्जटीनें पसरलेली आपल्या कृपेची जणूं पाखर होती. त्या सौम्य, शस्यगंधित चादण्यात सर्व स्थिरचराला एक प्रकारची मृदुता येऊन सृष्टींतलें सगळें काठिण्य द्रवून लोपून गेल्यासारखें वाटत होतें. वाऱ्याची एखादीच गार झुळूक जी मधून अवचित येई, ती दिवसभराच्या उकाड्यानें श्रांत झालेलीं गात्रें पुलकित करीत असे. रस्त्याच्या दोहों बाजूंना असलेल्या शेतांतील बेडकांचें अविरत चाललेलें पर्जन्यसूक्त तो निर्जन नैसर्गिक एकांत सचेतन असल्याची जाणीव देत होता.

अभयच्या हाताचा विळखा आपल्या अंगाभोवतीं पडताच अनघा त्याला अधिकच बिलगून म्हणाली--

" या नव्या घरीं रहायला आल्यापासून आपले दिवस फार सुखात चालले आहेत, नाहीं? मला वाटतं, लग्नानतरचे पहिले सहा महिने सोडल्यास इतका सुखाचा काळ आपल्या आयुष्यात पूर्वी आला नव्हता कधीं !--"

" या सुखाच्या दिवसाना मध्यंतरीं भोगाव्या लागलेल्या दुःखामुळेंच इतकी माधुरी आली आहे हे विसरूं नकोस तूं. जगाचा विकास सदैव विरोधातूनच होतो, हें मार्क्सचं तत्त्व खर नसेल कदाचित्; पण, जग द्वंद्वमय आहे आणि केव्हा त्या द्वंद्वाच्या संघर्षातून, तर केव्हा समन्वयातून जगाचा विकास होतो, हें मात्र निश्चित. आपण जीं काय दुःखं आतापर्यंत भोगलीं आहेत तीं आपल्या विकासालाच कारण झालीं आहेत, याबद्दल शंका नाहीं मला. दुःखाचा कहर होऊन गेल्यानतर लाभलेल्या सुखाची गोडी कांहीं अपूर्व असते, अनू !—"

" म्हणूनच, मला वाटतं, वनवासाच्या आणि परगृहवासाच्या दारुण दुःखानंतर जें पुनर्मीलनाचं सुख मिळालं, त्याचं वर्णन 'अद्वैतं सुखदुःखयोरनुगतं' या शब्दानीं प्रभु रामचंद्रानीं केलंय—"

" आदिकवीनं जगातलं पहिलं आदर्श दंपत्य निर्माण केलं प्रभु रामचंद्र आणि सीतामाई याच्या रूपानं. पण त्याच्या प्रणय-जीवनाचा शेवट किती दुःखात झाला ?—"

" पण त्याची आठवण या वेळीं कशाला, अभय!— "

• • •

पण ते सुखाचे दिवस त्याना फार काळ लाभले नाहींत.

दिवाळीनंतर भरलेल्या महिला परिषदेच्या अधिवेशनासाठीं अनघा भंडाऱ्याला गेली असता तेथून मोटरनें परत येताना वाटेतच तिच्या पाठींत थोडें दुखूं लागलें. प्रवासाची दगदग आणि थंडी याच्यामुळें कदाचित् तें दुःख उद्भवलें असेल, अशा समजुतीनें तिनें त्यावर प्रथम घरगुती उपचार केले. पण तें दुःख सारखें वाढतच चाललें. तेव्हा अभयनें तिला डॉक्टराकडे

नेलें. त्यांनीं प्रथम तिला काळजीपूर्वक तपासून शेवटीं टाळूवर हळूच चापट मारली. त्याबरोबर एखाद्या, खोल जखमेवर आघात व्हावा तसें वाटून, अनघानें विव्हळत 'नको, नको' असा करुण उद्गार काढला.

तो तिचा उद्गार ऐकताच डॉक्टर अगदीं गंभीर झाले व अभयला म्हणाले, "मला फार वाईट वाटतं, डॉक्टर! याना अस्थिक्षय झाला असल्याची शंका येते—"

"पण शंका आहे कीं खात्री? तुम्ही खरं काय तें स्पष्ट सांगा. आम्हांला कांहीं वाटायचं नाहीं दोघाना त्याबद्दल—"

"त्याची जाणीव आहे मला. म्हणूनच मीं इतकं स्पष्ट बोललों. मला वाटतं, आपण उद्या सकाळी याना मेयो हॉस्पिटलमध्यें घेऊन जावं न् 'क्ष' किरणांनीं तपासून खात्री करून घ्यावी आपली—"

"ठीक आहे—"

दुसरे दिवशीं सकाळीं दहा वाजता ते तिला मेयो हॉस्पिटलमध्यें घेऊन गेले. तेथें तिची तपासणी होऊन 'क्ष' किरणानीं फोटो घेण्यात आला. तेव्हां तिच्या पाठीच्या कण्याचे दोन मणके अस्थिक्षयानें ग्रासले असल्याचें सिद्ध झालें. म्हणून डॉक्टरानीं प्लास्टर कोट घालण्याचा उपचार सुचवून तिला पूर्ण विश्रांति घेण्याचा सल्ला दिला.

पण हॉस्पिटलमधून परत आल्यावर आल्यावर अनघा अभयला म्हणाली—

"मला प्लास्टर कोट घालून बिछान्यावर लोळत पडण्याची इच्छा नाहीं मुळींच! दुसऱ्या कोणत्या उपचारानीं मला बरं वाटण्यासारखं आहे का याची चौकशी करा तुम्ही—"

अभयनें तिची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. त्याचे सगळे डॉक्टर मित्रहि तिला मुद्दाम भेटून गेले. पण, तिनें प्लास्टर कोट घालण्याला जो नकार दिला, तो कायमचाच. निरुपमानें तिला विनवून सांगितलें—

" मी उद्यापासून शाळा सोडून तुझ्याजवळ येऊन बसतें, अक्का. पण तूं प्लास्टर कोट घालून घे मुकाट्यान. आपण तीन महिन्यात काय परिणाम होतो तो पाहूं; नाहीं तर काढून टाकूं. पण तूं उगाच हट्टानं दुखणं वाढवूं नकोस गडे आपलं—"

" आता जगून तरी काय उपयोग आहे माझा, ताई !—"

" अग, पण डॉक्टराना तरी हवी आहेस ना तूं ?—"

" पण अशा स्थितींत त्यांच्यासाठीं जगणं म्हणजे त्याचं जिणं दुःसह करणंच नव्हे का ! आमचं लग्न झाल्यापासून गेल्या अकरा वर्षांत पुरते सहा महिनेसुद्धा कधीं सुखात गेले नाहींत आमचे. ते एक चकार शब्द न बोलता माझ्या दुर्वह जीवनाचा भार वाहताहेत मुकाट्यानं. आमच्या वैवाहिक जीवनाविषयीं विचार करायला लागलं, म्हणजे मला केव्हा केव्हा वाटतं, त्याना दुःख देण्यासाठींच त्यांच्या आयुष्यात आलें मी. स्त्री आणि पुरुष मिळून मनुष्य पूर्ण होतो, मानवी जीवन पूर्ण होतं, असं म्हणतात. माझ्याशीं लग्न होण्यापूर्वी त्याना दुःख ही काय चीज असते याची कल्पना-सुद्धा नव्हती. आमचं लग्न झाल्यावर त्याच्या तोंपर्यंतच्या केवळ सुखमय जीवनाला दुःखाची जोड मिळून जीवनाचं द्वंद्व पूर्ण झालं ! माझ्यामुळं दुःखी झालेलं त्याचं जीवन पाहिलं म्हणजे ' दुःखसंवेदनायैव रामे चैतन्य-माहितं ' हे प्रभु रामचंद्रानें स्वतःविषयीं काढलेले उद्गार आठवतात मला. पण ते मुकाट्यानं आतल्या आत पिचत भार वाहताहेत माझा—"

" तूं उगाच वैताग करून घेतेस आपल्या जिवाचा, अक्का. तुझ्या असल्या अविचारानं मात्र मनस्ताप होत असेल त्याना—"

" माझं अस्तित्व म्हणजेच आता मनस्ताप आहे त्यांना, ताई. हें दुखणं लवकर विकोपाला जाऊन जर तें अस्तित्व संपलं, तर ते आणि मी दोघेहि मुक्त होऊं या दुःखमय संसारातून—"

निरुपमानें तिला परोपरीनें विनवून सांगितलें, पण तिनें आपला हट्ट सोडला नाहीं. अखेर होमिओपाथीचा उपचार सुरू झाला; व तिला

काहीं दिवस थोडें बरें वाटलें. पण तो गुण फारसा प्रभावी ठरला नाहीं. उन्हाळा सुरू झाल्यावर तिचें दुःख जास्त वाढलें; व तिला झपाट्यानें क्षीणता येऊं लागली. दादासाहेब तिला महाबळेश्वरला नेण्यासाठीं मुद्दाम साताऱ्याहून आले. त्याचा विचार सागलीच्या एका नामांकित वैद्याचें औषध तिला देण्याचा होता. पण तिला त्या स्थितींत माहेरीं जाण्याची मुळींच इच्छा नव्हती. म्हणून, गेल्या उन्हाळ्यात पचमढीला जाण्याचें जें वचन तिनें निरुपमाला दिलें होतें, त्याची आठवण तिनें अभयला दिली; व डॉक्टराच्या सल्ल्यानें अखेर पचमढीला जाण्याचे ठरलें. दादासाहेबाना तिनें अखेर अशा रीतीनें नकार देऊन वाटेला लावावें, ही गोष्ट अभयला रुचली नाहीं. पण, आजारी अवस्थेंत आपण माहेरीं जाऊं नये असें तिला वाटावयाला कोणतीं कारणें आहेत, याची त्याला जाणीव होती; व सद्य.स्थितींत महाबळेश्वरला जाण्यापेक्षां पचमढीला गेल्यानेंच तिला अधिक सुख होईल, हेंहि त्याला समजून चुकलें होतें. त्यामुळें डॉक्टरांची संमति मिळताच तो बंगला ठरविण्यासाठीं स्वतः पचमढीला गेला.

पचमढीच्या अगदीं दक्षिण टोकाला रॉयल हॉटेल इस्टेटच्या पलीकडे असलेला शेवटचा बंगला त्यानें तीन महिन्यांसाठीं ठरवला. तेथून जवळच पचमढींतील सर्वांत मोठी 'अंधकोह' नावाची घळ असल्यामुळें त्या बंगल्याला हिंस्र श्वापदाचा उपद्रव होण्याची भीति होती; व म्हणून तो बंगला न घेता सरकारी बगीचाजवळील बंगला त्यानें घ्यावा, असा सल्ला निरुपमाच्या वडिलांनीं त्याला दिला. पण, आपण ठरविलेल्या बंगल्याभोंवतीं असलेली रम्य वनश्री आणि पूर्ण एकांत पाहून, अभयनें तोच बंगला कायम केला.

निरुपमानें मोठ्या उल्हासानें तिच्या पचमढीच्या प्रवासाची तयारी केली. तो तिचा उल्हास पाहून अनघानें तिला म्हटलें—

" ताई, तूं मला पचमढीला नेते आहेस. पण तिथून परत आणशील ना मला नागपूरला !— "

" म्हणजे ? मी समजलें नाहीं तुझ्या बोलण्याचा अर्थ, अक्का !— "

" अग, अर्थ सरळ आहे अगदीं. माझी प्रकृति दिसतेच आहे तुला कशी आहे ती ! पचमढीला गेल्यानंतर एखाद वेळीं तिथंच राहायचा योग यायचा ! पण, झालच तसं, तर वाईट वाटायला नको त्याबद्दल. पचमढी म्हणजे कैलास आहे आपल्या प्रांतातला. तिथं मृत्युंजयाच्या सान्निध्यात मृत्यु येणं हें तरी केवढं भाग्य आहे, निरू ?— "

• • •

# ३

पण पचमढीला आल्याबरोबर अनघाच्या मनाला एकदम प्रसन्नता वाटली.

ते नागपूरहून छिंदवाडा रस्त्यानें स्वतःच्या मोटरनें पचमढीला आले. वाटेंत तामियाच्या डाकबंगल्यात दुपारीं चहासाठीं जेव्हा त्यांनीं मुक्काम केला, तेव्हा सातपुडयाच्या त्या उंच शिखराचें तें भव्य सौंदर्य पाहून अनघाला फार आनंद झाला आणि ती निरुपमाला म्हणाली—

" किती सुंदर स्थळ आहे ग हें ! इथंच राहावंसं वाटतंय मला— "

" अग, पचमढी याच्याहिपेक्षा सुंदर आहे, अक्का. धूपगड, महादेव आणि चौरागड याच्यापेक्षा काहीं उंच नाहीं हा तामिया. याच्या तळाशीं जसा महादेवाचा निवास आहे, तसाच आपल्या प्रातातला जो सर्वात मोठा महादेव तो त्याच्या नावानं प्रसिद्ध असलेल्या महादेवाच्या डोंगराच्या पायथ्याशीं एका गुहेंत आहे पचमढीपासून पाच—सहा मैलावर पचमढीपुढं तामिया काहींच नाहीं— "

आणि खरोखरीच, पिपरियाच्या घाटाचीं बिकट जंगली वळणें चढत रात्रीं आठच्या सुमारास त्यांची मोटर पचमढीच्या पठारावर येताच, जेव्हां घाटाच्या तोंडाशीं, उंचवटयावर असलेला, पचमढींतला पहिला विद्युत्-प्रकाशित बंगला त्यांच्या दृष्टीस पडला, तेव्हा अनघाला मेघदूतांत वर्णिलेल्या मणिहर्म्यांची आठवण झाली; व वाऱ्याच्या गंधयुक्त गार झुळकाचें स्पर्शसुख अनुभवीत तिनें अभयला हर्षभरानें म्हटलें—

" आपण हिमालय केव्हां पाहूं तेव्हां खरा ! पण महादेवाचं निवास-स्थान शोभतं खरंच हें. आपण घाट चढायला लागल्यापासून सारखं वाढतं

सौंदर्य दिसतंय प्रत्येक वळणागणिक. का नये राहूं महादेवानं अशा रम्य स्थळी !— ''

''पण, महादेव इथं येऊन राहिल्यामुळं वाघ, तेडवा, अस्वल, रानगवा, अजगर, नाग वगैरे त्याचे नाना प्रकारचे जंगली सहचरहि येऊन राहूले आहत या पचमढीभोवतालच्या रानात न् घळींत. आपल्या बंगल्याच्या आसपाससुद्धा साक्षात्कार होईल तुला त्यांचा एखादे वेळीं— ''

''खरंच, तुम्ही तो हंडीकोहजवळचा बंगला घ्यायला नको होता, अक्का. आप्पाजींनीं तसं स्पष्ट सांगितलं होतं डॉक्टराना. पण यानीं त्याचं न ऐकता ठरवला तो बंगला. त्या बंगल्यापासून हंडीकोह फार तर मैलभर असेल— ''

'' अग, पण त्या हंडीकोहला एवढं भिण्यासारखं काय आहे भयंकर त्यात —? ''

'' तो हंडीकोह म्हणजे या पटारावरली सर्वांत खोल घळ आहे. त्या घळीसंबंधीं अशी दंतकथा आहे कीं, या पचमढीच्या पठारावर एक मोठें थोरलें सरोवर होतं प्राचीन काळीं न् त्यात एक प्रचंड नाग रहात होता आपल्या कुटुंबासह. महादेवाच्या दर्शनाला येणाऱ्या यात्रींना हा नागराज आणि त्याचीं मुलंबाळं फार त्रास देत असत. म्हणून महादेवानं तें सरोवर कोरडं केलं; न् जमिनीवर आपल्या त्रिशूळाचा प्रहार करून ही हंडीकोहची घळ निर्माण केली त्या नागराजाला राहण्यासाठीं. तेव्हापासून तो नाग आपल्या परिवारासह तिथं रहातो म्हणतात. ती दंतकथा खरी असो वा नसो, त्या घळींत सोनचाफ्याचं दाट बन आहे न् त्यामुळं त्या बाजूला सापाचा सुळसुळाट आहे एवढं मात्र खरं. म्हणून म्हणतें, तो बंगला घ्यायला नको होता डॉक्टरांनी—''

'' आता घेतलाय खरा बंगला यांनीं. तेव्हा तिथंच राह्यचं आपण सगळ्यानीं, म्हणजे तूं सुद्धा बरं का, ताई ! इथं किती ठिकाणं आहेत एकंदर महादेवाचीं !—''

" मोठा महादेव, छोटा महादेव, चौरादेव आणि जटाशंकर अशीं एकंदर चार ठिकाणं आहेत. त्यापैकीं महादेवाची यात्रा करणारे भाविक मोठा महादेव, चौरा आणि छोटा महादेव यांची यात्रा करतात. जटाशंकरला जातातच असं नाहीं—"

त्याचें हे संभाषण चालू असतानाच मोटर सरकारी बगीचापाशीं आली. आप्पाजींनीं पुढें येऊन त्याचें स्वागत केलें. त्याना पाहाण्याचा अभयचा हा पहिलाच प्रसंग होता. त्याच्या कपाळावरील आडवें तिवोटी गंध, दोन भुंवयाच्यामध्यें लावलेला शेंदराचा टिळा, बसक्या नाकाच्या निसरड्या बैठकीवर थबकलेला चष्मा, जाड ओंठाना झाकणाऱ्या पाढऱ्या छप्परदार मिशा आणि मधून मधून त्या मिशाचीं टोंकें चावत हिंदी पद्धतीनें मराठी बोलण्याची मिठास लकब पाहून त्याला मोठी गंमत वाटली. मोटारींतून ती मंडळी-उतरल्या क्षणापासून ते जे सारखे बोलत होते, ते त्या दिवसभराच्या दगदगीनें थकलेल्या मंडळींचे डोळे मिटेपर्यंत ! त्याच्या वागण्यातले चापलुशी ढंग आणि बोलण्यातला लखनवी गोडवा पाहून अभयच्या मनात आलें, निरुपमाचें अभिनयकौशल्य आणि तिच्या वर्तनातलें मोहक लाघव हें तिच्या वडलाच्या या गुणावगुणाचें तर अधिक उन्नत, अधिक सुसंस्कृत स्वरूप नसेल ना !

पाहुण्याचे डोळे मिटेपर्यंत त्याच्याशीं गप्पा मारीत राहण्याच्या आप्पा जींच्या तंत्राचा उलगडा अभयला मध्यरात्रीं झाला. रात्रीं एकच्या सुमारास कुत्र्यांच्या भुंकण्यामुळें त्याला जाग आला. म्हणून, तो उठून पाहातो, तों अंगणात घातलेल्या त्या बिछान्याच्या अगदीं टाकाला असलेली आप्पाजींची खाट त्याला रिकामी दिसली. क्षणैक तो बुचकळ्यात पडला. तोंच एका हातांत काठी आणि दुसऱ्या हातात कंदील घेतलेले आप्पाजी आपल्या दोघां कुत्र्यासह सरकारी बगीचाकडून येत असलेले त्याला दिसले. अभयला समोर उभा असलेला पाहून ते वरमल्यासारखे झाले, पण लगेच हंसून अगदीं गोड आवाजात म्हणाले—

" काय, झोंप आली नाहीं ना ! जागा बदलली म्हणजे होतंच पाहा असं. मी जेव्हां जबलपूरहून प्रथम पचमढीला बदलून आलों पंधरा वर्षां-

पूर्वी, तेव्हा मला पहिले महिनाभर अजिबात झोंप आली नाहीं, डॉक्टर-साहेब ! आमच्या या बगीचाला रानडुकरांचा फार उपद्रव आहे बघा. त्यातून आज माळीहि नव्हता घरीं. म्हणून फेरी मारून आलों बगीचात !—"

"झोंप चागली लागली होती मला. पण कुत्रे भुंकल्यामुळें जाग आला—"

"बरोबर आहे. मघाशीं तेंडवा किंवा डुकर बगीचाच्या मागल्या बाजूनं जंगलांत गेला असावा बहुतेक. कुत्र्याना वास आला म्हणजे भुंकत सुटतात ते. मग ऐकायचे नाहींत कुणाला ! त्यातून ही आपली जोडी तर मोठी तेज आहे—"

आपल्या अंगावर लडिवाळपणाने उड्या घेत असलेल्या त्या उंच, सफेत, सडसडीत कुत्र्याकडे अभिमानानें पाहात आप्पाजी म्हणाले.

त्याना आवरण्याचा प्रयत्न करीत ते उद्गारले—

"किती धूम कराळ, बेटयानों ? मेहमानाची झोंप मोडली याचं काहींच नाहीं तुम्हाला ! थांबा, आता बाधून ठेवतों—"

ते कुत्र्याना बाधावयाला ओसरींत गेले.

आणि अभय मुकाटयानें अंथरुणावर पडला.

त्या कुत्र्याचें गुरगुरणें आणि आप्पाजींचें स्वगत भाषण कानावर पडत असतानाच त्याचा डोळा लागला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं चहापान झाल्यावर निरुपमा आणि नचिकेत यांच्यासह तीं दोघें आपल्या बंगल्यावर गेलीं. आप्पाजीहि त्याच्याबरोबर व्यवस्था लावण्यासाठीं आले होते.

बंगल्याच्या प्रशस्त आवारात शिरल्याबरोबर ते अभयला म्हणाले—

"या बंगल्याला इतिहास आहे थोडासा, डॉक्टरसाहेब—"

"तो कसा काय ?—"

अभयनें त्यांच्याकडे वळून कुतूहलानें विचारलें.

" हें पाहा, या बंगल्याच्या मुख्य दरवाजावर नागचिन्ह आहे. १८६२ साली कॅप्टन फॉर्सिथ् यानं आपले त्या वेळचे चीफ कमिशनर सर रिचर्ड टेंपल् याच्या हुकुमावरून या पठाराची पाहाणी केली. त्या कॅप्टननें ज्या जागीं आपला डेरा ठोकून पहिला रानगवा मारला, त्या जागेवर बांधलेल्या पहिल्या सरकारी बंगल्याला ' बायसन् लॉज ' हे नांव देण्यात आलें. इथून जवळच पांडवांच्या पाच गुहा आहेत डोंगरात खोदलेल्या लेण्यासारख्या. त्याच्यावरून या गावाला ' पचमठी–पचमढी ' असं नाव पडलं. हें गाव मूळ एका कोरकू जहागिरदाराच्या मालकीचं होतं. तो आपल्याला हंडीकोहमध्यें दडी देऊन बसलेल्या नागराजाचा वंशज म्हणवतो. आपल्या सरकारनं त्याच्यापासून हें गाव विकत घेऊन आपली वासंतिक राजधानी स्थापन केली इथं. त्या जहागिरदाराचा बंगला आहे हा—"

" म्हणजे हंडीकोहमधल्या नागराजाच्या वंशजाचं निवासस्थान आहे म्हणायचं हें—"

" हो. बाकी ही जागा मोठी शांत न् रमणीय आहे—"

" म्हणून तर पसंत केली मीं आपण नको नको म्हणत असता—"

" पण आप्पाजी, इथं पाहण्यासारखं काय आहे हो !—"

" साहेबाच्या मतें पहाण्यासारखं ढीग आहे. पण, मला असं वाटतं कीं, जटाशंकर, छोटा महादेव, मोठा महादेव, चौरादेव आणि धूपगड एवढं पाहिलं, म्हणजे सगळं कांहीं बघितल्यासारखं होतं. या पठारावरला सातपुड्याचा सगळ्यांत उंच डोंगर जो धूपगड, तो मध्यहिंदुस्थानांतलं सगळ्यात उंच गिरिशिखर समजला जातो; न् धूपगडाच्या पठारावरील सगळ्यात उंच खडकावर उभं राहिलं, म्हणजे तिथून सातपुड्याच्या सातहि रांगा मोजून पाहता येतात. नर्मदेच्याहि प्रवाहाची रेषा त्या खडकावरून दुपारीं दिसते म्हणतात—"

" मग तिथं गेलंच पाहिजे आपल्याला एकदां—"

" हो, जरूर गेलं पाहिजे, बाई. सुदैवानं धूपगडाच्या पठारावर सुंदर रेस्ट हाऊसहि आहे—"

" तिथून दिसतात सातपुड्याच्या रांगा !—"

" त्या रेस्ट हाऊसच्या मागून तर दिसतातच, बाई; पण, त्या रेस्ट हाऊसपासून अडीचशें फूट उंचीवर जो शिखराचा खडक आहे, त्यावरून तर सातहि रांगा अगदीं स्पष्ट दिसतात—"

" मग उद्याच घेऊन चला मला तिथं—"

" नाहीं बाई, आपण घाई करूं नका इतकी—"

" का बरं ? धूपगड लांब आहे का फार ?—"

" छे ! महादेवापेक्षाहि जवळच आहे थोडासा. आपल्या या बंगल्यापासून चार मैलावर येईल. अगदीं थेट पायथ्यापर्यंत मोटर जाते. पण मग आणखी मैल सव्वा मैलाचा चढाव मोठा अवघड आहे. आपण आता पंधरा दिवस विश्रांति घ्या. मग हत्तीवर किंवा खुर्चीवर बसवून नेऊं आम्हीं आपल्याला वर. पण या तिन्ही स्थळांचं दर्शन आताहि घेता येईल आपल्याला या बंगल्याच्या गच्चीवरून—"

" असं ? मग पाहूं या तरी वर जाऊन—"

अनघा उत्साहानें उद्गारली व लगेच जिन्याकडे वळली.

काल रात्रीं पचमढीला आल्यापासून तिच्या वृत्तींत एक प्रकारचा उल्हास संचारल्यासारखा झाला होता. तो तिचा उल्हास पाहून अभयला जसा आनंद तशीच भीतीहि वाटली. कारण त्या उल्हासाच्या भरात ती कोठें जाण्याचा आणि काय करण्याचा हट्ट धरील, याचा काहीं भरंवसा नव्हता. म्हणून तो तिला म्हणाला—

" आताच गच्चीवर जाण्याची काय घाई आहे, अनू ! काल सारा दिवस मोटारींत बसून काढावा लागल्यामुळं थकवा आलाय तुला. तेव्हां दोन दिवस अगदीं पडून राहा तूं न् मग पाहूंचं आपण हळूहळू एक एक स्थळ—"

" पण, आतां आपण कुठं बाहेर जातों आहोंत का, अभय ? फक्त एवढा जिनाच काय तो चढून जायचाय. आणि खरं सांगायचं, म्हणजे काल दिवसभर मी मोटारींत सारखी बसून होतें खरी, पण मला थोडासुद्धां थकवा आला नाहीं कीं पाठींतलं दुःख वाढलं नाहीं. उलट सारखं बसून राहल्यामुळं अंग मात्र अवघडून गेलंय—"

आणि ती तडक नचिकेतचा आधार घेऊन जिना चढावयाला लागली.

वर गेल्यावर आप्पाजींनीं पश्चिमेच्या बाजूला जो डोंगर दिसत होता, त्याच्याकडे बोट दाखवून म्हटलें—

" हा धूपगड, बाई. हा जो मोठा खडक आहे शिखरावरला, तो सिंहाकृति असल्यामुळे त्याला ' सिंह ' असं नाव ठेवलंय् साहेब लोकांनीं; न् त्याच्यासमोर डाव्या बाजूला असलेल्या या छोट्या खडकाला त्या सिंहापुढं बसलेलं कोंकरूं म्हणतात. साहेब मोठा डोकेबाज ! त्यानं सिंह आणि कोंकरूं याना समोरासमोर आणून बसवलें या धूपगडाच्या शिखरावर ! हा पलीकडला महादेव; न् त्याच्या पलीकडला तो जो उंच, ताशीव, उघडा-बोडका चौथरा दिसतो ना, तो चौरागडाचा. सकाळच्या कोंवळ्या उन्हांत. त्याच्या खडकात खोदलेल्या पायऱ्या न् धर्मशाळेच्या पांढऱ्या खोल्या कशा अगदीं स्पष्ट दिसताहेत पाहा. इथून नमस्कार केलात तरी महादेव पावेल तुम्हाला, बाई ! आमचा हा जंगलचा देव भोळ्या भावाचा भुकेला आहे. आणि तोच नेमका नसतो अलीकडल्या मंडळीजवळ ! माफ करा हं ! हा चौरागडाचा चौथरा म्हणजे भाविकानीं महादेवाला वाहिलेल्या त्रिशूळाचं बन आहे नुसतं ! मला वाटतं, बेलाच्या त्रिदळाऐवजीं त्रिशूळासारखं हत्यार शंकराला वाहून त्याची शस्त्रपूजा करण्याची प्रथा आपल्या भरत-खंडात फक्त इथंच असावी. पचमढीचे हे तीन पॉइंट्सच काय ते चार हजार फूट उचीवर आहेत. साहेबानीं शोधून काढून विलायती नांवं ठेवलेले बाकीचे सगळे पॉइंट्स दोन-तीनशें फूट खोल पाताळांत आहेत— "

" पण आपलीं महादेवाचीं तिन्हीं स्थळंहि खोलांतच आहेत ना !—"

अनघाच्या त्या प्रश्नानें आप्पाजी गडबडले.

पण अभय तिला चटकन् म्हणाला—

"हो. महादेव काय, जिथं वनश्री असेल, जिवंत पाण्याचे झरे गंगामाईची आठवण देत सदा झुळूझुळू वाहत असतील न् जिथं आत्मक्रीडेचं एकांत सुख मनसोक्त अनुभवायला मिळेल, तिथं रमतो, अनू! मग ती वनश्री पर्वताच्या मस्तकीं असो कीं त्याच्या तळवटीं असो. 'तो जंगलचा देव आहे' असं जें आप्पाजी आता म्हणाले, तें खरं आहे अगदीं. तो जंगलचा देव आहे आणि जंगली जमातींचाहि देव आहे. त्याचा त्रिशूळ, त्याचीं नागभूषणं, त्याचं भस्मलेपन, त्याचा स्मशानवास, त्याचे भूतपिशाचादि गण, त्यानं पांघरलेलं हरणाचं कातड, उणादि सूत्राचा आविष्कार करणारा त्याच्या हातांतला डमरू आणि त्रिभुवनाचा थरकाप करणारं त्याचं तांडवनृत्य हीं सगळीं त्याच्या अनार्यत्वाचीं लक्षणं आहेत; न् दुर्विकाराचं भस्म करणारा त्याच्या कपाळावरला ज्ञाननेत्र, जगताला पावन करण्यासाठीं त्याच्या जटाजटांतून वाहणारी गंगा, मानवतेला शांतिसुषमा देत त्याच्या मस्तकावर तळपणारा चंद्र आणि हलाहलानं पोळलेल्या कंठात त्यानं धारण केलेलं रामनाम हीं आर्यांनीं त्याला घातलेलीं आभरणं आहेत. अनार्य आणि आर्य याच्या सांस्कृतिक संकराचं महादेव हे प्रतीक आहे मूर्तिमंत. राम आणि कृष्ण हे दोघेहि लोकप्रिय देव आहेत आपआपल्या परीनं या भरतखंडातले; न् भारतीयांच्या सगळ्या चारित्र्याविषयींच्या कल्पना रामानं बनविल्या आहेत आणि त्याचं सगळं शृंगारिक जीवन कृष्णानं व्यापलंय. पण, हिमालयापासून रामेश्वरापर्यंत भारतातलीं सगळीं रम्य आणि भव्य स्थळं आपल्या अधिवासानं पुनीत करणारा न् वेदवेत्त्या ब्राह्मणापासून तों अक्षरशत्रु अंत्यजापर्यंत सर्व जातींना समदृष्टीनं जवळ करणारा जर कोणता राष्ट्रीय देव भरतखंडांत असेल, तर तो शंकर. त्याला 'महादेव' हें नांव खरोखरीच शोभतं!—"

"म्हणूनच त्याच्या दर्शनाची उत्कंठा लागली आहे मला—"

"पण घाई करणं इष्ट नाहीं, अनू. आप्पाजींनीं सांगितलं तेंच बरोबर. पंधरा दिवस तरी पूर्ण विश्रांति घेतल्याशिवाय तूं कोणतीहि हालचाल करतां कामा नयेस—"

" जशी आपली मर्जी ! पण पंधरा दिवसांनीं तरी मिळेल ना परवानगी बाहेर पडायला ? पण, आप्पाजी, काल रात्रीं नचिकेतनं बाबूगडापाशीं कोणा मंत्र्याच्या स्टेनोच्या मुलाला जाऊन भेटायची गोष्ट काढली होती, तो बाबूगड कुठं आहे हो ?--"

" हा पाहा तो बाबूगड, बाई—"

नचिकेतनें मध्येंच म्हटलें. तो पुढें म्हणाला—

" या टेकडीवरून सारी पचमढी फार सुंदर दिसते, बाई—"

" पण किती विचित्र नाव आहे या टेकडीचं !—"

" त्याचं कारण असं आहे बाई, कीं या टेकडीच्या पायथ्याशीं गव्हर्नरची कोठी आणि बिचाऱ्या बाबूंचे क्वॉर्टर्स आहेत. त्यामुळं ' बाबूगड ' हें नाव पडलंय या टेकडीला ! महादेवानं पायथ्याशीं वास्तव्य केल्यामुळं जसा महादेवाचा डोंगर, तसं बाबूंचं पायथ्याशीं ठाणं असल्यामुळं बाबूगड—"

" कारकुनाच्या नावानं ओळखलं जाण्याचं असलं अजब भाग्य हिंदुस्थानातल्या बहुधा दुसऱ्या कोणत्याहि टेकडीला लाभलं नसेल—"

" पण त्यात गैर काय आहे, बाई ? कामगार आणि कारकून हे दोन आधारस्तंभ आहेत जगाच्या संसाराचे ! कामगार देशांतले कारखाने चालवतो न् कारकून देशाचा कारभार हाकतो. मी तर असं म्हणेन, कीं किसान, कामगार, कारकून आणि शिक्षक या चार खांबांवर आजच्या आपल्या संसाराचा सारा डोलारा उभा आहे. यांतला एक खांब काढून घ्या, म्हणजे हा डोलारा कोसळलाच म्हणून समजा ! तेव्हां संसाराच्या एका आधारस्तंभाच्या नांवानं जर एखादी टेकडी ओळखली गेली, तर त्यात वावगं काय आहे खरोखरी ? किसान, मजदूर, मास्तर किंवा बाबू या कांहीं हलक्या चिजा समजण्याचें कारण नाहीं आजच्या श्रमजीवी दुनियेंत—"

आप्पाजींच्या वक्तृत्वाचा हा ओघ कांहीं लवकर थांबला नसता; पण तितक्यांत निरुपमा गडबडीनें वर येऊन म्हणाली—

" अक्का, चहा घ्यायला चलतां ना ? टेबलावर आणून ठेवलंयू सगळं--"

" आम्ही आलोंच, निरूताई; तुम्ही हिला घेऊन पुढं व्हा—"

अभयनें तिला म्हटलें.

त्याबरोबर निरुपमा अनघाला आधार देऊन हळूहळू जिना उतरूं लागली; व नचिकेतहि त्याच्या मागोमाग खालीं गेला.

त्या खालीं पोंचलेल्या पाहून अभय जिना उतरावयाला लागणार, तोंच आप्पाजींनीं त्याच्या खांद्यावर हळूच चापट मारून विचारलें—

" डॉक्टरसाहेब, आमच्या निरूकडे लक्ष आहे ना आपलं ?—"

त्याचा तो प्रश्न कानावर पडताच अभय चमकला आणि त्यांच्याकडे वळून त्यानें विचारलें—

" माझं लक्ष ? आणि तें कशासाठीं ?—"

" नाहीं म्हटलं, तिच्या लग्नाची कांहीं खटपट करता आहात ना आपण दोघं ? आपण मनावर घेतलंत तर सहज जमून जाईल. आपल्या कॉलेजात हवे तितके अविवाहित प्रोफेसर असतील—"

आप्पाजींनीं हंसत हंसत तपकिरीची चिमूट नाकांत कोंबून, आपलें शेंडा नसलेलें नाक दोन बोटाच्या चिमटींत धरलें आणि त्यातून चूस् चूम् असा आवाज काढीत ते जोरानें घुसळलें. त्याच्या त्या हावभावावरून ते शिंक काढून आपल्याला पावन करतात कीं काय, अशी भीति सारखी अभयला वाटत होती. पण उपरण्यानें नाक साफ करून ते पुढें म्हणाले--

" अलीकडे नस्य सुटल्यामुळं पडशाचा उपद्रव फार व्हायला लागला आहे, डॉक्टरसाहेब ! मला वाटतं, आपण उभयतांनीं मनापासून प्रयत्न केलात, तरच लग्न जमेल निरूचं. अहो, तीच मुळीं लग्नाला तयार नाहीं. नाहीं तर एव्हांना चार बाळंतपणं होऊन गेलीं असतीं तिचीं ! अविवाहित राहण्यांत काय मजा वाटते या अलीकडल्या पोरींना, समजत नाहीं !—"

त्यांनीं मिस्किलपणानें हास्य करीत अभयकडे रोखून पाहात तें शेवटलें वाक्य उच्चारलें.

पण, अंतःकरणांत उसळलेला संतापाचा कढ आवरीत अभयनें त्यांना शांतपणानें उत्तर दिलें--

"आम्ही निरूताईंच्या लग्नाच्या खटपटींतच आहोंत, आप्पाजी!--"

"छान, छान! तिनं 'हो' म्हणतांच मुहूर्ताचीसुद्धा वाट पाहूं नका आपण. ताबडतोब बार उडवून द्या. अहो, तिनं अद्याप लग्न न केल्यामुळं तिच्या खालचे नंबर अडले आहेत आमच्या घरातले. आपण पाह्यलंच असेल काल रात्रीं तिच्याखालीं आणखी तीन मुली आहेत रागेनं माडवाच्या तारणाला येऊन भिडलेल्या. पण, तिला कांहीं जाणीवच नाहीं आपण अविवाहित राहून आपल्या पाठच्या बहिणींचं किती नुकसान करतों आहोंत याची! ती नागपूरला स्वतंत्र राहते, नोकरी करून पैसा मिळविते, नाटकाबिटकांत कामं करते. त्यामुळं मजा आहे तिची! पण घरात कुचंबत पडलेल्या या पोरींनीं काय करावं? त्यांना कॉलेजांत घालायला पैसाहि नाहीं मजजवळ. आतां मुलांना शिकवूं का मुलींच्या शिक्षणावर पैसा खर्च करूं? पण आमच्या या एलिझाबेथ राणीला कांहीं कल्पना नाहीं आपल्या जबाबदारीची. आतां आणखी किती दिवस कुंवार राहणार ही? या वयांत नवऱ्याशिवाय स्त्री म्हणजे चंद्राशिवाय रात्र!--"

• • •

पचमढीचे ते त्यांचे पहिले पंधरा दिवस अतिशयच सुखांत गेले.

इतके सुखांत कीं, अनघाच्या डोळ्यातली मंदावलेली लकाकी आणि कांतींतला लोपलेला तजेला पुन्हा परत आल्यासारखा अभयला वाटला. म्हणून त्यानें तिला म्हटलें देखील--

"अवघ्या आठ दिवसांत तुझ्या प्रकृतींत पडलेला फरक पाहून नवल वाटतं मला--"

" नवल वाटण्यासारखं काय आहे त्यात एवढं, अभय ! इथं आल्या-पासून मला आपण सातारला किंवा महाबळेश्वरला आल्यासारखं वाटतंय आणि त्यामुळच खरोखरी इतका हुरूप आला आहे माझ्या मनाला. सकाळ-संध्याकाळ हे डोंगर दृष्टीस पडले, कीं विलक्षण ओढ लागते माझ्या जिवाला. सारखं असं वाटतं कीं, लहानपणीं जसं आपण अजिमताऱ्यावर, यवतेश्वरावर किंवा सज्जनगडावर धावत उड्या मारीत जात असूं, तसं या महादेवावर आणि धूपगडावर चढून जावं—"

आणि तें अनघाचें म्हणणें अगदीं खरें होतें. तिचा पिंड डोंगराळ हवेंतला होता; तिचें रक्त दऱ्याखोऱ्यातल्या पाण्यानें पोसलेले होतें; व तिच्या मनाचा विकास आकाशाचा जो अथाग नीलिमा डोंगर-दऱ्यांना कवळून सान्त—अनन्ताचे सुरम्य खेळ खेळतो, त्याच्या प्रसन्न परिसरांत झालेला होता. त्यामुळें रोज सकाळीं उठल्यावर, ती डोंगराचीं केव्हां झाडींनें तर केव्हा ढगानीं झाकलेलीं शिखरें पाहिलीं, म्हणजे तिला वाटे, केव्हा एकदां आपण या शिखरावर जाऊन भोंवतालची शोभा पाहूं ! पचमढीच्या पठारावरलीं तीं शिखरें आणि त्या टेकड्या, ती झाडी आणि ते झरे जणूं तिला खुणावीत होते, पालावीत होते, आपल्या विविध रूपानीं मोह पाडीत होते आणि विविध नादानीं साद घालीत होते—

पण तिचा अगदीं निरुपाय होऊन गेला होता. पंख जखमी झालेले पांखरूं जसें उडण्यासाठीं जागच्या जागीं फडफडतें आणि तडफडतें, तशी तिच्या मनाची तगमग पचमढीला आल्या दिवसापासून सारखी सुरू होती.

अभय अहोरात्र तिच्या जवळ असे. पण त्याचें तें सान्निध्य म्हणजे तिला या वेळीं सुखाची नजरकैद होऊन बसली होती.

त्यानें तिचा सगळा दिनक्रम असा ठरविला होता कीं, तिचा जास्तींत जास्त वेळ उघड्या हवेंत जावा. त्या बंगल्याच्या प्रशस्त आवारांत मुख्य कमानीखालीं बगीचात आणि हिरवळीवर खुर्च्या आणि खाटा ठेवून आराम करण्याची व्यवस्था केलेली होती. सकाळीं उठल्या-बरोबर वाऱ्याच्या गार झुळुकांमुळें अधिकच सौम्य भासणारें सूर्याचें कोंवळें

ऊन अंगावर घेत तीं बगीचांत चहापान करीत असत; व दुपारीं जेवण झाल्यावर व्हरांड्यांतल्या पलंगावर पडून अनघा विश्रांति घेत असे. सायंकाळीं मोटारींतून तीं दोघे सरकारी बगीचांत फिरायला जात. तेथें गेल्यावर रॉसबेरी, स्ट्रॉबेरी, मलबरी, पीच, प्लम्स, आंबा, जाभूळ वगैरे ताज्या फळांचा उपाहार आप्पाजी त्याना देत; व बकुळ, मोगरा आणि चमेली यांच्या फुलांच्या तिपदरी वेण्या घालून अनघाची सुमनशृंगाराची हौस निरुपमा पूर्ण करीत असे.

पण त्या सगळ्या सुखातहि अनघाचें मन अतिशय अस्वस्थ, अतिशय उत्कंठित होतें. ते डोंगर, त्या दऱ्या, ती झाडी आणि ते झरे कानाना ऐकूं न येणाऱ्या पण मनाला ओढ लावणाऱ्या आपल्या निःशब्द आवाहनानें तिला सारखे साद घालीत होते. दशदिशाना मुखरित करणारा त्याचा तो अनाहत ध्वनि तिच्या हृदयातल्या सगळ्या बाळपणच्या स्मृति आणि संस्कार सारखे चाळवींत होता.

शेवटीं एक दिवस चहा घेतांना ती अभयला म्हणाली—

" आज वैशाखी पूर्णिमा आहे. तुम्हीं कांहीं म्हटलंत तरी मी आज घरीं बसून राहणार नाहीं, अभय ! आज तुम्ही एक तरी पचमढींतलं स्थळ दाखवलं पाहिजे मला !—"

पण अभय कांहीं बोलला नाहीं.

" तीन आठवडे होतील आता आपण इथं आल्याला. माझी प्रकृति चांगली सुधारली आहे न् पाठींतलं दुःखहि थांबलंय बहुतेक. तरी तुम्हीं मला कुठं जाऊं देणार नाहीं का ? आता जर माझी प्रकृति पुन्हा बिघडली, तर ती मनाच्या अस्वस्थतेमुळंच बिघडेल—"

अनघा अगदीं निकरावर येऊन बोलत होती. तेव्हां अभय तिला अगदीं शांतपणानें म्हणाला—

" मोटारींतून तुला कुठेंहि फिरायला न्यायला हरकत नाहीं माझी. पण पायीं चालायची गोष्ट मात्र काढूं नकोस अगदीं—"

" का बरं ! रोज रात्रीं नाहीं का आपण फिरायला जात थोडा वेळ ! मोटारींतून तर आल्या दिवसापासून हिंडतों आहोंत आपण. मग थोडसं चालायला काय हरकत आहे आतां ! आजपासून मी इथलं एक एक स्थळ पाहायला सुरुवात करणार आहें, अभय !--

तें शेवटलें वाक्य उच्चारतांना तिच्या आवाजांत एकदम आलेला कणखरपणा अभयला जाणवला. तरीहि तो कांहीं बोलला नाहीं.

तेव्हां निरुपमा तिची समजूत घालण्यासाठीं म्हणाली—

" आप्पाजींनीं इत्ती मागवलाय मुद्दाम तुला महादेवाला जाता यावं म्हणून. तो येईलच चार-पाच दिवसात. धूपगडावर तुला खुर्चीवरून जातां येईल; न् जटाशंकरला जाऊं आपण लवकरच--"

" लवकरच नाहीं. आज, अगदीं आजच जाऊं. आज भगवान् बुद्धाची जयंति आहे. तेव्हा कोणत्या तरी पवित्र स्थळाचं दर्शन घेतल्याशिवाय दिवस बुडूं देणार नाहीं मी आजचा. तुम्ही रोज ट्र्‌यनॅम् पूलवर पोहायला जाता न् मी तेवढी घरीं बसून रहाते—"

" पण मीं एकदा तरी पोहायला गेलोंय का इथं आल्यापासून, अनू ! सारखा तर बसून आहे तुझ्या जवळ—"

अभयनें तिला उत्तर दिलें.

ती क्षणैक स्तब्ध होती. नंतर त्याला म्हणाली—

" आज मला जटाशंकरला न्या तुम्ही. आप्पाजी म्हणत होते, सगळ्यांत जवळचं न् सुगम स्थळ आहे तें--"

" निरूताई, खुर्चीची व्यवस्था करा आप्पाजींना सांगून. आज जटाशंकरला जाऊं आपण संध्याकाळीं हिला घेऊन. पण लक्षात ठेव, अनू ! तिथून परत आल्यावर जर का पाठींतलं दुःख वाढलं, तर पुन्हा आठ दिवस पडून रहावं लागेल बिछान्यावर—"

" तें पाहूं. पण आज आधीं जटाशंकरला तर जाऊं या--"

सायंकाळीं पाचच्या सुमारास तीं मोटरनें जटाशंकरला जावयाला निघालीं. जटाशंकरकडे जाणारी पायवाट आल्यावर त्यानें मोटर सडकेवर उभी केली; व तेथून सुमारें एक फर्लांग अनघा निरुपमाचा आधार घेऊन त्याच्याबरोबर हळूहळू चालत गेली. तेथें डोंगरातील एका प्रचंड खडकाच्या कपारींत थाटलेलें बिऱ्हाड पाहून तिला नवल वाटलें. त्या कपारीच्या समोरचें लहानसें शेत नागरलेलें होतें; व त्यावर घातलेले पेटवण धुमसून त्याचा त्या स्वच्छ, शीतल वातावरणात पसरलेला धूर डोळ्याना त्रास देत होता.

" हीं माणसं कशीं रहात असतील ग इथं ?——"

" का ? इथं काहीं भय नाहीं तेंडव्याचं वगैरे. इथून शहर अगदीं हांकेवर आहे, अक्का——"

" तें खरं आहे. पण आपण या उताराला लागल्यापासून एका बाजूला उंच पहाड न् दुसऱ्या बाजूला दाट झाडी याच्याशिवाय काहीं दिसत नाहीं दुसरं. म्हणून मनात आलं माझ्या——"

अभयनें तिला तिथेच खुर्चीवर बसावयाला सांगितलें. कारण तेवढ्या चालीमुळें तिला दम लागला होता.

तेथून सुमारें एक मैल सारखा उतार होता. ती पाऊलवाट दोन डोंगराच्या उंच, खडकाळ तटामधून गेली होती; व त्या खडकाना फुटलेल्या झिरप्याचा जागोजाग कोरडा पडलेला ओहोळ तिच्याशीं समातर वहात होता. जसजसा उतार खालावत गेला, तसतसा रस्ता अरुंद होत जाऊन दोहों बाजूंचे उंच पहाड आणि त्यांवर वाढलेलीं उंच झाडें याच्यामागें दडलेला सूर्य दिसेनासा झाला. वेलाच्या जाळीनें झाकलेला जो एक प्रचंड ताबूस काळसर पाषाण त्या ओहोळाच्या मधोमध उभा होता, त्याला पाहून हा कोणी असुर महादेवाला प्रसन्न करण्यासाठीं तप करीत बसला आहे असे वाटे; तर डोंगराच्या कड्यावरून खालीं झुकलेल्या निष्पर्ण कुंभवृक्षाच्या पाढऱ्या फटक हिडीस फाद्या पाहून त्या प्रच्छाय तरुराजींतला हा पंडुरोगी उद्वेगानें आत्महत्या करावयाला प्रवृत्त झाला आहे कीं काय, असा भास होई. त्या

खडकाळ पहाडाच्या शिलाप्रस्तरातील तांबूस, निळसर, पांढुरक्या, मोरपंखी वगैरे निरनिराळ्या रंगांच्या छटा संधिप्रकाशात उजळून दिसत होत्या.

पाऊलवाट संपून खाली जटाशंकराच्या गुहेकडे जाणाऱ्या पायऱ्या जिथें सुरू होतात, तिथें विलायती झाडांचा एक लहानसा बगीचा केलेला होता; व भाविकांना विश्रांति घेण्यासाठीं छोटी धर्मशाळाहि बांधलेली होती. तेथें येताच अनघा खुर्चीवरून खालीं उतरली; व निरुपमाचा आधार घेऊन एक एक पायरी उतरत गुहेजवळ आली. तों समोर चबुतऱ्यावर शेंदूर माखलेला त्रिशूळ, बेलफुलें वाहिलेले शिवलिंग आणि पार्वतीचा पितळी मुखवटा तिच्या दृष्टीस पडला. त्याबरोबर ती नचिकेताला म्हणाली—

"का रे नचिकेत, तूं ज्या प्रचंड जटाजूटाचं एवढं वर्णन केलं होतंस, तो जटाशंकराचा जटाजूट कुठं आहे ? हाच का जटाशंकर ?— "

"इतक्या अधीर होऊं नका बाई, तुम्ही. जटाशंकराचं दर्शन इतकं सहज घडणारं नाहीं. ही फक्त दर्शनी देवता आहे. खरा महादेव या गुहेच्या आंत उतरून नम्रतेनं पाण्यातून वाट काढीत जावं, तेव्हां दर्शन देतो भाविकांना—"

आणि त्यानें तेथें उभ्या असलेल्या वृद्ध पुजाऱ्याला दिवा घेऊन वाट दाखवायला सांगितलें. त्याच्या मागोमाग नचिकेत, निरुपमाचा आधार घेतलेली अनघा आणि अभय अशी सर्व मंडळी गुहेंत उतरलीं.

पुजाऱ्याच्या हातातल्या त्या मिणमिणत्या दिव्याच्या जोडीला नचिकेतनें आपल्या हातांतल्या मोठ्या थोरल्या उद्दीपिकेच्या प्रकाशाचा प्रखर झोत त्या गुहेंत फेकला; व खालीं वाकून आपल्या मागून येत असलेल्या अनघाला म्हटलें—

"बाई, तुम्ही डोकं वांकवून ओणव्यानं अगदीं सावकाश या. वरतीं सगळा खडक आहे. डोकं जरा जर वर केलं, तर कपाळमोक्षच व्हायचा. हं, पाण्यातून सावकाश या अगदीं. या पहा शंकराच्या जटा—"

आणि खरोखरीच नचिकेतानें गुहेंत फेकलेल्या त्या प्रकाशाच्या झोतांत उजव्या बाजूच्या कोपऱ्यातल्या वरच्या खडकाला आलेला जटाचा आकार

अनघाच्या दृष्टीस पडला. खालच्या खडकाला जीं लहान लहान टेंगळें आलेलीं होतीं, तीं सारीं शिवलिंगें; व वरच्या खडकाला जे लांब लांब जाड झुबके आलेले होते, त्या साऱ्या शंकराच्या जटा! पायाखालीं तर थंडगार पाणी होतेंच, पण वरूनहि सारखें पाणी ठिबकत होतें. उद्दीपिकेच्या झग-झगीत प्रकाशात त्या अजस्र जटाजूटाच्या साऱ्या रेषा अगदीं स्पष्ट दिसत होत्या. त्यातून ठिबकणारे पाण्याचे थेंब म्हणजे त्या जटाजूटात दडलेल्या चंद्रकलेंतून स्रवणारे जणूं अमृतबिंदुच! आणि खडकांत कोंडलेल्या जलौघाचा जो खोल आवाज त्या कपारींतून सारखा येत होता, तो म्हणजे त्या जटाजूटात गुरफटलेल्या नागाचा जणू आर्त रवच!!

तें भव्य दृश्य पाहून परत येत असता डाव्या बाजूच्या कोपऱ्यांत प्रका-शाचा झोत टाकून नचिकेतनें म्हटलें—

"हा पाहा बाई, केवढा प्रचंड मगर जटाशंकरापुढें लोटांगण घालून पडलेला आहे तो--"

अनघानें चमकून वळून पाहिलें, तों मगराच्या आकाराचा भयानक कातळ त्या बाजूला तिला दिसला.

"हे सगळे खडकात कोंडल्या गेलेल्या पाण्याचे खेळ आहेत, अनू–" अभय त्या मगराकडे पाहून हंसत हंसत म्हणाला.

"शतकानुशतकं पाण्याचे आघात खडकावर सतत होऊन ज्या या आकृति बनल्या, त्यांचे नंतर देव बनवले माणसांनीं! आपलीं सगळींच स्वयंभू दैवतं अशा प्रकारचीं आहेत, हें महाबळेश्वरला पाहिलेलं नाहींस का तूं?—"

"पाहिलं आहे. पण जटाशंकर खरोखरीच अद्भुत वाटतो. इतक्या हट्टानं इथं आल्याचं सार्थक झालं आज--"

ती डोक्यावर पडलेले पाण्याचे थेंब पदरानें टिपीत आनंदानें उद्गारली.

"पण माझ्या मनांत मात्र हा जटाशंकर पाहिल्यावर निराळीच कल्पना येते अक्का, नेहमीं—"

" कोणती ग ?—"

" मला शेषशायी भगवानावर छत्र धरणाऱ्या शेषाच्या फणाची आठवण होते या जटा बघितल्यावर—"

" आहे खराच आकार थोडासा तसा, ताई—"

आणि त्या दोघी गुहेतून वर आल्या.

खुर्चीवर बसताना अनघानें नचिकेतला विचारलें—

" आता रात्रीं काय पाह्यचं आज, नचिकेत ?—"

" रात्रीं हंडीकोह पाहता येईल आपल्याला. इथले लोक 'हंडीखो' म्हणतात त्याला. पण कॅ. फॉरसिथनं दिलेलं 'अंधकोह' हेंच नाव समर्पक वाटतं. आजच्या चादण्यात और शोभा दिसेल त्याची. आपल्या बंगल्यापासून मैलभर असेल फार तर—"

" मग जेवल्यावर लगेच निघायचं बरं का ! निरूताई, तूं आज पचमढी क्लबात गेली नाहींस तर चालणार नाहीं का ?—"

" अग, न चालायला काय झालं, अक्का ? रात्रीं तुम्ही दोघं फिरायला जाता म्हणून मी क्लबात जातें थोडा वेळ मिसेस् पवाराच्या बरोबर—"

" कोण ग या मिसेस् पवार ?—"

" अग, त्या नॅशनल कॅडेट् कोरच्या छावणीसमोर पिवळ्या बंगल्यांत ते लेफ्टनंट धैर्यशीलराव पवार राहतात ना, त्याच्या पत्नी. त्याचं माहेर बडोद्याचं आहे. मोठ्या गोड न् खेळकर आहेत. आतां घरीं गेल्याबरोबर मी चिठी पाठवतें गुलाबबाईंना 'आज मला क्लबात येणं शक्य होणार नाहीं' म्हणून—"

" पण तूं क्लबात जायला हरकत नाहीं, निरूताई. आपण रात्रीं अकराला निघूं. चंद्र मध्यावर आलेला असेल त्या वेळीं. त्याच्या प्रकाशात तो धळ तळापर्यंत स्पष्ट दिसेल अगदीं—"

"हें पहा नचिकेत, घाई नाहीं करायची बिलकूल. आतां इथून घरीं गेल्यावर प्रथम हिला कसं काय वाटतं तें पाहूं न् नंतर अंधकोह पाह्यला जायचं कीं नाहीं तें ठरवूं—"

इतका वेळ त्यांचें संभाषण मुकाट्यानें ऐकत असलेला अभय जरा रागानेंच म्हणाला.

पण, त्याचा तो राग जणूं आपल्या लक्षातच आला नाहीं, अशा आविर्भावानें अनघानें नचिकेतला विचारलें—

"का रे नचिकेत, मोटर अगदीं थेट कठड्यापर्यंत जाते नाहीं का त्या घळीच्या ?—"

"हो, पाव फर्लांगसुद्धां चालावं लागणार नाहीं तुम्हाला, बाई—"

"मग काय हरकत आहे रात्रीं तिथं जायला, अभय ? नाहीं तरी रोज रात्रीं जेवल्यावर आपण हिंडतोंच थोडा वेळ. त्याच्याऐवजीं आज ती घळ पाह्यला जायचं—"

पण अभय काहीं बोलला नाहीं. तो मुकाट्यानें पायऱ्या चढावयाला लागला.

ते सडकेवर मोटरपाशीं येऊन पोंचले, त्या वेळीं वैशाखीच्या चंद्राचें पिवळसर फिकट बिंब हळूहळू क्षितिजावर येत होतें.

त्याच्याकडे बोट दाखवून नचिकेत म्हणाला, "तो पाहा बाई, तुमच्या संस्कृत कवींनीं वर्णन केलेला चंद्रावरला हरिण किती स्पष्ट दिसतोय तो—"

अनघानें चटकन् त्या पूर्ण बिंबाकडे पाहून हात जोडले आणि ती त्याला म्हणाली—

"अडीच हजार वर्षांपूर्वीं याच वैशाखीच्या चंद्रानें लुम्बिनीवनांत भगवान् बुद्धाचा जन्म झालेला पाहिला. आपल्या संस्कृत कवींनीं पुष्कळ मजेदार न् शृंगारिक उत्प्रेक्षा केल्या आहेत चंद्रावरल्या या डागावर. पण पूर्ण चंद्राच्या

बिंबावर उदयाच्या वेळीं अगदीं सुस्पष्ट दिसणारी ही आकृति बघितली, म्हणजे मला मात्र नेहमी मातेच्या गर्भाशयात मोहनिद्रा घेत असलेल्या जन्मोत्सुक शिशूची कल्पना सुचते, नचिकेत !—"

• • •

जटाशंकरहून परत येतानाच अनघानें असा निश्चय केला होता का, आज पुनवेच्या चादण्यांत, काहीं झालें तरी, अंधकोह पाहून घ्यावयाचा.

म्हणून, घरीं आल्यावर जेव्हा अभयनें तिला बिछान्यावर पडून राहण्याचा आग्रह केला, तेव्हा ती हंसत हंसत त्याला म्हणाली—

" तुम्ही मला तान्हं मूल समजून थोपटून निजवीत नाहीं, हें नशीब समजतें मीं माझं ! सारखं बिछान्यावर पडून राहल्यानंसुद्धा अंग अवघडतं, हें कसं कळत नाहीं तुम्हाला, अभय ? आजारी माणसाची शरीरस्थिति न् मनोवृत्ति या दोन्हीहि कधीं लक्षांत यायच्या नाहींत तुमच्या—"

" खरं आहे तुझं म्हणणं, अनू. पण त्याला माझा काय इलाज आहे ? समजायला लागल्यापासून मी कधीं आजारी पडलोंय असं आठवत नाहीं मला. त्यामुळं मला अगदीं समरस होता येत नाहीं तुझ्याशीं तुझ्या या सध्यांच्या स्थितींत. म्हणून अलीकडे मला असं वाटायला लागलंय कीं, तुझ्या दुखण्याचा थोडा तरी वाटा माझ्याकडे यावा—"

" नको ग बाई ! तेवढंच संकट काय तें कमी आहे आपल्या संसारांत ! मीं कितीहि आजारी असलें, तरी सकाळीं उठल्यावर तुमचं सुंदर शरीर आणि प्रसन्न मुख पाहल्यावर मला विसर पडतो माझ्या सगळ्या वेदनाचा; न् त्यामुळंच कदाचित् वाढलं तर आयुष्य वाढेल माझं—"

बोलतां बोलतां तिनें त्याचा हात आपल्या हातांत घेऊन आपल्या किंचित् उललेल्या उष्ण ओंठांवर दाबला. तत्क्षणींच त्याच्या अंगावर रोमांच उठले; व तिचें तोंड कुरवाळून तिच्या भांगाच्या रेषेला त्यानें ओठांनीं स्पर्श केला.

रात्रीं जेवण झाल्यावर त्यानें तिला रोजच्याप्रमाणें फिरायला जाण्याबद्दल विचारलें. त्याबरोबर ती त्याला म्हणाली—

"आपल्याला आज अकरा वाजता अंधकोह पाहयला जायचंय ना! मग एकदमच बाहेर पडूं—"

"मग जायचंच अगदीं!—"

"हो. इतकं सुंदर चांदणं पडलेलं असताना घरीं बसून राह्यचं का आपण!—"

"पण खरं सांग मला, तुला कांहींसुद्धा त्रास झाला नाहीं आजच्या संध्याकाळच्या दगदगीचा!—"

"नाहीं, अगदीं नाहीं —"

"मग जाऊं या—"

रात्रीं अकरा वाजता ते मोटारींतून त्या घळीकडे जावयाला निघाले.

वैशाखीच्या प्रखर चांदण्यानें या वेळीं सारें स्थिरचर अगदीं उजळून गेले होतें. एरवीं कठोर, निळसर दिसणाऱ्या डोंगराच्या क्षितिजाशीं समांतर असलेल्या शिखररेषानासुद्धा त्या धवल प्रकाशात एक प्रकारची मृदु पांडुरता आली होती. आकाशहि आपला स्वाभाविक नीलिमा टाकून देऊन इतकें स्वच्छ, शुभ्र आणि सतेज दिसत होतें कीं, स्वर्गंगेला पूर येऊन तिचा तेजोरस साऱ्या द्यावापृथिवीवर ओसंडला आहे कीं काय, असा भास होत होता! पठारावर मध्येंच कुठें तरी उभ्या असलेल्या प्रचंड शिळा चंद्रकिरणातलें अमृत पिऊन सुस्त पडलेल्या आदियुगीन अजस्र श्वापदा सारख्या दिसत होत्या. पुनवेच्या त्या चंदेरी मायेंत वस्तुमात्राचें स्वरूप आणि स्वभाव हीं दोन्हीं जणूं बदलून गेलीं होतीं. चंद्राच्या सन्निध असलेली विशाखा त्याच्या रम्य रश्मिजालांत लोपून गेली होती. पण त्यांच पाठलाग करीत मागोमाग येत असलेला गुरु आणि तें दृश्य पाहून अधोमुख झालेले सप्तर्षि हे मात्र क्षितिजावर तळपत होते. वाऱ्याच्या गा झुळका त्या शीतल, किंचित् आर्द्र हवेंत कोंदलेले नाना प्रकारचे गं आणि थबकलेले नाना प्रकारचे नाद स्वच्छंदानें वाहून आणीत होत्या मध्येंच एखादे वेळीं कोण्या प्राण्याचें आक्रंदन कानांवर आलें, म्हणजे त्य

दुरून सोज्वळ वाटणाऱ्यां वृक्षराजींच्या उदरांत या वेळीं काय चाललेलें असेल, या कल्पनेनें अंगावर कांटा उभा राही !

सडकेच्या कडेला अचानक सुरू झालेली ती प्रचंड घळ म्हणजे त्या निर्मनुष्य जंगलानें उघडलेला आपला जबडाच होता जणूं !

त्या घळीच्या तोंडाशीं असलेल्या कठड्याला ओठंगून जेव्हां अनघानें खालीं पाहिलें, तेव्हां तिच्या अंगाचा थरकाप झाला अंधकोहाचें झाडीनें अर्धवट झाकलेलें अंतरंग चांदण्यांत स्पष्ट दिसत होतें. तळाशीं असलेल्या सोनचाफ्याच्या बनाचे सुगंधी उसासे नाकाला जाणवत होते; व डोळयांना न दिसणाऱ्या पाण्याचा गोड खळाळ कानावर येत होता. घळींत वाढलेल्या उंच आम्रवृक्षांनीं काहीं ठिकाणीं चंद्रकिरण आपल्या माथ्यावर झेलल्यामुळें त्यांतल्या अमृताचें पान करण्यासाठीं आसुसलेली इतर छोटीं झाडें जणुं कुरकुरत, कण्हत आहेत, असा भास त्या घळींतून मधूनच येणारे चमत्कारिक आवाज ऐकून होई !

तें दृश्य पाहतां पाहतां मध्येंच अनघानें अभयला म्हटलें—

" ही घळ म्हणजे मृत्यूचं भयानक पण रमणीय मुख आहे जणूं कांहीं ! दुःखसंतप्त सीतादेवीला आपल्या पोटांत घेण्यासाठीं भूमातेनं आपली जी कूस उघडली होती म्हणतात, ती अशीच असेल का ? घळीच्या त्या टोंकाचा तो आकाशाला अभिमुख असलेला त्रिकोण पाहिलात का तुम्हीं ? जणूं मृत्यूच्या काळोख्या मुखांतून स्वर्गाकडे जायचं उज्ज्वल द्वार आहे तें !—"

ती अगदीं तन्मय होऊन अंधकोहाचें तें विशाल उन्नत मुख पाहात होती. पण, तितक्यांत तिच्या मनांत काय कल्पना आली, कोण जाणें ! तिनें अंग शहारल्यासारखें करून त्याला विचारलें—

" खरंच असेल का हो, या अंधकोहाच्या तळाशीं तो महादेवानं हाकून दिलेला नाग ?—

" हो तर ! यमुनेच्या डोहांत कालिया रहात होता ना, तसा इथं वासुकि रहात असावा. ' बायका कितीहि शिकल्या तरी भोळसट आणि भेदरट

असतात,' असे जें म्हणतात, तें कांहीं खोटें नाहीं, अनू ! अग, कुठल्याहि खबदाडींत नाग न् साप असतात तसेच इथंहि असतील– "

" खरंच अक्का, आपल्या या बंगल्याचा तो गोंड रखवालदार फगवा मला काल सांगत होता की, पचमढीच्या कोर्कू जहागिरदाराचे पूर्वज नाग होऊन राह्यले आहेत या घळींत—"

" आणि त्यानंच ताई, मला असंहि सांगितलं कीं, आप्पासाहेब भोसल्यानी महादेवाच्या डोंगरात पळून जाताना, इंग्रजाच्या हातीं लागू नये म्हणून, भोसल्याचा सगळा खजिना या अंधकोहात लपवून ठेवला होता–"

" छे, छे ! फगवानं अपुरी माहिती दिली तुला, नचिकेत ! अरे, रघूजी भोसल्यानं बंगाल्यातून जी अपार संपत्ति लुटून आणली, तीच मुळीं या अंधकोहात आणून ठेवली सगळी ! म्हणून तर अडाणी लोक ' हंडीखो ' म्हणतात या घळीला ! संपत्तीचे मोठमोठे हंडे ठेवलेले आहेत या घळीच्या तळाशी ! खरोखरी ही घळ म्हणजे जामदारखाना आहे भोसल्याचा ! आणि, हे जे काजवे चमकल्यासारखे दिसतात ना तुला, ते काजवे नसून त्या जामदारखान्यातल्या रत्नांचा चमचमाट आहे बघ हा !—"

" तुमच्या शास्त्रीय बुद्धीला दंतकथा, पुराणं न् इतिहास हीं सगळीं भाकड वाटतात नाहीं तरी. आप्पासाहेबानीं जर पळून जाता जाता इथं वाटेंत आपला खजिना ठेवला असला, तर त्यात काय नवल आहे हो ?–"

" हो ! आणि वासुकि त्या खजिन्याचा रक्षक ! आता परत फिरूं या आपण, अनू नाहीं तर त्या खजिन्याचा शोध लावण्यासाठीं घोरपडीला दोर बांधून या घळींत उतरायचा मोह पडेल नचिकेतला ! चला रे लवकर–"

आणि अभय परत फिरला.

त्यामुळे इतरानाहि तें विलक्षण दृश्य पाहाण्याचा मोह सोडून देऊन परत फिरावें लागले.

निरुपमाच्या खांद्यावर हात ठेवून अनघा हळूहळू मोटरजवळ येत असत समोरच्या बाजूला बोट दाखवून नचिकेत म्हणाला——

" तो पाहा सिंह कसा ऐटींत बसलाय, बाई--"

आणि त्यानें आपल्या हातातल्या उद्दीपिकेच्या प्रकाशाचा झोत हंसत हंसत त्या सिंहाकृतीवर पाडला.

ते एक तोडलेल्या झाडाचें पिवळसर खोड चंद्रप्रकाशात खरोखरीच बसलेल्या सिंहासारखे दिसत होते. त्याच्याकडे पाहून अनघा उद्गारली--
" अग बाई, खरच सिंहासारखा दिसतोय हा झाडाचा बुधा. अंधाऱ्या रात्रीं एकट्या दुकट्या जाणाराला भीति वाटेल नाही, ताई ?--"

" हं! चला, चला लवकर. नाही तर तो सिंह झेप घालील तुमच्यावर ! हवेतला गारठा आपल्याला झोंबेल याच काहीं भान राहिलेलं नाही तुला, अनू--"

अभयने मोटारींत बसून कर्णा वाजवला. त्याबरोबर त्या शांत जंगलात त्याचे प्रतिध्वनि दणाणले.

दुसऱ्या दिवशीं त्याने अनघाला पूर्ण विश्रांति घ्यावयाला लावले. संध्याकाळीं निजून उठल्यावर छोटया महादेवाला जाण्याची कल्पना तिच्या मनात आली. पण, आप्पाजींनी तिला स्पष्ट सांगितले की, तेथे संध्याकाळीं गेलेला मनुष्य सहसा जिवंत परत येत नाहीं. त्यामुळें तिला तो नाद सोडून द्यावा लागला.

पण सकाळीं उठल्याबरोर तिनें छोटया महादेवाला जाण्याचा हट्ट धरला. निरुपमानें तिला परोपरीने सांगितले कीं, ट्वायनॅम् पुलापासून जरी ते स्थळ दीड मैल असलें, तरी वाट चांगली नाहीं आणि चढउतारहि बराच आहे. पण ती काहीं केल्या ऐकेना. शेवटीं नॅशनल् कॅडेट् कोरच्या छावणीपर्यंत मंडळी मोटारने गेली; व तेथून अनघाचा पुढला प्रवास खुर्चीने सुरू झाला.

पण, मैलभर चालून गेल्यावर खुर्चीनें पुढें जाणें सोपें नाहीं, हें तिचें तिलाच कळून आलें. मजुरानीं खुर्ची वरच्या खडकावर ठेवावी व खालच्या

खडकावर आपण उतरून नंतर ती पुढे न्यावी, अशा अत्यंत कष्टप्रद स्थितींत त्यानी अखेर छोटा महादेव गाठला. जगल अगदी दाट होतें; व उजव्या हाताला खडा असलेला काळा उंच पहाड जणू क्रुद्ध मुद्रेनें भोवतालच्या सृष्टीकडे पहात होता. जगलामधून, कुठे खडकाच्या खालून अंग चोरीत, तर कुठे त्याच्या अंगावरून उड्या मारीत, जो ओहोळ वहात होता, त्याचा सतत कानावर पडणारा आवाज एवढीच काय ती जीवनाची साक्ष त्या निर्जन, निःशब्द दाट रानात त्याना धीर द्यावयाला होती. छोटया महादेवाकडे जाणाऱ्या उताराच्या शेवटल्या वळणावर ते येत असता त्या ओहोळाच्या मधोमध उभा असलेला प्रचड वटवृक्ष त्याच्या दृष्टीस पडला. त्याच्या फांद्या आणि पारब्या भोवतालच्या अनेक झाडाना लगटलेल्या होत्या; व त्याच्या बुध्याने अडवून दुभंगलेला तो ओहोळ दोहों बाजूंनीं झुरुमुरु वहात होता. उजव्या बाजूच्या पहाडाशीं आपल्या उंचीने स्पर्धा करणारा तो उत्तुंग वटवृक्ष पाहून अनघाच्या मनात आले, पलीकडल्या गुहेंत जो महादेव एकाताचा आस्वाद घेत ध्यानस्थ बसलेला आहे, त्याच्या गुहेचा मार्ग कुणाला उमगू नये म्हणून तिचे गोपन करण्यासाठीं तर हा वटमुरू इथे जागता पहारा देत खडा नसेल ना ? किंवा कल्पांताच्या वेळीं बालभगवंताला आपल्या पानावर आसरा देण्यासाठीं हा अजस्र वटवृक्ष भरतखंडाच्या या नाभिस्थानी प्रलयाची वाट पाहात उभा राहिला आहे ?

आणि खरोखरीच, छोट्या महादेवाची ती गुहा इतकी काहीं झाडींनें आच्छादिलेली होती कीं, आता आकाशाच्या मध्यावर येत असलेल्या सूर्याचा एकहि किरण त्या आच्छादनाचा भेद करून आत येऊं शकला नव्हता. वर दाट झाडीची जाळी आणि खालीं खळखळ वहाणारा ओहोळ असे त्या गुहेचें भयानक स्वरूप होते. एका शिळेवरून दुसऱ्या शिळेवर पाय टेवीत ओहोळ ओलाडून त्यानीं ती कपार गाठली.

कपारीच्या पायथ्याशीं खालीं सात आठ फुटावर तो ओहोळ मोठमोठ्या शिलातून वहात होता; व कपारीतून निघालेली एक पाण्याची धारहि त्या ओहोळात अविरत पडत होती. कपारीच्या खालच्या गुळगुळीत खडकाला

जें उंच लाबट टेगूळ आलें होते, तो छोटा महादेव. कारण, त्याच्या समोरच मोठा थोरला त्रिशूळ उभा केलेला होता. तो त्रिशूळ हेच महादेवाचे वास्तव्य त्या कपारीत असल्याची एकमेव खूण! कारण नारळाच्या एखाद-दुसऱ्या कवटीशिवाय माणूस तेथे येऊन गेल्याचे कोणतेहि चिन्ह दिसत नव्हते. त्या स्वयंभू लिंगाला ना गंधाचा गंध, ना फुलाचा स्पर्श. जणू भाविकाच्या वर्दळीला कंटाळलेला बडा महादेव या अदृश्य अगम्य कपारींत लघुरूप धारण करून निर्जन, निःशब्द अशा अनिर्वचनीय एकांताचा आस्वाद घेत आत्मानंदात निमग्न झाला होता! येथे मूर्ति नाही, साळुंका नाहीं, जटाजूट नाही, देवपणाचे कोणतेहि चिन्ह, प्रतीक किंवा आभरण नाहीं.

ते विलक्षण शांत, एकाकी, किंचित् भयप्रद दृश्य पाहून अनघाच्या मनांत आले, सारिपाटात डाव अंगावर आल्यामुळें गिरिजेवर रुसून महादेव रानांत एकटेच ज्या निर्जन स्थळीं येऊन ध्यानस्थ बसले, ते स्थळ तर हे नसेल?

आणि त्या लिंगापासून काही अंतरावर एका बाजूला पडणारी पाण्याची धार पाहून ती उद्गारली, "इथं लघुरूप धारण करून आल्यावर आपल्या मस्तकातली गंगासुद्धा दूर झुगारून दिलेली दिसतेय महादेवान—"

• • •

त्यांच्या लग्नाचा तो बारावा वाढदिवस निरुपमाने मोठ्या उल्हासाने साजरा केला.

या वाढदिवसानिमित्त तिने पचमढीपासून आठ मैलावर पिपरियाच्या घाटात पगारा येथ असलेल्या सरकारी बगीचात वनभोजनाचा कार्यक्रम ठेवला होता. छोट्या महादेवाला जाऊन आल्यापासून अनघाच्या पाठींतील दुःख पुन्हा चाळवले होते. म्हणून अभयनें तिला विश्रांति घेण्याची सक्ति केली होती. या विश्रांतीच्या काळातच हा वाढदिवस आल्यामुळे तिच्या उबगलेल्या मनाला तो वनभोजनाचा कार्यक्रम अतिशय आनंददायक वाटला.

आदल्या दिवशीं दुपारीं त्याचा चहा होऊन गेल्यानंतर त्या दोघी एकट्याच असताना निरुपमा तिला म्हणाली—

" उद्या सकाळीं सातलाच आम्ही सगळी मंडळी पगाऱ्याला जाऊं. तूं न् डॉक्टरसाहेब दोघं बरोबर बाराच्या ठोक्याला तिथं या. संध्याकाळीं सातपर्यंत आपण परत येऊं घरीं—"

" मीसुध्दा येते सातला तुमच्याबरोबर. ते एकटे येतील मागाहून बाराला. तुम्ही सगळीं तिथ गेल्यावर मी एकटी इथं राहून काय करूं ?—"

" एकटी कशान ग ? डॉक्टरसाहेब आहेत ना तुझ्याबरोबर—"

" अग, पण त्यांनीं की नाही सध्या पालक, पहारेकरी न् परिचारक अशी तिहेरी भूमिका घेतली आहे माझ्या बाबतीत. त्यामुळं त्यांच्या तीक्ष्ण नजरेच्या कैदेतून थोडा वेळ जरी मी सुटलें, तरी तितकाच मोकळे-पणा वाटेल माझ्या मनाला !—"

अनघा हसत हसत उद्गारली.

" माझ्याशी बोलण्यापेक्षासुध्दा मला जास्तीत जास्त अथरुणावर निजवून ठेवण, दिवसातून चार वेळा माझा ताप पाहाणं, माझ्या अंगाखालच्या उशा नीटनेटक्या करणं, माझ्या उशागतीं ताजीं फुलं आणून ठेवण, मला सारखं काहीं ना काहीं तरी खायला भाग पाडण हें कर्तव्य वाटतं त्याना आपल. माझ्या पलगाशेजारींच आपल छोट टेबल ठेवून ते स्वत: दिवसभर वाचीत किंवा लिहीत असतात; न् घड्याळाबरहुकूम माझीं एक एक कामं मधून मधून उरकीत असतात. साऱ्या दिवसात आम्ही एक शब्द बोलत असूं तर शपथ ! मी त्याच्याशीं बोलत नाही, ते सारखे आपल्या उद्योगात गढलेले असतात म्हणून; न् ते माझ्याशीं बोलत नाहींत, मला पूर्ण विश्रांति मिळावी म्हणून ! संध्याकाळीं न् रात्रीं मला ते फिरायला घेऊन जातात, त्या वेळीं काय आम्ही बोलत असूं तेवढेच ! म्हणून म्हणतें, मी तुमच्याबरोबरच चलतें पगाऱ्याला. म्हणजे मजेत जाईल वेळ माझा तिथ—"

" अं हं ! आज नाही जमायचं तें. मी आज ' सरप्राइज् ' द्यायचं ठरवलंय तुला. तूं आमच्याबरोबरच तिथं आलीस, तर मग मजा नाहीं उरणार त्यात काही—"

" अग, पण साग तरी ' सरप्राइज् ' काय देणार आहेस तें—"

" अग, ' सरप्राइज् ' आधी सागायचं असतं, तर नेली नसती का मी तुला आमच्याबरोबर ? ते सागायचं नाही, म्हणून तर बागला बोलावलय मी तुम्हाला तिथं—"

निरुपमाच्या सागण्याप्रमाणें बाराच्या सुमारास ती दोघे पगाऱ्याला जाऊन पोचलीं. नागपूरहून पचमढीला येताना घाटातलों तो रस्ता त्यानीं पाहिला होता. पण, त्या वेळी रात्र होऊन गेलेली असल्यामुळें, त्या रस्त्यातलीं अवघड वळणे आणि दऱ्यातून दिसणारा दूरचा प्रदेश याची यथार्थ कल्पना त्याना आलेली नव्हती. आज त्या घाटाची भीषण रम्यता आणि विशेषतः त्याची चकवीं वळणे पाहून तिला साताऱ्च्या घाटाची आठवण झाली.

तीं दोघें मोटारींतून बगीचाच्या फाटकाशीं येताच आप्पाजींनीं त्याचें स्वागत करून त्याना सरळ वनभोजनाच्या जागीं आणलें. तिथे डाळिंबी रंगाची साडी नेसलेली एक जवान कोसलकामिनी सामानाची माडामाड करीत होती. आप्पाजींबरोबर ती दोघे त्या जागी येताच तिनें तिरप्या नजरेने अभयकडे रोखून पाहिले; विडयानें रगलेला आपला अधर डाव्या कडेला मुरडून स्मिताचा नखरा केला; व किंचित् लाजल्यासारखें दाखवून माथ्यावरून मागे झुकलेला पदर चटकन् हातानें सावरला. आप्पाजींनीं मोठें गोड हास्य करून तिला आपल्या मिठ्ठास आवाजात विचारलें—

" झाली सगळी तयारी, पुनम ? ताईसाहेबाना साग मेजवान आले आहेत म्हणून—"

पुनमनें पुन्हा एकदा अभयवर आपला गहिरा कटाक्ष फेंकला; व आपल्या डाव्या दंडात रुतलेली चांदीची वाक बोटानें खालीं सरकवून पायातल्या वाळ्याच्या तालावर पावलें टाकीत ती लचकत, मुरडत आत गेली.

अनघाने अभयकडे पाहिले. त्याचा चेहरा अतिशय गंभीर होऊन गेला होता; व डोळ्यात नाराजीची छटा स्पष्ट उमटली होती.

तोंच निरुपमा बाहेर येऊन हंसत हंसत त्याना म्हणाली—

"आप्पाजींनी एकदम उगाच आणलं तुम्हाला इथं. पात्रं वाढून होईपर्यंत त्यानीं तुम्हाला पलीकडे माडवात बसवायला हवं होतं—"

तो तिचा उद्गार ऐकताच अनघाचें लक्ष प्रथमच वनभोजनाच्या व्यवस्थेकडे गेलें. आंब्याच्या दाट सावलींत सुंदर रांगोळ्या घालून पात्रे अर्धवर्तुळाकार माडलेलीं होतीं. त्या दोघासाठीं केळीच्या हिरव्यागार पानावर ठेवलेली चांदीची ताटे पाहून अनघा म्हणाली—

"हीं तुझी चांदीचीं ताटं शोभत नाहींत बाई, या वनभोजनात—"

"वनभोजनात काय शोभतं न् काय नाहीं हे मीं ठरवायचंय, अक्का. हें काहीं नुसतंच वनभोजन नाही; तुमच्या लग्नाचा हा वाढदिवस आहे हें विसरूं नकोस तूं —"

"पण हीं चांदीचं ताटं पाहिल्यावर मला वनभोजनाच्या गमतीपेक्षां व्याहीभोजनाच गांभीर्यच जास्त जाणवलं, ताई—"

"आप्पाजींनी तुम्हांला एकदम इथं आणलं ही चूकच केली खरोखरी. अजून थोडा वेळ आहे जेवायला. तोंपर्यंत याना बगीचा दाखवून आण, नचिकेत—"

"वा, वा ! छान कल्पना आहे तुझी ही, निरू ! हा बगीचा म्हणजे माझ्या पंधरा वर्षांच्या श्रमाची कमाई आहे, डॉक्टरसाहेब. सबंध प्रातात इतका सुंदर बगीचा पाहायला मिळणार नाहीं आपल्याला. चला, आपण हिंडून येऊं थोडे बगीचातून—"

अनघाची तिथून उठण्याची मुळींच इच्छा नव्हती. पण आता आप्पाजींनीं स्वतःच त्याना बगीचा दाखविण्याची उत्सुकता व्यक्त केल्यामुळें तिचा निरुपाय झाला.

घाटातल्या एका जिवंत झऱ्याचें पाणी नळानीं खालीं आणून तें त्या बगीचात सर्वत्र खेळविलेलें होते; व पावसाळ्यांत पाणलोटानें जमिनीचे थर झरून वाहून जाऊं नयेत, म्हणून ठिकठिकाणीं बांध्या घातलेल्या होत्या. निरनिराळया प्रकारच्या भाज्या, कंद आणि वेल याचे वाफे ओळीनें लावलेले होते. जमिनीवर पसरलेले वाळकाचे वेल आणि माडवावर चढवलेले दोडक्याचे वेल याची जशी एक मजेदार शोभा दिसत होती, तसा दीड दोन हात वाढीचा केळींचा डुबरा मळा आणि बुध्यापासून दोन हातावर फळें लागलेल्या फणसाची उंच राग यांचीहि शोभा काहीं विचित्र दिसत होती बगीचाच्या मधोमध असलेल्या आंब्याच्या भव्य डेरेदार वृक्षाला जें मधमाशाचे मोठेथोरलें पोळे लागलेले होते, त्याच्याभोंवतीं घोंघावणाऱ्या माशाची झुम्मड आणि बगीचाच्या एका कोपऱ्यात जांभळीच्या झाडाखालीं ठेवलेल्या मोहोळाच्या लाकडी घरातून मधून मधून बाहेर पडणाऱ्या पाळीव माशाच्या येरझारा, याच्यातला विरोध अनघाला बोधप्रद वाटला.

आप्पाजी त्याना आपण बगीचात केलेल्या निरनिराळया प्रकारच्या सुधारणा आणि प्रयोग समजावून सागत होते. तोंच त्याचे मघाशीं स्वागत करणाऱ्या कोसलकामिनीनें लाजत-मलपत तेथें येऊन त्याना जेवण वाढून तयार असल्याची वर्दी दिली.

तेव्हा आप्पाजींनीं तपकिरीची एक चिमूट नाकात कोंबून स्निग्ध दृष्टीने तिच्याकडे पाहात स्वतःशींच बोलावे त्याप्रमाणें उद्गार काढला—

" मोठी हरकामी आहे ही माळीण आमची, बाई ! निरूच्या आईला आतां होत नाहीं काम फारसं. पण आमची पुनम साभाळून घेते वेळावरुताला. नाहीतर आपण पहाताच आहात आमचा प्रपंच किती मोठा आहे तो–"

त्याच्या मिठ्ठास आवाजात कारुण्याची कणव उमटली. पण, त्याची नजर मात्र, ठुमकत मुरडत चाललेल्या पाठमोऱ्या पुनमच्या पुष्ट नितंबावर

रुळत असलेल्या चांदीच्या मेखलेचे जे घागरीदार सर प्रत्येक पावलागणिक लुचमुचत आणि रुमझुमत होते, त्यांच्यावर खिळली होती.

जेवणाच्या जागीं आल्यावर आता जें दृश्य अनघाच्या दृष्टीस पडलें, तें पाहून तिचें हृदय भरून आलें. त्या दोघाच्या ताटाभोंवतीं बारा छोटया समया लावलेल्या होत्या; व बारा भाज्या आणि बारा पक्कान्नें याची कलापूर्ण माडणी ताटातून केलेली होती. समोर ठेवलेल्या काचेच्या सुंदर पुष्पपात्रात बारा प्रकारचीं फुलें पानामकट अशा रीतीने लावलेलीं होतीं की, त्याचे आकार आणि रंग याचे वैचित्र्य मजेदार दिसत होते. अनघा तिथे आल्याबरोबर निरुपमाने गुलाबाच्या बारा फुलाची वेणी तिच्या अंबाडयावर बसवून चमेलीची पांढरीशुभ्र जाळी तिच्या मस्तकावर घातली; व मोगऱ्याचा सुबक गुच्छ अभयला दिला.

" पाठच्या बहिणीनं तरी काय केल असत यापेक्षा ?–"

अनघाचे डोळे भरून आले. ती आवंढा गिळून उद्गारली—

" मी परमेश्वराजवळ एकच मागणं मागेन आज कीं, ही निरूताई माझ्या पोटी तरी येवो किंवा पाठीं तरी येवो—"

तें वाक्य तिनें उच्चारले आणि दुसऱ्याच क्षणीं ती हात जोडून उद्गारली—

" नको बाई ! फारच स्वार्थीपणाचं होईल हें माझं मागणं. असलं मागणं मागून तुला कशाला मी संकटात घालूं, निरू ?—"

" संकट कसलं आहे ग त्यात ?—"

" अग, संकट नाहीं तर काय ? माझ्यासारखी रोगट, पंगु आई किंवा बहीण कोणाला हवीशी वाटेल ? म्हणून तर गेल्या वर्षापासून मीं वटसावित्रीची पूजासुद्धा सोडून दिली बघ—"

" भलतंच काहीं तरी !—"

" अग, भलतंच कसं म्हणतेस तूं ? आपण वटसावित्रीचं व्रत करून मागतों काय ? तर ' जन्मोजन्मीं हाच पति लाभावा ' हेंच मागणं ना ?

माझ्यासारख्या रोगी, पंगु स्त्रीनं याच्यासारखा पति जन्मोजन्मीं लाभावा अशी प्रार्थना करून आपल्या दुर्वह जिण्याचं लोढणं त्याच्या गळ्यात पुढल्या जन्मींसुद्धा अडकवायची मागणी करायची हा स्वार्थीपणाच नाहीं का निव्वळ ? म्हणून, मी ठरवून टाकलंय कीं, जन्मोजन्मीं तोच तो नवरा आणि तीच ती बायको याची अभेद्य सागड घालण्याची फलश्रुति सागणारं ते व्रत आपण काहीं करायचं नाही. एक जन्म याचा जो मी कोंडमारा चालवलाय, तेवढा पुरे आहे —"

" हें व्याख्यान मला ऐकवण्यासाठीं का तूं इथं आली आहेस आज, अनू ? निरुताईनीं आज जो इतक्या हौसेनं हा समारंभ घडवून आणला, तो काहीं असलीं बोलणीं ऐकण्यासाठीं नव्हे——"

" मी बोलतें ते तुम्हाला कुणाला आवडणार नाही, हे जाणून आहे मी, अभय. विशेषतः तुम्हाला न् निरूताईला तर फारच दुःख होईल माझं हें बोलणं ऐकून, हे कळतं मला. पण, आज सकाळीं उठल्यावर जेव्हा गेल्या बारा वर्षांच्या आपल्या वैवाहिक जीवनाचा मीं विचार केला, तेव्हा मला वाटलं, माझं जिणं तर विफल झालंच आहे माझ्या दुर्दैवामुळं पण तुमच्याहि संसाराची माती केली मीं ! आजचा हा दिवस असा आहे कीं, आज तरी मला प्रामाणिकपणानं बोलू दे माझ्या जिवाला काय वाटतंय ते——"

पण ती पुढें बोलूं शकली नाहीं. तिच्या डोळ्यातून घळघळा अश्रु वाहूं लागले.

सर्व मंडळी अगदीं स्तब्ध उभी होती. निरुपमानें सकाळपासून परिश्रम करून उत्पन्न केलेलें तें आनंदाचें मधुर वातावरण तिच्या त्या करुण शब्दांनीं आणि करुणतर अश्रूंनीं पार विरघळून गेलें. पण, तिचा तो दुःखावेग कोणत्या उपायानें आवरावा, हें कोणालाच समजेना. निरुपमाच्याहि डोळ्यातून अश्रु वाहूं लागले.

पण अभयने किंचित् रागानेंच तिला म्हटलें—

" अनू, तूं इतकी अविचारी आणि कृतघ्न असशील, असं वाटलं नव्हतं कधी मला—"

त्याचा तो उद्गार ऐकून तिने चमकून त्यांच्याकडे पाहिले आणि त्याला विचारलं—

" मी कृतघ्न कशी काय ?—"

" निरुताईंनी इतक्या हौसेनं तयारी केली आपल्या लग्नाच्या वाढदिवसाची आणि तूं विरस करते आहेस या अविचारी बोलण्यानं सगळ्या मंडळींचा—-"

" पण मीं बोलले तें खोटं आहे का ? —"

" खात्रीन ! माझ्या संसाराची तूं माती केलीस कीं सोनं केलंस हें मीं ठरवायचं का तूं ? आपल्या असल्या बोलण्यानं न् वागण्यानं आपण कोणाची मनं कशा रीतीन दुखवतों याची थोडी तरी जाणीव आहे का तुला ? खरोखरी तू फार स्वार्थी आहेस, अनू ! —"

त्याच्या त्या चतुर भाषणाने अनघाच्या बोलण्यामुळें उत्पन्न झालेलें विषादाचे वातावरण ओसरले. व तिच्याहि लक्षात आपली चूक आली.

आणि ती हसून निरुपमाले म्हणाली—-

" बरं बाई ! याना नाही तरी नेहमींच माझ्या वागण्यात माझी आत्मकेंद्रित वृत्ति दिसते— "

" पण आता भांडूं नका गडे, तुम्ही दोघं ! इतकी सुंदर तयारी केली आहे आणि सगळी मंडळी तिष्ठत उभी आहे. चटकन् पाटावर बसा तुम्ही आता, डॉक्टरसाहेब ! —-"

निरुपमाचे ते शब्द ऐकताच अभय पाटावर बसला आणि अनघाहि त्याच्या शेजारीं बसली. निरुपमानें त्या दोघाना ओवाळून औक्षण केलें.

आणि आता जेवणाला सुरवात होणार, तोच अनघानें तिला विचारलें—-

" तूं कुठ बसणार आहेस, ताई ?—"

" मी मागाहून बसेन. मी आता बसले तर वाढील कोण तुम्हाला ?—"

" पुन्हा वाढायची गरजच नाहीं मुळीं, निरूताई. तुम्ही बारा वर्षांचं सगळं जेवण एकदम वाढलंय आज--"

अभय तिला हंसत हसत म्हणाला.

पण अनघा अगदीं काकुळतीने निरुपमाला म्हणाली—

" तूं बैस ना ग, निरू. तू बसल्याशिवाय काहीं जेवण गोड नाहीं लागायचं बाई मला आज—"

" मग पुन्हा जेव माझ्याबरोबर. डॉक्टरसाहेब, सुरवात करा. आधींच उशीर झालाय फार—"

" आज आम्ही तुमच्या ताब्यात आहोंत, निरूताई, तुम्ही म्हणाल तसं वागलं पाहिजे आम्हाला--"

जेवणें झाल्यावर सायंकाळीं सहा वाजेपर्यंत त्याचा वेळ फार मजेंत गेला. नचिकेतनें त्याचीं निरनिराळीं छायाचित्रें घेतलीं; व त्या चौघी बहिणींनीं तिच्याशीं मनसोक्त गप्पा मारल्या.

सूर्य डोंगराआड जाताच आप्पाजींनीं त्याना निघण्याची घाई चालवली. तेव्हां अभयनें त्याना म्हटलें--

" चहा झाल्यावर निघतांच आहोंत आपण. पण आणखी तासाभरानें निघायला काय हरकत आहे ?--"

" छे, छे ! घाटाच्या या भागात तेंडवा, शेर वगैरे जंगलचे अमीर उमराव काळोख पडल्याबरोबर हिंडायला लागतात. आपण दिवसाउजेडींच इथून परत गेलेल बरं--"

" आप्पाजी, मला कीं नाहीं जंगली श्वापदं त्याच्या स्वाभाविक स्थितींत पाहाण्याची फार इच्छा आहे एकदा—"

"पण, मग तशा तयारीन यायला हवं होतं आपण, बाई. इथं तर काठीसुद्धा आणलेली नाहीं कुणी आज--"

"पण आप्पाजी, तुमचा तो हत्ती केव्हा येणार आहे हो ?--

"आज आलाच असेल बहुतेक--"

"आला असेल, तर लगेच कळवा बरं का! म्हणजे उद्याच मोठ्या महादेवाला जाऊं आम्ही. मला हत्तीवर बसायची फार हौस आहे--"

"मला वाटतं, आज जर हत्ती इथं आलेला असता, तर निरुताईंनी हत्तीवरूनच घरीं पाठवणी केली असती आपली, अनू!-"

"खरोखरीच केली असती, डॉक्टरसाहेब. आज बरोबर एक तप पूर्ण झाल तुमच्या विवाहाला आजच्या समारंभाची सांगता गजारोहणानं होण्यात खचित औचित्य आहे--"

• • •

दुसऱ्या दिवशीं सकाळींच हत्ती आला असल्याची वर्दी आप्पाजींकडून आली. त्याबरोबर अनघा अभयला म्हणाली--

"आता महादेव न् धूपगड राहिलाय, तो उरकून टाकूं या ना लवकर! मग इथून नागपूरला परत जाईपर्यंत विश्रांतीशिवाय दुसरं काहीं नाहीं-"

"पण मग तरी तूं खरोखरीच स्वस्थ बसशील का ?--"

"नाहीं तर काय करणार ? मला काहीं ते इतर पॉइंट्स पाहाण्याची इच्छा नाहीं फारशी. एवढीं दोन स्थळं तुम्हीं मला दाखवलींत, म्हणजे मग तुम्ही म्हणाल तशी विश्रांति घेईन मी मुकाट्यानं--"

"मी फसणार नाहीं तुझ्या असल्या गोड बोलण्यानं, अनू. जटाशंकर न् छोटा महादेव या दोन ठिकाणीं खुर्चीवरून नेलं तुला. तरीसुद्धा तुला श्रम झालाच--"

" पण आप्पाजी म्हणतात, मोठ्या महादेवाच्या अगदीं थेट गुहेजवळ हत्ती जातो. धूपगडला तर खुर्ची जाईल तिथपर्यंतच येईन मी. मग तर झालं ना:! पण, आता हत्ती अनायासं आलाय तर उद्याच जाऊं या सकाळीं महादेवाला आपण--"

दुसऱ्या दिवशी सकाळीं आठ वाजता ते मोटारने महादेवाला जाण्यासाठीं निघाले. आज आप्पाजी मुद्दाम त्याच्याबरोबर आले होते; व त्याच्या सूचनेनुसार स्नान करून सर्वांना निघावें लागले. निरुपमाच्या तिघी बहिणीहि हत्तीवर बसण्याच्या हौसेनें या यात्रेंत सामील झाल्या होत्या. हत्ती त्याच्या आधींच बाराफत्तरला रवाना झाला होता. ते मोटरने तेथें येऊन पोंचल्यावर अनघा, निरुपमा आणि तिच्या बहिणी हत्तीवर बसल्या; व अभय आणि नचिकेत यानीं आप्पाजींबरोबर पायींच तो दोन-अडीच मैलाचा चढ आक्रमिण्याचें ठरविलें.

दाट जंगलाच्या मधून जाणारी ती रेताळ लाल वाट म्हणजे शैलश्रीच्या भागाची शेंदूर भरलेली रेषाच होती जणूं कांहीं !

डोंगरातून जाणारी जवळची पाऊलवाट आप्पाजींना माहीत होती. पण, त्या वाटेनें न जाता, एकमेकांशीं गप्पागोष्टी करित रमतगमत सरळ रस्त्यानें जाण्याचें त्यानीं ठरविलें. अनघा मधून मधून त्याना प्रश्न विचारी आणि ते मोठ्या कौतुकानें तिला उत्तरें देत.

हत्ती डुलत झुलत अगदीं सावकाश चालला होता. वाटेंत एखाद् दुसरी झाडाची फांदी आडवी आली, तर ती काडकन् मोडून तो पुढे चले. त्याच्या त्या संथ आरामशीर गतीची त्याना मोठी गमत वाटली. मधूनच एखादे वेळीं तो सोंड उभारून फुस्कारे, तेव्हा तिच्यातून उडणाऱ्या तुषाराचा काय उपद्रव होई, तेवढाच.

जंगलात शिरल्यावर रस्त्याच्या दोहों बाजूंना एकाच प्रकारची उंच झाडें एकमेकाना भिडलेलीं पाहून अनघानें आप्पाजींना विचारलें--

" हें कोणत्या झाडाचं जंगल आहे हो, आप्पाजी? सारीं झाडं एकाच जातीचीं दिसतात--"

"हो. हें सालाच्या झाडाचं जंगल आहे, बाई. हा वृक्ष फार उंच वाढणारा आहे. पण इथल्या हवामानांत त्याची वाढ इतकीच होते म्हणतात—"

" पण ही उंचीहि कांहीं कमी नाहीं. मला वाटतं, निरू, रघुवंशातील राजाच्या उंचीचं वर्णन करिताना कालिदासानं ' शालप्रांशुर्महाभुजः '। असं जें म्हटलंय, त्या उपमेतले ते शालवृक्ष बहुधा हेच असतील— "

हत्तीच्या संथ चालीमुळे जसजसे ते डोंगर चढत गेले, तसतशी पचमढीच्या पचक्रोशीतील गिरिकंदराची शोभा त्याच्या डोळ्यात भरूं लागली. आदल्या रात्रीं पावसाची जोराची सर पडून गेलेली होती. त्यामुळें जंगलातील पांढुरक्या तांबुस जमिनीवर लाल पाचोळ्याचा थर जागोजाग पसरला होता; व एका प्रकारच्या उग्र रानगंधानें वातावरण कुंद होऊन गेलें होते. खाली तांबुस लाल जमीन, वर पावसाने स्वच्छ न्हालेल्या सालवृक्षाची हिरवीगार छाया आणि त्यावर पसरलेलें साभ्र सुनील आकाश यांचें रंगवैचित्र्य जितकें आकर्षक होतें, तितक्याच पावसाने धुऊन निघालेल्या डोंगराच्या शिलाप्रस्तरातील काळ्या; पिंवळ्या, जांभळ्या, किरमिजी, मोरपखी, तांबुस वगैरे निरनिराळ्या रंगाच्या छटाहि मनाला आल्हाद देत होत्या. त्या गर्द रानात मध्येच एखाद्या ठिकाणीं कीड लागून वठून गेलेल्या झाडाचा अद्याप उभा असलेला पर्णहीन सांगाडा किंवा वादळाने मोडून जाऊन जमिनीवर पडलेल्या झाडाचा कळकट सांगाडा वाऱ्याने हलताना दृष्टीस पडे, तेव्हा त्याची ती निष्प्राण हालचाल पाहून वनश्रीच्या स्वयंभू वैभवाचाहि विध्वंस करणाऱ्या मृत्यूच्या सर्वंकष सामर्थ्याचा साक्षात्कार मनाला होई. डोंगर चढावयाला लागल्यावर काही वेळ धूपगडाने त्याची साथ केली. क्षितिजाशीं समांतर असलेल्या त्याच्या उत्तुंग कड्याची भव्यता आज प्रथमच त्याना उत्कटतेनें जाणवली. महादेवाचा चढ संपून जेव्हा ते उताराला लागले, तेव्हा चौरागडाचा एका बाजूनें बेलाग असलेला ताशीव चौथरा त्याच्या नजरेस पडला. धूपगड जितका भव्य, तितकाच चौरागड उग्र

दिसत होता. जणू महादेवाच्या त्रिशूळाची सारी भयानक उग्रता तो आपल्या रुक्ष, रौद्र आविर्भावानें व्यक्त करीत होता. विशेषतः धूपगडाच्या गगनाला भिडलेल्या शृंगावर या वेळीं ढगाचें विरळ धुकें साचलेलें असल्यामुळे भस्मलेपन केलेल्या एखाद्या योग्यासारखा तो शांत, सौम्य दिसत होता; उलट चौरागडाच्या चौथऱ्यावर या वेळीं भगभगीत ऊन पडलेलें असल्यामुळें दक्षाचा शिरच्छेद करावयाला उद्युक्त झालेल्या वीरभद्राच्या क्रुद्ध मुद्रेची भीषणता त्याला आली होती. त्या दोन गडांच्या भव्यतेनें आणि उग्रतेनें त्यांचीं मनें इतकीं भारून, इतकीं विस्मित करून सोडलीं होतीं कीं, उजव्या बाजूच्या हिरव्यागार दऱ्यांतून झाडींच्या झुबक्यांनीं झाकलेले जे सुळके डोकें हळूच वर काढून त्या दोन्हीं गडांकडे जणू भयचकित वृत्तीनें पाहात होते, त्यांच्या त्या शालीन सुंदरतेकडे कोणाचेंच लक्ष गेलें नाहीं. पण, उताराच्या शेवटल्या वळणाला लागताच आम्रवृक्षांनीं झाकलेली महादेवाची दरी थोडथोडी दिसू लागली आणि त्या दरीवर खडा पहारा करणारा चौरादेव हळूहळू अदृश्य होत गेला. त्या उतारावरील एका वळणाच्या अगदीं कडेला एक प्रचंड आम्रवृक्ष स्वतःच्या शाखाभारानें वाकून इतका काहीं खालीं झुकला होता कीं, तो जणू आपले शतबाहु उभारून महादेवाच्या दर्शनार्थ त्या दरींत उडी घ्यावयाला उत्सुक झाला आहे, असे वाटे.

डोंगर उतरून दरींतील मैदानावर येताच त्या चौघीजणी हत्तीवरून खालीं उतरल्या; व सर्व मंडळी महादेवाच्या गुहेकडे जावयाला निघाली. त्या निर्जन डोंगरावर जंगलात यात्रेकरूंसाठीं बांधलेल्या पडक्या झोंपड्यांच्या रूपानें मनुष्यवस्तीच्या खुणा प्रथम तेथेंच त्यांच्या दृष्टीस पडल्या. तेथून एक फर्लांगावर महादेवाची गुहा होती. गुहेकडे जाणाऱ्या पायवाटेच्या डाव्या बाजूला ओहोळ वहात होता. आंब्याच्या उंच झाडांची इतकी दाट छाया त्या दरींत पडलेली होती कीं, त्या वेळीं डोईवर तळपत असलेल्या मध्यान्हींच्या सूर्याचे फारसे किरण काहीं जमिनीपर्यंत पोंचूं शकले नव्हते.

गुहेच्या समोरील चबुतऱ्यावर शेंदरानें माखलेले दोन मोटे त्रिशूळ, दोन घंटा आणि शिवलिंगें होतीं. त्याचप्रमाणें उजव्या हाताला गुहेच्या तटा-

लगतहि पार्वती-परमेश्वर आणि इतर देव याच्या पितळी मूर्ति होत्या. गुहेच्या दारानजीक असलेल्या ओटयावर जी झोपडी बांधलेली होती, तींत दोन दाढियाल गोसावी चिलीम फुकीत धुनीपाशीं बसलेले होते.

अभयला पाहाताच त्यातला एक गोसावी चटकन् पुढें येऊन म्हणाला, "आईये, साब! —"

आणि, हातात पेटवलेली पणती घेऊन, तो त्याच्या पुढें झाला. त्याच्या मागोमाग ते गुहेच्या त्रिशूलांकित लोखंडी दारातून आत शिरले.

ती मध्यान्हाची वेळ असूनहि गुहेत गडद अंधार होता. खडकातून सतत पाझरणारें पाणी गुहेच्या मधल्या खोलगट भागात साचलेलें होते. त्याच्या आधीं आत आलेला एक संन्यासी त्या पाण्यात बुचकळी मारून तसाच ओलेत्यानें काळोखातून पुढें चालला होता. म्हणून अभयनें त्या गोसाव्याला विचारलें—

"या पाण्यात आधीं स्नान करून मग महादेवाचं दर्शन घ्यायचं असतं का? —"

"हो. यात्री या तीर्थात स्नान करून मगच दर्शन घेतात. पण तसा नियम नाहीं—"

तें वाक्य उच्चारून त्यानें त्यामधल्या तीर्थाच्या दोहों बाजूंना जो लोखंडी कठडा उभारलेला होता, त्याच्या आधारानें नतमस्तक होऊन चालण्याची सूचना त्याना केली. खडकातून झिरपणाऱ्या पाण्याचे थेंब सारखे अंगावर पडत होते. ते डाव्या बाजूनें आंत येत असतां कपारीलगत बांधलेल्या कुंडापाशीं अनघा थांबली. तेव्हां गोसाव्यानें तिला विचारलें—

"काय माई, पाणी प्यायची इच्छा आहे? हें पाणी स्वच्छ आहे फार—"

तिनें त्या कुंडाला असलेली तोटी दाबून हातांत पडलेलें पाणी डोळ्याना लावलें आणि ती अभयला म्हणाली, "किती गार पाणी आहे पाहा तरी—"

" असायचंच. सारी गुहा सारखी पाझरतेय न् उन्हाचा एक कवडसाहि नाहीं आंत पडलेला. मग पाणी गार असावं यात नवल काय ? --"

त्या गोसाव्याच्या हातातल्या पणतीच्या मंद थरथरणाऱ्या प्रकाशात काहींच नीट दिसत नव्हतें. म्हणून नचिकेताने आपल्या हातातल्या उद्दीपिकेच्या प्रकाशाचा स्रोत गुहेच्या टोंकाला असलेल्या महादेवावर पाडला. त्याबरोबर शाळुंकेसहित लहानसे शिवलिंग आणि त्याच्या शेजारी उभी केलेली पार्वतीची ओबड धोबड पाषाणमूर्ति त्याच्या दृष्टीस पडली. तेव्हा अनघा आश्चर्यानें उद्गारली--

" हा महादेव काहीं जटाशंकर आणि छोटा महादेव यांच्याप्रमाणं स्वयंभू दिसत नाहीं. नेहमीं कुठल्याहि देवळात जी पाषाणाचीं लिंगं आपण पाहातों, तसंच तर दिसतंय हे. आणि या पार्वतीचे हात तुटलेले आहेत. राणी दुर्गावतीचा पराभव केल्यानंतर मुसलमानांनी मोठ्या महादेवाचा विध्वंस तर केला नसेल ? हा महादेव स्वयंभू नाही आणि ही पार्वतीची मूर्तिहि भंगलेली ! जटाशंकर आणि छोटा महादेव याचं उग्र सौंदर्य किंवा गांभीर्य काहींच नाहीं इथं. आणि तरी हा महादेव मोठा ?—"

" हें स्थानमहात्म्य आहे, अनू. सातपुड्याच्या गोंडवनांतील गिरिराजींच्या अधिदेवाचं हें निवासस्थान आहे या भावनेनंच पाहिलें पाहिजे आपण त्याच्याकडे—"

" मी त्याच भावनेनं कल्पना केली होती या महादेवाबद्दल. आमच्या सातारा जिल्ह्यातला शिखर-शिंगणापूरचा शंभुमहादेव आठवतो ना तुम्हाला ? तोहि, सह्याद्रीच्या ज्या महादेवाच्या टेकड्या आहेत, त्यांचा अधिदेव समजला जातो. पण त्या महादेवाचं राजैश्वर्य कुठं आणि या महादेवाचं दैन्य कुठं ! तो सह्याद्रीच्या उत्तुंग उत्संगावर विराजमान झालेला आहे; तर हा सातपुड्याच्या खोल दरींत दडलेला आहे---"

" अग, तो शंभुमहादेव सिंघणासारख्या महापराक्रमी यादव सम्राटानं स्थापन केलेला, मालोजी भोसल्यासारख्या कर्तबगार सेनानीनं आपलं कुलदैवत

म्हणून आराधिलेला आणि श्रीशिवाजीमहाराजांसारख्या राष्ट्रनिर्मात्यानं राजचिन्हं समर्पण करून गौरविलेला ! त्या देवाधिदेवाची या गोंड, कोरकू, महार वगैरे जंगली जातींच्या महादेवाशी तुलना करण्यांत काय अर्थ ? महादेव हा मूळचा अनार्यांचा देव आहे ही जी कांहीं संशोधकाची उपपत्ति आहे, ती पचमढींतलीं त्याचीं हीं स्थानं पाहून मला पूर्णपणे पटली. पण, शिखर-सिंघणापूरचं स्थान मला जितकं रम्य वाटल, तितकंच हेंहि रम्य वाटल एका दृष्टीनं--"

"पण, मीं तुला आधीं बजावलं होतं अक्का, हें स्थान कांहीं विशेष बघण्यासारखं नाहीं म्हणून. जटाशंकराच्याच गुहेची ही थोडी मोठी आवृत्ति आहे—"

निरुपमा अनघाला म्हणाली.

त्यावर अनघाने तिला उत्तर दिलें—

"पण बरं झालं बाई मीं एकदां हें स्थान प्रत्यक्ष पाहलं तें. किती झालं तरी आपल्या मिश्र प्रांतातलं फार मोठें दैवत. आहे हें. त्याच्या नावानं ही सगळी सातपुड्याची रांग ओळखली जाते; न् लाखों लोक शिवरात्रीला दर्शनाला येतात त्याच्या. तेव्हा, इतक्या जवळ पचमढीला आल्यावर जर त्याचं दर्शन घेतलं नसतं, तर खरोखरी चूकच झाली असती ती. महाकोसल आणि महाविदर्भ यांचा संरक्षक राष्ट्रीय अधिदेव आहे हा—"

आता सर्व मंडळी गुहेतून बाहेर पडली होती.

अनघा विश्रांति घेण्यासाठीं चबुऱ्यावर बसली. तितक्यांत त्या गोसाव्यानें अभयला विचारलें—

"साहेब, आपल्याला चहा हवा असेल तर तयार करून देऊं ! —"

"असं ? फार उत्तम. जरूर तयार करून आणा. इथं हें विलायती तीर्थ हे गोसावी देत असतील अशी कल्पना नव्हती मला. धुनीचा छान उपयोग आहे हा ! मग आतां चहा घेतल्यावर इथून चौरागडला चला वाटल्यास. हत्ती आहेच उभा तुमची वाट पाहात, अनू—"

" नको बाई ! इथूनच नमस्कार चौरादेवाला माझा. तिथं बेलाच्या त्रिदळाऐवजीं यात्रींनी महादेवाला वाहिलेल्या हजारो त्रिशूळाची रास आहे म्हणतात नुसती—"

" मग ती नाहीं का पाह्यची इच्छा ?—"

" नाहीं. तुम्हाला काय होतं थट्टा करायला ? चौरा सगळ्यांत चढायला अवघड आहे न् तिथं पाहाण्यासारखंहि काहीं नाहीं म्हणतात. म्हणून मी माझ्या शक्तीची सगळी पुंजी आतां धूपगडावर जाण्यासाठीं राखून ठेवणार आहे—"

" मला वाटलं, आज संध्याकाळींच धूपगडला जावं असं म्हणशील तूं—"

" खरोखरी हरकत नव्हती जायला. कारण आज हत्तीवरून आल्यामुळं तसा थकवा नाही वाटत आहे मला फारसा. पण, तें अजस्र धूड चालत असताना जे सारखे धक्के बसत होते, त्यामुळं आता दिवसभर विश्रांति घ्यायची ठरवली आहे मी—"

यावर अभय तिला काहीं म्हणणार, तोंच त्या गोसाव्यानं ताब्याच्या स्वच्छ गडव्यातून चहा आणला; व भांड्यात ओतून तो सर्वांना दिला. अभय त्याचा घोट घेतल्याबरोबर हसून उद्गारला—

" सुंदर चहा बनवलाय आपण, गोसावीजी ! वास्तविक आपल्याकडे फार तर शांभवी मिळायची. इतका उत्तम चहा मिळेल असं स्वप्नातहि आलं नव्हतं आमच्या—"

" पण हा चहा साखरेचा नाहीं, डॉक्टरसाहेब—"

" मला तर कांहीं फरक नाहीं जाणवत, निरुताई—"

त्याबरोबर तो गोसावी आपली काळीभोर दाढी कुरवाळीत हसत हसत म्हणाला—

" बाईजी म्हणतात तें खरं आहे, साहेब. हा चहा गुळाचा आहे. पण गूळ साखरेसारखा असल्यामुळं लक्षात आला नाही फरक आपल्या—"

आप्पाजींना तर तो चहा इतका आवडला कीं, त्यानीं आणखी एकदां आपले भांडें भरून घेतलें अशा रीतीनं आकंठ चहापान केल्यावर आपल्या चर्चीतल्या द्रव्यानीं तयार केलेलं स्वादिष्ट पान तोंडात टाकून आणि तपकिरीचा एक बार ठासून ते म्हणाले—

"आता निघूं या, डॉक्टरसाहेब. घरीं पोंचायला एक वाजेल आपल्याला या हत्तीच्या चालीनं—"

त्याचा हा आदेश ऐकताच सगळी मंडळी उठली.

तोंच हातात कॅमेरा घेतलेला नचिकेत अनघाला म्हणाला—

"बाई, माझी अशी इच्छा आहे कीं, तुम्ही दोघानीं त्या त्रिशूळाखालीं उभं रहावं क्षणभर. मला फोटो घ्यायचाय तुमचा—"

"त्रिशूळाखालीं उभं रहाण्यात काय स्वारस्य आहे, बेटा ? —"

"मी सांगतें तुम्हाला. मृत्युंजयाचं अमोघ आयुध आहे तें. त्याच्या आश्रयाला जो उभा राहील, त्याला भय नाहीं काळिकाळाचं !—"

• • •

"अक्का, मी आज संध्याकाळीं पचमढी क्लबांत घेऊन जाणार आहे तुला—"

दुसऱ्या दिवशीं सकाळीं अनघा वेणी घालीत असतां निरुपमा तिला म्हणाली.

"का ग ? आजच कशी तुझ्या मनात कल्पना आली ही ?—"

"गुलाबबाईची फार इच्छा आहे तुझी ओळख करून घ्यायची; न् त्याच येणार आहेत स्वतः तुला क्लबात नेण्यासाठीं. आणि शिवाय माझंहि खास काम आहे—"

"तुझं खास काम ? समजलें नाहीं मी—"

अनघानें आपल्या हातातला केसाचा पेड तसाच पाठीवर सोडून देऊन आश्चर्याने विचारलें.

"माझ्या भावी पतिराजाशीं तुझी ओळख करून द्यायची आहे मला आज तिथं—"

"निरू, तूं काय बोलतेस हें ?—"

"अगदीं खरं बोलतेय—"

"आणि या क्षणापर्यंत तूं काहीं थांगपत्तासुद्धा लागू दिला नाहींस मला या प्रकाराचा ?—"

"अग, पण मला तरी कुठं ठाऊक होतं काल रात्री माझं लग्न नक्की ठरणार आहे म्हणून ? काल दुपारीं आपण महादेवाहून परत आलों, तेव्हा विचार होता माझा तुझ्याशी बोलण्याचा. पण, तूं निजून होतीस आल्यापासून सारखी—"

"हो. मला हत्तीवर बसल्याचा मागाहून बराच त्रास झाला ग. सारखं पाठींत दुखत होत परत आल्यापासून—"

"मला दिसतंच होतं तें. त्यामुळं मी बोलले नाहीं तुझ्याशीं. संध्याकाळी मी नेहमींप्रमाणं गुलाबबाईबरोबर क्लबात गेलें आणि लेफ्टनंट पवारानीं निश्चित केल्या सगळ्या गोष्टी तिथंच—"

"पण त्याच्यापूर्वी काहींसुद्धा बोलणं झालं नव्हतं तुझ्याशीं ?—"

"झालं होतं. पण माझ्याच मनाचा निश्चय झाला नव्हता. इथं आपण आल्यानंतर पहिल्याच आठवड्यात पवारसाहेबानीं हा प्रश्न काढला माझ्यापाशीं —"

"आणि तरी तू दाद लागूं दिली नाहीस मला ?—"

"खरं सागूं अक्का, तुला आवडलं नसतं मी जें करायचं ठरवलंय तें—"

निरुपमाच्या पापण्यावर पाणी तरारलें.

त्याबरोबर अनघा तिच्या गळ्यांत हात घालून म्हणाली—

"आपलं लग्न ठरल्याचं डोळ्यात पाणी आणून सांगणारी पहिलीच स्त्री भेटलीस तूं मला. का ग, खरं सांग काय झालं तें ! कुणी लादलं का तुझ्यावर हें लग्न ?——"

"नाहीं ग. मीच स्वतःवर लादून घेतलं——"

"पण नाव तर सांग तुझ्या पतिराजाचं——"

"कर्नल हिराचंद भार्गव. तूं म्हणाली होतीस ना मला मागे तुला निर्वासिताशींच लग्न करावं लागेल म्हणून ? तसाच योग आलाय आज अखेर—"

"पण ते तर बडे लष्करी अधिकारी दिसतात—"

"हो. पंजाबातले मोठे जमीनदार आहेत. घरचे अगदी एकटे एक आहेत. फाळणीच्या वेळीं लाहोरला झालेल्या कत्तलींत त्यांच्या कुटुंबातलीं सगळीं माणसं मारलीं गेलीं. ते त्या वेळीं बंगलोरला होते, म्हणूनच वाचले. त्यांचं घरदार सगळं गेलं; फक्त जमीनदारी पूर्व पंजाबात असल्यामुळं ती मात्र राहिली—"

"तुझी ओळख कशी झाली त्यांच्याशी ?—"

"पवारसाहेबांनीं करून दिली. नंतर तीन चार दिवसांनींच त्यांनीं विचारलं मला लग्नाबद्दल. पण माझ्या मनाचा कांहीं निश्चय होईना. अखेर काल रात्रीं ठरलं सगळं——"

"आप्पाजींच्या सल्ल्यानं ठरवलंस ?—"

"आप्पाजींचा सल्ला ? त्यांचा काय संबंध माझ्या लग्नाशीं ?——"

"तुझ्या जिभेला हाड नाहीं, निरू. अग, ते तुझे वडील ना ?–"

"असतील. पण वडलाच्या नात्याला शोभेसं वर्तन आहे का त्यांचं ? साठीच्या घरात आल्यावर ज्या इसमानं अकरा मुलं झालेल्या माझ्या सीता-सावित्रीसारख्या आईच्या डोक्यावर ती माळ्याची तरणी-

ताठी बायको आणून बसवली, त्या इसमाचा सल्ला मी लग्नाच्या बाबतींत काय म्हणून घ्यावा ? ज्याला स्वतःच्या कुटुंबाच्या सुखाची आणि शीलाची चाड नाहीं, त्या माणसाविषयीं बोलताना माझ्या जिभेला तरी हाड का असावें ?"

"पण त्यांना आवडेल का हा संबंध ?--"

"ते विचार करतात का कधीं त्यानीं उतार वयात माळणीशीं जोडलेला संबंध आपल्या मुलामुलींना आवडेल की नाहीं याचा ? आपल्या वृद्ध पत्नीवर आणि मुलाबाळांवर त्या संबंधाचा काय परिणाम होईल याचा ? आणि मी लग्न करणार आहे, अक्का. मी काही तशीच राहणार नाहीं आहे कर्नलसाहेबाजवळ—"

"त्याचं वय किती आहे ग ?--"

"तसं फार नाहीं. फक्त पन्नाशीची झुळूक लागली आहे !--"

"मग तूं कशासाठीं लग्न करणार त्याच्याशीं, निरू ?—"

"सुखासाठीं. मी तुला स्पष्ट सांगितलं होतं ना मागें ? दर्जा, अधिकार, पैसा याच्यासाठीं—"

"निरू, तू ही जाणूनबुजून आत्महत्या का करून घेते आहेस ?—"

"तुला असं काहीं तरी वाटेल हें जाणून होतें मी; न् म्हणूनच तुला कांहीं कळवलं नव्हतं मी आतापर्यंत. पण, मी जे ठरवलंय, ते सगळी परिस्थिति लक्षात घेऊनच ठरवलय. आप्पाजींचा प्रकार तूं पहातेच आहेस. माझ्या पाठीवर दहा भावंडं आहेत एकाखाली एक; न् त्यातल्या माझ्या नंतरच्या तिघी बहिणी तर अगदीं गळ्याशीं येऊन भिडलेल्या आहेत. त्याचं शिक्षण थांबलंय न् लग्नंही होत नाहीत. त्याच्या खालचे भाऊ आता कॉलेजपर्यंत येतील एकामागून एक. या साऱ्या भावंडांना माझ्या-शिवाय कोण मार्गाला लावणार आहे ? माझं उद्या कर्नलसाहेबाशीं लग्न झालं, म्हणजे ज्या बहिणीला पुढं शिकायची इच्छा असेल, तिला मी

कॉलेजात घालीन आणि जिला लग्न करायची इच्छा असेल तिला छान नवरा पाहून देईन. या लग्नामुळं माझ्या भावंडाबद्दलची सगळी जबाबदारी पार पाडायला समर्थ होईन मी; न् माझ्या उपेक्षित दुःखीकष्टी आईला उतार वयात सुखाचे दिवसहि दाखवू शकेन--"

बोलता बोलता निरुपमाच्या डोळ्यात पुन्हा अश्रु आले.

"पण यापेक्षा जास्त चागलं स्थळ महाराष्ट्रात मिळालं नसतं का तुला ? तूं घाई का केलीस एवढी ?--"

" घाई कशी, अक्का ? पुढल्या आषाढात अठ्ठाविसावं वर्ष संपेल माझं. आणखी दोन वर्षे जर अशीच गेलीं असतीं माझीं, तर कदाचित् जन्मभर कुमार राह्यचा प्रसंग आला असता मग माझ्यावर. शिवाय इतकं चागलं स्थळ मला महाराष्ट्रात मिळाल असतं असं वाटत नाहीं. चांगलं स्थळ म्हणजे दर्जा, अधिकार आणि पैसा जास्तीत जास्त असलेलं स्थळ ! आमच्या लग्नाच्या दिवशीं कर्नलसाहेब एक लक्ष रुपये बँकेंत ठेवणार आहेत माझ्या नावानं; आपला एक लाखाचा विमा आणि सिमल्याचा बंगला देणार आहेत मला; न् शिवाय दागदागिने माझ्या हौसेप्रमाणं करून देणार आहेत ते निराळेच ! असलं घबाड मला कुठून मिळालं असतं ग, आपल्या गरीब, हिशेबी महाराष्ट्रात ?

" तूं सगळी माहिती नीट मिळवली आहेस त्याच्याबद्दल ?--"

"हो. अगदीं पजाबांतल्या जमीनदारीच्या गांवापासून तों त्यांच्या तोंडात नकली दात किती आहेत इथपर्यंत !--"

"पण ते लष्करी अधिकारी आहेत हें विसरूं नकोस तूं. खलाशी, शिपाई आणि वैमानिक यांच्या प्रियकरणी प्रत्येक मुक्कामाच्या गावीं असतात अशा आशयाची जी एक इंग्रजी म्हण आहे, ती माहित आहे ना तुला ?--"

"हो. अग, त्याची इथली प्रियकरीण कोण आहे हें सुद्धां माहित आहे मला; न् त्यानीं स्वतःच ओळख करून दिली तिची माझ्याशीं. तसा मोठा सरळ आहे माझा शिपाईगडी !--"

" हें काय सांगतेस तूं !—"

" अगदीं जे घडलं, तेंच सांगते आहे. या पचमढींत धड गोरी नव्हे न् धड काळी नव्हे अशी एक उंडगभवानी आहे मिस् फर्नांडिस नावाची. ती नेहमी कर्नलसाहेबांच्या मागें मागें असायची, त्यांच्या सिगारेटवर सिगारेट शिलगावून धूम्रपान करायची, खायची प्यायची, तीन पत्ते खेळायची न् रात्रीं त्यांच्याबरोबर मोटारींतून जायची ! आमचं लग्नासंबंधीच बोलणं बरंच पुढं गेल्यावर मी कर्नलसाहेबांना एक दिवस सरळच विचारलं हा काय प्रकार आहे म्हणून त्या वेळीं त्यांनीं मला सांगितलं कीं, " ज्या दिवशीं आपलं लग्न नक्की ठरेल, त्या दिवशीं पांचशें रुपयांचा चेक तिच्या तोंडावर फेंकून मी मोकळा होईन तिच्या पाशातून ! " इतक्या खुल्या दिलाचा मनुष्य महाराष्ट्रांत मिळणं कठीण आहे, अक्का ! लेफ्टनंट पवार आणि मेजर उज्जलसिंग हे मध्यस्थ आहेत या प्रकरणांत; न् तेच साक्षीदार राहणार आहेत आमच्या लग्नाला—— "

" लग्न इथंच होणार आहे !— "

" नाहीं. जूनअखेर नागपुरास होईल धडाक्यानं. आज रात्रीं तुझ्यासमक्ष वाङ्‌निश्चय होईल; न् लगेच ती बातमी नागपूरच्या दैनिकांना तारेनं कळवतील कर्नलसाहेब. परवांच्या ' हितवादा 'त ती बातमी पाहिली म्हणजे आप्पाजींच्या डोळ्यांपुढं काजवे चमकतील—— "

" काय बोलतेस तूं हें, निरू !— "

" अगदीं खरं आणि योग्य तेंच बोलते आहे. मीं लहानपणापासून हट्टानं भांडून, शिष्यवृत्त्या मिळवून न् नोकरी करून शिक्षण पुरं केलं माझं. नाहीं तर माझ्या बहिणींची कुचंबणा बघतेच आहेस तूं ! तुझ्या सुदैवानं तुला दादासाहेबांसारखे उदार वडील न् डॉक्टरसाहेबांसारखा आदर्श पति मिळाल्यामुळं तुझ्या लक्षातच येत नाहींत इतरांच्या अडचणी, दुःख आणि दुष्कृत्यं ! नावाप्रमाणं अनघा आहेस तूं खरोखरी ! बरं, पण तूं आज सध्याकाळीं येणार ना मग क्लबांत !—— "

" हो; पण डॉक्टरांना नाहीं बोलावीत तूं ?— "

" नाहीं. एकदां वाङनिश्चय होऊन जाऊं दे तुझ्या संमतीनं. मग तूंच सांग सगळी हकीगत त्याना— "

" पण माझ्या संमतीचा प्रश्नच कुठं उरतो आता ? तूं तर सगळ्या गोष्टी ठरवून मोकळी झाली आहेस— "

" छे ग ! आज संध्याकाळी कर्नलसाहेबाना पाहून तुझं मत जर वाईट झालं त्याच्यासंबंधीं न् तूं लग्न करूं नको त्याच्याशीं म्हणून सांगितलंस मला, तर त्याना तिथल्या तिथं नकार देऊन मी परतेन तुझ्याबरोबर—"

" निरू, तूं इतकी वस्ताद असशील असं वाटलं नव्हतं कधीं मला— "

अनघाने तिची हनुवटी धरून हंसत हंसत म्हटले.

" आमच्यासारख्या गरीब स्थितींतल्या मुलींना आजच्या मायावी जगांत वस्ताद झाल्याशिवाय जगणंच मुळीं अशक्य आहे, अक्का— "

● ● ●

संध्याकाळीं सहाच्या सुमारास गुलाबबाई अनघाच्या भेटीला आल्या; व तासभर चहापान, गप्पागोष्टी वगैरे झाल्यावर त्या तिघी त्यांच्या मोटारींतून पचमढी क्लबांत गेल्या.

वाटेंत क्लबाविषयीं बोलताना गुलाबबाई अनघाला म्हणाल्या—

" ब्रिटिश राजवटींत या क्लबाला महत्त्व होतं फार. स्वतः गव्हर्नर हा पेट्रन असे क्लबाचा; न् त्याचे कौन्सिलर्स, सल्लागार, दिवाण वगैरे बडे अधिकारीहि रोज यायचे क्लबांत. त्यामुळं त्याला अमदानी चांगली होती. पण स्वातंत्र्य आल्यापासून उतरती कळा लागली आहे या क्लबाला. तुमचे काँग्रेस मंत्री कधीं ढुंकून पाहात नाहींत या क्लबाकडे. त्याचा सगळा वेळ सकाळ संध्याकाळ मोटारनं येणाऱ्या काँग्रेसवाल्यांच्या तक्रारी ऐकण्यात, मागण्या पुऱ्या करण्यात आणि एकमेकाविरुद्ध कोंबडीं झुंजवण्यात जात असावा !

त्यामुळं पचमढीच पूर्वीचं मोकळं, खेळकर, प्रसन्न वातावरण राहिलेलं नाहीं आता ; न् क्लबाचा तर महिन्याचा खर्च भागणंसुद्धा कठीण होऊन बसलंय. सध्या लष्करी अधिकाऱ्यांच्या आश्रयावर अवलंबून आहे हा क्लब. पण असं किती दिवस चालेल, बाई ? —"

"पण काँग्रेसमंत्र्यांना काय सामाजिक जीवनाची, खेळाची न् गप्पांची गोडी नाही का अजिबात ? दिवसभर राज्यकारभाराचा काम करून शिणलेल्या मेंदूला न् मनाला तरतरी न् तजेला आणण्यासाठीं त्यांना संध्याकाळीं गप्पा मारायच्याशा किंवा खेळावसं नाहीं वाटत ? —"

"दिसतं खरं बाई असं. ते आपल्याच रुबाबात गर्क असतात. त्यामुळं गोल्फ न् टेनिस खेळायची इतकी सुंदर सोय इथं असून खेळणारेच कोणी नाहींत बघा ! त्यांच्या बायका तर कधीं दृष्टीस पडायच्या नाहीत कुठं ! सगळ्याच बिचाऱ्या पडद्यात आहेत कीं काय कोण जाणें ! पूर्वी हा क्लब स्त्रीपुरुषांनी फुललेला असे नुसता; न् खेळायला जागा पुरत नसे. दिवसभर सपाटून काम केल्यावर संध्याकाळचा वेळ उघड्या हवेत न् खेळकर वातावरणात मजेनं घालवून पुन्हा ताजंतवानं व्हायचं, ही युरोपियनांची कला काहीं शिकले नाहींत आपले हे देशी राज्यकर्ते—"

"तेवढीच कला का म्हणता ? युरोपियनांची सचोटी, दानत, उरक, धडाडी, प्रांजळपणा, व्यापक राष्ट्रीय दृष्टि यांपैकीं किती गोष्टी आहेत आपल्या नव्या राज्यकर्त्यांत ? ते आपले आहेत म्हणूनच केवळ बोलायचं नाहीं त्यांच्याविरुद्ध—"

"पण एक गोष्ट मात्र फार चांगली आहे, बाई. लष्कराचं खातं न् कारभार सर्वस्वीं मध्यवर्ति सरकारच्या हुकमतीखाली असल्यामुळं आणि त्याची शिस्त न् व्यवस्था सर्व सर–सेनापतींच्या तंत्रानं ठरत असल्यामुळ प्रांतिक मंत्र्यांचा काहीं उपद्रव नाहीं लष्कराला. नाहीं तर इतर अधिकाऱ्याप्रमाणें आमच्याहि अधिकाऱ्यांना सकाळ–संध्याकाळ खेटे घालावे लागले असते त्यांच्या दारात ! गांधी-टोपीनं सगळं हिंदुस्थान व्यापलं; पण लष्करी

ातं मात्र अगदीं अलिप्त राह्यलंय त्या साथीपासून. तिथं सगळा युरोपियन ट आहे नखशिखान्त !--"

" तो कायम आहे तोंपर्यंतच शिस्त आणि संघटना कायम राहील ापल्या लष्कराची, गुलाबबाई. आपले पुढारी स्वतःला कितीहि गांधीवादी णवीत असले, तरी लष्कराला गांधीवादाचा संसर्ग पोचूं न देण्याइतके तें न् दुटप्पी आहेत ते !—"

" पण तुम्हीं एक गंमत पाह्यली आहे का त्याची ? आपले गव्हर्नर, त्री किंवा पुढारी जेव्हा धोतर नेसून लष्करी सलामी घेतात, तेव्हा तो खावा किती विचित्र दिसतो ! त्याच्यापैकीं काहींना तर धड ताठ उभं हाता येत नाहीं किंवा सलामी देणाऱ्या सैनिकाची नीट पाहाणीहि करतां त नाहीं. अशा बेगरूळ हिंदी अधिकाऱ्याचा काय बोज पडणार रोपियनांच्या शिस्तींत तयार झालेल्या सैनिकावर ?—"

" मला पुष्कळदा असं वाटतं कीं, आपल्यातल्या शिकलेल्या लोकांनीं श्चात्यांची कृत्रिम राहणी आणि त्यांची व्यसनं जितक्या प्रमाणात उचललीं ाहेत, तितक्या प्रमाणात त्यांचे गुण नाहीं उचलले. त्यामुळं आपल्या यक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक तीनहि प्रकारच्या जीवनाला कांहीं शेस्त किंवा वैशिष्ट्य म्हणून आलेलं नाही अद्याप. धड ना भारतीय, धड ा युरोपियन असं कांहीं विचित्र रूप आहे आपल्या सुशिक्षित समाजाचं !–"

त्या बोलत बोलत क्लबात येऊन पोंचल्या, त्या वेळीं फारशी मंडळी मालेली नव्हती. आतल्या बाजूला दोन शीख तरुण बॅडमिंटन खेळत होते; बाहेरल्या पटांगणात खुर्च्या टाकून बसलेल्या युरोपियन स्त्री-पुरुषांचें मूम्रपान आणि गप्पाष्टकें चाललीं होतीं.

त्यातल्या एका वयस्कर युरोपियन स्त्रीनें गुलाबबाई दृष्टीस पडताच मापल्या रंगीत ओठांत धरलेली सिगारेट हातात घेऊन त्यांना म्हटलें—

" या, या, मिसेस् पवार. आम्ही वाटच पाहात होतों तुमची. कर्नलच्या ाकूनिश्चयाची मेजवानी कधीं देणार तुम्ही ?— "

" उद्यां सायंकाळीं सागतें तुम्हाला नक्की, ऑटी !— "

" छान ! छान ! चागली बातमी सागितली तुम्हीं ही. पण का हो, माझं लग्न जुळवण्याचा विचार कधींच येत नाहीं का तुमच्या मनांत ? मला कंटाळा आलाय आता या कुंवारपणाचा, मिसेस् पवार !— "

" तुम्ही हिंदी माणसाशीं लग्न करायला तयार असाल, तर उद्यां जमवतें मी लग्न तुमचं, ऑटी ! सध्या इथं आपल्या प्रातातले तुरुंगाचे आय. जी. आलेले आहेत नुकतेच विधुर होऊन. तुमची तयारी आहे का त्याच्याशीं लग्न करायची ? ते चागले गोरेपान पुणेरी ब्राह्मण आहेत. तुमचा जोडा छान दिसेल बघा !— "

" छे, छे ! मला कोणातरी पेन्शनीला आलेल्या म्हाताऱ्याच्या गळ्यांत बाधायचा बेत दिसतोय तुमचा ! पण मला लग्न करायचं झालं, तर मी तरण्या-बाड जवानाशींच करीन. माझ्यापेक्षा दहा वर्षांनीं लहान असलेला उमेदवार उभा करा तुम्हीं माझ्यापुढं. मग विचार करीन मी लग्नाचा — "

ऑटीचें तें विधान ऐकून त्या टेबलाभोवतालची सारी मंडळी हंसूं लागली. पण ती यत्किंचितहि न वरमता हंसत हंसत म्हणाली—

" परवा तुमच्या लेफ्टनंटबरोबर तो तरणाजवान लष्करी अधिकारी मोठ्या ऐटीनं छडी फिरवीत आला होता—काय त्याचं नाव पाहा !— कॅप्टन अग्निजोब—"

" कॅप्टन अग्निजोब नाहीं ; अग्निभोज, ऑटी—"

" हो, कॅप्टन अग्निभोज !—देव त्याचं भलं करो, मिसेस् पवार !— माझी झोंप उडून गेली त्या फांकड्या शिपायाला पाहिल्यापासून. त्याच्याशीं जुळवता का माझं लग्न ? मी एका पायावर तयार आहें—"

" मी विचारून पाहातें त्यांना—"

गुलाबबाईनीं हंसत हंसत उत्तर दिलें.

तोंच वेताच्या वाटोळया खुर्चीत कोंबलेलें आपले स्थूल शरीर त्याच्या बाजूला कलते करून ऑटींनें हळूच त्याना विचारलें--

" ती मिस् फर्नांडिस दिसत नाहीं आताशा कर्नलबरोबर ? मला वाटतं लग्न जमवलं बहुतेक तुम्ही कर्नलचं. एरवी त्यानं सोडली नसती त्या फटाकडीला--"

" मी उद्या सांगतें तुम्हाला सगळं ऑंटी, आम्ही त्याचं गडबडींत आहोंत आज-- "

अशा रीतीनें ऑंटीचें तोंड बंद करून गुलाबबाई आपल्या मागें उभ्या असलेल्या चपराश्याला म्हणाल्या--

" त्या पलिकडल्या टोंकाला सहा सात खुर्च्या न् एक टेबल ठेव बरं जलदी--"

आणि नतर आपल्या मनगटावरल्या घड्याळाकडे पाहात त्यांनीं अनघाला म्हटलें--

" लेफ्टनंटसाहेब, कर्नलसाहेब न् सरदारसाहेब बरोबर साडेसातला येणार आहेत इथं. अजून पंधरा मिनिटं आहेत त्याना यायला. तोंपर्यंत आपण बाहेर हिरवळीवर बसू या--"

चपराश्यानें खुर्च्या आणून ठेवल्या व तो अदबीनें मागें उभा राहिला. त्या दोघी बसल्यावर गुलाबबाईनीं अनघाला विचारलें--

" आपण काही पेय घेता का, बाई ? काय मागवूं आपल्यासाठीं ? बॉय--"

त्या चपराश्याला काहीं आणावयाला सांगणार, तोंच अनघा त्याना म्हणाली--

" मला काहीसुध्दा नको--"

" असं कसं म्हणता ? आपण आज प्रथमच आला आहात आमच्या क्लबात. आपण काहीं घेतलंत, तर आनंद वाटेल मला. काय निरुताई, काय घेतां मग ? लेमनस्कॉश, व्हिम्टो कीं जिन बोला ? काय मागवूं ?--"

" सगळी मंडळी आल्यावर मगच घेऊ आपण—"

" का ? आज कर्नलसाहेब आल्याशिवाय कांहीं घ्यायचं नाहीं असं ठरवलंय का तुम्हीं ?—"

गुलाबबाईनीं हंसून विचारले.

निरुपमाहि हंसली. तिच्या त्या हास्यात नववधूची सलज्ज उत्सुकता डोकावल्याचा भास अनघाला झाला. आणि, तिच्या मनात आलें, मग सकाळीं ही लग्नाविषयीं आपल्याजवळ इतक्या अनुत्साहाने आणि उद्वेगाने कां बोलली ! आपल्या कॉलेजमधील प्रियकराच्या आठवणीमुळें कीं कर्नलसाहेबाचें वय कळलेले असल्यामुळें ?

तोंच समोरून तिघे लष्करी अधिकारी त्यांच्या टेबलाकडे येत असलेले त्यांना दिसले. त्याबरोबर गुलाबबाई घड्याळाकडे पाहून हंसत हंसत उद्गारल्या—

" अजून साडेसाताला दहा मिनिटं आहेत. पण निरूताई, तुमच्या ओढीमुळं कर्नलसाहेबानीं घाई केली असली पाहिजे यायची आज—"

ते जवळ येतांच त्या उभ्या राहिल्या. त्या तिघा अधिकाऱ्यानीं किंचित् वांकून त्या तिघींना अभिवादन केलें; व लेफ्टनट पवार यानीं तोंडातला पाईप हातात घेऊन अनघाकडे पाहात अदबीनें विचारलें—

" आमच्या धूम्रपानाचा कांहीं त्रास तर होत नाहीं ना आपल्याला ? "

" छे, छे ! —"

अनघानें त्यांना चट्‌दिशीं उत्तर दिलें.

त्यावर लेफ्टनंट पवार हंसून तिला म्हणाले—

" आपल्या परिचयाचा योग आल्याबद्दल आनंद वाटतो मला फार. आम्हीं पुष्कळ ऐकलंय निरूताईच्या तोंडून आपल्याबद्दल —"

नंतर गुलाबबाईनी कर्नल भार्गव आणि सरदार उज्जलसिंग यांच्याशीं अनघाचा परिचय करून दिला; व निरुपमा कर्नल भार्गव याना म्हणाली—

" या थोरल्या बहिणीसारख्या आहेत मला, कर्नलसाहेब. म्हणून मुद्दाम आणलंय मीं याना आज इथ या आजारी असताना —"

त्याबरोबर कर्नल भार्गव चटकन् उठून अनघाला म्हणाले—

" फार उपकार झाले आपले. आपल्याला सगळं सांगितलंच असेल यांनी. खरोखरी, आज आपण आजारी असताना इथं आलात, ही आपली मेहरबानी आहे माझ्यावर—"

कर्नल भार्गव याच्या बोलण्यातली मिठास आणि ऐट अनघाला मोठी मोहक वाटली. ते रुबाबदार खरे, पण किंचित् उतार दिसत होते विशेषतः, त्याच्या पाणीदार डोळ्याच्या खालच्या फुगीर कडा, हनवटीला येऊन भिडलेला गळ्याच्या वळीचा जाड मासल थर आणि कानाजवळील केसाचे काडे झुबके हे त्याच्या धिप्पाड शरीरावर वार्धक्याची झडप झपाट्यानें पडत असल्याची साक्ष देत होते. जिवणीच्या टोकांशीं पीळ भरून वर वळवलेल्या त्याच्या अकडबाज मिशा आपण आता रंग बदलण्याच्या बेतात असल्याचें दर्शवीत होत्या; तर खालच्या लोंबत्या ओठावर चढलेला काळसर, तांबुस रंग धूम्रपान आणि तांबूलसेवन याचा अतिरेक सुचवीत होता. आल्या क्षणापासून त्याची लालस नजर निरुपमावर खिळलेली आहे, अनघाच्या ताबडतोब लक्षात आलें. पण त्याच्या विनयमधुर भाषणाने हृष्ट होऊन ती त्याना म्हणाली—

" निरुताईनं सांगितली मला सगळी हकीकत. माझ्या मैत्रिणीला आपल्यासारखे थोर पति लाभले, याबद्दल आनंद वाटतो मला. मी आपलं उभयताचं मनापासून अभिनंदन करते—"

" खरोखरी, मी आपल्या मैत्रिणीचा फार ऋणी आहें, मिसेस पंडित. माझ्यासारख्या घरादाराला मुकलेल्या पंजाबी निर्वासिताला यांच्यासारख्या गुणी, सुस्वरूप महाराष्ट्रीय तरुणीनं पत्करलं, हा याच्या मनाचा उदारपणा आहे. हा गोड योग जुळवून आणण्याचं सर्व श्रेय मी लेफ्टनंट आणि मिसेस पवार याना देतों. माझ्याविषयींच्या कळकळीनं जर त्यांनी ही गोष्ट

घडवून आणायचं मनावर घेतलं नसतं, तर माझा विसकटलेला संसार काहीं सावरला नसता पुन्हा—"

"हो. मला सांगितलं हें सगळं निरूनं. लेफ्टनंटसाहेबांची निवड फार चांगली आहे सर्वच दृष्टींनीं—"

अनघाचा तो उद्गार ऐकताच कर्नल भार्गव पुन्हा उभे राहिले आणि किंचित् वाकून नमस्कारपूर्वक म्हणाले—

"खरोखरी, मी तुम्हा सर्वांचाच फार आभारी आहे या बाबतींत. लेफ्टनट पवार यांच्याप्रमाणच माझे मित्र सरदार उज्जलसिंग यानीहि आपल्या मैत्रिणीचं मन वळवण्यासाठीं पुष्कळ मेहनत घेतली. दीड वर्षांपूर्वी मी बंगलोरला असताना आमचं सगळं कुटुंब लाहोरला कत्तल झाल्याचं ज्या दिवशीं मला कळलं, त्या दिवसापासून मन खचून गेल्यासारखं झालं होतं माझं. पण आपल्या मैत्रिणीनं पुन्हा नवजीवन दिलं आहे मला. आणि मी आपल्याला आश्वासन देतों कीं, माझ्या ठिकाणीं जरी पुष्कळ दोष असले, तरी आपल्या मैत्रिणीशीं मी अत्यंत निष्ठेनें वागेन—"

बोलता बोलता कर्नल भार्गव यांचा आवाज भरून आला. आपला भावनावेग लपविण्यासाठींच की काय, त्यानीं खुर्चीला टेकून ठेवलेली आपली काळीभोर काठी हातात घेतली. पण, त्या काठीच्या चांदीच्या व्याघ्र-मुखी मुठीवर ठेवलेले त्यांचे केसाळ राकट हात कांपत होते आणि त्यांच्या कपाळावरील आठ्यांच्या दाट रेषांवर शिरवा आला होता.

त्यांची ती प्रक्षुब्ध मनःस्थिति ओळखून सरदार उज्जलसिंग मध्येंच म्हणाले—

"मीहि ग्वाही देतों मिसेस पंडित, त्याबद्दल आपल्याला. कर्नलसाहेब हे माझे जुने स्नेही आहेत. आम्ही एका राहुटींत राहिलों आहोंत आणि एका रणांगणावर लढलों आहोंत. मी त्यांना पुरेपुरे ओळखतों. शिपायाची जात आणि रीत याची कल्पना आपल्याला थोडीबहुत असेलच. कर्नल

मोठे उमदे आणि प्रेमळ शिपाई आहेत. आपल्या मैत्रिणीचं विवाहानंतरचं आयुष्य सुखात जावं म्हणून सर्व प्रकारची काळजी त्यांनीं घेतली आहे. हा योग आमच्या पवारसाहेबांनीं जुळवून आणल्याबद्दल मला आणखी एका कारणामुळं आनंद होतो. पंजाब आणि महाराष्ट्र हे आपल्या हिंदुस्थानांतले दोन लढवय्ये प्रांत आहेत. या दोनच प्रांतांनीं मोगल बादशहाशीं यशस्वी सामना देऊन स्वतंत्र राज्यं स्थापन केलीं. या दोन प्रांतातल्या शूर जमातींत जर आंतरप्रांतीय विवाह घडून आले, तर, मला वाटतं, त्यामुळं आपल्या या दुभंगलेल्या देशाचा फायदाच होईल. आपल्याला आतां या विभागलेल्या हिंदुस्थानातून महान् बलाढ्य राष्ट्र निर्माण करायचं आहे. आम्ही सैनिक लष्करात फक्त एकच जात ओळखतों—ती म्हणजे 'हिंदी', 'भारतीय'! लष्कराप्रमाणं ज्या दिवशीं या सर्व देशातहि 'हिंदी' ही एकच जात ओळखली जाईल, त्याच दिवशीं या दुभंगलेल्या देशातून एकात्म बलशाली हिंदी राष्ट्र उदयाला येईल. त्याहि दृष्टीनं आपण सर्वांनीं या आंतरप्रांतीय विवाहाचं स्वागत केलं पाहिजे—"

"मी थोडं मध्यें बोलतों याबद्दल मला माफ करा, मिसेस् पंडित. सव्वा महिन्यापूर्वी मी जेव्हा मिस् देशपांडे यांची कर्नलसाहेबांशीं ओळख करून दिली, त्या वेळीं मला मुळींच आशा नव्हती या लग्नाचा योग जुळून येईल अशी. पण, या दोघांचा निकट संबंध आल्यावर मी मिस् देशपांडे यांच्याशीं हा प्रश्न काढण्याचं धैर्य केलं; व त्यांनीं सर्व गोष्टी नीट समजावून घेऊन नंतर लग्नाला संमति दिली. तरीसुध्दां काल रात्रीं त्या असं म्हणाल्या आम्हाला कीं, माझ्या थोरल्या बहिणीची मान्यता मिळाल्याशिवाय लग्न पक्कं ठरलं असं समजूं नका आपण. म्हणून मिसेस् पवारांनीं आज मुद्दाम आपल्याला इथं यायची तसदी दिली. आपण कांहींहि विचारूं शकता कर्नलसाहेबांना—"

"मला त्यांना कांहींहि विचारण्याची गरज वाटत नाहीं. निरुपमानं सगळ्या गोष्टी समजावून सांगितल्या आहेत मला. आज तरी मला असं दिसतंय कीं, हा योग सर्व दृष्टीनीं अभिनंदनीय आहे. लग्न हा खरोखरी

जुगार आहे एक प्रकारचा. संसारात पुढं काय होईल हें कोणीं सांगावं ? पण कर्नलसाहेबांना बघितल्यावर माझ्या मैत्रिणीला उमदा पति मिळाल्या-बद्दल आनंद झाला माझ्या मनाला—"

"कर्नलसाहेबांनीं आपलं बॅंकबुक, विम्याची पॉलिसी व इतर सगळे कागदपत्र दाखवायला आणले आहेत आपल्याला. आपण आत जाऊन खात्री करून घेऊं शकता आपली—"

"नाहीं, काहीं गरज नाहीं. माझा पूर्ण विश्वास आहे आपल्यावर—"

अनघाचा हा उद्गार ऐकताच कर्नलसाहेबांनीं चट्दिशीं तिला विचारलें—

"मग मी तार करूं आता वाङ्निश्चय झाल्याबद्दल नागपूरच्या दैनिकांना आणि नोटीस देऊं रजिस्ट्रारला लग्नाची ?—"

"हो. माझी पूर्ण संमति आहे—"

"मला फार आनंद होतो मिसेस् पंडित, आपण इतक्या तत्परतेनं आमच्या लग्नाला आशीर्वाद दिल्याबद्दल आपल्याला कल्पना नाहीं येणार निरुपमा कितो साशंक होती आपला आशीर्वाद मिळवण्याच्या बाबतींत याची—"

इतका वेळ स्तब्ध असलेल्या निरुपमानें आतां तिला विचारलें—

"अक्का, तूं मनापासून आशीर्वाद देते आहेस ना आम्हाला ?—"

तो प्रश्न विचारतांना तिच्या आवाजात उत्पन्न झालेला कंप अनघाला जाणवला; व आपलेंहि हृदय भरून येत आहे, असें तिला वाटलें. पण स्वतःला सावरून ती चटकन् म्हणाली—

"हें लग्न तुम्हां उभयतांना सुखकर होवो, असं मी मनापासून इच्छितें, निरूताई. पण कर्नलसाहेब, मला आपल्याला एक विनंती करायची आहे—"

त्याबरोबर कर्नेल भार्गव यांनीं चटदिशी उठून तिला अदबीनें विचारलें—

" कोणती विनंती ?—"

" विनंती अशी कीं, माझी ही मैत्रीण अगदीं भिन्न परिस्थितींत वाढलेली आहे. तिचे संस्कार आणि शिक्षण हीं अगदीं वेगळ्या प्रकारचीं आहेत. आमच्या महाराष्ट्रात पंजाबप्रमाणं पडदा नाहीं; न् स्त्रिया पुरुषांशीं अगदीं मोकळेपणानं वागतात. शिवाय आजपर्यंतचं तिचं सर्व आयुष्य सार्वजनिक कामात भाग घेण्यात गेलेलं आहे हें तिचं वैशिष्ट्य लक्षात घेऊन आपण अतिशय समजूतदारपणानं वागलं पाहिजे तिच्याशीं. तरच हा विवाह सुखावह होईल तिला—"

" हे सगळं मिसेस् पवारहि बोलल्या आहेत माझ्याशीं. मी आपल्याला वचन देतों मिसेस पंडित, आपल्या मैत्रिणीला आज जें स्वातंत्र्य आहे, त्याचा केव्हाहि संकोच केला जाणार नाहीं माझ्याकडून. मी साधाभोळा खुल्या दिलाचा शिपाईगडी आहे. आपण बेलाशक विश्वास ठेवा माझ्या शब्दावर. माझे हे दोघे स्नेही साक्ष आहेत मी आपल्याला देत असलेल्या या ग्वाहीला—"

" मी आपली फार आभारी आहें, कर्नेलसाहेब—"

" मग मी आगठी देऊं आता निरुपमाला वाङ्निश्चयाची ?—"

" हो—"

अशा रीतीनें अनघाची संमति मिळताक्षणींच कर्नेलसाहेब उठले आणि गुलाबबाईंनीं पुढें केलेला निरुपमाचा थरथर कापणारा हात आपल्या हातांत घट्ट धरून त्यांनीं गुलाबी झाक असलेल्या हिऱ्याची सुंदर आगठी तिच्या बोटात घातली.

आणि त्या दोघानीं चटकन खालीं वाकून अनघाला नमस्कार केला.

त्याबरोबर तिनें त्या दोघाचे हात आपल्या हातांत घेऊन जुळवले आणि

"माझी ही मैत्रीण आज आपल्या स्वाधीन होते आहे, कर्नलसाहेब. आपण तिला प्रेमानं वागवा एवढीच प्रार्थना आहे माझी आपल्याला. परमेश्वर तुमचं वैवाहिक जीवन सफल करो—"

अनघाला पुढें बोलवेना. आपल्या डोळ्यांत येत असलेले अश्रु तिनें मोठ्या कष्टाने आवरले.

तोंच तें हृदयंगम दृश्य कौतुकानें पाहात तिच्या शेजारीं उभ्या असलेल्या गुलाबबाई हंसत हसत उद्गारल्या—

"शुभ मंगल सावधान !—"

त्याबरोबर लेफ्टनंट पवार त्याना म्हणाले—

"शुभमंगल म्हणण्याचा अधिकार तुझा नाहीं, गुलाब. तो अधिकार आपल्या ऑंटीचा आहे. ती आमच्या या क्लबाची गेलीं तीस वर्षे सभासद आहे, मिसेस् पंडित. तिची जीभ मोठी चटोर न् चावरी आहे; पण मन आणि वर्तन मात्र अगदीं स्वच्छ! तिला हळूच इकडे बोलाव बरं, गुलाब. आमच्या क्लबाची कन्याकुमारी आहे ती ! त्या अधिदेवतेचा आशीर्वाद घेऊन आपण इथून सटकलों कीं, उद्या सकाळीं साऱ्या पचमढीभर बातमी होईल या लग्नाची !—"

आणि त्यांनींच स्वतः शीळ घालून हाक मारली—

"ऑंटी, ऑंटी, कृपा करून इकडे येतां का जरा ! थोडं खाजगी काम आहे—"

ती हाक ऐकतांच ऑंटीनें त्या वेताच्या लहानशा वाटोळ्या खुर्चीत चपखल बसलेला आपला स्थूल जघनप्रदेश तिच्यातून मोठ्या परिश्रमानें हलकेच काढून घेतला; व हातातल्या काठीवर भार टाकून ती डुलत डुलत त्यांच्या टेबलापाशीं आली...

"काय लेफ्टनंट, कांहीं ड्रिंक घ्यायचा विचार आहे का ! तुम्हीं कांहीं उगाच शीळ घातली नाहींत या पावराला—"

"नुसतं ड्रिंक का ? डिनर मागा ऑटी, तुम्ही आज कर्नलजवळ—"

"काय ! लग्न ठरलं कर्नलचं ?—"

"हो. आताच—"

"आणि वधू कुठं आहे ?—"

ऑटीनें आपले चपटे, पोपटी, तीक्ष्ण डोळे निरुपमावर रोखून विचारलें.

"या मिस् निरुपमा देशपांडे, भावी वधू कर्नलसाहेबांच्या—"

"निपामारु—"

"नाहीं, नाहीं. निरुपमा, ऑटी !—"

"हो. हो. निरुपमा ! माफ करा हं, मिस् देशपांडे. हीं तुमचीं संस्कृत नावं माझ्या कानात शिरलीं कीं, भलतंच रूप धारण करून बाहेर पडतात माझ्या तोंडातून ! तरी मी अलीकडे कीलहॉर्नचं व्याकरण पडते आहे तुमच्या त्या रामभरताप सास्तऱ्याजवळ !—"

आणि ती कर्नल भार्गव याच्याकडे वळून उद्गारली—

"कर्नल, मोठा नशीबवान् आहेस तूं मला कल्पना नव्हती इतकी देखणी पोर तूं पटकावूं शकशील अशी—"

आणि तिनें त्याच्याजवळ जाऊन त्याचे गालगुच्चे घेतले आणि त्यांचे दोन्ही हात धरून त्यांना गदगदा हलविलें.

नंतर ती निरुपमाजवळ गेली आणि तिची हनुवटी धरून म्हणाली—

"मोठी गोड पोरगी आहेस तूं. पण, लक्षात ठेव, जवानीचा मद्य फार थोडे दिवस टिकतो; न् त्याचा आस्वाद घेतल्यावर पुरुष दुसरीकडे झुकतो. त्यातून हा तर रंगेल मुरब्बी शिपाईगडी आहे !—"

"छान ! हाच का आशीर्वाद ऑटी, तुमचा आम्हाला ?—"

कर्नलसाहेबांनीं तिला हंसत हंसत विचारलें.

"नाहीं, नाहीं. मी फक्त तिला सावध करतें आहे तुझ्याबद्दल, माझ्या बुद्दया छोकऱ्या !—"

आणि तिनें चटकन् त्या दोघाचे हात एकत्र जुळवले आणि ती हंसत हंसत उद्गारली—

"प्रभू येशूची पवित्र कुमारीमाता तुमचं वैवाहिक जीवन सुखी आणि सफल करो—"

• • •

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं पाचच्या सुमारास ते धूपगडाला जाण्यासाठीं निघाले.

धूपगडाच्या पायथ्यापर्यंतची ती चार मैलाची मोटारची वाट त्याना फार सुखकर वाटली. अभयनें मोटारवरलें आच्छादन काढून टाकलें होतें; व ती अगदीं संथपणानें तो चालवीत होता. त्यामुळें पचमढीच्या पठारावरील शैलश्रीच्या सौंदर्याच्या ज्या अनेक सूक्ष्म छटा त्याना आतापर्यंत प्रतीत झाल्या नव्हत्या, त्या आज प्रथमच त्याच्या डोळ्यात भरल्या.

सायंसूर्याचे कलतें सौम्य ऊन या वेळीं पठाराच्या उंचसखल भागांवर सर्वत्र पसरलें होतें. त्या तिरप्या तकतकींत उन्हात पठारावरील रेताळ मातीचा कुठें ताबुस, कुठें अंजिरी तर कुठें पिवळा रंग, पठारावर उगवलेल्या गवताचा कुठें हिरवा, कुठें करडा तर कुठें गेरवा रंग, टेंकडयावरील पाषाणाचा कुठें काळसर, कुठें जांभळा तर कुठें लाल रंग व निरनिराळ्या प्रकारच्या झाडाचा कुठें पोपटी, कुठें गर्द हिरवा तर कुठें निळसर रंग अशा नाना प्रकारच्या रंगछटा खुलून दिसत होत्या; व पश्चिमेकडील क्षितिजावर या वेळीं जे पाढरे, काळे, भस्मी, गुलाबी आणि पिवळसर रंगाचे ढग सुस्तपणानें जागोजाग थबकले होते, तेहि सर्व सूर्यप्रभेनें उजळून गेलेले असल्यामुळें द्यावापृथिवीच्या वेषभूषेंत एक प्रकारची विचित्र रंगसंगति उत्पन्न झाल्यासारखी दिसत होती. चौरागड, महादेव आणि धूपगड यांचीं शिखरें त्या उन्हात आपली भव्यता मृदुतेनें प्रगट करीत होतीं. चौरागडाचा

उघडाबोडका रखरखीत चौथरा व धूपगडाच्चीं गगनाला भेदणारीं सुनील शृंगें याच्या मधोमध असलेला महादेवाचा पसरट डोंगर हा दुरून नंदीसारखा दिसे; तर या तीन शिखराच्या मानानें ठुबरा असलेला त्रिकोणी चाबूगड स्वयंभू शिवलिंगासारखा दिसत होता. उलट पूर्वेकडून पश्चिमेकडे गेलेली डोंगराची सलग तटबंदी कुठें खडकामुळें काळी, झाडांमुळें हिरवी तर मातीच्या थरामुळे तांबुस दिसत होती.

पठारावरील झाडांचेहि विविध रंग आणि आकृति त्या सौम्य होत चाललेल्या सूर्यप्रकाशात मोठ्या मजेदार दिसत होत्या. ताल, सुरू, पाईन, तून आणि चंदेरी ओक यांचे उंच पण सडसडीत व आंबा, वड, शिरीष, हिर्डा, आणि जांभूळ यांचे उंच पण घेरदार वृक्ष यांच्या आकारातील विरोध जितका प्रेक्षणीय होता, तितकेच गुलमोहोराचे लालभडक तुरे, अमलताशाचे पिवळे-जर्द गुच्छ आणि जकारंदाचा निळा-जांभळा बहर यांचें रंगवैचित्र्यहि विलोभनीय होतें.

क्षितिजाच्या अस्मानी रंगापासून तों जमिनीच्या तांबुस रंगापर्यंत त्या पठारावर रंगांच्या ज्या नाना प्रकारच्या सूक्ष्म छटा पसरलेल्या होत्या व त्याच्यात जो बदल मावळत्या सूर्यकिरणाच्या कांतींतील बदलाबरोबर सारखा झपाट्यानें होत होता, त्याची अनघाला गंमत वाटली आणि ती अभयला म्हणाली --

" माणसानं आतापर्यंत जे अनेक रंग निर्माण केलेले आहेत, त्यांत कांहीं निसर्गातल्या या नानाविध रंगाच्या बारकिसाराक छटा आढळा-यच्या नाहींत ––"

" कशा आढळतील ! माणसानं तरी रंग कुठून घेतले, अनू ! सृष्टिपासूनच कीं नाहीं ! आम्हा वैज्ञानिकांची अशी भावना आहे कीं, आम्ही निसर्गावर जय मिळवीत आहोंत पण, मला केंव्हा केंव्हा असं वाटतं कीं, निसर्गाच्या स्वरूपाचा आणि सामर्थ्याचा आतापर्यंत केवळ अंशमात्र बोध आम्हाला झाला आहे––"

धूपगडाच्या पायथ्याशीं मोटर आल्यावर ते खालीं उतरले; व अनघा खुर्चीवर बसल्यानंतर तो मैलभराचा अवघड चढ चढावयाला त्यांनीं सुरुवात केली. महादेवाच्या मानानें धूपगडाचा चढ जसा बिकट, तशाच त्याच्या भोंवतालच्या दऱ्याहि भीषण. पण त्या दऱ्या हिरव्यागर्द झाडींनें झाकलेल्या असल्यामुळें व मावळत्या सूर्याचा सोनेरी प्रकाश या वेळीं त्याच्यावर पसरलेला असल्यामुळें, त्याची भीषणता थोडी सौम्य झाली होती. उलट, दऱ्याच्या ज्या खोल भागावर सायंप्रभा पसरलेली नव्हती, ते भाग झपाट्यानें काळवंडत चालले होते. जणूं, भरतीचें पाणी जसें किनाऱ्यावरील सखल भागात जलद पसरावें, त्याप्रमाणें तमिस्रेचा गडद अंधार दऱ्याच्या या निष्प्रकाश भागांना प्रथम व्यापून टाकीत होता.

गडाच्या पठारावर आल्यानंतर त्यांनीं तेथें असलेल्या रेस्ट हौसमध्यें थोडा वेळ विश्रांति घेतली; व मग त्या बंगल्याच्या मागल्या बाजूला जाऊन तेथून दिसणाऱ्या सातपुड्याच्या रांगाचा रम्य देखावा पाहिला. एकापुढें एक क्षितिजापर्यंत जाऊन भिडलेल्या त्या डोंगराच्या उंच उंच रांगा आणि दाट झाडींने व्यापलेल्या मधल्या खोल खोल दऱ्या याचें दूरवर पसरलेलें तें अफाट दृश्य इतकें मनोवेधक होतें कीं, अनघा आणि निरुपमा याना कांहीं तेथून हलावेंसें वाटेना.

तेव्हा नचिकेत त्याना म्हणाला, " धूपगडावरून दिसणारा सातपुड्याचा खरा देखावा हा नव्हे बरं का, बाई. ते जे तीन उंच काळेभोर खडक दिसतात ना समोर, ते चढून गेल्यावर तिथून सातपुड्याच्या सात रांगा पाहायला मिळतील आपल्याला. पण त्या खडकावर जाण्यासाठीं आणखी अडीचशें फूट चढाव लागेल—"

" पण त्या खडकावर जायला रस्ता आहे ना?—"

" हो. अगदीं चांगल्या छान पायऱ्या आहेत. आतांपर्यंत आपण जो चढाव चढून आलों, त्याच्यापेक्षा अगदीं सोपा आहे तो चढ— "

" हे पहा नचिकेत, इथून जो देखावा दिसतोय, त्याच्यापेक्षा जास्त कांहीं दिसणं शक्य नाहीं वरतून. आपण दोघं इथंच बसूं, अनू. बाकीची मंडळी वर जाऊन येतील— "

" नको, नको. मी बसतें अक्काजवळ, डॉक्टरसाहेब. मी अनेकदा वर जाऊन आलेली आहे तुम्ही आज प्रथमच येताहात इथं, तर तुम्ही अवश्य वर जा नचिकेतबरोबर. तुम्ही परत येईपर्यंत आम्ही गप्पा मारीत बसूं दोघी इथं— "

रेस्ट हाउसच्या समोरील पटांगणात चपराशानें खुर्च्या आणून ठेवल्या होत्या. त्या दोघी तेथे येऊन बसल्या; व अभय आणि नचिकेत हे निरुपमाच्या बहिणींसह वर गेले.

ते दृष्टीच्या टप्प्यापलिकडे गेल्यावर अनघा निरुपमाला म्हणाली—

" निरू, आपण वर जाऊं या हळुहळू— "

" मी खुर्चीवाल्याना बोलावते, अक्का— "

" नको. खुर्चीतून वर जायची इच्छा नाहीं माझी. हळुहळू चालत जमेल तितकं वर जाऊं. थोडीशी तरी स्वतःच्या पायानीं डोंगर चढण्याची मजा अनुभवूं दे मला आज— "

" पण तुला झेपायचं नाहीं, अक्का—"

" अग, प्रयत्न तर करूं दे मला. नाहीं झेपलं, तर आहेतच खुर्चीवाले बसलेले मला स्वर्गात नेण्यासाठीं !—"

" उगाच भलभलतं का बोलतेस तूं ? माझी तुला वर न्यायला ना नाहीं. पण डॉक्टरसाहेब काय म्हणतील ग ? —"

" त्यांना आता थोडंच दिसणार आहे आपण वर चढून येत असल्याचं ! मी अचानक जाऊन उभी राहीन त्याच्यामागं न् डोळे झाकीन त्याचे ! — "

" आणि ते उघडल्यावर शंकराच्या तृतीय नेत्रातल्या ज्वाळा निघतील यांतून न् मी भस्म होऊन जाईन त्यात—"

" छे, छे ! मी समोर असताना ज्वाळा नाहीं निघणार; चांदणच बरसेल त्याच्या डोळ्यातून ते कितीहि रागावले तरी ! पण वादात वेळ नको घालवूं गडे उगाच. चल ना मला वर घेऊन—"

तिनें निरुपमाच्या गळ्यात हात घातला व ती तिच्यासह उठून उभी राहिली. तिला वर घेऊन जाण्याची निरुपमाची मुळीच इच्छा नव्हती. पण अनघाच्या लडिवाळ हट्टापुढें तिचें काहींच चालले नाहीं.

तिचा आधार घेऊन अनघानें अगदीं सावकाश तो चढ चढावयाला प्रारंभ केला. खडकातून पायऱ्या खोदलेल्या असल्यामुळे चढ त्या मानाने सोपा होता हें खरेंच. पण थोडेसें चढून जाताच अनघाला दम लागला. म्हणून निरुपमा तिला म्हणाली--

" थाब, तुला धाप लागली, अक्का. मी खुर्चीवाल्याना हांक मारतें—"

" नको ग, निरू ! मी जाईन हळूहळू वर मुंगीच्या गतीनं. एवढा चढ तरी मला आपल्या पायानीं चढू दे. सुदैवानं ते आधीं वर निघून गेलेले असल्यामुळं मला मोकळीक मिळाली आहे तेवढीच—"

" पण उद्या जर तुझ्या पाठींत टणकायला लागलं, तर मला जबाबदार धरतील ते—"

" नाहीं ग. त्याना माहीत आहे मी किती हट्टी आहे तें. आम्हीं बारा वर्षे एकत्र काढलीं आहेत हें विसरूं नकोस तूं !—"

" नाहीं, नाहीं. मी हांक मारतें खुर्चीवाल्याना. आपण त्या दिवशीं हत्तीवरून महादेवाला गेल्यापासून आधींच पाठींतलं दुःख चाळवलंय तुझ्या. त्यात आणखी हा नसता उपद्व्याप नको—"

" निरू, तूं खुर्चीवाल्यांना हांक मारलीस, तरी मी बसणार नाहीं खुर्चीत. मी आतां काहीं झालं, तरी वर गेल्याशिवाय राहणार नाहीं. मघाशीं नचिकेतला जेव्हां हरणाप्रमाणं उड्या मारीत वर जातांना मीं पाहिलं,

तेव्हा लहानपणी यवतेश्वरला आपण कशा धावत पळत जात होतो याची आठवण झाली मला. खरोखरी, तारुण्य आणि आरोग्य या अजब दैवी चिजा आहेत, ताई. त्या संपल्यावर जगण्यासारखं काहीं शिल्लक उरत नाहीं आयुष्यात--"

"तूं काय म्हातारी झाली आहेस का, अक्का?—"

"म्हातारी नसेन, पण रोगी तर आहे ना? दुबळेपणाशिवाय म्हातारपण तें आणखी वेगळं काय असतं? वार्धक्यानं दुबळं आणि पंगु होण्यापेक्षां रोगानीं पोखरून जाऊन दुबळं आणि पंगु होणं फार भयंकर—"

"उगाच भलभलतं बोलूं नकोस, अक्का. मग पायींच जायचं का वर?--"

"हो—"

आणि त्या पुन्हा चढावयाला लागल्या. त्या तीन पायऱ्या चढल्या असतील, तोंच अनघा एकदम थांबून निरुपमाला म्हणाली—

"तो पाहिलास का केवढा प्रचंड अस्वल उभा आहे आपल्यासमोर, निरू? प्रभु रामचंद्राचा रीस सेनानी जाम्बुवत असाच असेल का ग?—"

"अग बाई, खरंच! हुबेहूब उभ्या राहिलेल्या अस्वलासारखा दिसतोय हा काळाभोर प्रचंड खडक. काळोखात जर कुणी इथं आलं, तर धडकीच भरायची त्याला ही पाषाणाकृति पाहून--"

"पांडवानीं ज्या वेळीं स्वर्गारोहण केलं, तेव्हा हिमालय चढून स्वर्गाला जाताना अशाच प्रकारचे अजस्र प्राणी भेटले असतील नाहीं वाटेत त्याना?—"

"पण स्वर्गारोहणाची कल्पना कशी आली ग एकदम तुझ्या मनात, अक्का?—"

"येणं अगदीं साहाजिक आहे, निरू. आज हा खडक चढून गेल्यामुळं माझं दुखणं जर जास्त झालं, तर हे स्वर्गारोहणच ठरेल नव्हे का माझं?—

"आणि तरी तूं हट्टानं इथवर आणलस मला!—"

"आणि अगदीं शेवटपर्यंत नेणार आहे तुला मी. नाहीं तरी माझ्यासमोर मृत्यु उभाच आहे आता. मग मी त्याला भिऊन जगण्याची धडपड करण्यात काय अर्थ आहे? त्यापेक्षा जें काय थोडंसं आयुष्य उरलं असेल, तें भोगून तरी घेऊं दे मला मनाप्रमाणं—"

"तुझ्या असल्या या बोलण्यानें तूं आपल्यावर प्रेम करणाऱ्या माणसाना किती दुःख देतेस याची कल्पना आहे का तुला, अक्का?—"

"हो. नसायला काय झालं? पण मी तरी काय करूं? आपलं शरीर झपाट्यान थकत चाललं असल्याचं मला आताशा सारखं जाणवतंय. मला फक्त एकच इच्छा आहे आता निरू, तुझ लग्न झालेलं पाहावं—"

"नागपूरला आपण गेल्याबरोबर आठ दिवसात लग्न होईल माझं-"

"मला मरताना फक्त एकाच गोष्टीबद्दल वाईट वाटेल, निरू. लग्न झाल्यापासून गेल्या बारा वर्षांत एकहि दिवस कधीं आम्हीं एकमेकापासून दूर राहिलेलों नाहीं. त्यामुळ मी गेल्यावर अगदीं एकाकी, अगदीं भयाण वाटेल त्याना. माझ्याशिवाय राहण्याची त्याना अगदीं संवय नाहीं!—"

"अक्का, तूं आता बोलूं नकोस मुळींच, तुला धाप लागलीय; न् घामहि आलाय. आपण सारख्या बडबडतों आहोंत. पण समोर डॉक्टरसाहेबाची बघ कशी समाधि लागली आहे ती!—"

"खरंच! आपण अगदीं हळूच मागें जाऊन बसूं त्याच्या—"

*

अभय समोरच्या उंच खडकावर बसून क्षितिज आणि शैलराजी याच्या अथाग, धूसर नीलिमात विलीन होण्याच्या बेतांत असलेल्या सूर्याच्या सौम्य बिंबाकडे एकाग्रतेनें पाहात होता. त्या दोघी मागल्या बाजूनें एक एक पायरी चढून हळूच वर आल्या. पलीकडल्या खडकावर बसलेल्या नचिकेतला खूण करून अनघानें गप्प बसण्याची सूचना दिली. त्यामुळें त्या दोघी इतक्या जवळ आल्या, तरीसुद्धा अभयला त्याची चाहूल लागली नाहीं. अनघानें त्याच्या खांद्यावर हात ठेवताच त्याची समाधि उतरली; व तिचा हात आपल्या हातात घेऊन त्यानें विचारलें—

" कशाला आलीस तूं इथं, अनू? कशी आलीस वर तूं—?"

पण तिला इतकी धाप लागली होती आणि घामहि इतका आला होता की, तिनें आपलें मस्तक त्याच्या खांद्यावर टेवून आपला सगळा भार त्याच्या अंगावर टाकला.

त्यानें मुकाटयानें तिला डाव्या हाताने लपेटून तिच्या कपाळावरला घाम पुसला आणि तिचे शिणलेलें शरीर आपल्या अंगावर घेतले.

त्याच्या अंगावर कांहीं वेळ रेलल्यावर तिला बरें वाटलें आणि ती उठून त्याच्या शेजारीं बसली.

तेव्हा त्यानें तिला विचारले, " मी बरोबर नाहीं असं बघून तूं पायीं आलीस का वर? खरं सांग मला—"

तिने मानेनेंच होकार दर्शविला; व आपल्याकडे रोषानें पाहाणाऱ्या त्याच्या विस्फारलेल्या डोळ्याना हंसत हंसत आपले प्रीतिपूर्ण डोळे भिडविले.

त्याबरोबर तो तिला पुन्हा लपेटून उद्गारला—

" किती वाईट आहेस तूं, अनू? उद्या किती अनिष्ट परिणाम होईल तुझ्या प्रकृतीवर या चढण्याचा, याचा विचार केला आहेस का तूं?—"

" सगळा विचार करूनच चढून आले वर मी. नाहीं तरी या दुखण्यांतून मी वाचत नाहींच आता. मग म्हटलं, स्वतःच्या पायानीं वर जाण्याची मजा का नये अनभवूं एकदा तरी! खरोखरी, सार्थक झालं माझ्या इथं येण्याचं. किती भव्य आणि विशाल दृश्य आहे हें!—"

आणि खरोखरीच त्या खडकावरून पश्चिम आणि पूर्व अशा दोन्ही दिशाचा जो देखावा दिसत होता, त्याची भव्यता अवर्णनीय होती. सातपुड्याच्या ज्या सहा रागा धूपगडापासून क्षितिजापर्यंत पसरलेल्या स्पष्ट दिसत होत्या, त्यापैकीं शेवटल्या क्षितिजाशीं समरंग झालेल्या रागेच्या उंच. सुळक्यावर सूर्यबिंब या वेळीं येऊन विसावलें होतें. मघाशीं त्याच्या प्रकाशात

हिरवीगार दिसत असलेली दऱ्यांतील झाडी आतां काळवंडत चालली होती. नैऋत्येच्या कोपऱ्यात दूर कुठें तरी जो पाऊस पडत होता, त्याचा निळा गर्द पट्टा क्षितिजाच्या त्या कडेला दिसत होता; तर आग्नेयेकडलें बहुतेक निरभ्र असलेलें आभाळ सुरम्य गुलाबी छटेनें रंगून गेलें होतें. सूर्यबिंबाच्या अगदीं वर भला थोरला काळा ढग लोंबकळत होता. त्याच्या उदरात घुमलेले सूर्यकिरण त्याला भेदून आपली उज्ज्वल प्रभा क्षितिजावर उधळीत होते. त्या परावर्तित प्रभेच्या प्रकाशात पश्चिम क्षितिजाचा पट्टा कुठें तपकिरी, कुठें पारवा, कुठें मोरपंखी, तर कुठें हिरवा दिसत होता त्या बदलत्या सामिश्र सायप्रभेत सातपुड्याच्या अंतराअंतरानें पसरत गेलेल्या रंगाचें रंगवैचित्र्यहि क्षणोक्षणीं बदलत होते.

सूर्यबिंब निटिलावर धारण केलेल्या शैलश्रीचें तें विराट्, विस्मयकारक विलोभनीय रूप पाहून अनघाचे हात आपोआप जुळले, डोळे भरून आले आणि ती उद्गारली--

" पूषन्नेकर्षे यम सूर्य प्राजापत्य व्यूह रश्मांन्समूह
तेजो यत्ते रूपं कल्याणतमं तत्ते पश्यामि........ "

• • •

धूपगडावरून परत आल्यावर त्या दिवशीं रात्रीं अनघाला जो थकवा आला, तो नतर सारखा वाढतच गेला.

रात्रीं जेवणानंतर अभयबरोबर थोडा वेळ तरी एकटेंच फिरावयाला जावयाचें असा तिचा नेम होता. त्या दिवशीं जेवण आटोपल्यावर तिला अंथरुणावर पडलेली पाहून अभयनें विचारलें—

" आज फार थकवा आला का तुला? मला वाटलंच होतं. तूं त्या सुळक्यावर हट्टानं पायीं चढून आल्यामुळं फार त्रास होणार तुला आता—"

" होऊं दे. मी जर तो सुळका चढून वर आलें नसतें, तर इतका सुंदर देखावा मला पाहायला मिळता ना. धूपगडाच्या पठारावरले ते तीन सुळके पाहून मला सारखा रामायणातल्या त्रिशिरस् राक्षसाची वर्णनाची आठवण होतेय—"

" रात्रीं स्वप्नांत त्रिशिरस् दिसायचा तुला एखादे वेळीं ! पण, मीं मात्र ठरवून टाकलंय कीं, नागपूरला गेल्याबरोबर प्लास्टर कोट घालायचा तुला. होमिओपॅथीचा प्रयोग पुरे झाला आता—"

" प्लास्टर कोट घातल्यानं मला बरं वाटेल अशी जर तुमची कल्पना असेल, तर ती चूक आहे अगदीं. पण, तुमचा आग्रहच असेल, तर माझी ना नाहीं. पण निरूच लग्न झाल्यावर प्लास्टर-कोट घालून घेईन मी; तोंपर्यंत नाहीं—"

" पण त्यानंतर मात्र मी म्हणेन तसं वागलं पाहिजेस तूं—"

" हो—"

" मग आज फिरायला जायचं नाहीं ?—"

" नाहीं कसं ? ही मी उठलेंच—"

आणि ती तत्क्षणींच अंथरुणावरून उठली. हवेंत किंचित् गारवा होता, म्हणून तिनें स्वेटर घातला; व तीं दोघे बाहेर पडलीं.

ज्येष्ठाष्टमीचा चंद्र आता कलला होता. त्याच्या छायासंकुल प्रकाशात भोंवतालची वनश्री किंचित् उजळलेली पण श्यामल दिसत होती. जणूं चांदण्याचें शुभ्र विरल दुकूल अंगावर घेतल्यामुळे तिची सावळी कांति खुलून दिसत होती. वाऱ्याच्या गार झुळका सावल्यांशीं खेळत होत्या. जिथें झाडाची दाट छाया पडून रस्ता अजिबात दिसत नसे, तिथें अभय हातातल्या उद्दीपिकेच्या प्रकाशाचा झोत पाडी. पचमढीच्या त्या टोंकापासून पुढें सगळें जंगलच असल्यामुळें आणि पावसाच्या एक-दोन सरी नुकत्याच पडून गेलेल्या असल्यामुळें, नाहीं म्हटलें तरी अंधारातून जाण्यात धोका होता. शिवाय, छोट्या महादेवाजवळ रानगवे आले असल्याची हूल उठली असून, एका मड्याच्या बंगल्यावरील रखवालदारानें तडवा दिसतांच हातातली बंदूक टाकून पळ काढल्याचीहि बातमी वृत्तपत्रातून फडकली होती.

सुमारें फर्लांग दीड फर्लांग चालून गेल्यावर अनघा म्हणाली—

" आतां परत जाऊं या. आपण पुन्हा एकदा या चांदण्यात अंधकोह पाहावा असं मनात येतंय माझ्या---"

" का बरं ? एकदा पाहून समाधान नाहीं झालं ?--"

" जसा धूपगड कितीहि वेळा पाहिला तरी समाधान होणार नाहीं, तसंच अंधकोहाचंहि आहे. धूपगडाची भव्यता आणि अंधकोहाची भीषणता या सारख्याच आकर्षक वाटतात मला. धूपगड हा उग्र पण भव्य, तर अंधकोह हा भीषण पण रम्य. भीषणतेतहि एक प्रकारचें सौंदर्य असतं हें अंधकोह बघितल्यावर प्रथमच प्रत्ययाला आलं माझ्या. मृत्यु हा भीषण पण शांत आणि सुंदर असतो, असं रवींद्रानीं म्हटलं आहे. त्याच्या त्या भीषण पण शांत सौंदर्याची कल्पना ती दरी पाहून पहिल्यांदाच आली मला--"

" का बरं ? शिखर-सिंघणापूरला आपण शिवरात्रीच्या वेळीं गेलों असता आदल्या रात्रीं देवळाच्या तटावर उभं राहून जो देखावा पाहिला, तोहि भयानक पण रमणीय नव्हता का ?--"

" हो. मला आठवण आहे त्या प्रसंगाची. पण, ती कृष्णपक्षातली रात्र होती, म्हणून भयानक वाटला तो देखावा. उलट, वैशाखीच्या ज्या प्रखर चांदण्यात निश्चल डोंगर पाहून ध्यानस्थ बुद्धदेवाच स्मरण मनाला व्हावं, त्या चांदण्यातहि अंधकोहाच्या दरींत जेव्हा मीं डोकावून पाहलं, तेव्हा काटा उभा राहिला अंगावर माझ्या--"

" त्याचं कारण ती महादेवानं हाकून लावलेल्या नागाची दंतकथा. त्या कथेचा जो परिणाम तुझ्या मनावर झाला, त्यामुळं तुला अंधकोहाविषयीं धास्ती बसली आहे एक प्रकारची. त्या दरीची स्वाभाविक भीषणता त्या दंतकथेमुळं शतगुणित झाली आहे—"

" असेल. पण तरीसुद्धां तो पुन्हा एकदा पूर्णिमेच्या रात्रीं पाहायचा आहे मला—"

" आतां वटपौर्णिमेच्या रात्रीं पाहूं आपण पाऊस नसला तर--"

इतक्यांत समोरून काहींतरी गेल्याचा भास त्याला झाला. म्हणून, झटदिशीं त्याने ज्या दिशेला पानें वाजलीं, त्या दिशेला प्रकाशाचा झोत फेकला. तों उडया मारीत पळत चाललेला करडा ससा त्याच्या दृष्टीस पडला. त्याबरोबर त्याला बिलगलेली अनघा उद्गारली--

" खरंच, एकाद वेळीं तेंडवासुद्धा भेटायचा रस्त्यांत--"

" भेटेलहि कदाचित्. मधल्या वादळी पावसामुळं जंगल हलून गेलंय सगळं. त्यामुळं आता प्राणी निघताहेत बाहेर एकामागून एक. त्यातून आपला बंगला अगदीं एकीकडे डोंगराच्या उतारावर आहे. एखाद दिवशीं तेंडवा आपल्या व्हराड्यात देखील येऊन उभा राह्यचा !--"

तो हंसत हंसत उद्गारला आणि एका हातानें तिला लपेटून घेऊन त्यानें जलद चालावयाला सुरुवात केली.

बंगल्याच्या आवारात शिरतांना ती म्हणाली—

" फार सुखात गेले नाहीं आपले दिवस पचमढीला ? खरोखरी, निरूचे उपकार आहेत हे--"

" मला दुःखात गेलेल्या दिवसातसुद्धा सुखाच्या शलाका दिसतात, अनू. कारण, सुखदुःखाच्या सर्व अवस्थातून पार पडल्याशिवाय जीवनाला गाढता, माधुरी आणि उदात्तता येत नाहीं, असं वाटतं मला. आपल्यावर जे दुःखाचे अनेक प्रसंग आले, त्यामुळंच खरोखरी एकमेकाच्या हृदयाची ओळख आपल्याला पटून, आपल्यात तादात्म्य उत्पन्न झालं. तें तादात्म्य हा जीवनाचा गाभा आहे आपल्या—"

ते आवारात येतांच उजव्या हाताला असलेल्या मोगऱ्याच्या ताटव्याचा बहर त्याच्या दृष्टीस पडला. आता पूर्ण फुललेली ती मोगऱ्याचीं पांढरीं शुभ्र फुलें जमिनीवर पडलेल्या चांदण्याच्या कवडशांकडे पाहून जणूं तुच्छतेनें हंसत होतीं. त्याच्या सुगंधाचा मादक दरवळ श्वासाबरोबर मस्तकांत

जाऊन भिनताच अनघाला तीं फुलें तोडण्याचा मोह अनावर झाला ; व ती झटकन् त्याचा हात बाजूला करून त्या ताटव्याजवळ गेली.

"रात्रीच्या वेळीं फुलं तोडूं नयेत हें महीत आहे ना तुला, अनू ? शिवाय तुझ्या वेणीवर सगळा बगीचा धमलाच आहे कीं आधीं येऊन—"

तोंच त्या ताटव्याच्या कडेला काहीं तरी सळसळल्यासारखा आवाज झाल्यामुळें अभयनें एकदम प्रकाशाचा झोत त्या बाजूला टाकला आणि तो जोरानें उद्गारला—

"माझी ती पोलादी मुठीची काठी आण बरं आधीं, अनू—"

"कां ?—"

"तें विचारूं नकोस. काहीं न बोलता काठी आण प्रथम जल्दी—"

तिनें त्वरेनें आत जाऊन काठी आणली.

तो हातांत उद्दीपिका घेऊन एका विशिष्ट ठिकाणीं प्रकाशाचा झोत पाडीत अचल उभा होता. तिच्या हातातली काठी घेऊन तो तिला म्हणाला—

"हा टॉर्च असाच हातांत घेऊन तू उभी रहा इथं. बिलकूल हलूं नकोस जागची—"

तिच्या हातीं त्यानें टॉर्च दिला आणि त्या ताटव्याच्या कडेला पडलेल्या प्रकाशात दणादण काठीचे घाव घातले.

त्या घावाचा आवाज ऐकून नचिकेत, निरुपमा आणि फगवा तिघें धांवतच बाहेर आलीं.

नचिकेतनें आपल्या हातांतल्या उद्दीपिकेचा प्रकाश, अभय घाव घालीत होता, त्या जागेवर पाडला.

तो एक पांच–सहा फूट लांबीचा मोठा थोरला केसाळ नाग छिन्न-विच्छिन्न होऊन पडलेला त्यांना दिसला.

अभय हातातली काठी तिथेंच टाकून मागें फिरला.

त्याचें कपाळ घामानें डबडबून गेले होतें.

फगवा त्या नागाच्या अगदीं जवळ गेला आणि तत्क्षणींच मागं वळून उद्गारला—

"साहेब, हें काय केलंत आपण ? अरेरे, घात झाला अगदीं—"

"काय झालं, फगवा ?—"

निरुपमानें त्याला घाबऱ्या घाबऱ्या विचारलें.

"ताईसाहेब, हा साधासुधा नाग नव्हे. हा या जायदादीचा रक्षक, आमच्या मालकाचा मूळ पुरुष आहे. गेलीं वीस वर्षे मी पाहातोंय याला. हा कधीं कुणाला डसलला नाहीं. पावसाळ्यात बंगला रिकामा असला, म्हणजे हा आंतसुद्धा येऊन बसत असे केव्हा केव्हा; नू मग आम्हीं दूध घालीत असूं याला. अरेरे, मालकाना कळलं, तर ते काय म्हणतील आम्हाला ?—"

"पण, हा तोच नाग कशावरून, फगवा ?—"

अभयनें कपाळावरला घाम पुशीत त्याला विचारलें.

"तोच नाग आहे हा, साहेब. आम्हीं नेहमीं पाहात होतों ना याला. या बंगल्यासंबंधीं अशी आख्यायिका आहे कीं, आमचे मालक हे पचमढीच्या मूळच्या नागराजाचे वंशज असल्यामुळें इंडकिंहमधला एक ना एक नाग येथें येऊन या जायदादीचं रक्षण करतो—"

"बरं, आतां झालं तें झालं. मला काय कल्पना हा नाग इतका निरुपद्रवी आहे याची ! मीच कळवीन उद्या मालकाला तुझ्या—"

"तें झालं, साहेब. पण याचा परिणाम काहीं चागला होणार नाहीं. आतां मी याची पूजा करून पुरून टाकतों याला—"

अभय काहीं बोलला नाहीं.

ते सर्व आत आल्यावर तो म्हणाला—

" काहीं तरी विचित्र समजुती असतात या जंगली लोकांच्या. हा म्हातारा, दांत पडलेला नाग असल्यामुळं डसत नसेल कदाचित्. पण म्हणून त्याला मारल्याबद्दल वाईट कशाला वाटायला हवं इतकं ?—"

" तो मूळपुरुष आहे म्हणतात ना इथला ?—"

" या सगळ्या कविकल्पना आहेत, अनू ! तूं संस्कृत पंडित असल्यामुळं तुला असल्या खुळचट कल्पना तेव्हाच खऱ्या वाटूं लागतात. माणसाचा पूर्वज काय कुठं नाग होत असतो का मेहयावर ! उत्क्रांतितत्त्वाच्या अगदीं उलट गोष्टीवर विश्वास कसा बसतो तुझा ?—"

" पण तुम्ही उगाच मारलात त्याला —"

" उगाच ? चांगला सळसळत होता तो. मीं प्रकाश अंगावर टाकताच फणा काढली त्यानं. तो डसला असता आपल्याला म्हणजे मग ? तूं म्हणशील फगवा आला असता मंत्र घालायला—"

" मी काहीं म्हणत नाहीं. पण माझ्या मनाला अगदीं उदास, अगदीं अस्वस्थ वाटतंय तें मघाचंच सगळ बोलणं ऐकल्यापासून —"

" बायका कितीहि शिकल्या तरी भोळ्या न् भित्र्या असतात, हेंच खरं. पण आता निजू या आपण. उद्या सकाळीं निजून उठल्यावर आठवण नाहीं राह्यची तुला या प्रसंगाची—"

" तसं खरोखरीच व्हावं अशी इच्छा आहे माझी, अभय—"

तिनें त्याला बिलगून करुण स्वरांत म्हटलें.

पण झालें मात्र अगदीं उलट.

पहांटच्या सुमारास ती दचकून ओरडत उठली—

—तो अगदीं गाढ झोंपेंत होता—

पण, तिच्या तोंडचा तो "नाग! नाग!" असा आर्तरव कानावर आदळताच तो उठला आणि तिचा हात धरून म्हणाला—

"काय झालं, अनू? का ओरडत उठलीस? भ्यालीस का स्वप्नात?—"

ती प्रथम काहीं बोलली नाहीं. अगदीं निपचित पडली होती. फक्त तिच्या मिटलेल्या डोळ्यातून पाणी वहात होतें.

त्यानें हळूच तिला आपल्या मांडीवर घेतली. त्याबरोबर तिच्या अंगाचा उष्णता त्याला एकदम जाणवली. पण, त्याच्या मनात आले, ती उष्णता म्हणजे तिनें अंगावर घेतलेल्या रगाची ऊब असावी. तिचें तोंड कुरवाळीत तो तिला म्हणाला—

"अनू, काय झालं ग इतकं भ्यायला? मीं तुला जवळ घेतली आहे ना आता?—"

तिनें एक उसासा टाकला आणि म्हटलें—

"फार भयंकर स्वप्न पडलं मला—"

"काय पडलं स्वप्न?—"

"तुम्हीं काल मारलेला तो नाग!— तो स्वप्नांत आला, काहीं तरी फुस्कारत माझ्याशीं बोलला न् त्यानं कडकडून दंश केला माझ्या पायाला. त्याबरोबर ओरडत उठलें मी—"

"काल रात्रीं निजतांना जें तुझ्या मनांत आलं होतं ना, तें दिसलं तुला स्वप्नात. दुसरं काहीं नाहीं—"

"तुम्ही म्हणता ते खरं असेल, अभय. पण, आज काहीं अंथरुणावरून उठायचं त्राण नाहीं उरलेलं माझ्या अंगात—"

"तूं हट्टानं तो धूपगडाचा सुळका पायीं चढलीस, त्याचा परिणाम आहे हा सारा—"

"कुणाला ठाऊक कशाचा परिणाम आहे तो! पण, त्या नागानं दंश करून माझी सगळी जीवनशक्ति दूषित, शोषित करून टाकली, असं वाटतंय मला—"

# ४

आज ज्येष्ठाची पुनव. चंद्राचें मोठें थोरलें पिवळें गरगरीत बिंब पूर्वेच्या धूसर क्षितिजावर हळूहळू चढत होते संधिप्रकाश अद्याप कायमच होता. त्यामुळे तें बिंब फिकट, निष्प्रभ दिसत होतें. विशेषत: पश्चिम क्षितिजावर गडगडणाऱ्या काळ्याभोर ढगात दडलेली वीज जेव्हा मध्येंच लखलखत उफाळून तळपे, तेव्हा तो क्षीण होत चाललेला संधिप्रकाश आणि तें पांडुर चंद्रबिंब हीं दोन्हीं तिच्या दशदिशाना उजळणाऱ्या लखलखाटात लोपून गेल्यासारखीं वाटत. वाऱ्याच्या झुळका सारख्या वहात होत्या. पण दिवसभर तापलेल्या आणि मृगवर्षासाठीं आसुसलेल्या गिरिराजीचे मंदोष्ण उसासे वाटत होते ते !

"मला जरा बगीचांत घेऊन चलता का ? तिथं तलखली कमी होईल अंगाची; न् चांदण्यांत पाठींतल्या वेदनाचाहि विसर पडेल मला—"

"पण अनू, चंद्र उगवला असला तरी चादणं पडलेलं नाहीं अजून—"

"पण मला बाहेर न्यायला काय हरकत आहे ?—"

"हरकत कांहींच नाहीं—"

अभयनें नचिकेत आणि फगवा यांच्या मदतीनें तिची खाट बाहेर आणली. त्याबरोबर ती उद्गारली—

"किती बरं वाटतंय आतां ! चंद्र समोर दिसतोय आणि फुलांचाहि सुगंध येतोय—"

"अक्का, तूं हें बूर्नव्हिटा घे थोडंसं. बरं वाटेल तुला—"

"मला नको तें. गरम असेल बहुतेक—"

" नाहीं ग. मी अगदीं थंड दुधात तयार करून आणलंय. तूं घेऊन तर पाहा एक दोन चमचे—"

निरुपमानें बूर्नव्हिटा चमच्या चमच्यानें तिच्या तोंडांत घातलें. दहा बारा चमचे घेतल्यावर ती म्हणाली—

" नको; पुरे आतां. मग तासाभरानं घेईन वाटलं तर पुन्हा—"

आणि तिने खाटेजवळ उभ्या असलेल्या अभयला म्हटले—

" तुम्ही जवळ बसा ना माझ्या—"

अभय हळूच खाटेवर बसला आणि त्याने तिचें मस्तक आपल्या मांडीवर घेतलें.

आपल्या कपाळावर असलेला त्याचा हात आपल्या हातात घेऊन ती म्हणाली—

" सकाळपासून सारखं मला असं वाटतंय कीं, वेदनांव्यतिरिक्त आपलं शरीर म्हणून काहीं शिल्लक उरलेलं नाहीं आता. माझं अस्तित्व इतकं काहीं वेदनामय होऊन गेलंय कीं, मृत्युच आतां सोडवील मला या असह्य दुःखातून—"

" तुला मॉर्फिया द्यायला सांगूं का डॉक्टरांना ?—

" नको. मीं ठरवून टाकलंय कीं, कितीहि वेदना झाल्या, तरी मॉर्फियाचं इंजेक्शन काहीं घ्यायचं नाहीं—"

" असा भलताच हट्ट काय म्हणून ?—

" भलताच हट्ट नाहीं. मी आपल्या मनाशीं अगदीं पूर्ण विचार करून ठरवलंय. मला मरण यायचंच असलं, तर तें शेवटल्या क्षणापर्यंत तुमच्याकडे पाहात, तुमच्याशीं बोलत, तुमचं स्पर्शसुख अनुभवीत यावं, अशी इच्छा आहे माझी. मी मॉर्फिया घेतला, तर कदाचित् बेशुद्धींत मरण येईल मला. तो संज्ञाशून्य, निर्बुद्ध मृत्यु नको मला—"

" पण हें बोलताना इतराचा विचार केला नाहींस तूं, अनू. तुला या वेदनांनीं तळमळतांना पाहून आमच्या जिवाची जी तळमळ होते, ती नको का लक्षात घ्यायला तूं ?--"

" तें मला समजतं. पण माझ्या आयुष्याचे जे थोडेसे दिवस, कदाचित् थोडेसे क्षण आता उरलेले असतील, ते तुमच्या सान्निध्याचा सुखास्वाद घेत घालवायची इच्छा आहे मला. मृत्यूच्या भीषणतेतलं तेवढं तरी सुख अनुभवूं दे मला. म्हणून मी मॉर्फिया घेणार नाहीं. तुम्ही आग्रह नका करूं--"

" माझा आग्रह नाहीं. फक्त इच्छा आहे—"

" पण यापुढं माझी इच्छा पूर्ण केली पाहिजे तुम्हीं--"

तो काहीं बोलला नाहीं. तिचे गरम, रोड, मऊ हात आपल्या हातात घेऊन तो हळूहळू दाबीत होता.

" मला एकाच गोष्टीच वाईट वाटतं, अभय—"

" कोणत्या ?—"

" मी तुम्हाला सुख देऊं शकलें नाहीं—"

" खोटी आहे ही तुझी समजूत—"

" त्याहिपेक्षा आणखी एका गोष्टीचं दुःख जास्त वाटतं मला—"

" कोणत्या गोष्टीचं ?—"

" तुम्हांला मी पुनर्जन्म देऊं शकलें नाहीं या गोष्टीचं—"

" तेंहि तुझं दुःख अनाठायीं आहे, अनू. आपल्याला मूल नाहीं याबद्दल कधींहि खेद वाटला नाहीं माझ्या मनाला. माझे आवडते विद्यार्थी हींच मी मुलं समजतों आपलीं—"

" तुमचीं असतील; पण माझीं मुलं नाहींत तीं. तुमच्यापासून त्या विद्यार्थ्यांनीं विद्या घेतली, संस्कार घेतले, स्फूर्ति घेतली, अनुभव घेतला; न् त्यांच्या जोरावर ते तुमची कीर्ति, तुमच्या कार्याची परंपरा, तुमच्या संशो-

धनाच वैशिष्ट्य पुढं चालवतील हें खरं. त्या दृष्टीनं तुमचे विद्यार्थी ही तुमची मानसप्रजा आहे, बौद्धिक संतानं आहेत; पण ते माझीं मुलं नाहीं होऊं शकत—"

तो कांहीं बोलला नाहीं.

ती कांहीं क्षण थांबून नंतर पुन्हा म्हणाली—

"हाच फरक आहे अभय, पुरुष आणि स्त्री याच्यामध्यें. पुरुष हा बुद्धिप्रभ, बुद्धिजीवी आणि बुद्धिनिष्ठ असतो. त्यामुळं त्याच्या बुद्धीच्या वासना आणि आकांक्षा तृप्त झाल्या, म्हणजे समाधान होतं त्याच; जीवन-साफल्याच्या जाणीवेनं तृप्त होते अस्मिता त्याची तसं स्त्रीचं नाहीं. स्त्री ही जीवनाची धारिणी आणि वाहिनी आहे. मागल्या पिढीपासून घेतलेलं जीवनाच्या सातत्याचं ऋण पुढल्या पिढीपर्यंत पोचविण्यासाठीं ती जन्माला येते. तिच्या जीवनाची सफलता तिला संतति होण्यात, आपल्या प्रिय-कराला पुनर्जन्म देण्यात असते—"

"अनू, तूं उगाच कांहीं तरी बोलून मनस्ताप करून घेते आहेस. तूं जर स्वस्थ पडून रहाशील, तर ताप न् वेदना कमी होतील तुझ्या—"

"माझ्या तापाचा न् वेदनाचा शेवट जवळ आलेला मला स्पष्ट दिसतोय म्हणूनच बोलतेय मी—"

इतक्यात निरुपमा चमेलीचीं आणि मोगऱ्याचीं फुलें घेऊन आली; व तीं सर्व तिनें अनघाच्या उशागतीं दोन्ही बाजूना पसरलीं.

"माझ्यासाठीं बकुळीची वेणी नाहीं आणलीस तूं, ताई?—"

"आणली आहे ना—"

निरुपमा म्हणाली. अभयनें हळूच तिचें डोकें वर उचललें; व निरुपमानें ती बकुळीच्या फुलाची एकावळ तिच्या अंबाड्याभोंवतीं गुंडाळली.

"आज वटपौर्णिमा आहे नाहीं, निरू? सौभाग्याचं मरण यायला आजचा मुहूर्त किती चांगला आहे!—"

निरुपमाचे डोळे भरून आले. ती अश्रु आवरीत तिला म्हणाली—

"असं का भलतंच बोलतेस तूं, अक्का ? तुला पचमढीला मीं काय असं बोलण्यासाठीं आणली का ?—"

"पण इथ महादेवाच्या या रम्य तपोभूमींत, पुनवेच्या चंद्राकडे पाहात, यांच्या मांडीवर, तुम्हा सगळ्यांशी बोलत, जर मला आज मरण आलं, तर त्यांत काय वाईट आहे, निरू ? या विफल, रोगट जीवनाचा निदान अंत तरी मांगल्यांत आणि आनंदांत होईल—"

ती बोलता बोलता हंसली. पण तिचे डोळे मात्र डबडबले होते.

निरुपमा हळूच उठून बाजूला झाली.

"तुम्ही आणखी थोडी वर घेना का मला ? म्हणजे मला चंद्र चांगला दिसेल. याच चंद्रानं सावित्रीला तिचा प्रियकर परत मिळालेला पाहिला—"

त्यानें तिला हळूच वर घेऊन तिचें मस्तक आपल्या छातीवर घेतलें.

"नको. आता चंद्र चांगला दिसतो मला. पण तुमचं तोंड दिसत नाहीं. माझं डोकं पुन्हा मांडीवर घ्या तुम्ही आपल्या—"

त्यानें मुकाट्यानें तिचें मस्तक आपल्या छातीवरून मांडीवर घेतलें.

तिनें त्याच्याकडे पाहिलें आणि त्याचा हात आपल्या हातात घेऊन ती उद्गारली—

"तुम्हाला कितीहि पाहिलं, तरी तृप्ति होत नाहीं माझ्या मनाची, अभय. तुम्ही जन्मोजन्मीं हवेत मला !—"

● ● ●

दुसऱ्या दिवशीं सकाळी चहा झाल्यानंतर अभय नचिकेतला म्हणाला—

"आपली नागपूरला जायची तयारी कर, बेटा. माझीं पुस्तकं, ट्रिंक नू कपडे घे बाकीचं सामान आप्पाजी पाठवून देतील मागाहून सावकाश तूं खाऊन घे थोडंस नू मग निघूं आपण लगेच—"

नचिकेतनं त्याचा तो निर्णय निरुपमाला सांगितला. काल रात्रभर झालेलें जागरण, मनस्ताप आणि दगदग हीं लक्षात घेतां त्यानें आज दिवसभर विश्रांति घेऊन उद्या नागपूरला जाणें इष्ट होईल, असें तिच्या मनात आलें; व तिनें नचिकेतला तें बोलूनहि दाखविलें.

पण अभयला तसें कांहीं म्हणण्याचा त्या दोघानाहि हिय्या झाला नाहीं.

त्यानीं जाण्याची सर्व तयारी केली. ओव्हलटिन आणि चहा यानं भरलेले थर्मास, पाण्याचा खुजा आणि थोडे फराळाचें सामान निरुपमानें त्याच्याबरोबर दिलें; व ते सायंकाळपर्यंत नागपूरला पोचत असल्याबद्दल तिनें त्याच्या नोकराला तारहि केली.

स्नान झाल्यावर अभयनें नेहमींप्रमाणें चहा न घेता मीठ घातलेलें लिंबाचें सरबत घेतलें. पण, जे खाण्याचे ताजे पदार्थ निरुपमानें टेबलावर आणून टेवले होते, त्याच्याकडे त्याने ढुकूनहि पाहिले नाहीं. मात्र तो नचिकेतला म्हणाला—

" आपल्याला महा सात तास सारखा प्रवास करायचाय. तेव्हा तूं पोटभर खाऊन घे, बेटा. तुझं आटपलं म्हणजे निघूं आपण—"

तो स्वतःच मोटर चालवीत होता. तामियाला आल्यावर तो तेथील रेस्ट हौसमध्यें थाबून थोडा वेळ विश्रांति घेईल, अशी नचिकेतची अपेक्षा होती. पण त्याने कुठेच वाटेत गाडी थाबवली नाहीं. घाटातून जातांनाहि तो इतक्या वेगानें गाडी चालवीत होता की, नचिकेतला सारखें वाटे, नेहमी संथपणानें गाडी चालविणारे डॉक्टर आजच इतक्या वेगानें का चालले आहेत ? आपल्या असह्य मनोवेदनाचा विलक्षण आवेग आवरून धरण्यासाठीं तर त्यानीं गाडी इतक्या वेगानें चालविली नसेल ना ? किंवा गाडीच्या वेगात व्यग्र झाल्यामुळें त्याच्या प्रमाथी मनाला आपल्या दुःखावेगाचा विसर पडत असेल ?

नचिकेतच्या मनात किती वेळां तरी आले, थर्मासमधला चहा किंवा ओव्हलटिन काढून त्याला प्यावयाला द्यावें. काल चंद्रोदयानंतर अनघाची

तळमळ सारखी वाढतच गेल्यामुळें तो तिच्याजवळून अजीबात हलला नाहीं; व सकाळीं चहाच्या वेळींहि त्यानें बिस्किटालासुद्धां हात लावला नव्हता. त्यामुळें नचिकेतला सारखें वाटे, त्यानें जर आता काहीं तरी घेतलें नाहीं, तर कदाचित् गाडी चालविण्याचे श्रम असह्य होऊन त्याला ग्लानि येईल. पण गाडींत बसल्यापासून तो एक शब्दहि त्याच्याशीं बोलला नाहीं. त्यामुळें नचिकेतलाहि त्याच्याशीं बोलण्याचे धैर्य झालें नाहीं. तो पाणी तरी प्यावयाला मागेल आणि मग आपण त्याला ओव्हलटीन घ्यायला लावूं, अशी आशा नचिकेतला वाटत होती, पण तीहि व्यर्थ ठरली.

अभय मोटर चालवीत होता आणि नाचिकेत त्याच्या शेजारीं बसलेला होता. पण इतक्या एकाग्र चित्तानें आणि अविचल दृष्टीनें तो गाडी चालवीत होता कीं, हातात असलेलें तें मोटारीचें चाक आणि तो समोरचा रस्ता यांच्याशिवाय दुसरें कांहींहि त्याला दिसत नव्हतें, दुसऱ्या कशाचेंहि भान त्याला नव्हतें. इतका अबोल, इतका अतृप्त, इतका अखंड, इतका अविश्रांत प्रवास होता तो! मोटारीची गति आणि त्याच्या मनाची गति यांच्यांत जणूं इतकें तादात्म्य झालेलें होतें कीं, त्या गतिव्यतिरिक्त दुसऱ्या कशाचीहि शुद्धबुद्ध त्याला उरलेली नव्हती.

त्याच्या शेजारीं बसलेल्या नचिकेतच्या मनात आलें, आपल्या सान्निध्याची त्याला जाणीवहि नसावी. त्याच्या आणि आपल्यामध्यें जणु सप्तसिंधु पसरलेले आहेत, सप्तशैल आडवे पडलेले आहेत. त्याच्या सान्निध्यात सतत सहा वर्षें घालवूनहि त्याच्या आयुष्यातील असीम दुःखाच्या या अनंत क्षणीं आपण जणू त्याचे कोणी नाहीं, आपली जणु त्याला ओळख नाहीं, आवश्यकताहि नाहीं.

नाचिकेतला आठवलें, ता. २ फेब्रुवारीच्या त्या भयंकर प्रसंगानंतर त्याच्या कॉलेजचे प्रिन्सिपल् जेव्हा अभयला भेटावयाला आले होते, तेव्हां त्याच्या सांत्वनाच्या शब्दाना उत्तर देतांना तो उद्गारला होता, "We must bear our cross meekly and bravely (आपल्या दुःखाचा शूळ आपणच वाहिला पाहिजे,—नम्रतेनें आणि शौर्यानें!) ती नम्रता आणि

ते शौर्य ! हा मोटारीचा अविश्रांत वेग, हा अबोल आणि अतृप्त प्रवास हा त्या मानी नम्रतेचा आणि मूक शौर्याचा द्योतक आहे? कीं जिला अश्रूंनीसुद्धा वाचा फुटूं शकत नाहीं, अशा दारुण मनोवेदनेचा द्योतक आहे?

त्या निःशब्द स्थितींतच सायंकाळीं सहाच्या सुमारास मोटर त्यांच्या पर्णकुटीसमोर येऊन उभी राहिली.

चपराश्यानें धावत पुढें येऊन सलाम केला आणि मोटरचें दार उघडलें.

" माझ्या स्नानाची तयारी कर—"

अभय गाडींतून खालीं उतरताना उद्गारला.

" चहा तयार आहे, साहेब—"

" नचिकेत घेईल. मी स्नान करून निजणार लगेच—"

" कांहीं खाणार नाहीं का?—"

नचिकेतनें मध्येंच त्याला अगदीं नम्रतेनें विचारलें.

" स्नान केल्यावर ओव्हलटिन घेईन आणि मग निजेन—"

तो म्हणाला आणि तडक आपल्या खोलींत गेला.

तो स्नान करून न्हाणीघरांतून बाहेर आला, त्या वेळीं सूर्य मावळून गेला होता; व चंद्राच्या पूर्णकल्प बिंबाची पिवळी कडा समोरच्या क्षितिजावर डोकावत होती.

नचिकेतनें ओव्हलटिननें भरलेली किटली टेबलावर ठेवली. तें कपांत ओतीत असताना अभय त्याला म्हणाला—

" तुला फार दगदग झाली आहे काल संध्याकाळपासून. तूं आतां जेव आणि स्वस्थ झोंप, बेटा—"

चंद्रबिंब आतां वर आलें होतें.

त्याच्या भोंवतालच्या काळ्या ढगांनाहि जणूं सुवर्णकांति लाभली होती

अभयनें समोर पाहिलें आणि उसासा टाकला.

जणूं काल सायंकाळीं याच वेळीं अनघा आपल्या माडीवर मृत्यूची वाट पाहात पडलेली होती, याचें त्याला स्मरण झालें आणि त्याच्या दुःखाला अखेर न कळत वाचा फुटली.

त्यानें ओव्हलटिनचा कप तसाच खालीं ठेवला आणि तो उठला.

ती भरलेली किटली, तो अर्धवट भरलेला कप—

नचिकेतच्या डोळ्यांतून टिपें पडूं लागलीं.

अभय तडक आपल्या खोलींत गेला आणि त्यानें दार आतून लावून घेतलेलें नचिकेतच्या कानावर आलें.

दुसऱ्या दिवशीं चहाच्या वेळीं जेव्हा अभय बाहेर आला, तेव्हा त्याची मुद्रा नेहमींसारखीच शांत आणि प्रसन्न आहे, असें नचिकेतला वाटलें.

चहा घेताना तो नचिकेतला म्हणाला—

"मी आता कॉलेजांतून जाऊन येतों एकदा. दुपारीं जेवण झाल्यावर नेहमींप्रमाणं कामाला लागायचं हं आपण! आज हवा छान आहे नाहीं? काल रात्रीं सर येऊन गेली का एखादी पावसाची?—"

"हो. पहाटच्या सुमारास पाऊस पडला थोडासा—"

"खरं ना? मला अशी गाढ झोंप लागली होती कीं, एकदम सकाळींच जाग आला बघ मला—"

त्यानें हसून म्हटलें आणि तो उठला.

नचिकेतच्या मनांत आलें, पचमढीला बाईचे जे अनेक फोटो आपण घेतलेले आहेत, त्यातला कोणता डेव्हलप् करून त्याच्या टेबलावर ठेवाना, हें विचारावें आता त्याला—

पण त्याला धीर झाला नाहीं.

कॉलेजांतून परत आल्यावर अभय जेवला आणि जो कामाला बसला, तों सायंकाळी चार वाजले तरी खुर्चीवरून उठला नाहीं.

अखेर पाचच्या सुमारास नचिकेत म्हणाला—

" चहा आणून ठेवलाय पलिकडल्या टेबलावर. तुम्ही येता ना ?—"

तो लिहीत होता. त्यानें वर न पाहातांच म्हटलें—

" आलोंच मी. पण बाई कुठं आहेत ? बाईंना बोलाव— "

नचिकेत स्तब्ध उभा होता.

अभयनें वाक्य पूर्ण करून हातातलें पेन खालीं ठेवलें आणि वर पाहिलें.

नचिकेतचे डोळे भरून आले होते.

अभयनें एक उसासा टाकला आणि तो जणूं तो स्वतःशींच उद्गारला—

" Yes, I forgot. I am alone in this house now. ( हो, मी विसरलोंच. आतां मी एकटाच आहे या घरात ! )—"

• • •

पचमढी, वटपूर्णिमा
१९४९

This is [illegible] something of psychology and politics also. The most admirable [illegible] the book [illegible] style of writing. Really it is a good picture of [illegible] characters. [illegible]